म. ग्रं सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. 3284



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

20 APR 1988

20 APR 1988

14 MAY 1988

2 MAY 1988

15 JUN 1988

25 SEP 1988

22 FEB 1989

12 JUL 1989


19 JUL 1989

29 NOV 1989

14 DEC 1989

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

संदर्भ निबंध
३२८८
२५५३८
१३१८८



REFBK-0025538

बलुतं

एक वादळ

-दया पवार

प्रादेशी ग्रंथ संग्रहालय
३२८८
२५५३८
निबंध १३१८८

बलुतं

एक वादळ

– दया पवार

प्रकाशक: मनोहर चंपानेरकर
रोहन प्रकाशन
ए ३/५ सुंदर नगर, मालाड, मुंबई - ६४

प्रकाशक : मनोहर चंपानेरकर
रोहन प्रकाशन
ए ३/५, सुंदरनगर, एस. व्ही. रोड
मालाड (प.), मुंबई–४०००६४

© सौ. हिरा पवार
२–डी 'स्वरूप', सुभाषनगर,
गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०००६३
प्रथमावृत्ती : नोव्हेंबर, १९८७


मुखपृष्ठ : सुभाष अवचट
सजावट : अशोक चव्हाण
मुखपृष्ठ छपाई : मौज

मुद्रक : सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ, पुणे ४११०३०

किंमत : रुपये ४५/- (Rs. 45/-)

माझ्या असंख्य वाचकांना

सादर



अंतरंग

प्रकाशकाचे निवेदन / ५–६

कैफियत / ७–४२

पुरस्कार / ४३–७०

शालजोडी / ७१–१०६

घरचा अहेर / १०७–१३९

प्रकाशकाचे निवेदन

' बलुतं ' हे दया पवार ह्यांनी लिहिलेले आत्मचरित्र कानाकोपऱ्यातून गाजलं. अनेकांनी वेगवेगळ्या कारणांनी पुस्तकावर आक्षेप घेतले. काहींना पुस्तक फार फार आवडलं. काहींना बलुतं म्हणजे एक खोटं नाटक वाटलं. काहींना ' बलुतं 'मुळं समाजाची उन्नती न होता अवनतीच होईल असं वाटलं. अनेक दृष्टिकोणांतून वाचकवर्ग पुस्तकाकडे बघू लागला. काही व्यक्तींना असं वाटलं की जाणूनबुजून दया पवार ह्यांनी ' बलुतं ' वाईट शब्द वापरून, अश्लिलतेचा पाठिंबा घेऊन लिहिलं. काहींच्या मते दलित समाजाचं साकार दर्शन दया पवार ह्यांनी निर्भिडपणे केलं आणि वास्तवतेचं दर्शन घडवलं. स्तुती-प्रशंसेची भरपूर पत्रे आली. निंदा-टीकेचीही विपुल पत्रे आली ह्या पत्र लिहिणाऱ्यांमध्ये दलित समाजातील व्यक्ती आहेत, तसेच उच्चस्तर सुशिक्षित वर्गाचेही लोक आहेत. त्याचप्रमाणे अनेक नामवंत साहित्यिकांचाही समावेश आहे. काही पत्र-लेखकांनी स्तुती आणि निंदा ह्यामधील सुवर्णमध्य साधून पत्रे लिहिली आहेत. एकूण ह्या पुस्तकावर ह्या दहा वर्षांत खूप चर्चा होत राहिली.

' बलुतं ' मुळं दया पवार ह्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली, पैसा मिळाला, पारितोषिके मिळाली. ' बलुतं ' पुस्तकाच्या मराठीत आतापर्यंत चार आवृत्त्या निघाल्या. शिवाय त्याचे हिंदी, इंग्रजी आणि इतर भाषांमध्येही भाषांतरे होत आहेत.

तरीसुद्धा अजून ' बलुतं 'विषयीचे मतभेद चालूच आहेत. म्हणून हातच्या कंगणाला आरसा कशाला ह्या दृष्टिकोणातून ' **बलुतं–एक वादळ** ' ह्या पुस्तकाची निर्मिती ' **रोहन प्रकाशना** 'तर्फे होत आहे. त्यांना आलेल्या अनेक पत्रांचा परामर्श हाच ह्या पुस्तकाचा गाभा आहे. साहित्यिक, दलित आणि इतर सुशिक्षित व्यक्तींकडून आलेली पत्रे जशीच्या तशी येथे देण्यात आली आहेत. ' बलुतं ' ह्या पुस्तकाविषयी जे जे त्यांना आलेल्या पत्रांत लिहिले आहे ते तसेच्या तसे छापत आहोत. परंतु त्यापूर्वीच सुरुवातीलाच त्या त्या पत्रांचा स्वतः दया पवार ह्यांनी सखोल अभ्यास करून, त्या पत्रांचा वेगवेगळा गट करून, सामायिक टीकेला उत्तरे दिली आहेत. त्यावर चर्चा केली आहे.

ही ' चर्चा ' म्हणजेच त्यांची ' **कैफियत** ' होय. नंतर ' **पुरस्कार** ' ह्या सदरात साहित्यिकांची पत्रे आहेत. त्यामध्ये पु. ल. देशपांडे सारखे थोर साहित्यिकही आहेत ' **शालजोडी** ' हे तिसरे सदर आहे. त्यामध्ये मध्यमवर्गीय, सुशिक्षित व्यक्तींची वेगवेगळ्या भागांतून आलेली पत्रे दिली आहेत. चौथा भाग आहे ' दलितांकडून ' आलेल्या पत्रांचा. त्याला ' **घरचा अहेर** ' असा साजेसा मथळा दिला आहे.

अशा तऱ्हेने ' पुरस्कार ', ' शालजोडी ', ' घरचा अहेर ' ह्या तिन्ही सदरांतील पत्रांना दया पवार ह्यांनी कुशलतेने ' कैफियत ' ह्या सदरात त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण लेखणीने उत्तरे सादर केली आहेत. अशा तऱ्हेने ' **बलुतं** ' ह्या पुस्तकावर झालेलं हे ' वादळ ' आहे. स्थलाअभावी काही पत्रे आम्ही देऊ शकलो नाही. तरीही अनेक महत्त्वाची पत्रे घेतली आहेत. शिवाय केवळ स्तुती–प्रशंसेची पत्रे घेऊन पुस्तकाचं ' वादळ ' कसं सिद्ध होणार ? म्हणून जास्तीत जास्त टीकात्मक पत्रे घेण्यात आली आहेत.


दया पवार ह्यांनी आपल्या मनाचा तोल न जाऊ देता, शांततेने टीकात्मक पत्रांचा परामर्श घेतला आहे. हे पुस्तक अनेक दृष्टींनी उपयुक्त व मनोरंजक ठरेल असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

ज्या विद्यार्थ्यांना ' बलुतं ' हे पुस्तक अभ्यासासाठी योजिले आहे, त्या विद्यार्थ्यांनाही हा संदर्भ ग्रंथ म्हणून परीक्षेच्या दृष्टिकोणातून उपयुक्त ठरेल.


— मनोहर चंपानेरकर

कैफियत

साहित्य ग्रंथ संग्रहालय ठाणे
3248
दा. क्र. 99/3८
निबंध
शाळा स्थळ प्रत



कैफियत



'कैफियत' भागात दया पवार ह्यांना 'बलुतं' पुस्तकाच्या संदर्भात जी अनेक पत्रे आली, त्या पत्रांवर त्यांनी संपूर्ण भाष्य केले आहे. त्या पत्रांमध्ये त्यांच्यावर झालेल्या टीकांवर विनयशीलपणे, समतोल अंगिकारून उत्तम तऱ्हेने समाचार घेतला आहे. त्याचप्रमाणे त्यातील स्तुतीने वा प्रशंसेने ते भारूनही गेले नाहीत. — प्रकाशक

२४ डिसेंबर १९७८ रोजी 'बलुतं' प्रसिद्ध झालं. 'ग्रंथाली'ने आजवर 'बलुतं'च्या चार आवृत्त्या प्रसिद्ध केल्या. प्रत्येक आवृत्ती पाच हजार प्रतींची. 'बलुतं' हिन्दीत 'अछूत' या नावानं 'राधाकृष्ण' ह्या दिल्लीतील प्रकाशन संस्थेने प्रसिद्ध केले. त्यामुळे की काय महाराष्ट्राची सीमा ओलांडून 'बलुतं' दूरवर गेलंय. साता समुद्रापलिकडेही 'बलुतं'ची नोंद घेतली गेली. आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून माझ्यावर पत्रांचा वर्षाव झाला. अजूनही ही प्रक्रिया थांबलेली नाही. ह्या पत्रांतील 'काही निवडक' पत्रांचा संग्रह प्रसिद्ध करावा ही 'रोहन प्रकाशन' संस्थेचे प्रकाशक श्री. मनोहन चंपानेरकर यांची इच्छा! त्यांनी अनेकदा माझ्या घरी पायपीट केली. पत्रांचा संग्रह प्रसिद्ध करावा की न करावा या संभ्रमात मी! त्यातील काही पत्रांमुळे पुढे आयुष्यात कोणते मोहोळ उठेल ह्याचीच चिंता. आधीच 'बलुतं'मुळे गुदमरलेली अवस्था! गेल्या काही वर्षांतील काटेरी वाट तुडवताना पाय अनेकदा रक्तबंबाळ झालेत. काहींना हे खरे वाटत नाही. दुरून डोंगर साजरे असेच त्यांना वाटते. पत्रांमुळे कोणत्या चक्री वादळाला तोंड द्यावे लागेल हे काही आज सांगता येत नाही.

गेल्या काही वर्षांत महत्त्वाची काही पत्रे गहाळ झालीत याची तीव्र खंत वाटते. आजही आठवते की वसंत पळशीकर, ताराचंद्र खांडेकर यांची 'बलुतं'च्या संदर्भात पत्रं आलेली. अनेकदा घरभर शोधूनही ती सापडत नाहीत. संग्रहात पत्रे निवडताना केवळ स्तुतीपर पत्रेच निवडलेली नाहीत तर लेखकाची कातडी सोलणारीसुद्धा पत्रे निवडली आहेत. एखाद्या पत्रात सांस्कृतिक, सामाजिक संदर्भ असेल; मला न जाणवणारा एखादा महत्त्वाचा मुद्दा पत्रात असेल तर अशा पत्रांना अग्रक्रम दिला आहे. पुस्तकाचा आकार आटोपशीर असावा म्हणून नाइलाजास्तव काही पत्रांचा समावेश करता आलेला नाही.

'बलुतं'च्या दुसऱ्या आवृत्तीला शेवटी मी एक छोटेसे टिपण जोडले होते. 'बलुतं' प्रसिद्ध झाल्यानंतर जनमानसात नेमकी कोणती प्रतिक्रिया उमटली होती याचा शोध त्या छोट्याशा टिपणात मी घेतला होता. नोव्हेंबर १९८० मध्ये 'बलुतं'ची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली. तेव्हापासून आजवर खूपसे पाणी पुलाखालून वाहून गेले. असे असले तरी त्यावेळच्या मांडणीत आज फारसा फरक पडेल असे वाटत नाही. त्यावेळी मी म्हटले होते की आपला सर्व समाज एका सांस्कृतिक पातळीवर नाही. समाजात भिन्न भिन्न सांस्कृतिक कप्पे, जातिव्यवस्था, संस्कारांमुळे झालेली मानसिक अवस्था .... ह्या सर्वांमुळे दुभंगलेले 'समाजजीवन'. आणि सारासार विवेक, नैतिकता यांची खोटी दडपणे यामुळे साहित्यकृतीचा आस्वाद घेण्याची प्रक्रिया शुद्ध राहिलेली नाही. त्यामुळेच समाजातील वेगवेगळे गट ह्या पुस्तकाकडे वेगवेगळ्या दृष्टीने पाहातात. जेथे धूर निघावा असे वाटत होते, तिथे तो निघालाच नाही. तो धूर भलतीकडेच निघतो आहे.

'बलुतं' प्रसिद्ध होण्याच्या आधी त्यातील काही प्रकरणे 'आयुध' आणि 'पूर्वा' या मासिकांच्या दिवाळी अंकांतून आलेली. १ नोव्हेंबर १९७७ रोजी प्र. श्री. नेरूरकरांचे आलेले पत्र ह्या संदर्भातील पहिले पत्र असावे. 'बलुतं' प्रसिद्ध होऊन पाच-सहा दिवसांचाच काळ उलटला असताना प्रा. प्र. ना. परांजपे यांचे पत्र आले. ही दोन्ही पत्रे आजही 'माइल स्टोन'सारखी वाटतात. 'बलुतं' लिहून आपण फारसे काही चुकलो नाही याचा दिलासा सुरुवातीच्याच काळात मिळाला. गेले काही दिवस बलुत्यावरची पत्रे पुन्हा नव्याने वाचत आहे. सर्व पत्रांचा जेव्हा मी विचार करू लागतो तेव्हा त्यातील घोंगावणारे प्रश्न पाहून मी चक्रावून जातो. एक प्रचंड 'कोलाज' माझ्यासमोर उभे आहे. आणि त्या अक्राळविक्राळ चित्रापुढे मी दडपला जातोय असे सारखे वाटते आहे त्यातील सर्वच प्रश्नांची उत्तरं देऊ शकेन की नाही याबद्दल मी साशंक आहे. पत्रांची वर्गवारी करताना काही संकल्पना मनाशी निश्चित केल्या आहेत. दलितातील आजचा सुशिक्षित वाचकवर्ग, दलित साहित्यिक, विचारवंत आणि कार्यकर्ते हा एक वर्ग. नंतर मध्यमवर्गीय पांढरपेशे वाचक आणि शेवटी लेखक, समीक्षक आणि विचारवंत 'बलुतं'कडे कोणत्या दृष्टीने पाहातात हे शोधण्याचा एक अल्पसा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून, समाजातील सर्व थरांतून जशी पत्रे आली आहेत, तशी

काही पत्रे गोवा व कर्नाटकमधूनही आली आहेत. 'बलुतं' हे हिंदीमध्येही भाषांतरीत झाल्यामुळे हिंदीतील एक श्रेष्ठ कवी 'गिरीधर गाठी' यांचे दिल्लीहून पत्र आले आहे. हनुमंत मनगटे यांचे छिंदवाडा (मध्यप्रदेश) येथून पत्र आले आहे. यशवंत कानेटकर यांनी 'बलुतं' वाचून आपली प्रतिक्रिया खास अमेरिकेहून लिहून पाठवली आहे. दलितांतील सुशिक्षित पांढरपेशा मंडळींनी जी पत्रे पाठवली आहेत, त्यात एका स्त्रीचा अपवाद वगळता सर्वच पत्रे पुरुषांनी लिहिलेली आहेत. ज्या स्त्रीने पत्र लिहिले, तिचा शोध घेतला असता ते तिच्या नवऱ्यानेच लिहिले असे कळले. (या पत्राचा खुलासा पुढील चर्चेत येईलच.)

आंबेडकर चळवळीतून शिक्षणाचे जे लोण खेड्यापाड्यापर्यंत पसरले त्यातून दलितांची एक नवी पिढी सुशिक्षित झाली आहे. पुरुषांच्या प्रमाणात दलित स्त्रीचे शिक्षणाचे प्रमाण कमी असले तरी महाराष्ट्राच्या काही मोठ्या शहरातून फार मोठ्या प्रमाणात दलित स्त्रिया सुशिक्षित झालेल्या दिसतात. मुंबई, पुणे, नागपूर येथे तर काही दलित-बौद्ध स्त्रिया संघटनेत काम करताना आढळतात. परंतु 'बलुतं'च्या संदर्भात एकाही सुशिक्षित दलित स्त्रीला पत्र लिहावेसे वाटले नाही हे पाहून नवल वाटले.

मध्यमवर्गीय पांढरपेशा स्त्रियांची पत्रे या संग्रहात आहेत. त्यांनी झडझडून, कधी आक्रमकतेने लेखकाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. असे एखाद्या सुशिक्षित दलित स्त्रीला का बरे वाटू नये? त्या शिक्षित झाल्या परंतु त्यांच्यापर्यंत बलुतं गेलेले नाही असे समजायचे काय? मला तर असे वाटते की, त्या कितीही शिकलेल्या असल्या, काही मोक्याच्या जागी कामेही करीत असल्या; तरी पुरुषप्रधान संस्कृतीतून त्यांची सुटका झालेली नाही. एका पुरुषाला (मग तो लेखक का असेना) पत्र पाठवणे ही कल्पना त्यांना असह्य वाटत असावी. पत्र पाठवले तर आपल्या नवऱ्याला अगर वडिलधाऱ्या मंडळींना काय वाटेल या दडपणाखाली बहुधा त्या वावरत असाव्यात. पुण्याच्या 'स्त्री वाणी' संघटनेने दलित आत्मकथनातील स्त्रियांच्या प्रश्नांचा शोध घेतला. त्यांना 'बलुत्या'त एकशेएकोणीस स्त्रियांचा उल्लेख आहे असे आढळले. एका अभ्यास गटाने असे मत व्यक्त केले : आजच्या दलित स्त्रीला आपण ज्या भूतकाळातून आलो, तेथील स्त्रियांचे प्रश्न हे आपले प्रश्न वाटत नाहीत काय?

या उलट काही दलित पुरुषांच्या पत्रांतून अडाणी असलेल्या स्त्रियांची मानसिक व्यथा 'बलुत्या'च्या संदर्भात व्यक्त झाली आहे. गोव्याहून श्री. बेले लिहितात, "माझी आई अंगठाबहादर; पण ती देखील 'हीच पुस्तकं मला वाचून दाखव' अशी म्हणायची. तिला 'बलुतं' पाचदा वाचून दाखविली. अक्षरशः रडायची! पुस्तकातील काही प्रसंग जेव्हा तिला चटका देत, तेव्हा तर ती सुन्न व्हायची. बिचारी आई, ती पण पूर्वीचे दिवस आठवायची. म्हणायची, 'बेटा, आम्ही फारच त्रास घेतला. पण तुम्ही घेऊ नका.'" ठाणे जिल्ह्यातून केशव हंडोरे लिहितात, "सध्या बलुतं माझी सौ. वाचत आहे. ती कोणत्याही शाळेत शिकली नाही. लिहिता येत नाही

पण वाचू शकते. जोडाक्षरांच्या दगडावर ठेचाळते. मी जवळ असलो तर मलमपट्टी करतो. नाहीतर रक्ताळलेली ठेच वेऊन वाटचाल करते. बलुत्यात अनेक 'महारीव' शब्द असल्यामुळे तिला आपल्या घरातच बोलतोय असे वाटते." अडाणी स्त्रियांना हे जे वाटते आहे तसेच सुशिक्षित दलित स्त्रीला का वाटू नये? तिने कडवट प्रतिक्रिया व्यक्त केली असती तरी चालली असती.

२४-१०-१९८१ च्या प्रा. प्र. ना. परांजपे यांच्या पत्रात 'रसिक'च्या दिवाळी अंकातील माधव मनोहर यांच्या लेखाकडे लक्ष वेधले आहे. माधव मनोहर आपल्या लेखात म्हणतात, "दलित लेखक आता खरी-खोटी, बहुतकरून खोटीच आत्मचरित्रे लिहायला लागले आहेत. एका दलित लेखकाने आत्मचरित्र लिहिले. ते दलिताचे म्हणून पुष्कळच गाजले. आणि स्वाभाविकच त्याचे तसे कौतुकही पुष्कळच झाले. या आत्मचरित्राच्या बळावर कर्मधर्मसंयोगाने त्याला उत्तर-लेखनासाठी एक भली मोठी ग्रँट मिळाली. तेव्हा त्याला कोणी विचारले की, "बाबारे, आता तू काय लिहिणार आहेस?" "पुन्हा आत्मचरित्रच" त्याचे उत्तर. "— म्हणजे काय? जे पहिले होते ते आत्मचरित्रच होते ना?"— त्यावर त्याचे उत्तर: "होय, पण ते खोटे होते. आता मी खरे आत्मचरित्र लिहिणार आहे." ह्या मजकुरानंतर परांजपे मला लिहितात, "अशा बेजबाबदार लेखनाला चपराक मिळाली पाहिजे. माझ्या मते तुम्ही अब्रुनुकसानीचा दावा दाखल करू शकाल." पत्रातील परांजपे यांचा सात्विक संताप मी समजू शकतो. मुंबईच्या साहित्य संमेलनात माधव मनोहरांच्या उपस्थितीत जाहीर व्यासपीठावरून लक्ष्मण माने यांनी, "असे म्हणणाऱ्यांनी पुढे व्हावे" असे म्हणून हातात जोडा घेण्याची भाषा काढली होती. माझा स्वभाव मवाळ असल्याने मी अशी हमरीतुमरीची भाषा करू शकत नाही. माधव मनोहरांनी कधीही न पाहिलेल्या जीवनाविषयीची, परदेशी किंवा रशियन लेखकांनी लिहिलेली आत्मचरित्रे त्यांना खरी वाटतात; पण आपल्याच अवतीभोवती असलेले गावकुसाबाहेरचे जीवन त्यांना अनाकलनीय वाटते याला 'दृष्टिभ्रम' म्हणावे काय? झोपेचे सोंग घेतलेल्या माणसाला जागे कसे करावे हाच प्रश्न पडतो, हेच खरे! 'बलुतं' हे आत्मकथन आहे. मला कळू लागल्यापासून ते १९५८ पर्यंतचा कालखंड 'बलुत्या'त चितारला आहे हे अनेकदा सांगून झाले आहे. 'बलुतं'च्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेतही ते मांडले आहे. १९५८ पासून आजतागायत एक गुंतागुंतीचे आणि जटिल असे आयुष्य माझ्यासमोर आहे. त्यातील काही भाग वेगवेगळ्या दिवाळी अंकांत प्रसिद्धही झाला आहे. 'केसरी', 'पुस्तक पंढरी', 'अबकडई', 'दिनांक' हे काही अंक सांगता येतील. या प्रसिद्ध झालेल्या भागाचे मी सहज पुस्तक काढू शकलो असतो. केवळ माझ्या आयुष्याच्या काटाकाटाने हा प्रवास आहे याची मला जाणीव आहे. गेल्या वीस-पंचवीस वर्षांतील आयुष्याचा डोह फार खोल आहे. याची खोली मोजताना माझी अजूनही दमछाक होते. मला वाटते, एका दलित लेखकाचे जे एवढे कौतुक होत आहे, 'भली मोठी' ग्रँट मिळाली आहे त्या

संदर्भातला पोटशूळ माधव मनोहरांसारख्यांच्या अपवादात्मक लेखनातून व्यक्त झालेला दिसतो.

'बलुतं' हे किती बेंबीच्या देठापासून खरं सांगितलेलं आहे याची साक्ष म्हणून अनेक पत्रांचा हवाला देता येईल. 'बलुत्या'त जगलेले काही स्त्री-पुरुष अजूनही जिवंत आहेत. त्यातील काहींनी पत्र पाठवून खरेपणाबद्दल दाद दिली आहे. 'बलुत्या'च्या ६१ पानावर शिरसाट मास्तर यांची कहाणी आली आहे. शिरसाट मास्तर आपल्या पत्रात लिहितात, "आपण माझे स्मरण ठेवून मला वाङ्मयात अजरामर करून ठेवले, याबाबत आभार मान्ण्यासाठी मजजवळ शब्दच नाहीत." मी लहानपणी पाहिलेले शिरसाट मास्तर आजही समाजातील कर्मकांडांविरुद्ध, अंधश्रद्धा व ढोंगबाजीविरुद्ध बंड उभारीत आहेत हे त्यांच्या पत्रावरून दिसते. चावडीतील मेसूआईचा शेंदराचा दगड ते आजही उचलतात. ते पत्रात मिस्किलपणाने लिहितात, "मी मेसूआईशी बोलतो, माणसासारखा मी माणूस, माझी या गावाहून त्या गावाला बदली, आणि पिढ्यान् पिढ्या तू मात्र इथंच ? वारे आई !" असे म्हणून शिरसाट मास्तर मेसूआईची उचलबांगडी करतात. आंबेडकरी चळवळीतील बुद्धिवादाचा, विज्ञान-निष्ठचा असा प्रखर इगळ पाहिला म्हणजे आजचे तथाकथित बुद्धिवादीही चरकतील. धर्मांतराने नेमके काय दिले याचा हा दाखला म्हणून सांगता येईल. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर पुन्हा जैसे थे—दुकान तेच, पाटी बदलली– क्रांतिकारक कणा नाहीसा होऊ लागलाय· शिरसाट गुरुजींसारखी व्यक्ती, चळवळीतील इंगळ—खडे वेचणारे, असे फिनिक्स पक्षी —हाताशी किती राहिलेत हा अंतर्मुख करणारा प्रश्नही सतावतो आहे.

बलुतंमधे पान ८९ वर सखाराम वस्ताद यांची घटना आलेली. कामाठीपुऱ्यात महार-मुसलमानांची झालेली दंगल आठवतेय. कशामुळे ही दंगल उसळली हे मात्र आज सांगता येत नाही. पण दंगलीवेळी पाहिलेला सखाराम वस्ताद आठवतोय. डोक्याची गंजी केलेला, उघडा बंब, धिप्पाड शरीराचा, हातात शिंग घेऊन मुसलमानांच्या मागे लागलेला. आणि मुसलमान गल्लीतून भेदरून पुढं पळत आहेत, गुरं फाडण्याच्या तळपत्या सुऱ्या त्यांच्या हातात आहेत, असं दृश्य दिसत आहे. ह्या तालमीमुळं एक झालं, मुसलमान मंडळींना दलित स्त्रिया म्हणजे भाजीपाला वाटत असत ते त्यापुढे बंद झाले. ते बचकून राहू लागले. सखाराम वस्ताद यांची आठवण यायचे कारण म्हणजे संग्रहात त्यांचेही एक पत्र आहे. संगमनेरहून त्यांनी ते पाठवले आहे, 'बलुतं' लिहायच्या आधी मला भेटला असता तर आणखी महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या असत्या, हे त्यांनी पत्रातून आवर्जून कळवले आहे. त्यांची परिस्थिती वाचून मात्र गलबलून गेलो. गेली दोन तीन वर्षे अर्धांगवायुने ते आजारी होते. त्यांचे निधन झाल्याची बातमी कळली. त्यांचे शरीर लुळे पडले होते. हे त्यांचे चित्र पाहिले म्हणजे खरे वाटत नाही. आंबेडकर चळवळ ही त्या काळात अशा वस्ताद मंडळींनी जिवंत ठेवली. समाज मात्र अशा मंडळींना विसरला ही दुःखाची बोचणी आजही वाटते.

'बलुत्या 'त ज्यांचा उल्लेख आहे त्यांनी आत्मीयतेने पाठविलेली अशी काही पत्रे. बलुत्याचा नायक जेव्हा संगमनेर येथील पेटिट विद्यालयात शिकत होता, तेव्हा तिथे असलेल्या मन्हाळकर सरांचेही पत्र आले आहे. त्यांचे नाव चुकीचे छापले गेले आहे. भराळकर नव्हे मन्हाळकर ही दुरुस्ती त्यांनी सुचविली आहे. तसेच एक पत्र गंधे यांचे चिरंजीव शिरीष गंधे ह्यानी पाठविलेले आहे. त्यांच्या पत्रात बलुत्यातील एका घटनेवर झगझगीत प्रकाश पडला आहे. पुढे यातील पात्राचे काय झाले असावे ह्याची माझ्या एवढीच जिज्ञासा आपल्यालाही असेल. शिरीष गंधे यांच्या पत्रात महार मुलगी आणि ब्राह्मण तरुण ह्यांच्या लग्नाची घटना आलेली. ('बलुत्या 'त पान ११२ वर आलेली घटना अशी :

" संगमनेरात त्या काळी एक आंतरजातीय लग्न मात्र कमालीचं गाजलं. नवरा ब्राह्मण आणि नवरी महार. मुलगी संगमनेर महारवाड्यातली होती. नाव बहुधा हंसा असावं. हंसासारखीच देखणी. हा काही प्रेमविवाह नव्हता. चक्क प्रपोज्ड मॅरेज. हायस्कूलमधे एक ब्राह्मण शिक्षक होते. ते पुरोगामी विचारांचे म्हणून ओळखले जात. नाव देशपांडे. त्यांनी आपल्या एकुलत्या एक मुलाकरिता हंसाला मागणी घातली. गावात खळबळ माजली. काहींना शिक्षक विक्षिप्त वाटले. कुणी म्हणायचे, 'नवरा मुलगा हा टी. बी.नं आजारी. त्याला कुणी जातीत मुलगी देत नाहीत म्हणून ही महाराची सून करायला निघालेत.' लग्न मोठ्या थाटात होतं. कलेक्टर, प्रसिद्ध पुढारी लग्नाला आलेले. लग्नाचा शेवट मात्र दुःखद होतो. एका मुलाला जन्म देऊन नवरा मुलगा गचकतो. पांढरं कपाळ घेऊन हंसा पुन्हा महारवाड्यात येते. "

(वरील घटनेचा हवाला देऊन श्री. शिरीष गंधे पत्रातून लिहितात, " हंसाचा मुलगा हा माझा लहानपणचा जवळचा मित्र. खरे सांगतो, त्या वेळेस हा मुलगा असा जन्मलेला असेल याची काहीसुद्धा कल्पना नव्हती. 'बलुतं 'मधे वाचलं आणि पुन्हा अस्वस्थ झालो. आज संगमनेर सोडून दोन वर्षे झाली. मनोहर कोठे आहे याची कल्पना नाही. त्याने शाळा अर्धवट सोडली असावी. "

ज्या परिसरात दगडूचे बालपण-शिक्षण झाले, तेथून (अहमदनगर, अकोला, संगमनेर) काही पत्रे आलेली. त्यात, 'बलुत्या 'त काही महत्त्वाचा भाग येऊ शकला नाही याची खंत व्यक्त केलेली. अकोले तालुक्यात जंगल सत्याग्रह झाला. याची नोंद नाही याची खंत श्री. चौधरी ह्यांनी व्यक्त केलेली आहे. ज्या सांस्कृतिक वेटावर नायकाचे आयुष्य गेले, त्याच्या परिघापर्यंतच नायक सांगू शकला, ही वस्तुस्थिती आहे. 'बलुतं ' प्रसिद्ध झाल्यानंतर जेव्हा गावी गेलो तेव्हा अनेक बहुजन समाजातील वाचकांनी काही गोष्टी नवीन सांगितल्या. गावाजवळच एक-दीड मैलावर धुमाळवाडी हे गाव. तेथील गोपाळबाबा हे, सावरकर जेव्हा अंदमान येथे काळ्या पाण्याची शिक्षा भोगत होते, त्या काळात अंदमानात शिक्षा भोगत होते. ('बलुत्या 'त मुसलमान फौजदार जाळल्याची जी घटना आहे, त्यातील गुन्हेगार म्हणून गोपाळबाबाला काळ्या पाण्याची

सजा झालेली. हे गोपाळबाबा मी लहानपणी अनेकदा पाहिलेले. पण त्यांचे कादंबरी-सारखे रोमहर्षक आयुष्य तेव्हा समजू शकलो नाही. इतिहासातही सावरकरांवरोबर त्यांचे नाव नोंदवले गेले नाही याचे वैषम्य वाटते.)

('बलुत्या'त दगडूच्या आयुष्यात बालपणात गावकुसाबाहेरचे हलाखीचे जीवन वाट्याला आले, तसेच आयुष्य आमच्याही वाट्याला आले असे अनेक दलित तरुणांनी अगत्याने कळवले. केवळ महारांची विटंबना नव्हती; तर मातंग, चांभार यांच्याही वाट्याला असेच जीवन आलेले. श्री. ठाकळ आपल्या पत्रात लिहितात, "माझंच प्रतिबिंब पानापानांतून दिसते. पण शपथेवर सांगतो, मुंबईचे आपले जीवन वगळता हे असंच मी जगलो.)' बलुतं' वाचताना डोळ्यांतून अश्रू गळत होते. हुंदके अनावर होत होते. आपण चाण्याचा उल्लेख केलात. ते वाचत असताना चाण्या (तोडक्या) शिळ्या भाकरीच्या तुकड्यात मिसळून, तव्यात शिजवून खाल्ल्याची आठवण झाली." आपण जातीने मातंग आहोत हे सांगायला ते विसरले नाहीत. योगेंद्र मेश्राम (नागपूर), जाधव (गोवा), नारायण भुईर (भिवंडी), सर्वोदे (रत्नापूर), भिमसेन देठे (मुंबई) इत्यादी मंडळींच्या पत्रांतून 'बलुतं' आपलंच आयुष्य आहे असा दृष्टिकोण पाहावयास मिळतो.

('बलुतं'च्या पान ८२ वर जावई प्रकरण आलेले. त्यावेळेस लिहिताना हा प्रसंग पुढील आयुष्यात जोवघेणा बनू शकेल याची पुसटशी कल्पना आली नाही. दगडू लहानपणी मामाच्या गावाला जायचा. गाव तसं सारंच मामाचं, त्यामुळे साऱ्या बायका 'जावई आलेत' म्हणून चिडवीत. त्यात एका मुलीवद्दलचा उल्लेख आलेला.)(ती खुदकन हसायची. आपल्या वयाच्या मुलींना माझ्याबद्दल काहीबाही सांगायची. मी मात्र तिच्याकडे डोळे वर करून पहात नसे.')या वाक्यावरून, कधीकळी, तिचा पुढील आयुष्यात झालेला नवरा दगडूचा संशय घेईल हे पटत नव्हतं. एक दिवस ऑफिसमध्ये हे गृहस्थ आलेले. आल्या आल्या उसंत न घेता स्वारी डाफरली, "बोल, माझ्या बायकोबद्दल काय लिहिलेस?" त्याच्या डोळ्यात डोकावून पाहिलं. हिंस्र भाव होते. काय झालं असेल याची पुसटशी कल्पना आली. मनातून चांगलाच टरकलो. गृहस्थ तसा अंगापिंडानं मजबूत होता. ठरवलं असतं, तर त्याने मला सहज 'लोळवलं' असतं. खोटं कशाला सांगू? तोंडाला कोरड पडलेली. काहीतरी बोलायचं म्हणून म्हणालो, "अरे, अशी डोक्यात राख का घालतोस? लहानपणापासून तू मला ओळखतोस ना? पुस्तक तरी वाचलंस का?"

त्याने पुस्तक वाचलं नव्हतं त्याने पुस्तकाची मागणी केली. पुस्तक जवळ नव्हतंच. त्याची ऐपत नसताना त्याने पुस्तक विकत घेतलं. दुसऱ्या दिवशी आला. बराच निवळला होता. पण गावी गेल्यावर पुन्हा त्याच्या डोक्यात भूत संचारलं. सात-आठ पानी घाणेरडं पत्र पाठवले बायकोच्या नावाने पाठवले पण लिहिलं स्वतःच पत्रात एक वाक्य होतं, "माझा नवरा तुझ्यावरून संशय घेतोय. तो म्हणतो आता मी तुला दया

पवाराकडे नेऊन सोडणार आहे. तेव्हा त्या गोष्टीचा कसा निर्णय लावतोस ते ठरव!" नंतर तो गृहस्थ पुनः पुन्हा येत होता. मजकडे माफीपत्र मागत होता. मला ब्लॅकमेल करण्याचा तो हिडीस प्रकार होता. ह्या संदर्भात जे पत्र आले ते वाचून काही काळ मन सुन्न. झोपेचे खोबरे झालेले. धूर भलतीकडेच निघतो तो असा. पत्रावर कुणाचीही सही नसणे ह्यात पत्र लिहिणाराची दूरदृष्टी दिसून येते.

दलित बौद्धात कार्यकर्त्यांचा एक वर्ग आहे. तो पुढाऱ्यांच्या अवतीभवती वावरतो. काही पत्रांतून दिसते आहे की तो कमालीचा खवळला आहे. त्यांनी दिलेला घरचाच 'अहेर' फारच महागात पडलाय.

'महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद' या नावाची संस्था १९५० सालापासून साहित्य क्षेत्रात काम करते. श्री. टी. पी. आडसूळ नावाचे संस्थेचे अध्यक्ष (त्या वेळचे) हे वेळोवेळी दलित साहित्यावर कठोर आघात करीत असतात. श्री. आडसूळ आणि मी एकाच कार्यालयात गेली पंचवीस वर्षे नोकरीला आहोत. सकाळ-संध्याकाळी भेट होते. चहापानही होते. माझा त्यांच्यावर कणभरही राग नाही. 'बलुतं' वाचून ते भडकलेले. त्यात भास्कर चंदावरकर ह्यांनी 'बलुतं'वर चित्रपट काढलेला. चित्रपट पाहून त्यांनी संस्थेच्या वतीने फर्मान काढले. त्याची एक प्रत मला देण्यास विसरले नाहीत. ते आपल्या ८० सालच्या पत्रात म्हणतात, "श्री. दया पवार यांचे १९५८ नंतरचे जीवन माझ्या समोर माझ्यासहच घडत गेले असल्याने त्यांच्या जीवनातील मी एक जवळचा साक्षीदार आहे. त्यामुळे त्यांच्या 'बलुतं'मधील एकूण कथाभाग समाजाला कसा बदनामीकारक आहे, हानीकारक आहे, अतिशयोक्तिवर आधारलेला आहे या बद्दलची प्रतिक्रिया मी आणि समाजातील काही मान्यवरांनी वेळोवेळी व्यक्त केलेली आहे. 'बलुतं' बरेच चर्चित झाले असले तरी बौद्ध समाजाने त्यास मुळीच स्विकारलेले नाही. अथवा अन्य समाजातील त्याच्या यशाबद्दल स्वागतही केलेले नाही. याची आपणास कल्पना नाही अथवा आपण जाणून घेण्याचा कधी प्रयत्नही केलेला नाही. केवळ त्याच्या बाह्य यशावर लक्ष ठेवून आर्थिक फायद्यासाठी त्यावर 'अत्याचार' नावाचा बोलपट तयार केलात, असा आमचा आक्षेप आहे." श्री. आडसूळ यांच्या आरोपाच्या संदर्भात परस्परच नांदेड येथून उत्तम कांबळे यांनी आपल्या पत्रात उत्तर दिले आहे. ते म्हणतात, "काही दिवसांपूर्वी बौद्ध साहित्य परिषदेतर्फे प्रकाशित झालेले एक पुस्तक वाचले. सदरील पुस्तकात 'बलुतं'वर अवास्तव चिखलफेक केलेली पाहून वाईट वाटलं. आपली माणसं आपल्याच माणसाचे पाय ओढतात. त्या पुस्तकात आपल्यावर वैयक्तिकपणे टीका वाचून आपल्या समाजातील तथाकथित पांढरपेशा साहित्यिकांबद्दल अत्यंत घृणा वाटू लागते." मुंबईचे श्री. शांताराम सांळुके लिहितात, "मध्यमवर्ग (आमचा) नाराज आहे; कारण त्यांना सत्य वाचायला मिळालं." श्री. सावंत लिहितात, "आपल्या समाजाची अब्रू गेली अशी प्रतिक्रिया व्यक्त करणारांपैकी मी नाही. 'बलुतं' हे चांगलं पुस्तक असून त्यामुळे भारतीय संस्कृतीचे वाभाडे काढले गेले आहेत, असे वाटते."

के. आर. देठे हे तसे जवळचे नातेवाईक. संगमनेरच्या वसतिगृहात दगडूबरोबर होते. ते लिहातात, " समाजाला आपण गोड कोपरखिळ्या दिल्यात. कोणी दुखावले, कोणी सुखावले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची कास आपण सोडली नाही. " श्री दिलीप मून लिहितात, " प. पू. बाबासाहेबांचे स्वप्न साकार करण्यासाठी आपला एक प्रामाणिक साहित्यिक, एका प्रामाणिकपणाच्या भावनेतून लेखन करीत आहे हे वाचून अत्यानंद झाला. ' बलुतं 'चं यश त्याच्या लेखनामागील प्रामाणिक भूमिकेत आहे. " अशा कितीतरी पत्रांतून दलित, बौद्ध समाजातील सामान्य वाचक ' बलुत्या ' पाठीमागे ठाम उभा आहे. अशा पत्रांमधून व्यक्त झालेली मते पाहिली की, ' बौद्ध समाजाची बदनामी झाली ', ' विकृत आणि हिडीस चित्रण झाले ' असे जे खोडसाळ विधान श्री आडसूळ करतात त्यापाठीमागे त्यांचा दांभिकपणा दिसून येतो. एकूण आंबेडकरांच्या समाजाच्या वतीने बोलण्याचा श्री. आडसूळ यांना काहीच अधिकार पोहोचत नाही.

माधव मनोहर आणि आडसूळ यांच्या मांडणीत एकच संगती दिसत असली तरी पाहण्याचा सांस्कृतिक दृष्टिकोण भिन्न दिसतो. श्री. आडसूळ यांनी स्पष्टपणे लिहिले आहे पण त्यासारखी कुजबूज सातत्याने कानांवर येते आहे. संपूर्ण ' बलुतं ' न वाचता वर्तमानपत्रात आलेला काही मजकूर घेऊनच काही मंडळी तोंडसुख घेताना दिसतात. काहींना मी ' स्पाय ' वाटतो, तर काही ' बलुत्या 'वर बंदी घाला अशी हाकाटी करतात. काही मंडळी जी अस्वस्थ होतात त्यात त्यांची मानसिक कारणेही डोकावतात. या संदर्भात मी अनेकदा माझी मते मांडलेली. पुनरावृत्तीचा दोष पत्करूनही काही गोष्टी सांगाव्याशा वाटतात. दलितांनी स्वतः भोगलेला भूतकाळ—की जो कमालीचा लाजिरवाणा होता—त्यांना वाचताना कमालीचा अस्वस्थ करतो. दुसरे कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरानंतर ही चळवळ कशी विकलांग झाली, तिचा क्रांतिकारक कणा कसा नाहीसा झालाय हे वास्तव त्यांना पेलवत नाही. या संदर्भात मराठवाड्यातून आलेले प्रा. गायकवाड यांचे पत्र पाहाण्यासारखे. ' बलुतं 'वर त्यांनी एम. फिल.साठी शोध-प्रबंध लिहिला हे विशेष. ' आंबेडकरी चळवळीत सुरुवातीच्या काळात महार समाज हा सापाने कात टाकावी तसा सळसळत होता ' असा ' बलुत्या 'त उल्लेख आहे. सर्पाचीच प्रतिमा घेऊन गायकवाड लिहितात, " आपला दगडू मारुती पवार हा दया पवार कसा बनला याचं हे इतिवृत्त असं काहींचं म्हणणं. परंतु ह्या म्हणण्यात जे दिसतं त्यापेक्षा वेगळं असं त्यात असावं अशी माझी समजूत. " शैक्षणिक सवलतींमुळे शिकलेली दलित मंडळी हळूहळू कशी प्रस्थापित मध्यमवर्गीय होऊ लागलीय त्याचा हा आलेखच. ह्या आलेखाचं संरचनात्मक विश्लेषण करताना कात टाकलेला साप गारुड्याच्या टोपलीत कसा वेटोळा घालून बसला असावा ह्या विषयी मी काही लिहू इच्छितोय.

दलितांना जो भूतकाळ घृणास्पद वाटतो त्याची लाज त्यांना वाटायच्याऐवजी खरी लाज हे गुहाजीवन त्यांच्यावर ज्यांनी लादलं त्यांनाच वाटायला हवी. पण आजच्या

मध्यमवर्गीय दलितांवर, त्यांच्या जाणीवेवर मूठभर पांढरपेशा मूल्य व्यवस्थेने आक्रमण केले आहे, याचं त्यांना भान नाही. 'बलुत्या'तील एखादा परिच्छेद अगर एखादं वाक्य वेगळं काढून दाखविलं तर 'बलुत्या'कडं पाहण्याचा दृष्टिकोणच विकृत होऊ शकतो. आंबेडकरी चळवळीचे सूक्ष्म पदर मी उलगडून दाखवले आहेत. या चळवळीचे नेमकेपण सांगितले आहे. जे दलित आज नव्याने मध्यमवर्गात जात आहेत, त्यांची त्रिशंकूसारखी अवस्था झालेली. फार मोठा समाज की जो आजही गुहाजीवन जगतो आहे तो आपण मागे सोडला, आपण एकटेच वर सरकलो ही खंतही 'बलुत्या'त व्यक्त होत आहे. सत्तेकडे जाण्यासाठी मूठभर पुढाऱ्यांनी दलितांचा आणि दलितांच्या चळवळीचा शिडीसारखा वापर केला आणि दलित चळवळीस 'स्लो पॉयझनिंग' होऊन ही चळवळ कशी दुर्बळ होत आहे यावरही बोट ठेवलं आहे. 'बलुत्या'च्या सुरुवातीला जॅक लंडनचं वाक्य आहे. "हा दगड इमारतीच्या कामातून निकामी केलेला..." या वाक्याचा अर्थ भल्याभल्यांना लागला नाही. 'बलुत्या'चा नायक दगडू आहे एवढ्यापुरतं हे वाक्य मर्यादित नाही. गावगाड्यात सारा दलित समाज कुजवला गेला. हा काही केवळ महाराष्ट्रातच नाही, साऱ्या देशभर आहे. सर्व अंगांनी प्रकट होणारी ह्याची सृजनाची ताकद समाजव्यवस्थेने कुजवली. आजही कुजवली जात आहे. याचं भान 'बलुतं' वाचताना किती जणांना आलं ?

'बलुत्या'त नकळत त्यावेळचे राजकारण आलेले. पुढाऱ्यांचा उल्लेख नावानिशी न करता दादासाहेब, केनेडी, दुरुस्त, नादुरुस्त असा आलेला. ही नेमकी माणसे कोण या संदर्भात पत्रातून विचारणा केली गेली आहे. 'बलुत्या'त तीन दादासाहेब आलेले. त्यामुळं एका पत्र लिहिणाऱ्याचा गोंधळ उडाला आहे. श्री. सावंत पुण्याहून लिहितात, पुस्तकात दादासाहेब आहेत ते रुपवते की गायकवाड ? त्याचप्रमाणे एका बॅरिस्टराचा उल्लेख आहे. मला वाटते श्री. आर. आर. भोळे यांच्याविषयी असावा." असाच संभ्रम केनेडीबद्दल झाला आहे. एका पत्रात मुंबईचे श्री. सावंत लिहितात, "आपल्या दृष्टीने एक हास्यास्पद विधान करतो की विचारांची तुलना केली तर बी. सी. कांबळे केनेडीपेक्षा श्रेष्ठ ठरतील सत्यनिष्ठा व विचारांची तुलना केली असता केनेडीपेक्षा श्रेष्ठ ठरतील. परंतु त्यांना संधी मिळाली नाही व आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा नाही." या संदर्भात माणूस कोणता हा प्रश्न महत्त्वाचा वाटत नाही. त्यामागील प्रवृत्ती ध्यानात यावी, या करिता हा खटाटोप. दलितांच्या राजकारणाचा कोणी कसा खेळखंडोबा केला याची सावंतांची मीमांसा वेगळी आहे. त्यावेळच्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा हवाला त्यांनी दिला आहे. त्यावेळी ही समिती कम्युनिस्ट वर्चस्वाखाली होती. पक्ष दुभंगण्यास हे कारण होय असे मत सावंत यांनी मांडले आहे. दलित साहित्यिक पांडुरंग कदम ह्यांनी आपल्या ८० सालच्या पत्रात वेगळीच मीमांसा केली आहे. ते म्हणतात, "एकमेकाविषयी आंतरिक ओढ नष्ट झाल्यामुळेच आपल्या लढ्याचे तीन तेरा झाले. वैयक्तिक अहंता नि महत्त्वाकांक्षा यामुळे कलह पेटले, नि त्यात चळवळीची होरपळ झाली.

दलित साहित्यिक यापासून दूर राहायला हवे होते; कारण त्यांचं क्षेत्र सर्जनशीलतेचं. पण खोकल्याच्या उबळीसारखी माणसं वागताना दिसतात. ... काहीच नक्की नसतं." पांडुरंग कदम ह्यांना केवळ रिपब्लिकन पक्षातली फाटाफूट येथे अभिप्रेत नाही तर दलित पँथर, मास मुव्हमेंट, मुक्ती वाहिनी इ. दलित तरुणांच्या संघटनेच्या ज्या वेगवेगळ्या राहुट्या दिसतात, त्यात दलित लेखकांच्याही फळ्या झाल्या याचा स्वच्छ संदर्भ दिसतो. ह्यात विनोदाची गोष्ट म्हणजे सर्वच संघटना स्वतःला आंबेडकरी अनुयायी म्हणवून घेतात आणि वाळूच्या ढिगाऱ्यासारखे कोसळतात. पांडुरंग कदम म्हणतात की, "त्यांच्यातील वैयक्तिक अहंता नि त्यात चळवळीची होरपळ झाली." हे त्यांचे मत विचारान्ती खरे वाटू लागते.

जवळ जवळ आज सर्वच क्षेत्रात दलित चळवळ ही दुहीने ग्रासलेली आहे. राजकारण, धर्मकारण, समाजकारण ह्या सर्वांना दुहीने छिन्नविछिन्न केले आहे. सांस्कृतिक चळवळीतही हे दुहीचे पाणी शिरले आहे ह्याचे मलाही दुःख होत आहे. आंबेडकर चळवळीत काम करणारा तसा ग्रेट असतो. त्याची मानसिकता तशी प्रखर बुद्धिवादी असते. अनेक कर्मकांडांची लचांडं त्याने फेकून दिलेली असतात. पण हा माणूस जेव्हा समूहात येतो, तेव्हा त्याच्यातील रचनात्मक आणि विधायक ताकद नासविली जाते.

मध्यंतरी दलित समाजात—आपण प्रति बाबासाहेब आहोत अशी एक लाट आली होती. त्यामुळे बाबासाहेबांसारखा पेहराव करणे, त्यांच्यासारखे बोलण्याचा सराव करणे, त्यांच्यासारखे फोटो काढून घेणे इ. बालिश प्रकार झाले. प्रेतयात्रेतही ही मंडळी सुटात येत. अशा व्यक्तिरेखा 'बलुत्या'त अनेकदा पाहाण्यात येतील. ह्या पाठीमागे व्यक्तिगत अहंकाराची लागण दिसते. नेमका हाच प्रकार वेगळ्या प्रकारे साहित्यातही घुसला. दलित चळवळीचे केवळ आपणच भाष्यकार आहोत, आपणच तिला दिशा दिली; आपण निर्माण केलेले गुरुपण,—त्याचे पीठ—चिल्यापिल्यांची मागे शिष्यपरंपरा—आपल्या पुढे कोणी जाऊ शकत नाही ह्या अहंकाराने ग्रासलेली मते, ही त्यांची अवस्था. हे लोक समाजवाद, लोकशाही, भारतीय घटना, बुद्धाची प्रज्ञा, करुणा ह्यांची व्यासपीठावर कितीही गर्जना करीत असले तरी, त्यांची मने सरंजामशाहीतील आहेत हे खुशाल समजावे. प्रतिष्ठा, अहंकार आणि सत्तास्पर्धा त्यांमुळे चळवळीच्या सर्वच अंगांना काजळीने ग्रासले आहे. आपणास आपला शत्रू सापडत नाही. आपणच आपले शत्रू. ही कीड सर्वच दलित चळवळ खाऊन टाकील की काय अशी भीती वाटते. अनेक प्रसिद्ध दलित कवि-लेखक, मान्यवर पुढारी समाजातील मान्यवर अशा वेगवेगळ्या व्यासपीठावर हौसेने जातात. त्यावेळी त्यांना डावे किंवा उजवेही चालतात. आर. एस. एस.सारखी संघटनाही चालते. पण आपल्याच चळवळीच्या व्यासपीठावर जाण्यासाठी मात्र आपले अहंकार आडवे येतात. एकमेकाबद्दल 'ऑलर्जी' वाटते. 'पाटील' माझ्याशी बोलला याचेच कौतुक तो सांगत असतो. आपल्यातील भाईबंदांचा किळसवाणा काळ (बलुत्यात अशी अनेक उदाहरणे आहेत.) पुन्हा नवे पेहराव घालून

धुडगूस घालत आहे. पुन्हा 'गुडश्यांच्या' हिश्श्यांचं भांडण—याचे भीषण चित्र डोळ्यांसमोर सरकत असते. म्हाताऱ्यांच्या चळवळी मोडीत निघाल्या असे म्हणणाऱ्या तरुणांनाही आपली संघटना एकसंध ठेवता येत नाही हे कबूल करायला हवे. स्वतः मी कुठल्याही संघटनेत काम करीत नाही. 'तेव्हा आपणास बोलावयास अधिकार नाही' असे म्हणणारीही काही मंडळी आहेत. ही एक प्रकारची हुकुमशाहीच काहींच्या मनात वास करते.

हया सर्व गोष्टींचा विसर पडून अनेक पत्रलेखक 'बलुत्या'च्या नायकाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करतात. 'आपण आंबेडकर अनुयायीत्व मानता अथवा नाही याबद्दल शंका वाटते. आपल्या लिखाणात डॉ. आंबेडकरांच्याबाबत आदर दिसून येत नाही आपण स्पष्टपणे मार्क्सवाद स्वीकारला नाही किंवा आंबेडकरवाद नाकारला नाही.' दगडूच्या मनात राजकारणाच्या चळवळीत पडण्याची उमज आणि उर्मी निर्माण झाली असली तरी ती कोवळी म्हणून सुजाण नसावी. 'बलुत्या'त व्यक्त केलेले हमीद दलवाईंचे वाक्य असे—"हा सर्वत्र असतो पण कुठेच नसतो." या वाक्याचा विपर्यास करून पत्रलेखक म्हणतो, "यातून पवारांच्या ठायी त्यावेळी सामाजिक, साहित्यिक चळवळीच्या संदर्भात असलेली प्रेरणा, जाणीव ही काहीशी डळमळीत असली पाहिजे... व्यक्तिमत्व पुरुषी बनवू शकला नाहीस, उभा राहू शकला नाहीस... तुझी कणव येते... दोष तुझाच आहे." काही 'क्रांतिकारक स्लोगन'ही करतात. "हे विश्व ज्यांनी निर्माण केले त्याला तू उत्तर देऊ शकला नाहीस. कदाचित् असेही होईल की याचा हिशोब पुढील पिढी करील. हातात शस्त्र घेऊन किंवा शासन घेऊन."

अशा अनेक प्रश्नांचे रान ज्यांनी उठवले त्यांना आपल्या पायाखाली काय जळते ह्याचे भान नाही. बहिर्मुख होऊन दुसऱ्यावर वार करणे सोपे आहे पण आपल्या आतल्या आत डोकावण्याचे सामर्थ्य किती जणांपाशी आहे? ही सर्वच मंडळी बौद्ध तत्त्वज्ञान मानतात असे गृहीत धरू. बुद्धांनी 'पाहायला शिका' असा संदेश दिला आहे. डोळे असले तरी माणसांना पाहता येतेच असे नाही.

काही पत्रांतून माझे नकळत शिक्षण झाले. काहींनी बलुत्यातील चुका प्रामाणिकपणे आणि पोटतिडिकेने व्यक्त केल्यात. दीनबंधु शेगांवकर ह्यांनी विदर्भातील अकोला येथून लिहिले आहे, "'बलुतं'मध्ये महारांच्या काठीबद्दलच्या परिच्छेदात (पान ४९) आपण 'शूद्र पूर्वी कोण' हा ग्रंथ वापरला आणि त्यावरून (अस्पृश्यांच्या) इतिहासाचे दुवे जुळून आले असे जे म्हटले ते असंबद्ध होय. ती गफलत होय." "महारांच्या काठीचा जो इतिहास पान ४९ वर आला आहे तो असा : ह्या काठीचाही महारात परंपरागत इतिहास चालत आलेला. कुणी सांगत ह्या काठीला पूर्वी ध्वज होता. आपण राज्यकर्ते होतो. युद्धात हरलो. 'ही माणसं एकत्र राहिली तर खूपच डोईजड होतील. सरपण फोडतात तशा यांच्या चिरफाळ्या करा. गावागावात वेशीबाहेर वाटून टाका. त्यांचे ध्वज, हत्यारे काढून घ्या आणि गुलामगिरीची खूण म्हणून काठी द्या!' तेव्हा-

पासून महारांच्या हाती काठी आली म्हणतात. पुढे जेव्हा शिकलो-सवरलो आणि बाबासाहेबांचा 'शूद्र मूळचे कोण?' हा ग्रंथ वाचला तेव्हा ह्या इतिहासाचे काही दुवे जुळून आले." शेगांवकर पुढे म्हणतात, "यावरून दोन गोष्टी स्पष्ट होतात. अस्पृश्यांच्या इतिहासासाठी बाबासाहेबांचा कोणता ग्रंथ वापरावा हे आपणास माहीत नाही व दुसरी गोष्ट अशी की शूद्रांवद्दलचा ग्रंथ अस्पृश्यांसाठी लिहिला गेला अशी आपली चुकीची कल्पना झाली. हा घोटाळा लहान वा क्षुल्लक नाही. शूद्र व अस्पृश्य ह्या संज्ञा एकाच समाजवर्गासाठी आहेत ही आपली चुकीची धारणा, 'मनुस्मृती'मधील नावाबद्दल आपण जो उल्लेख केला (पान ४) त्यावरूनही दिसून येते." एकंदरीत त्यांच्या पत्रांच्या मांडणीत पुढील विचार दिसून येतो. 'शूद्र' हा चौथा वर्ण आहे. शूद्र जातींना सवर्ण म्हणतात. उपनयन, विद्या आदींपासून तोडलेल्या कुणबी, माळी आदि जातींना शूद्र म्हणण्यात आले. सध्या त्यांना ओ. बी. सी. म्हणतात. ह्यांच्या प्रश्नांची उकल करणारा बाबासाहेबांचा ग्रंथ म्हणजे 'शूद्र पूर्वी कोण?' आणि केवळ अस्पृश्यांच्या प्रश्नावरचा ग्रंथ म्हणजे 'अस्पृश्य मूळचे कोण?'. मला वाटते की ब्राह्मणांव्यतिरिक्त सर्वच सवर्णांना शूद्र म्हणावे. ही त्यांची मांडणी आज अनेकांना आवडणार नाही. वरच्या जातीचा अहंकार दुखावेल. त्यांना क्रांतिकारक अर्थाने फुले म्हणतात तसे 'डी'कास्ट होणे आवडत नाही. दलित शब्द छातीवर मिरवण्यासारखा आहे काय? असे ज्यांना वाटते त्यांच्याही मनात जातीचाच अहंकार दडलेला आहे हे नाकबूल करण्यात हशील नाही.

सागरमाळ येथून श्री. घाटणे कळवतात, "आपल्या 'बलुतं'मध्ये पृष्ठ १३४ वर खंडोबाचा उल्लेख आला आहे. त्यामध्ये थोडा चुकीचा संदर्भ आहे. खंडोबा हे दैवत मागासवर्गीयांचे असले तरी कोकणस्थ ब्राह्मणांमध्येदेखील आहे." मी शेड्यूल्ड आहे (अनुसूचित जात क्र. ३१–खाटिक) असा स्वतःचा उल्लेख करण्यास ते विसरले नाहीत. मी जातीने 'खाटीक' असूनही माझे कुलदैवत आणि कोकणस्थ ब्राह्मणाचे कुलदैवत एकच आहे हा बहुधा सुप्त अहंकार त्यांना सुखावत असावा.

नांदेडहून श्री. कुरवतवार लिहितात, 'बलुतं'च्या ४० व्या पेजवर आपण एका बादशहाची दंतकथा कथित केली आहे. त्यात एका महाराने बादशहाच्या कन्येस त्याच्या जवळ पोहोचते केले परंतु बादशहाच्या शंकेचे समाधान करण्यासाठी तो महार चिमुकल्या डब्यात आपले लिंग कापून ठेवलेले दाखवतो. बादशहास (प्रामाणिकपणाची) खात्री पटते. आमचे वाचक एवढे अज्ञानी कसे आहेत? त्यांना एवढे कळत नाही की एखाद्या माणसाचे लिंग तोडल्यास तो जिवंत राहील काय? जर तो राहिला तर सायन्सला आव्हान आहे" हे सर्व लिहून पत्रलेखक थांबला नाही तर "वाटल्यास आपण प्रात्यक्षिक करून पाहू शकता." हा सल्ला देण्यास विसरला नाही. खरे म्हणजे दंतकथा किंवा मिथ्स ह्या अनादि काळापासून समाजाच्या रक्तात भिनलेल्या असतात. त्यातील वाच्यार्थ घेता कामा नये. समाजाच्या घडणीत, आचारविचारात अशा दंतकथा

किंवा मिथ्स खोलवर परिणाम करीत असतात. एकूण आपल्या भारतीय साहित्यात आजवर तळागाळातील दंतकथा किंवा मिथ्स आलेल्या नाहीत. बापाच्या सांगण्यावरून परशुरामाने आईचा वध केला आणि आईला पुन्हा जिवंत केले. ही मिथ वरच्या वर्गात सर्वांना माहीत आहे. पण दलित समाजात त्याच्या पुढील घटना येते. आईला जिवंत तर करावयाचे पण कसे? तेथून एक मातंग स्त्री जात असते. परशुराम मातंग स्त्रीचे डोके उडवतो आणि आईच्या डोक्यावर ठेवतो. या दंतकथेचा अगर मिथ्सचा नकळत परिणाम झाला असावा. महाराष्ट्राच्या काही भागात ब्राह्मण स्त्रिया अजूनही डोक्यावर पाण्याचा हंडा किंवा कळशी घेत नाहीत. (अस्पृश्य बाईचे डोके म्हणून हा विटाळ तर नसावा?) हे जसे एक परखड सत्य आहे, तसे परशुरामाची आई रेणुका (यल्लमा) हिला केवळ अस्पृश्य मुलीच का 'जोगतिणी' म्हणून सोडतात. हा संशोधनाचा विषय ठरावा.

संग्रहातील काही पत्रे मात्र मोहरांचा हंडा सापडावा तशी मोलाची वाटतात. ह्या पत्रांना तसे ऐतिहासिक दस्तऐवजाचे मोल आहे, तसे ती पुढील पिढ्यांना स्फूर्तिदायकही आहेत. काही संस्मरणीय आणि दुर्मिळ चिजा बाहेर आल्यात. कवि सोपानदेव चौधरींची काही हृद्य पत्रे आहेत. आंबेडकरांचा आणि सोपानदेवांचा परिचय होता. मुंबईच्या राजगृहात त्यांचा मुक्काम असायचा. त्यांनी स्वतः संत चोखाचा अभंग बाबांना गाऊन दाखवला होता. मला आजवर माहीत नसलेली बहिणाबाईची कविताही त्यांनी पत्रातून लिहिली होती.

"देखा महारवाड्यात, कशी मानसाची दैना,
पोटामध्ये उठे आग, चुल्हा पेटता पेटेना।"

ऑल इंडिया रेडिओचे निवृत्त स्टेशन डायरेक्टर श्री. दीक्षित ह्यांचे पत्रही असेच हृद्य आहे. ते लिहितात, "मी संगमनेरचा नाही. पण सासर संगमनेरचे. लहानपणी लग्न झाल्याने तिकडे जाणंयेणं खूप. त्यामुळेच संगमनेर, तिथलं बोर्डिंग, अकोले, कोतूळ, अगस्ती हे सर्व वाचताना ओळख पटत होती. दुसरं जे बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव. डॉक्टरसाहेब आम्हाला Lawला Constitutional Law शिकवीत. भरदार देहयष्टीसारखाच धीरगंभीर आवाज आणि ज्ञानसामर्थ्याचा पूर्ण आविष्कार, असा तो तास असे. भारताच्या भवितव्याची चाहूल त्यांना लागलेली होतीच. त्यांचं Confederatian and Federal Administration या विषयावरचं विवेचन जितकं गहन, तितकंच त्यावेळी संदर्भपूर्ण होतं. नंतर आमचे भोसलेसाहेब. त्यांचे निःसीम भक्त. परमशिष्य. रेडिओच्या शेजारी सिद्धार्थ कॉलेज होतं. भोसलेसाहेब मला त्यांच्याबरोबर तिथं घेऊन जात. त्या वेळी बुद्ध प्रार्थनांना संगीत देत होते मास्तर कृष्णराव. मलाही संगीताचा नाद. म्हणून मी जात असे. डॉक्टरसाहेबांबरोबर (आंबेडकर) बराच सहवास झाला ते एकदा मला म्हणाले, "अरे आपल्या देशात पुष्कळ गोष्टी वाईट आहेत पण एक गोष्ट अशी की तिच्या चांगुलपणाला तुलना नाही.

आपलं अभिजात संगीत. पूर्वसूरींनी विचार केलेले, तालस्वराचा पूर्ण आविष्कार असलेले असं संगीत. परिपूर्ण जगात कुठेही त्याला तुलना नाही." आयुष्यभर राजकारण, समाजकारण करणाऱ्या बाबासाहेबांच्या आयुष्यात कला, संगीत या संदर्भात एक कोवळा कप्पा होता हे किती लोकांना माहीत असेल?

मनोहर तल्हार यांची 'माणूस' नावाची कादंबरी मला मनापासून आवडलेली. मराठीतल्या मान्यवर समीक्षकांनी 'माणूस'ची दखल घेतली नाही, याची खंत मी 'बलुत्या'त व्यक्त केली होती. या संदर्भात अमरावतीहून 'माणूस'चे लेखक मनोहर तल्हार यांचे एक पत्र आलेले. ह्या पत्राने मी रोमांचित झालेलो. कुठेतरी दुःखाची नाळ जोडल्याची भावना झाली. तल्हार लिहितात, "'बलुतं' वाचताना एक सुखद धक्का आपण मला दिलात. 'माणूस'चा आपण केलेला गौरवपूर्ण उल्लेख वाचून क्षणभर थांबलो. भारावलो व थोडा अंतर्मुखही झालो. 'माणूस'ला समीक्षकांनी कधीच डोक्यावर घेतले नाही हे शंभर टक्के सत्य आहे. हे सत्यही आपण 'बलुतं'मध्ये नोंदवले. या उल्लेखाने मनात गलबल झाली हे खरे." कुटलीही ललित कलाकृती शेवटी आत्मकथाच असते ह्याची कबुली त्यांच्या पत्रावरून मिळते.

अनेक पत्रांतून 'बलुत'ला कादंबरी म्हटले आहे. हिंदीत तर 'अछूत' छापलं तेव्हाच 'आत्मकथनात्मक उपन्यास' असे म्हटले आहे. मी 'आत्मकथा' न म्हणता 'कादंबरी'ला होकार दिला तर समीक्षक टपून बसलेले. 'बघा, आम्ही सांगत होतो ना हे सत्य नाही, फिक्शन आहे!' खरे म्हणजे पुस्तक सुरू व्हायच्या आधीच 'ह्या पुस्तकातील प्रसंग, घटना, पात्रे कुणाला काल्पनिक वाटल्यास तो केवळ योगायोग समजावा' अशी ग्वाही देऊनही घोटाळे केले जातातच.

सदा डुम्बरे यांनी पुण्याच्या 'सकाळ'मध्ये लेख लिहून, हा जो नवा वाङ्मय प्रकार येऊ लागलाय त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. 'The realities of life are beyond the wildest imaginations of ever our best novelists' असं जॉन हॅबिलन या अमेरिकन कादंबरीकाराबद्दल म्हटलं आहे. वेगानं बदलणाऱ्या वास्तवाशी अमेरिकन कादंबरीकारांना कल्पनेतही स्पर्श करता येईनासा झाल्यानंतर कादंबरीची रचना, तंत्र व शैली वापरून पत्रकाराप्रमाणे प्रत्यक्ष जीवनाचं बातमीपत्र असलेल्या पुस्तकांचा जन्म झाला. ट्रुमन, कॅपोट, नॉर्मन मेलर व टॉम वुल्फ हे या नव्या वाङ्मय प्रकाराचे उद्गाते. 'बलुत्या'चाही सामावेश त्यात करता येईल. जागतिक लेखकांच्या संदर्भात 'बलुतं'चा विचार करताना स आ. इंगळे बसमतहून लिहितात, "'बलुतं' वाचून Steinbeck John (Dead '72) या नोबेल पुरस्कारप्राप्त साहित्यिकाची आठवण माझ्यासारख्या James Havey—Auster Jean ते Below Souls—Joyce James यांच्या कादंबऱ्या आवडीने वाचणाऱ्या वाचकास आल्यावाचून राहिली नाही. Grapes of Wrath & East of Eaden सारख्या अजरामर कलाकृती निर्मिणाऱ्या या प्रतिभावंताच्या Cannery Row, Sweet Thursday,

Torfilla Flat, The Moon is Down, The Pearl इ. सारख्या छोटेखानी कादंबऱ्यांमधून त्या ज्या समाजजीवनाचे दर्शन घडविले, त्याला त्याने Slum of Society असं म्हटलं आहे व त्यातल्या लोकांना Little Beautiful People म्हटलेले आहे. याच संदर्भात आपण 'तवंग' हा वापरलेला शब्द आठवतो. त्यात तसं काही त्यांच्या कादंबरीतून गोरे-काळ्यांचा संघर्ष दाखविल्याचे स्मरत नाही. त्याने त्यांच्या 'लोकां'विषयी आपुलकी निर्माण व्हावी असा दृष्टिकोण राखलेला दिसेल. भारतीय सांस्कृतिक, सामाजिक जीवनाचा एवढा पचका झाला आहे की असं कडवटपणे म्हणता येईल की एक वेळ विदेशी माणूस आपुलकीने जवळ करील पण आपला देशबांधव मात्र त्यांना दोन हात दूरच ठेवील.

वरील परिच्छेद वाचल्यानंतर कुठल्याही लेखकाला अहंकाराचा स्पर्श होईल. पण स्तुतीच्या पारड्यबरोबरच निंदेचेही पारडे लेखकाच्या वाट्याला आलेले. अर्थात ते जादा जड आहे. काही पांढरपेशी वाचक साप म्हणून भुई धोपटताना दिसतात. बलुत्यात असलेल्या दोन टक्के लैंगिक दृश्याचे भांडवल केलं जातं. विलास राशीनकर दहा पानांचं दीर्घ पत्र लिहितात. त्यातील काही भाग असा—

'स्वतःच्या लैंगिक जीवनाचे दर्शन घडविणे हे योग्य की अयोग्य ? तसेच ते आवश्यक की अनावश्यक हे प्रश्न आहेतच. पण ह्याबरोबर हे शक्य की अशक्य ? हा तो एक प्रश्न होताच. दगडू पवाराने हे शक्य करून दाखविले. एवढेच नव्हे तर त्याही पुढची अनुल्लंघनीय झेप त्यांनी घेतली. त्यांनी केवळ स्वतःच्या व आप्तेष्टांच्या लैंगिक जीवनाचे दर्शनच घडविले नाही तर लैंगिक जीवनात पदरी आलेल्या विटंबनेचे व प्रतारणेचे प्रदर्शन घडविले. ही बाब अभूतपूर्व अशी होय. सामान्यच काय तर असामान्य माणसे ज्या बाबी झाकण्यासाठी आकाशपाताळ एक करतात, त्या बाबी दगडू पवार प्रदर्शनात मांडून बसला. तथाकथित सुसंस्कृतपणा व सोवळेपणा याचे कवच फोडून पवाराचे लेखन अवतरले आहे. स्वतःचा रंडीबाज बाप, हिजडा चुलता, वेश्या-व्यवसायी मावशी, बापाच्या मृत्युनंतर आईला आलेल्या गरोदरपणाबद्दल आपण कशी-शंका घेतली हेही तो आडपडदा न ठेवता आम्हाला सांगतो ह्या महत्त्वाच्या बाबींशिवाय लैंगिक जीवनाच्या अनेक अंगांचे अनेक परीने बलुत्यात दर्शन घडते. हे कामजीवन त्याने उघड्यावर आणताना जे धैर्य दाखवले ते सामान्यच होय. असामान्य आहे ते इतकेच की हे असे जीवन त्याने विटंबनेशिवाय, तथाकथित अनैतिक अंगांसह, ओंगळपणासह वाचकांना सादर केले. त्यातून आई, वडिल, चुलता, मावशी यांनाही सोडले नाही.''

स्त्री-पुरुष संबंधांबद्दल 'वासुनाका'सारख्या कादंबरीत एखाद्या भाऊ पाध्येसारख्या लेखकाने मोकळा 'सेक्स' लिहिला तर चालू शकतो. पण सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या लेखकाने स्त्री-पुरुष संबंधावर लिहायचे म्हणजे शांतम् पापम्! 'बलुत्या'तील स्त्री-पुरुष संबंध एवढ्या मोकळेपणाने का लिहिले गेले याची मानसशास्त्रीय कारणे

कुणीच उमजत नाहीत. 'बलुत' जर अशा दोन टक्के भडक गोष्टीमुळे गाजत असेल तर लेखक लेखनात अपयशी झाला असे समजावे. काहींनी तर, केवळ पुस्तक गाजावे, सनसनाटी व्हावे म्हणून लेखकाने भडक तुकडे जोडले आहेत असेही नमूद केले आहे. एकूणच आपले समाजमन बंदिस्त असल्यामुळे अध्यात्माचा, संतांच्या शिकवणीचा पगडा. स्त्री ही पापाची खाण आहे ही कल्पना. अंडरग्राऊंड जे चालते ते मात्र अनादि कालापासून चालू द्यायचे. त्याची जाहीर वाच्यता फक्त नको, अशी ही समाजातील चमत्कारिक सेन्सॉरशिप आहे. आधुनिक शिक्षणातही लैंगिक शिक्षण तसे वर्ज्य मानलेले. लहानपणापासून मुली-मुले दूर. त्यांचा कुठल्याही प्रकारे एकत्र संबंध येऊ नये म्हणून पालक दक्ष. त्यामुळे जीवनाच्या उंबरठ्यावर स्त्री-पुरुष म्हणून ते एकमेकाकडे पाहू लागतात तेव्हा वयात आलेला पुरुष हा दुष्काळातून आल्यासारखा स्त्रीकडे पाहतो. आणि स्त्री केवळ भोगवस्तू आहे म्हणून तिची मानसिक कुचंबणा हेच दृश्य सर्वत्र दिसते. पाण्यात शेण टाकलं तर लगेच वर येतं. समाजाच्या तळच्या कप्प्यात एखाद्या सुनेने वाईट कर्म केले तर सासूच अंगणात येऊन म्हणते, "कुठे शेण खायला गेली होतीस ?" तिचं हे कृत्य लपत नाही. गावगाड्यातील – भाईबंदातील – पंचायतीतील जाचक नियम यांचाही क्रूर वरवंटा नकळत त्या व्यक्तीवर, अथवा घराण्यावर फिरत असतो. दगडूच्या बालपण, तरुणपणातील काही काळ ज्या सांस्कृतिक वेटावर गेलाय, तेथील कायदेही नकळत दगडूच्या व्यक्तित्वाचा घास घेत होते, हे विसरून चालणार नाही. आजच्या दया पवारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यात साप समजून भुई धोपटण्याचाच प्रकार वाटतो. दगडू जगला तो तळचा वर्ग सोडून वरच्या कप्प्यात डोकावलं तर तिथे संस्कृती, नीतिमूल्ये ह्या नावाखाली संगळीकडे झाकपाक चालू असते. विवाहसंस्थेत मान्यता नाही पण अंडरग्राऊंड सारेच चालते. मांजर चोरून दूध पिते. तिला वाटते कुणाला दिसत नाही. ही झाली मध्यमवर्गीय प्रवृत्ती.

विवाहसंस्थेत ज्यांना मान्यता नाही पण वरवरची फ्रेम कशी शाबूत आहे, याकरिता कोणती धडपड चालते या संदर्भात मी जाहीर सभेतून अनेकदा हिंदी लेखक हरि शंकर परसाई यांची एक गोष्ट सांगत असतो. ती गोष्ट अशी : मुंबई-पुण्यासारख्या एका आधुनिक शहरात नव्याने सिमेंट कॉंक्रीटची वसाहत तयार होते. तेथे एक ब्राह्मण आणि दुसरे मराठा कुटुंब नव्याने राहावयास आलेले. ब्राह्मणाची वयात आलेली तरुण मुलगी आणि मराठ्याचा तरुण मुलगा ह्यांचे प्रेमप्रकरण रंगात आलेले. तेव्हा मराठा कुटुंबातील तरुणाचा बाप मुलीच्या घरी जातो. आणि तिच्या आईवडिलांना विनंती करतो. 'बाबारे, माझ्या मुलाचे तुझ्या मुलीवर प्रेम आहे. तेव्हा मुलीला मागणी घालण्यास मी आलो आहे.' तेव्हा ब्राह्मण पालक सांगतो, 'तुझ्या मुलाला सांग, माझ्या मुलीला पळवून ने म्हणून. कारण पळवून नेणे हे धर्मशास्त्रात संमत आहे. पण असे जातिबाहेर लग्न लावून देणे हे विवाहसंस्थेस मान्य नाही.' पडलो तरी आमचीच टांग उपर, अशी ही नीती !

श्री. राशिनकरांना जो भाग ओंगळवाणा वाटतो, नातेवाईकांची विटंबना वाटते ती प्रकरणे खरंच का तशी आहेत ? त्या पाठोमागे, गुहाजीवन जगणाऱ्या माणसांची अशी अवस्था कुणी केली हे ते समजत नसावेत. कसरत करणारी धुमाळी काळीसावळी बाई आणि दगडूचा तात्या यांच्या प्रेम-प्रकरणावर अनेक पाने लिहून मला हे प्रकरण 'थ्रील' करता आले असते. पाच-दहा ओळीतील त्यांच्या मैथुनाच्या वेळेस त्यांनी लावलेले आरसेच काहींना दिसले. पण कसरत करणारी बाई एकाएकी निघून गेली म्हणून तात्याने फूटपाथवर जीव दिला. केवळ या घटनेचा दगडूच्या आयुष्यावर किती खोलवर परिणाम झाला आहे हा कोणाला शोध घ्यावासा वाटत नाही. अनेक मध्यमवर्गीयांना मक्याची कणसे विकून जी बाई चरितार्थ चालवते व जिची पुढे शोकांतिका होते तिची गोष्ट खरी वाटत नाही. बाई कमालीची देखणी असेल तर अनेकांच्या नजरा तिचा घास घेण्यास टपलेल्या. दलित स्त्री असुरक्षीत असल्यामुळे ते सहज शक्य. अशा वेळेस आसरा म्हणून ती एका म्हाताऱ्या माणसाबरोबर राहात असते. त्याच्या पैशावर चैन करते. पण ती त्याला हात लावू देत नाही. एका रात्री साऱ्या चाळीचा विरोध पत्करून ती नग्न अवस्थेत घरातून सुटका करून घेते. ती फुकटचे खाते पण हात लावू देत नाही, म्हणून चाळीतील सर्वच तिचा बळी घेण्यास टपलेले. पळून जाताना ती बिजलीसारखी चमकून जाते असे पुस्तकात वाक्य आहे. केवळ अन्न, वस्त्र आणि निवारा आणि बाहेरच्या गिधाडांपासून मुक्तता या गरजेपोटी ती म्हाताऱ्याजवळ राहाते. तिच्या मनात पुरुषाची वेगळी कल्पना असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या स्त्रीचे हे दुःख हे सामाजिक बांधिलकीत मोडत नाही काय ? विठाबाई निपुत्रिक. आपण गरोदर दिसावं म्हणून ओटीपोटावर कपडे बांधते. दगडू त्यावेळी सातआठ वर्षांचा. अशा वेळी केवळ वात्सल्यापोटी लहान दगडूला उरीपोटी घेणे ह्यात कामवासना दिसणं ही विकृती वाटते. आणि महारोग्याचा मुलगा 'दामू' हा केवळ महारोग्याचा असल्यामुळे त्याचं लग्न कसं होणार ? त्यानं पशुसंभोग घेतला. ह्यातील कारुण्य–वेदना–तडफडाट 'सहृदय' माणसाच्या लक्षात येत नाही. आणि तो केवळ अनैतिक ओंगळपणा वाटावा ह्याला काय म्हणावे ? हिजडा चुलता, बापाची चोरी–रांडवाजी, मावशीचा वेश्या व्यवसाय, बापाच्या मृत्युनंतर आईला आलेल्या गरोदरपणाबद्दल घेतलेली शंका इ. अनेक प्रश्नांचे मोहोळ दीर्घ पत्रांतून व्यक्त झालेले दिसते. हे लिहिण्यापाठीमागचा लेखकाच्या ट्रॅक आणि वाचणाऱ्याच्या मनातील ट्रॅक भिन्न होत गेल्यामुळेच अशा निरर्थक प्रश्नांची राळ ते उडवतात.

श्री. राशिनकरांच्या पत्रात काही मुद्दे नव्याने उपस्थित करण्याचेही कौशल्य दिसले. राम नगरकर आणि दगडू यांचे जीवन तसे काही प्रमाणात समान पातळीवरून गेलेले. ते म्हणतात, "'रामनगरी' आत्मकथेचा नायक व 'बलुत्या'चा नायक यांची तुलना करण्यासारखी दोघेही तसे पाहिले तर उपेक्षित समाजातील. दोघांचे जीवन मुंबई व नगर जिल्ह्यातील खेड्यात गेले. पण दोघांच्या आत्मकथा-लेखनात फरक आढळतो.

रामनगरीचा नायक हा सोंगाड्याच्या भूमिकेत वावरताना आढळतो. उपेक्षित जीवनतील दारिद्र्य, दैन्य, विटंबनेचे दर्शन घडवतानाही वाचकाने हसले पाहिजे असा त्यांचा प्रयत्न दिसतो. तर 'बलुत्या'चा नायक हे दुःख, दैन्य, दारिद्र्य, विटंबना हास्यास्पद कोटीत नेत नाही त्यांची गांभिर्याने दखल घेतो. वाचकांचे रंजन करणे यावर त्याचा भर नाही."

असेच एक कोल्हापूरहून आलेले पत्र सौ. मंगला दंडवे यांनी लिहिलेले. पत्राची सुरुवात ओम् ने केलेली. त्यातून सांस्कृतिक वेट लक्षात यावे. बाई लिहितात, "पुस्तक वाचताना मनाला अत्यंत वेदना झाल्या. वाचकांना ज्ञात नसलेले शब्द ज्ञात झाले. आत्मनिवेदनाचा अट्टाहास कशाकरिता ? अनेक प्रश्नचिन्हे भेडसावू लागली. वास्तवता मनाची समजूत घालायची म्हटलं तरी वास्तवतेच्या बुरख्याखालील क्षुद्रता, तिचा हीन दर्जा, मानवंचना. कटू अनुभव कुणाला येत नाहीत ? गटारगंगा पावलोपावली आहेतच की ! वास्तवतेच्या ढोंगाखाली त्याचे हीन दर्शन कशाला ? आत्मनिवेदनामागे सात्विकतेचा झरा झरू द्यावा. संस्कारक्षम अशा नव्या युवकांनी आपल्या 'बलुतं'पासून काय बोध घ्यावा ?" पत्राच्या शेवटी 'ज्ञानेश्वरांसारखे रसाळ लिहा' हा सल्ला देण्यास त्या विसरल्या नाहीत.

'बलुतं' चुकीच्या मापदंडानं कसं मोजलं जातं याची ही चुणूक. भौतिक समृद्धीपासून, सांस्कृतिक जीवनापासून तुटलेला समूह केवळ गुहाजीवन जगू शकतो. जीवनातील सर्वच दारे जेव्हा बंद असतात तेव्हा केवळ तोंड वाजवणं, शिवीगाळ करणं आणि सेक्स घेणं एवढीच साधनं करमणुकीला असतात, याचं भान 'बलुत्या'तील स्त्री-पुरुष तपासताना किती वाचकांजवळ असतं ? प्रा. प्र. ना. परांजपे यांच्यासारख्या सहृदय समीक्षक हे समजू शकतो ते लिहितात, "Sex विषयीच्या अनुभवाबाबतचं तुमचं perspectiveही आजकाल दुर्मिळ असं आहे. तुम्ही ते अनुभव दडपलेही नाहीत आणि त्यांना अवास्तव महत्त्वही दिलेलं नाही. त्यातही ज्यांना तुमच्या समाजाच्या दृष्टीनं प्रातिनिधिक महत्त्व आहे त्यांना तुम्ही अधिक महत्त्व दिले आहे. हे पुस्तक लिहिण्यामागची तुमची भूमिका सूचित होते."

संस्कारक्षम अशा नव्या पिढीने 'बलुत्या'पासून काय शिकावे असा भाबडा प्रश्न सौ. मंगला दंडवे ह्यांनी विचारला आहे. या संदर्भात स्वाती काळे ह्यांचे पत्र बघण्यासारखे. पत्र पाठवले, तेव्हा त्या F. Y. B. Sc.ला शिकत होत्या. त्या म्हणतात, "अगदी खूप विचार करायला लावणारं पुस्तक आहे. कदाचित ह्याच पुस्तकामुळे माझी वागणूक बदलेल. माझे विचार बदलतील. कारण माझं आत्ताचं वय हे संस्कार घडवून घेण्याचं वय आहे. घराच्या चार भिंतीपलिकडे मिसळण्याचं वय आहे. अजून जगाचा खूपच खूप अनुभव यायचा आहे. आणि बरोबर त्याच काळात हे पुस्तक हाती आलं. स्वतःच्यात बदल करायचा नक्कीच प्रयत्न करीन." कु. स्वातीचा पत्ता वाचला आणि लक्षात आले. साहित्यिक व. पु. काळे यांची कन्या म्हणजे स्वाती काळे. घरातील

निकोप वातावरणाचाही तिच्या मनावर संस्कार झाल्यामुळेच 'बलुतं' सहज समजू शकली.

आजच्या जातिव्यवस्थेचे काहींनी उदात्तीकरण केले आहे. काहींनी मूळ प्रश्नांना सहजच बगल दिली आहे. जात आणि गावगाडा, धर्मपीठे, उत्पादनसाधने नेमकी कोणाच्या मालकीची ह्याची उत्तरे न शोधता श्री. कुलकर्णी म्हणतात, " महार म्हणून तुम्ही जे भोगलेत त्यात जातीमुळे किती व दारिद्र्यामुळे किती ? मला असं वाटतं की दारिद्र्यरेषेखाली राहाणाऱ्या सर्वच माणसाला या अथवा अशा प्रकारच्या खडतर जीवनाला सामोरे जावे लागते ना ? कोणत्या जातीत, कोणत्या देशात, धर्मात, आर्थिक परिस्थितीत जन्माला यावं हे आपल्या हाती थोडंच असतं ? मी कुलकर्णी— ब्राह्मण; पण आता व्यवसायाने 'घिसाडी-फौंड्रीमन'. आमचे कणबरकर जन्माने मराठा पण व्यवसायाने शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू—म्हणजे ब्राह्मण झाले. केशव मेश्राम ज्ञानदान करतात, शिकवतात म्हणजे ब्राह्मणच नव्हे काय ? "

आजच्या जटिल जातिव्यवस्थेकडे वरवर कसे बघितले जाते याचे हे पत्र नमुनेदार उदाहरण म्हणून सांगावे लागेल. ज्ञान देणारे हे फक्त 'ब्राह्मण' असतात हाही अहंकार ह्यात डोकावतो. दगडू किंवा त्यासारखे गावकुसाबाहेर जगणारे असंख्य समूह ह्यांची परवड-दारुण अवस्था-ठायी ठायी अस्पृश्य जातीमुळे झालेली अवहेलना, ही केवळ गरिबीतच जन्माला आल्यामुळे झाली हे पटत नाही. जातिव्यवस्था ही केवळ धार्मिक नाही तर त्यात आर्थिक शोषणही होत असते. दलित जातीत जन्माला आलेल्या माणसाला या दोन्ही गोष्टींच्या शोषणातून जावे लागते. दलित माणसाचे दुखणे केवळ आर्थिक नाही तर सांस्कृतिक शोषणही आहे हे विसरून चालणार नाही. आजही जातिव्यवस्थेचा इमला तसाच आहे. काही बुरुज ढासळलेत हे मान्य करायला हवे. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, " जातिव्यवस्थेच्या इमल्याला जिने नाहीत. ज्यांनी ज्या मजल्यावर जन्म घेतला त्यांनी तिथेच मरावे. खाली किंवा वर सरकण्याची परवानगी त्याला धर्माने नाकारली. "

डॉ. साठे आपल्या पत्रात म्हणतात, " १६ वर्षापर्यंत मी संघात जात होतो. हरिजनांच्या बरोबर मी कामे केलेली आहेत. पण माझे मत सांगतो. 'आळस, विनासायास जीवनोपयोगी वस्तू मिळवणे व लाचारी प्रथम हरिजनांनी टाकल्या पाहिजेत. पूर्वजांच्या चुका आपण भोगतोय. जन्माचं स्वातंत्र्य, म्हणजे तो केव्हा ? कोठे ? कोणाच्या पोटी जन्मणे हे आपल्या हाती नाही, मग स्वातंत्र्य कशात आहे ? कर्मात आहे. मग ह्या जगात आपला समाज जन्म-श्रेष्ठता का मानतो ? आपण प्रथम अद्वैतवादी होतो आणि त्यानंतर आपला ऱ्हास झाला. अद्वैतवाद मानला की तो परमेश्वर आणि मी एकच. तुम्ही आणि मी एकच. "

पुनरुज्जीवनवादी मंडळी जीवनाकडे, त्यातील जीवघेण्या समस्येकडे कशा प्रकारे बघतात हे साठे यांच्या पत्रावरून दिसते. भारतीय समाजव्यवस्थेत साठे एकटेच नाहीत.

त्यांच्यामागे इतिहासाची, भव्य दिव्य संस्कृतीची थोर परंपरा आहे. त्यांच्या भाषेत हरिजनांनी आळस, विनासायास जीवनोपयोगी वस्तू मिळवणे व लाचारी सोडायला पाहिजे. हे त्यांचे मत पाहिले म्हणजे कुणाही संवेदनशील माणसाला संतापच येईल. दलितांनी येसकर पाळी मागणे ही त्यांच्या भाषेत भीक होते—फुकट वस्तू घेण्याची प्रवृत्ती आढळते पण त्यांच्या संस्कृतीत 'माधुकरी' मागणे ह्यात उदात्तीकरण दिसते. काही श्रम न करता देवळात, महंत पुजाऱ्यांच्या तिजोरीत विनासायास गडगंज संपत्ती गोळा करणे ही त्यांना 'फुकटी' वृत्ती वाटत नाही. मध्यमवर्गात दलितांना मिळणाऱ्या रिझर्वेशनसंबंधी जो ठायी ठायी जळफळाट दिसून येतो, तीच धारणा त्यांच्या शब्दापाठीमागे असेल काय? आपला सारा देश, समाज, शासकीय यंत्रणा भ्रष्टाचाराने पोखरलेली आहे. वर्तमानपत्रात दररोज रकानेच्या रकाने भरून भ्रष्टाचारासंबंधी बातम्या येत असताल. देश गहाण ठेवण्यासाठी मौल्यवान दस्तऐवज परदेशात विकले जात आहेत. तेव्हा हे सर्व करण्यात आघाडीवर कोणता समाज पुढे आहे? दलितांनी देशाशी गद्दारी केल्याचे इतिहासात एक तरी उदाहरण दिसते काय? फार मोठ्या प्रमाणात कोण वस्तूधन लाटतोय? आणि लाचारी ही केवळ दलितवर्गातच असते हे कितपत खरे आहे? मुसलमान राजवटीत, ब्रिटिश राजवटीत सत्तेशी लांगूलचालन करणारा, त्यांचे नॉर्म्स—पेहराव, संस्कृती, भाषा—शिकणारात कोणता धर्म किंवा जात पुढे होती? माझ्याच एक कवितेत म्हटले आहे—

'तोंडात कचकचीत शिवी यावी
हा काही गुन्हा नाही
खाचरात संस्कृतीचं वेणं कधी कुणी लावलंच नाही.
संस्कृतीच्या ठेकेदारांनी
शेरा-पासरीने देशाचा अनेकदा लिलाव केला.
चिंदकातील हातांनी
शेजेची बाईल देऊन, असा द्रोह कधी केला नाही.
खोपटा खोपटातील उघडा नागडा संसार
तुम्हाला का किळस यावी
काचेच्या महालात—पायाखाली पापांचे जळीत पाहिले का नाही?'

आळसाबद्दल तर बोलायलाच नको. पिढ्यान् पिढ्या गडगंज संपत्ती—स्थावर, जंगम—त्या श्रीमंतांची चैन-आळसात दिवस काढण्याची वृत्ती—आयत्या पिठावर रेघोट्या काढणे ही बाब कुणालाच आळसाची वाटत नाही. त्यांचे 'प्रारब्ध', 'मागील जन्माचे पुण्य' म्हणून नकळत त्यांचा गौरवच होतो. असे म्हणतात की ज्या देशाचा निसर्ग, हवामान प्रतिकूल असते तेथली माणसे—तो देश कामसू असतो. सर्वच विषुववृत्तावर जनसमूहात हा आळस अंगात शिरलाय, मुरलाय—मग त्यातून भारताची तरी सुटका कशी?

सोमनाथाचा जो ऐतिहासिक विध्वंस झाला—त्यावेळी सर्व धर्ममार्तंड हात चोळीत

बसले. 'आमचा सोमनाथ मुसलमानांना बघून घेईल' हे भाकित खोटे ठरले. हमीद दलवाई सांगत, 'अरे बाबा, धर्मश्रद्धा एवढी की तिचा फायदा घेऊन मुसलमान आक्रमकांनी लढण्याच्या पूर्वी हिंदू सैन्यावर गाईंचे कळप सोडले. गाईवर हत्यार कसे चालवायचे म्हणून सैन्य शरण गेले. अशी ही हिंदू समाजाची वृत्ती. तेव्हा केवळ दलितांनाच झोडपण्यात हशील नाही.

साठे यांनी अद्वैतवाद—परमेश्वर आणि मी एकच—तुम्ही आम्ही एकच ही गोंडस भाषा वापरली आहे. संत एकनाथांची परंपरा ह्या विसाव्या शतकातही चालत आली ती अशी. तुम्ही आम्ही एक व्हा पण कठड्याला हात लावू नका. ही उफराटी नीती व्यवहारात चालत आलेली. आपल्याच अवतीभोवती एकीकडे कुणी पत्रावळी चाटत आहे आणि दुसरीकडे अन्नाची नासाडी—मग ती यज्ञात का असेना. घासभर अन्न त्यांच्या पदरात टाकलं की झालं—ही आमची भूतदया झोपडपट्टीत जाऊन मनाचे श्लोक शिकवणं, त्यांना स्वच्छतेचे धडे देणं, मुलांचे लेंढार वाढवू नका. शुद्ध बीजा हा उपदेश करणं, अशा आपल्या समाज-सुधारण्याच्या कल्पना. जाती आणि येथल्या जमिनीचा, उत्पादन साधनांचा अन्योन्य संबंध आहे. त्याचे फेरवाटप करावे. जात ही रक्तगट शुद्ध ठेवणे या हास्यास्पद कल्पनेतून पुढे आली, तेव्हा आजच्या विवाहसंस्थेत आमूलाग्र बदल करावा आणि आंतरजातीय विवाहाच्या कल्पनेला मोठ्या प्रमाणात सामोरे जावे असा बदल कुणाला नको असतो.

कर्म बदलणे हे आपल्या हाती असते असे साठे म्हणतात. जात ही मडक्यांच्या उतरंडीसारखी. मडकी जशी एकावर एक रचली जातात, त्यांचे तोंड बंद होते—तशीच जातींची उतरंड. त्यामुळे गुदमरलेली अवस्था. पिढ्यान् पिढ्या दिलेले व्यवसाय करीत राहावे ही दिनचर्या. त्यातील काही मडकी इकडे तिकडे जाताना दिसतात. पण त्यांची अवस्था 'न घर का न घाट का' अशी झालेली आज ज्या जाती मोठ्या संख्येने ज्ञानाच्या क्षेत्रात, उद्योग-धंद्यात, साखर कारखान्यात, झेड. पी.त, सत्तेच्या राजकारणात, यांची मीमांसा करण्यात कुणालाच रस नाही.

महाराष्ट्र सोडून इतर प्रांतांत 'बलुत्या'कडे कसे पाहिले जाते हे बघण्यासारखे. मराठीत 'बलुतं' हे एका व्यक्तीचे आयुष्य—हा असा वागला – तसा वागायला हवा—ह्यास नीतीमूल्यांची चाड नाही. दलितांवर अन्याय झाला तर ही मंडळी ओरडतात; पण प्रसंग पडला तर हीच माणसे आपल्या स्त्रियांवर अन्याय करतात—हा टीकेचा सूर. लेखक हा आरोपीच्या पिंजऱ्यात उभा आहे, न्याय निवाडा चालू आहे हेच दृश्य मला दिसू लागते. 'शांतता, कोर्ट चालू आहे' या नाटकातील नायिका ज्या चक्रात सापडली आहे, तसाच भास होत असतो. पण अशा वेळी एखादं पत्र कानडी मुलुखातून अथवा हिंदी भाषिक प्रदेशातून येतं, तेव्हा मराठीतील पुस्तकाकडे बघण्याचा ॲप्रोच आणि कन्नड किंवा हिंदी भाषेतील ॲप्रोच ह्यात भिन्नता का पडत असावी हा प्रश्न भेडसावत आहे. खरे म्हणजे आपण एकाच देशाचे रहिवासी. आपण जेव्हा

अनेकदा हे मांडत असतो तेव्हा काहींची मराठी भाषेची अस्मिता डिवचते. आपली ओरड ही त्यांना 'फाजील दुखरेपण' वाटू लागते. पण आपल्याकडे साहित्यक्षेत्रात 'मर्ढेकरी सौंदर्यवादा'चे जे फाजील लाड झाले, त्यातून मराठी साहित्याला एकारलेपण आले. समाजाची त्याची नाळ तुटली. त्यामुळेच सामाजिक संदर्भाचे भान नसले म्हणजे मग व्यक्तिगत पातळीवरचे प्रश्न सुचतात. लेखकाला कोंडीत पकडण्याची भाषा सुरू होते. हिंदीत असलेली प्रेमचंद्र सारखी परंपरा किंवा कानडीमध्ये असलेले शिवराम कारंथ हे जेवढे समाजाच्या तळापर्यंत सामर्थ्याने पोहोचले, तसे काही मराठीत झाले नाही. म्हणूनच की काय हिंदीतील तरुण कवी राठी लिहितात, "पिछले दिनों सत्यजित राय की 'पथेर पांचाली', 'अपराजिता' और 'अपूर संसार' एक साथ पढ़ी थी। उस व्यथा ने जितना मरोडा और तोडा था, शायद उस से ज्यादा तोड-मरोड हो तो आदमी खत्मही हो जाय ... 'अछूत' ने घाव और गहरे और अधिक जहरीले कर दिये। विभूती बाबू ने जिस तरह देश की नब्ज पकडी थी, दूसरी ओरसे आपने भी वैसा किया है। पर उन का कथानायक ब्राह्मण था, जब कि आप की कृती का अछूत! ... और यह कितना बडा अंतराल है, इसे पढकर ही जाना जा सकता है।

"हमारे यहाँ – शायद सारे संसार में – प्रथा है, कामना करता है कि कोई कृति यदि किसी को भा जाये तो वह चाहता है, कामना करता है, लेखक और भी कृतियाँ दे देता रहे। यह, या ऐसी कामना करते हुअे मुझे कँप कँपी होती है ... पर हम सच्चाइयों से कितना मुँह मोडेंगे ... सच्चाइयाँ कुछ अधिक प्रीतिकर हों, अधिक आनंदमय हों, यह कामनाही की जा सकती है।

"उस सारे कुरूप यथार्थ में भी आपने माननीय स्वत्व, इमानी, गरिमा पर अपनी नजर रखी। उसे जहाँ मौका मिला, सामने लाये। उस की खोज, उसी की स्थापना – शायद सब से बडा लक्ष्य मनोरथ हम सब का हो।"

कर्नाटकमधील श्री. मल्लिनाथ लिहितात, "'बलुतं'वरील चर्चा खरंच खूप खूप वैचारिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोणातून व्यवस्थित व उद्‌बोधकरित्या झाली. भाषेची अडचण सोडल्यास ही चर्चा खूपच सुंदर होती. ६० ते ६५ व्यक्तींनी या चर्चेत भाग घेतला होता. ३०–४० जणांनी आपले मत मांडले. मी तेव्हाच पत्र पाठविले असते तर नक्कीच आमचे विचार लिहिले असते. परंतु मी त्यावेळी दुबळा होतो. तरी इथे 'बलुतं' आणि डावी विचारसरणी, सरंजामशाहीच्या विरुद्ध जातीयतेसंबंधी (कोमवादी असे कानडीत म्हणतात) खूपसे विचार circulate होत आहेत. 'बलुतं' तसंच डॉ. शिवराम कारंथ यांची चोमन डुडी (चोमाचा डमरू) सारखी पुस्तके हुन्नरी तरुण जनमानसात पसरवित आहेत. एकूण माझ्या गावात निदान तोंड उघडणारी माणसं तयार होत आहेत, याचा मला खूप आनंद होत आहे."

'बलुत्या'तील सामाजिक, सांस्कृतिक आशयापेक्षा समीक्षक जेव्हा 'बलुत्या'चा फॉर्म–लय–घाट ह्यावर चर्चा करू लागले, तेव्हा त्या साऱ्या प्रकारची मला गंमत वाटू

लागलेली. 'दगडू पवार' हा 'दया पवार'ला आपली हकीकत सांगतो अशी भूमिका आहे. दया पवार हा दगडू पवाराला कळू लागल्यापासून सावलीसारखा ओळखतो. दगडूच्या चरित्राचा कोणताही भाग दया पवारापासून लपलेला नाही. खरं तर ते एकच आहेत—पण हे दोन कल्पिले आहेत. ह्या पाठीमागे काही सबळ कारणे दिसत नाहीत. त्यामुळे आत्मचरित्राचा घाट विस्कळीत झाला आहे. एकसंधपणा येत नाही. दगडू या नावाचा आसरा घेतल्यामुळे प्रत्यक्षातल्या घटना वगळल्या तरी गेल्या असाव्यात किंवा त्यांच्यात कल्पिताचे रंग मिसळले असावेत, हा समीक्षकांचा मुद्दा.

संग्रहात अरुण रहाळकर यांचे एक पत्र आहे अगदी मनस्वी आहे. श्री. रहाळकर तसे प्रसिद्ध लेखक नाहीत. पण त्यांचे संपूर्ण पत्रच वाचायची तसदी घेतली तर वाङ्मया-संबंधी त्यांची जाणीव किती खोलवर आहे याची प्रचिती यावी. फॉर्मसंबंधी दया–दगडू असे काही वेगळेपण करतोय याचे लिहिताना काहीच भान नसते. मनुष्य एकटा असला म्हणजे त्याचा स्वतःशी संवाद चालतो. स्वतःशीच झाडा-झडती चालते. हीच कल्पना लिहिताना होती.—अगदी हाच मुद्दा श्री. अरुण रहाळकरांच्या पत्रात वाचून, या पत्र-कर्त्यास आपले मन कसे वाचता आले याचे नवल वाटले. रहाळकर लिहितात, "लिखाणाच्या तुमच्या आकृतिबंधाविषयी मला एवढंच म्हणावसं वाटतं, की तो 'परफेक्ट' आहे. स्वतःशीच केलेलं संभाषण, अशा थाटातलं आणि कुठलं आत्मचरित्र मी तरी अजून वाचलेलं नाही. त्या form मुळे या आत्मचरित्राला एक वेगळीच dimension लाभलेय." श्री. रहाळकरांच्या पत्रातील 'बलुतं' नेमकेपण हेरणारी काही वाक्ये चटका लावून गेली. ते म्हणतात, "व्यक्ती म्हणून या आत्मचरित्रातून कळणारा 'मी', त्याला घडवणारा समाज, आणि त्या समाजाचं आणि त्या मधील अपरिहार्यपणे घडणाऱ्या स्थित्यंतराचं त्या व्यक्तीत घडलेले प्रतिबिंब याचा आवाका / झेप फार मोठा / मोठी आहे." मला वाटते या वाक्यात नुसती स्तुती अभिप्रेत नाही; तर तळठाव घेतल्यासारखा वाटतो आहे. नाडी पकडल्यासारखे वाटते.

मराठीतील काही अपवाद वगळता लेखक-समीक्षक यांची पुस्तकाकडे पाहण्याची थंड प्रवृत्ती कशी आहे याचा दाखला आपल्या पत्रातून गणेश पाठक देतात. दूरदर्शन-वर 'प्रतिभा आणि प्रतिमा' या कार्यक्रमात 'बलुतं'वर चर्चा घडवली गेली. हा कार्यक्रम पाहून गणेश पाठक लिहितात, "गेल्या रविवारी दूरदर्शनवर 'बलुतं'वरील चर्चा मोठ्या कुतुहलाने ऐकली. प्रा. य. दि. फडके यांचा एकूणच थंड प्रतिसाद, प्रा. पुष्पा भावे यांची छापील बोलण्याची तऱ्हा (उदा. बायकांचं स्वस्त कुतूहल, दोन ओळींतील मजकूर, वगैरे) आणि श्री. बाबूराव बागूल यांचा अलिप्त सहभाग – हे सगळं पाहिल्यावर आत्मचरित्रकार दगडू मारुती पवार यांची कींव करावीशी वाटली. वरील तिघाही पृच्छकांनी संपूर्ण कार्यक्रमात 'बलुतं' आपल्याला चुकूनही आवडल्याचा किंवा न आवडल्याचा धीटपणे उल्लेख केला नाही. हे आम्हाला तरी जाणवल्याशिवाय राहिले नाही. प्रत्येकाची आवड वेगवेगळी असते म्हणून त्यांनी कोणत्याही प्रकारची प्रतिक्रिया

व्यक्त केली नसेल तर ते समजू शकते. पण एखाद्या कलाकृतीच्या सच्चेपणामुळे तिला मिळालेले अभावित यश तथाकथितांना कुठेतरी खुपते की काय अशी शंका घेण्याइतपत ही चर्चा बेचव व्हावी याचे वाईट वाटले.

" पृच्छकांच्या निरनिराळ्या प्रश्नांना उत्तरे देण्याची तुमची पद्धती मात्र अगदी सरळ, साधी आणि समीक्षाविषयक परिभाषेच्या जंगलात नव्हती हे बरे झाले. उतास जाणारं यशही पचवणं किती कठीण असतं याचा प्रत्यय आला. कौतुक करण्यासाठी लागणारं मन फार मोठं असावं लागतं हात राखून बोलण्याचा शाप मराठी समीक्षकांना केव्हा आणि कोणी दिला कोणास ठाऊक. अहंकारानं एकारलेल्या बहुतांश आत्मचरित्रांच्या तुलनेत (अपवाद–स्मृतिचित्रे) तुमचे पुस्तक मला खूप आवडले म्हणून मी समीक्षकांविषयी कडवट प्रतिक्रिया व्यक्त केली. सदर पत्र वृत्तपत्राकडे पाठवावे की काय असा प्रश्न पडला पण वृत्तपत्रे दखल घेतीलच असे वाटेना म्हणून तुम्हालाच लिहिले."

'बलुत्या'तील भाषेसंबंधी — काही शब्द, म्हणी, वाक्प्रचार आम्हास कळत नाही असा आक्षेप काही पत्रांतून व्यक्त होतो. 'बलुतं' हा शब्दाचा नेमका उच्चार पांढरपेशा मंडळींना करता येत नाही. 'तं'वर जोर त्यांना देता येत नाही. ह्या शब्द आपण नव्यानेच ऐकतोय अशी कबुलीही काही देतात. खरे म्हणजे गावगाड्यातील बहुजन समाजाच्या रक्तात भिनलेला हा शब्द. एखाद्या सुशिक्षित दलित तरुणाने 'पाणी' ह्यातील 'णी' ह्याचा उच्चार 'नी' असा केला तर पांढरपेशा समाज त्याला हसतो. त्याच्या गावंढळ भाषेची कुचेष्टा होते. पण 'बलुतं'चा उच्चार चुकीचा केला तर यांना कुणी हसावे ? मूठभरांचे नॉर्म कुरघोडी करतात ते असे ! भाषा कुणाची शुद्ध ह्यावर अलिकडे मराठीत खूपच रण माजले आहे. मराठी शब्दकोषात नाहीत असे नवे शब्द, वाक्प्रचार, म्हणी फार मोठ्या संख्येने दलित आत्मकथनातून आल्या आहेत. पण कोणत्याही विद्यापीठात या संदर्भात अभ्यास नाही. आपल्याकडे ग्रीक किंवा लॅटिन शब्दांची उत्पत्ती कशी झाली असे संशोधन होत असते. पण आपल्याच मातीमधील शब्द-संपत्ती आपण आज मातीमोल करू बघतोय. ही एक प्रवृत्ती दिसते. तशी भाषा शुद्ध ठेवण्यासाठी, मराठीत आलेल्या परकीय शब्दांचीही उचलबांगडी करण्याचा हास्यास्पद अट्टाहास चाललेला. 'दुकान' नका म्हणू, 'विकान' म्हणा. 'टाय' नका म्हणू, 'कंठलंगोटी' म्हणा इ. पर्याय सुचवले जातात. प्रा. सुभेदार यांनी आपल्या पत्रात जशी न कळणाऱ्या शब्दांची यादी दिली आहे, तशी संस्कृत व इंग्रजी किती आलेत यांचीही यादी जोडली आहे. प्रत्येक पानावरचा उल्लेख आणि शब्द ह्यांसाठी त्यांनी घेतलेल्या कष्टाचा अचंबा वाटतो. इंग्रजी आणि संस्कृत शब्द हे अशिक्षित समाजाला कळणार नाहीत तर दलित/मागास शब्द आम्हासारख्या शिकलेल्या मंडळींना कळत नाहीत, असा पेच त्यांनी उभा केला आहे. जवळ जवळ २००–२२५ शब्दांची यादी त्यांनी आपल्या पत्राला जोडली आहे. मला वाटते भाषा समृद्ध व्हायची असेल तर असा शब्दांचा विटाळ धरून चालणार नाही. हाडीमाशी या शब्दकळा रुजल्यास–संस्कृत बेटाची जेवढी घसट होत जाईल तशी मराठी

भाषा समृद्ध-जिवंत-आणि रसरशीत होणार आहे.

शब्दांवरून आठवलं. 'बलुत्या'त काही गावकुसाबाहेरील शब्दांचा अर्थ नकळत विशद करण्यात आलेला. पण असा शब्दांचा अर्थ सांगितला तर समीक्षकांना कलाकृतीत बाध आल्यासारखे वाटते. घाट बिघडतो अशी त्यांची तक्रार. प्रा. रा. भि. जोशी आपल्या पत्रात लिहितात, "दगडू पवाराला ज्या शब्दांचा अर्थ आधीच माहीत आहे त्या शब्दांचा अर्थ दगडू का बरे सांगतो? कशासाठी? कोणासाठी? उदा. 'चाण्या, तोडक्या, गुडसा, मेगू, फाशी, शेव, बोहडा इ. शब्दांचा खुलासा कुणासाठी? उघड उघड तो आमच्यासारख्या पांढरपेशा वाचकांसाठी लिहितो. कलाशास्त्रात आस्वादाची प्रक्रिया सांगितली आहे. लेखकांनी मध्येच लुडबूड करू नये. आस्वादाच्या प्रक्रियेत खंड पडतो." पण मला वाटतं, 'मुंज' किंवा 'मोदक' या शब्दांमुळे जसा या पाठीमागे दडलेला आस्वाद घेता येतो, तसा 'बरबाट' किंवा 'खेंगाट' या शब्दांपाठीमागील आस्वाद पांढरपेशा वाचकांना किती प्रमाणात घेता येईल? (दलित वाचकाच्या एका पत्रात 'खेंगाट हा शब्द आला आहे. बलुतं वाचून त्याला 'खेंगाट' खाल्ल्याची आठवण आली.) जे शब्द केव्हाच वाङ्मयात आले नाहीत, शब्दकोषातही नाहीत, त्यांचा अर्थ देणं-त्याची व्युत्पत्ती शोधणं-त्यातील सांस्कृतिक छटा व्यक्त करणं हे जसे भाषा समृद्ध करण्याचे महत्त्वाचे काम आहे, तसेच समाजशास्त्र - मानव वंशशास्त्र ह्यातील धागेदोरे जुळविण्यासाठीही भाषेची मदत होणार आहे, हे विसरून चालणार नाही.

मी मध्यंतरी ३९ व्या जागतिक प्रदर्शनास फ्रॅंकफूर्ट (पश्चिम जर्मनी) येथे भेट दिली असताना असे आढळले की भारतातील जातिव्यवस्थेसंबंधी नेमकी कल्पना तेथील मंडळींना येत नाही. भारताबद्दल चुकीच्या कल्पना— 'म्युझियम'मध्ये ठेवण्याचा देश असेच त्यांना वाटते. त्यांना 'क्लास' कळू शकतो पण 'कास्ट' कळू शकत नाही. एकाच नदीच्या पात्रात जातीनिहाय पाणी भरण्याच्या जागा मुक्रर केलेल्या असतात— पाणवठ्यावर शेवटी अस्पृश्य मंडळी पाणी भरतात, पण पुढील येणाऱ्या दोन तीन मैलावरील गावातील उच्चवर्णीयांना तेच नदीचे पाणी कसे चालते हे त्यांना कळत नाही. पश्चिम जर्मनीतील हा अनुभव तर लंडनमधील युनिव्हर्सिटीतील (साऊथ आशिया) माझ्या एका कार्यक्रमात काही महाराष्ट्रीयनही श्रोते म्हणून उपस्थित होते. एका प्रश्नाला उत्तर देताना भारतातील दलितांना मिळणाऱ्या रिझर्वेशनाच्या संदर्भात मी बोलत होतो. तेव्हा तेथील सवर्ण मंडळी म्हणाली की "आम्ही लंडमध्ये दलितच आहोत. आम्हालाही रिझर्वेशनसाठी भांडावे लागते."

हे सर्व कथन करण्याचे कारण म्हणजे कु. बी. गीता यांचे बंगलोरहून याच विषयाच्या संदर्भात पत्र आले आहे. हिंदीतील 'सारिका'मधून 'बलुतं'चा काही हिस्सा त्यांनी वाचला. ब्राह्मण असूनही जातिव्यवस्था, प्रांत, भाषा यामुळे त्यांची झालेली ससेहोलपट लक्षात येते. त्या आपल्या पत्रात लिहितात, "सध्या मी 'आंबेडकर आणि पेरियार

रामस्वामी यांचा जनतेवर प्रभाव ' या विषयावर अभ्यास करीत आहे. आंबेडकरांचा सुसंस्कृतपणा पेरियरमध्ये नसला तरी त्यांनी ब्राह्मणेतर जनतेत जागृती निर्माण केली. त्यांच्या स्वाभिमानाला जे आव्हान दिले ते कमी महत्त्वाचे नाही. त्या दृष्टीनं कुणी आजच्या साहित्याचं मूल्यांकन अजून तरी केलेलं नाही. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतरांसंबंधी तेढ लहानपणापासून मी पाहात आलेली आहे. एका तटस्थ प्रेक्षकासारखी. बालपण पुण्यात. वास्तव्य स्वतःला सुसंस्कृत म्हणवून घेणाऱ्या डेक्कन जिमखान्याच्या, आपट्या-लेल्यांच्या वसाहतीत. आम्ही मद्रासी म्हणजे बाहेरचे आणि म्हणूनच सगळ्या महाराष्ट्रीयांना सारखेच जवळचे आणि दूरचे. मोरे आणि मोघे यांच्यातला फरक कधी उमगला नाही. पटवर्धनांच्या शैलाबरोबर शेजारच्या शेवंतीला आईनं इडली खायला बसवलं म्हणून शैला फणकाऱ्यानं का निघून गेली हे तेव्हा समजलं नाही ... पुणे सोडून मद्रासला आलो तेव्हा जातिभेदांचं वेगळंच विकृत आणि हिडीस रूप प्रकट झालं. ' पापाती (बामणाची पोर) म्हणून पदोपदी अपमान. कॉलेजमध्ये प्रवेश नाही. कारणे दोन : एक म्हणजे ब्राह्मण आणि दुसरं म्हणजे शिक्षण मराठी माध्यमातून. ए. बी. च्या बरोबर म्हणजे (Non Brahmin) ब्राह्मणेतरांमध्ये मिसळतो म्हणून नातेवाइकांकडून बहिष्कार ... "

ह्या पार्श्वभूमीवर रहिमतपूर येथून अजमल ईस्माइल मुजावर यांचे पत्र वाचण्यासारखे आहे. खेड्यातील मुसलमानांचीही स्थिती बलुत्यात चित्रित केलेल्या दलित समाजा-सारखीच आहे ही व्यथा ते मांडून जातात. ते आपल्या पत्रात म्हणतात, " सध्या मुस्लीम समाजाचीसुद्धा अशीच मागासलेली परिस्थिती आहे. महाराष्ट्रातल्या खेड्यांमध्ये राहाणाऱ्या मुस्लीम समाजाला खरे खुले धर्माचे ज्ञान नाहीच. केवळ ज्यांना थोडंफार धार्मिक ज्ञान आहे, अशांच्या मागे सर्व खेड्यात मुस्लीम समाज उभा असतो आणि धर्माच्या नावावर मग अनेक काळी कृत्ये घडत असतात. राजकीय लोक याचा चांगला फायदा उठवतात. " ठायी ठायी होत असलेल्या धार्मिक दंगलीवर मुजावर यांनी नेमके बोट ठेवले आहे. हमीद दलवाई गेल्यानंतर त्यांचा विचार मुस्लीम तरुणांच्या (संख्येने थोडे का असेना) मनात क्रांतिकारक प्रेरणा कशा देऊन केलाय, याची प्रचिती अशा पत्रातून मिळते. असे एखादेच जरी पत्र असलेलं तरी त्याचे मोल महत्त्वाचे असते.

दलित साहित्याची चळवळ नसती तर ' बलुतं ' हाताला लागले असते की नाही याबद्दल साशंक आहे. डॉ आंबेडकरी चळवळीतून लहानपणापासून जे वैचारिक घुसळण झाले, विचारांचा, वैज्ञानिक दृष्टिकोणाचा जो झोत पडला, त्यातूनच ' बलुतं ' दिसू शकले. दलित साहित्य चळवळीमुळेच आज मराठी साहित्यात आत्मकथानकाची लाट आलेली. कोण मागे कोण पुढे हा प्रश्न मला तसा दुय्यम वाटतो. श्री. उत्तम बंडू तुपे ह्यांचे ' काट्यावरचे पोट ' हे आत्मकथन वाचल्यानंतर मी त्यांना पत्र लिहिले होते त्यात माझी वरील भूमिका स्पष्ट केली होती. बाकीचे बलुतेदार आपल्यासारखेच जागे होतील अशी भूमिका प्रकट केली होती. त्यावर तुपे ह्यांनी पत्र लिहिले आहे. दलित.

साहित्य चळवळ त्यांना मान्य नाही. ग्रामीण साहित्याचीच तीही एक बाजू असे ते समजतात. ते आपल्या पत्रात लिहितात, "वास्तविक 'काट्यावरचं पोट' आपल्या 'बलुतं'च्या आधी प्रकाशित झाले असते. परंतु 'मनोरा'च्या प्रकाशकाचे अडेलपणामुळे ते उशिरा प्रकाशित झाले आहे. आणि आपण म्हणता तसलं दलित चळवळीचं काही पण नाय, या चळवळीच्या आधी अण्णाभाऊ साठे, शंकर खरात यांसारखे अनेक नामवंत लेखक व परंपरा या दलित चळवळीअगोदर नावारूपाला आली आहेत. रामायण लिहिणारा वाल्मिकी कोळीच होता आणि महाभारत लिहिणारा व्यास पण दलितच की—असो." श्री. तुपे यांना दलित साहित्याची नेमकी भूमिका न समजल्यामुळेच त्यांचे असे घोटाळे होत असावेत. केवळ दलित जातीत जन्माला येणारा प्रत्येक लेखक हा दलित साहित्यिक ही भूमिका कधीच घेतली गेली नाही. दलित असणे निराळे आणि त्याच्या लिखाणात 'दलित जाणीव' असणे निराळे. भारतीय समाजात आतापर्यंत मध्यमवर्गाची जाणीवच मातब्बर ठरलेली आहे. या जाणिवेच्या पाठीमागे आजपर्यंत समाजातील सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा उभी होती, आहे. या मध्यमवर्गीय normनाच समाजाने दीर्घकालीन मान्यता दिली आहे. धार्मिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा जीवनाच्या सर्वच क्षेत्रात त्यांचे प्राबल्य असते. हेच norms साहित्यावरती कुरघोडी करतात. ह्या normsना छेद देणारी, तळागाळातील माणसाबद्दल आपुलकी बाळगणारी, कप्पेबंद व्यवस्थेला झिडकारून देऊ इच्छिणारी जाणीव—ती दलित जाणीव—असे मला वाटते. व्यास वाल्मिकी हे केवळ दलित जातीत जन्माला आले म्हणून त्यांच्यापासून दलित साहित्याची परंपरा आहे असे जे तुपे म्हणतात हे दिशाभूल करणारे आहे. वाल्मिकीला उद्देशून मी एका कवितेत म्हटले आहे,

" वा, वाल्मिकी,
रामराज्याची तू स्तुती गावी
कारण तू कवींचा महंकवि ना ?
क्रौंच पक्ष्याची हत्या पाहून
तुझे कारुणिक मन आक्रंदून उठले
तुझा जन्म झाला गावाबाहेर : उपेक्षित वस्तीत
जिथे दुःखच जन्मले; तिथले विषण्ण चेहेरे
काळजीने नांगरलेले
फळाफुलांनी नाही कधी बहरले
मुक्तीसाठी त्यांनी टाहो फोडलेले
खरंच का न ऐकले ?

तुझ्याच रक्ताचा एखादा शंबूक
तटतटून संतापाने पेटून उठला

रामराज्याची स्तुती गाणाऱ्या
हे महाकवे !
तेथेही अमानुषतेचा हिमकडा कोसळला.

हे महाकवे, तुला महाकवी तरी कसे म्हणावे ?
हा अन्याय, अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला असता
तर तुला काळजावर कोरून ठेवले असते !

मला वाटते, या कवितेत 'दलित जाणीव' म्हणजे काय ह्याचे नेमकेपण लक्षात यावे. येथे केवळ रामायण लिहिणारा कवि वाल्मिकी अभिप्रेत नाही. तर आजही तथाकथित रामराज्याची स्तुती करणारे—प्रस्थापित मूल्यांचे ढोल बडवणारेही साहित्यिक दिसतात. श्री. तुपे यांना दलित साहित्याची चळवळ ही ग्रामीण साहित्याचीच एक बाजू वाटते. ह्या दोन चळवळीतील भिन्नता अनेकदा सांगून झाली आहे. ग्रामीण साहित्याने सातत्याने 'कृषी संस्कृती' असा पाठपुरावा केला आहे. कृषि संस्कृती म्हणजे आजचा गावगाडा का ? की ज्यात जुने कर्मकांड-शोषण-जातीव्यवस्थेची पक्की उतरंड ह्यांचेच दर्शन होते ? सांस्कृतिक पातळीच्या दृष्टीने ग्रामीण साहित्य ही दोन साहित्य विश्वं वेगवेगळी आहेत. ग्रामीण साहित्याला आमूलाग्र परिवर्तन अभिप्रेत नाही. ग्रामीण साहित्याचा झगडा ग्रामीण विरुद्ध नागर असा आहे. ग्रामीण साहित्य लिहिणारा वर्ग परंपरावादी आणि भूतकालीन इतिहासाचा भोक्ता आहे. ग्रामीण साहित्य हे मनोरंजनवादी आहे. फार तर शहरी साहित्यातील आकृतिबंध (फॉर्म) इ. निर्माण करण्यावर खुश आहे. दुःखाबद्दल, तेथील अडाणी जनतेबद्दल ग्रामीण साहित्य टवाळीच्या सुरात बोलते. एखाद्या फ्लॅटमधील माणसाने टवाळी करावी तसा हा प्रकार. शैलीतूनही हा टवाळीचा सूर दिसतो.

श्री. तुपे यांच्या पत्रात 'बलुतं'च्या आधी 'काट्यावरचे पोट' प्रसिद्ध झाले असते असे विधान आले आहे. त्यात सूक्ष्म आकस दिसून येतो. 'बलुत्या'चा झालेला गवागवा, मिळालेला पैसा ह्यामुळे हा आकस आहे की काय न कळे ! हा अनुभव मला अनेकदा आलेला. 'फडतुस आत्मचरित्र लिहिले आणि परदेशची वारी मिळाली' असा सूर एका पत्रातही पाहावयास मिळतो. 'बलुतं' लिहिलं गेलं तेव्हा पुढे ते गाजेल, एवढं सनसनाटी होईल, फोर्ड फौंडेशनची शिष्यवृत्ती—तीही लाखाच्या वर मिळेल असं बेतून काही लिहिलं गेलं नाही. तरी पण धुळे येथील एका परिसंवादात एका मान्यवर समीक्षकांनी उद्‌गार काढले. त्यांच्या टिपणात मतं व्यक्त केले की दगडू मारुती पवार याच्या आयुष्यावर दया पवार ह्यांनी व्यापार केला. अर्थात् वाङ्मयीन व्यापार असे आपणास बोलावयाचे होते अशी पळवाट त्यांनी काढली होती. 'वाङ्मयीन व्यापार' या पाठीमागे समीक्षकांना वेगळा अर्थ अभिप्रेत असेल, पण तेथील श्रोत्यांना 'सौदा केला' असाच अर्थ उघड झाला. तेथेच एका दलित साहित्यिकानेही आपल्या मनातली

मळमळ व्यक्त केली. ते म्हणाले, "मला फोर्ड फाउण्डेशन जरी मिळाले नाही तरी 'लोक फाउण्डेशन' मिळाले आहे." एक तर आपला अभावग्रस्त देश. त्यातही अभागस्त समाजातील माणसाला अशी शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे केवढी 'गोची' होते हे अनुभवल्याशिवाय कळणार नाही. 'फोर्ड' ही अमेरिकेतली संस्था. त्यांनी दिलेली शिष्यवृत्ती, त्यामुळे काल-परवापर्यंत 'डावा' समजला जाणारा मी एकदम एका रात्रीत 'उजवा' झालो होतो. काहींच्या दृष्टीने गद्दार, तर काहींना 'स्पाय' वाटतो.

'बलुत्या'त हिरोची थिअरी नाही. रामायण-महाभारतापासून तर आजतागायत आपल्याकडे 'हिरोगिरी' वाचण्याची सवय जडलेली. पुरोगामी आणि दलित साहित्यातही या हिरोच्या कल्पनेचं उदात्तीकरण केलं जातं. माणूस आहे त्यापेक्षा, समाजाच्या तळापासून चार 'अंगुळं' वर दाखवला म्हणजे क्रांतीला दिशा मिळते अशीही काहींची भाबडी कल्पना असते. 'बलुत्या'तील प्रत्येक प्रसंग हा पराजयाकडे झुकलेला दिसतो. धडपड विफल होते आहे, विचार पराभूत होत आहेत किंवा प्रत्येक दिवस युद्धाचा वाटतो आहे, यामुळे अनेकांचा हिरमोड होतो. श्री. मधुकर तूपलोंढे ह्यांचे या संदर्भातले पत्र पाहण्यासारखे! ते म्हणतात, "एवढा विध्वंस पाहूनही, बाबासाहेब आंबेडकरांसारखा प्रचंड स्रोत तुझ्यापुढं असताही, ज्ञानाचे दरवाजे खुले होत असताही, परिस्थितीला लाथ मारून, तिचा कोथळा फोडून, तू तुझं व्यक्तित्व पुरुषी बनवू शकला नाहीस ह्याची खंत वाटतेय. जसा जसा पुरुषावर प्रहार पडावा .. पण त्या रसायनातून पोलाद तयार व्हायच्याऐवजी तू ठिसूळ लोखंडासारखा, Cast-Iron सारखाच राहिलास याबद्दल मला तुझी कणव येते. तुझ्यातील दुर्मुखलेपणा किंवा अंतर्मुख स्वभाव याला कारणीभूत आहे. याचा सर्वस्वी दोष तुझाच आहे. म्हणून जीवनात आलेल्या अनेक संधी तू घालवल्या असशील, म्हणूनच तू ताठ उभाच राहू शकला नाहीस. क्षमा कर! पण हेही जाणवलं!"

मधुकर तूपलोंढे हा तसा माझा जवळचा मित्र. अनेक वर्षे एकत्र राहूनही तो दगडूला समजू शकला नाही असे दिसते. 'बलुत्या'तील नायक भसा भसा कोणतंच तत्त्वज्ञान बोलत नाही. आपण हे केले, ते केले असा पुरुषार्थही सांगत नाही. काहीतरी भव्य, दिव्य, चिंतनीय प्रेषितवाणी त्याने उच्चारावी; समाजाला मार्ग दाखवावा; म्हणूनही काही वाचक वाट पहात असतात. पण त्यांची शेवटपर्यंत कमालीची निराशा होते.

असा 'ॲण्टी हिरो' का बरं चितारला, याचं कोडं कुणाला उलगडत नाही. दलित साहित्य विद्रोह—नकार—विज्ञाननिष्ठा अशा काही सूत्रात मांडणाऱ्या भाष्यकारांचाही 'बलुतं'च्या नायकाच्या वागणुकीमुळे गोंधळ उडालेला आहे. खरं म्हणजे नायक ही कल्पनाच मुळी आजच्या संदर्भात बांडगुळासारखी वाटते आहे. पाच दहा लोकांच्या गुणांचो बेरीज करून आपण नायक उभा करतो. वास्तवात तसा तो कुठेच दिसत नाही. नायकाचं केवळ उदात्तीकरण होतं. समाजापासून तो चार अंगुळं वर जाऊन बसतो, रोमँटिक क्रांतिवाद्यांना क्रांतीच्या झिणझिण्या उठतात, पण समाज जेथल्या तेथेच

असतो. खरं म्हणजे 'बलुत्या'त अशी अनेक पात्रं आहेत की त्यांच्या ठायी हिरो-हिरॉइनचे गुण आहेत. पण त्यांची अशी ससेहोलपट कोण करीत आहे याकडे वाचकांनी जावं अशी इच्छा होती. "हा नायक असा वागायला नको होता ..तो नेभळट आहे...त्याच्यात पुरुषार्थ नाही .." अशा प्रकारची वाक्यं फेकून सामाजिक जाणिवा बदलतील असं मला वाटत नाही. 'बलुत्या'त सर्वत्र नकार आहे. पण त्याऐवजी काय? ह्याचं उत्तर पुढील येणारा समाज देणार आहे. आजच त्यावर सैद्धांतिक भाष्य करणं, म्हणजे त्या अनुभवावर लेखकानेही कुरघोडी करणं होणार आहे. या नकाराच्या पाठीमागे काही विधायक विचार आहे याचं भान आलं तरी 'बलुतं' बरंच काही सांगून जातं असं मला वाटतं.

'बलुतं'च्या नायकाचे काही प्रसंग सांगून सहज उदात्तीकरण झालं असतं. ते प्रसंग सांगितले असते तर हा नायक 'पुरुषोत्तम' ह्या सदरातही काहींनी त्याची वर्णी लावली असती. 'बलुत्या'त मुलीच्या लग्नाकरिता शेत गहाण ठेवल्याची घटना सांगितली आहे. ही नेमकी मुलगी कोणती या संदर्भात काहींनी पत्रांतून विचारणा केली आहे. बकुळाच्या संदर्भात काही पत्रकर्त्यांनी नायकाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. निकम मालेगाव येथून लिहितात, "सईनंतर आपण दुसरे लग्न केले असावे. परंतु सईच्या पोटी तुमच्या रक्ताचा गोळा वाढला त्याचे काय झाले? आपण सुधारणावादी आहात (असे वाटते?) तर बकुळाचा शोध घेऊन तिला चांगलं जीवन जगण्यास संधी दिली काय?" जळगावचे पाटील लिहितात, "अत्यंत वेदना देणारी दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या प्रेमाची निशाणी व आपला जीव की प्राण अशा मुलीचे—बकुळाचे—काय झाले, ते आपण लिहिले नाही. बिचारी खरंच मुरळी झाली काय?" श्री. मुकुंद टाकसाळे पुण्याहून लिहितात, "सईचं एक वाक्य तुम्ही उद्धृत केलंय, 'हा पुढारी झालाय ना? उद्या बकुळा मोठी झाली म्हणजे मी तिला मुरळी करीन, त्याच्यापुढं नाचवीन!' हे वाक्य तमाम विद्रोही कवितांच्या तोंडात मारणारं आहे. त्यातला कडवटपणा कापत जाणारा आहे. सईलाही मुलीविषयी प्रेम असणारच. पण तुमचा 'पुढारीपणा'चा नक्षा उतरवण्यासाठी पोटच्या पोरीचाही बळी देण्याची तयारी आहे. कदाचित सईच्या अडाणीपणामुळे 'मुरळी बनवणे' हा प्रकार तिला तुमच्याइतका भयंकर वाटतही नसावा. पण तुम्हाला तो किती भयंकर वाटतो याची तिला कल्पना आहे आणि म्हणूनच तिला त्या प्रकारे तुम्हाला उघडं पाडायचं आहे, तुमचा सूड घ्यायचा आहे."

'बकुळा'चा मुद्दा घेऊन अनेक पत्रकर्त्यांनी हल्ला चढवला आहे. त्यापैकी एकाही पत्रकर्त्याने प्रत्यक्ष पायपीट करून नेमकी वस्तुस्थिती काय असेल याचा शोध घेतला नाही. आपली पत्रकारिता भ्रष्टाचाराचा शोध करून घेते ना? मग हा प्रश्न त्यांना का बरे महत्त्वाचा वाटत नाही? काही काही तर 'बलुतं'वर एम. फिल. किंवा पीएच. डी. सारखे प्रबंधही लिहीत आहेत! 'बलुतं' प्रसिद्ध झाले त्यापूर्वी बकुळाचं लग्न झालं होतं. तब्बल १४-१५ वर्षानंतर दगडू बकुळाच्या मामाच्या गावी गेलेला असतो.

(बकुळा लहान असताना तो काही वेळा जात असतो, पण त्यावेळी बापाकडे मुलीला देत नाहीत, हा उल्लेख बलुत्यात आलेला.) एखाद्या नाटकात किंवा सिनेमात शोभेल असा तो सीन असतो. बकुळाला बाप मुंबईला घेऊन येतो. तिचे मोठ्या डामडौलानं सुशिक्षित तरुणाशी लग्न लावून देतो. आज बकुळा आपल्या संसारात सुखी आहे. बापाचे अंतःकरण तुटले नसते तर आज ती कोणत्या खाचरात असती याची सहजच कल्पना यावी. हा साराच प्रसंग 'दिनांक'च्या दिवाळी अंकात आलेला. इच्छुकांनी तो मुळात वाचून पाहावा. 'बलुत्या'च्या नायकाचे उदात्तीकरण टाळले याचे कारण म्हणजे एका बकुळाची सुटका झाली ह्याकडे लक्ष वेधण्यापेक्षा समाजात अशा अनेक बकुळा आहेत ह्याची खंत वाचकांना वाटावी, ह्या बाबीकडे लक्ष वेधण्याकडे आहे याची साक्ष पटावी.

सई-सलमा ह्यांच्या संदर्भात—त्यांची बाजू घेऊन झडझडून काही पत्रे आली आहेत. सौ. सुनीता देशपांडे, श्री. मुकुंद टाकसाळे, सौ. सामंत ह्यांच्या पत्रातील 'धार तीक्ष्ण आहे', 'काळीज कापीत जाणारी' अशी. सौ. सुनीता देशपांडे पुण्याहून लिहितात, "तुम्ही पुरुष म्हटल्यावर तुमची प्रेमप्रकरणे सभ्य ठरतात. सच्च्या निष्ठेबद्दल शंका आल्यावर तुम्हालाही रामाचा अवतार घेऊन तिला वनवास भोगायला पाठवावसं वाटतं. म्हणजे तुम्हीही सवर्णांच्या संस्कृतीचाच सोयीस्कर आश्रय घेतलात ना? लग्नापूर्वीची प्रकरणे सोडा, पण सईकडून पत्नी म्हणून निष्ठेची अपेक्षा तुम्ही करता, तर सलमाचं वेड तुम्हाला लागलं असतं का? आणि ज्या सलमानं तुमचं कोमेजलेलं आयुष्य पुन्हा फुलवलं, तुम्हाला माणसात आणलं, तिच्या प्रेमाला तरी तुम्ही कोणता प्रतिसाद दिलात? जिवावर उदार होऊन ती तुमच्याबरोबर यायला तयार असताना जिवाला घाबरून तुम्ही माघार घेतली ना? त्यानंतर सलमाच्या घरी गेला असताना तिच्या गर्भार पोटाकडे पाहून तुम्ही जे उद्‌गार काढले, ते तुमच्या तोंडून मग निघू शकले नसते. दलितांच्यावर होणारा अन्याय सूर्यप्रकाशाइतका स्वच्छ, सत्य आहे. पण दलित चळवळीबद्दल मात्र माझ्या मनात अनेक शंका आहेत. दलित पुरुष, स्त्रीशी ज्या रीतीने वागतात, ती रीत सवर्णांपेक्षा काही निराळी नाही." जवळ जवळ अनेक पत्रांतून अथवा समीक्षेतून हाच सूर दिसतो.

ह्यातील प्रश्नांना उत्तर म्हणून एक गोष्ट सांगाविशी वाटते. "एक सर्कस असते. त्यात डोळे बांधून चाकू-सुऱ्यांचा खेळ करणारी एक स्त्री व पुरुष असतात. त्या दोघांचे एकमेकांवर जिवापलिकडे प्रेम असते. एकदा काय होते, सुरा फेकणाऱ्या तरुणाच्या लक्षात येतं, की आपण जिच्यावर मनस्वी प्रेम करतो, ती आपली प्रेयसी आपल्याशी प्रतारणा करते आहे. परपुरुषाशी तिचा संबंध आहे. ही घटना कळताच तरुण वेडापिसा होतो व सूड घेण्याचे विचार त्याच्या मनात येऊ लागतात. तो मनाशी निश्चय करतो की रात्रीच्या वेळी सुरा फेकताना तिच्या हृदयाचा छेद घ्यायचा. रात्री रोषणाईत खेळाला सुरुवात होते. तरुणीला फिरत्या चक्रावर बांधलेले असते आणि तो

तरुण डोळ्यावर पट्टी बांधून त्या बाईच्या हृदयाचा ठाव घेण्यासाठी आतुर झालेला असतो. पण त्याचे हात त्याच्या कलेत एवढे निष्णात असतात की अनेकदा सुरी मारूनही तो तिला मारू शकत नाही.'' हे रूपक सांगून किती वाचकांचे समाधान करता येईल हे काही सांगता येत नाही.

'बलुत्या'तील स्त्री-पुरुष संबंधांकडे अनेकांनी 'भानगड' म्हणूनच बघितलं. ह्या विषयी मध्यमवर्गीय वाचकांनी कमालीची उत्सुकता दाखवली. सई-सलमा प्रकरणांवरून वादळ उठवलं. दोन ओळींच्यामधले वाचकांनी वाचायला हवे असे आवर्जून सांगणाऱ्या लेखक-समीक्षकांनी, सुज्ञ वाचकांनीही हे घोटाळे केले आहेत. दलित मध्यमवर्गीयांच्या पत्रांतून मात्र सई-सलमावर प्रश्न नाहीत. त्यांना वेगळ्याच प्रश्नाने सतावले आहे. पत्रांतून आईच्या शोषणासंबंधी अनेक पत्रं आहेत. पण आजी, काकू, जमनामावशी, विठाबाई यांच्या जीवघेण्या दुःखाबद्दल कुणाचेच पत्र नाही. या स्त्रियांबद्दल बोलायचे तर समाज-व्यवस्थेवर बोलावे लागते. सई-सलमावर नेमकं बोट टेवलं, नायकाच्या डोक्यावर सर्व खापर फोडलं म्हणजे आपला समाज शुचिर्भूत झाला असे त्यांना वाटत असावे. सई-सलमात मध्यमवर्गीयांची फार मोठी गुंतवणूक होते आहे, याचा अर्थ त्यांना हे आपलेच प्रश्न वाटतात. आपल्याच अंतरंगाचे किंवा 'बेड'चे प्रश्न वाटत असावेत. ह्या प्रश्नानेच तो आज जवळ जवळ ग्रासलेला आहे. त्याची समाजाची नाळ तुटल्याचे हे द्योतक सांगावे लागेल.

'बलुतं' अलिकडे शिवाजी विद्यापीठात अभ्यासक्रमात लावलेले. प्रश्नपत्रिकेत 'टीपा लिहा' या सदरात अनेक व्यक्तिरेखांची यादी दिलेली असते. पेपर तपासणारे एक प्राध्यापक मध्यंतरी भेटले होते. ते म्हणाले, "अरे काय म्हणावे आजच्या तरुणांना, जवळ जवळ सर्वच सई किंवा सलमावर टिपणं लिहितात." स्त्री-पुरुष संबंधात आपला समाज किती sick असू शकतो, ह्याची ही प्रचिती. खऱ्या म्हणजे वाचकांना ज्या भानगडी वाटतात, त्या तशा आहेत काय ? 'बलुत्या'त जो काही दगडूची प्रेम-प्रकरणं येतात ती बरीचशी 'काफ-लव्ह'च्या पातळीवर. सलमाचं प्रकरण तर फ्रॉटोनिक लव्ह-सारखं. काही वाचक नीति-अनीतिचे प्रश्न उपस्थित करतात. तर काहींना हया पलिकडे हयात काहीतरी पाणी मुरतंय असा संशय ! खऱ्या अर्थानं जी माणसं भानगडी करतात, त्यांना असे लिहिण्याचे धाडस होते काय ? प्रत्यक्ष काही घडण्यापेक्षा मनात काही बरंच घडतं. त्यात सांस्कृतिक दरीमुळे पडलेले अंतर हाही महत्त्वाचा मुद्दा असतो, हयाचं चित्रण आलेलं. हयाची मुळे जातीपातीच्या उतरंडीत, सांस्कृतिक मूल्य-कल्पनेत असावीत. प्रेम कुणाशी करावं, लग्न कुणाशी करावं, हयाचं गणित तुम्ही कोणत्या जातीत जन्म घेतलात हयावरच सारं बेतलेलं. डोळे मिटून अंडरग्राउंड काहीही चालेल, पण विवाह-संस्थेत मात्र हयाला मान्यता नाही. माणसामाणसात जात, धर्म, वर्ग अशा भिंती कशा पडल्या आहेत हेच कुणी ध्यानी घेत नाही.

इथवर 'बलुतं'वरील आलेल्या काही पत्रांचा आढावा घेण्याचा मी प्रयत्न केला

आहे. ह्यात काही त्रुटी राहिल्यात ह्याची मला जाणीव आहे. काही वेळेस अनवधानाने तर काही वेळेस व्यावहारिक अडचणींमुळे सर्वच प्रश्नांना मी सामोरा जाऊ शकलो नाही याची जाणीव आहेच. माझ्या दृष्टीने जे सत्य वाटते ते सांगण्याचा एक प्रयत्न. मला तर वाटते सत्याला दोनच डायमेन्शन्स नसून तीन असावीत. मी जी बाजू बघतो तिच्या पलिकडील दुसरी बाजू मला दिसेलच असे नाही. आणि मी आणि दुसरा बघणारा तिसरीही बाजू दुरून पाहू शकतो. त्यातील त्या तिसऱ्याला वेगळेच दिसण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे असे भिन्न का दिसते यालाही सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कारणे असतात.

'बलुतं' लिहून लेखक संपला, आता त्याच्याकडे लिहिण्यासारखे काय राहिले— म्हणून की काय, ही पत्रे प्रसिद्ध करून 'बलुतं'च्या शिळ्या कढीला ऊत आणला असं काहींना वाटणार आहे. मराठीत एकदा का 'कानफाट्या' म्हणून शिक्का बसला की मागचा पुढचा विचार न करता सगळे तशीच री ओढतात. लेखक, समीक्षक, पत्रकारही यातून सुटत नाहीत. 'बलुत्या'च्या यशाचे दडपण लेखकाला वाटते ही त्यांची मीमांसा. 'बलुतं'नंतर माझी 'विटाळ' आणि 'चावडी' ही दोन पुस्तकं आलीत. 'विटाळ'-मधील बहुतांश कथा सारिका, धर्मयुग, साहित्य अकादमीची पत्रिका, रविवार हंस (हिंदी), आजकाल इ. नामवंत हिंदी नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्यात. हिंदीत आल्यामुळे की काय, कन्नड, तेलगु, गुजराथी भाषेत गेल्यात. नुकतंच फ्रँकफूर्ट येथे जे जागतिक पुस्तकांचे प्रदर्शन भरले, तेथे दिल्लीच्या Sterling (स्टर्लिंग) पब्लिकेशनच्या वतीने भारतातील वेगवेगळ्या प्रांतांतील लेखकांच्या कथांची अँथॉलॉजी इंग्रजी भाषेत प्रसिद्ध करण्यात आली. त्यात 'विटाळ'मधील कथा (वधस्तंभ) घेण्यात आली. नुकतीच ही कथा अमरावती विद्यापीठात इंग्रजी भाषेच्या पुस्तकात सामाविष्ट करण्यात आली. असे असले तरी कथाकार म्हणून मराठीत आपणास कुणीच ओळखत नाही. दलित साहित्यिक म्हणून मराठी कथेची जी अँथॉलॉजी प्रसिद्ध केली गेली, त्यातही कथाकार म्हणून माझी निवड नाही. 'चावडी'कडे तर जवळ जवळ सर्वांचेच दुर्लक्षच झाले आहे. त्यातील 'जागल्या' हे सामाजिक-राजकीय व्यंग—लेखकांवरचे लेखन—हे मराठीत कुठे बसते याचा फारसा विचार नाही. ह्या लेखनामुळे भले भले साहित्यातील मानदंड दुखावलेत याची मला जाणीव आहे. 'जागल्या' हे लेखन 'तात्पर्य' ह्या मासिकातून टोपण नावाने यावयाचे. टोपण नावाचा शोध जसा जसा लागत गेला, तसतसे हे लेखन आकसत गेले ह्याला सेन्सॉरशिप म्हणायचे नाही तर काय म्हणायचे? 'तात्पर्य'मधील हे जागल्याचे पान आपण आवर्जून वाचतो आहे, असे पु. ल. यांनी मोठ्या मनाने लिहून पाठवले आहे. माझे कविता-लेखन धीराद्दमाने असले तरी ते आजही थांबलेले नाही. ज्या कविता अनुल्लेखाने मराठीत मारल्या जात आहेत, त्या कवितांचा जर्मन, इंग्रजी भाषेत अनुवाद होतो याचेही नवल वाटलेले. एकूण काय, 'बलुत्या'सारखं सनसनाटी सर्वांना हवं म्हणजे लेखक जिवंत असल्याची साक्ष पटणार आहे. मराठीच्या


संदर्भात एक गोष्ट आवर्जून सांगाविशी वाटते की नव्या लेखकाच्या डोक्यावर मोठ्या माणसाचा वरदहस्त असेल तर गल्लीबोळातले लोकही आपल्याला ओळखू लागतात. अनेक पत्रांतून 'बलुतं'वर पु. लं.नी 'एक दुःखाने गदगदलेलं झाड' हा म टा. मध्ये लेख लिहिला आणि वाचक खडबडून जागा झाला. आणि त्यामुळेच त्यानं बलुतं वाचलं असावं! 'बलुतं'ला पु. लं.नी मोठं केलं असे म्हणणारे महाभागही भेटलेत. तेव्हा 'बलुतं'व्यतिरिक्त माझं लेखन लोकांपुढे येणंच अशक्य. एखाद्या समर्थ हाताची वाट पाहावी की काय असे वाटू लागलेले!

जवळ जवळ गेली दहा वर्षे 'बलुतं' वेगवेगळ्या कारणांनी गाजलं आहे. समाजाच्या सर्व थरांतून ते आज वाचलं जातंय. वेगवेगळ्या 'जनरेशन गॅप'ला 'बलुतं' वेगवेगळ्या कारणांनी आवडतंय काहींना न आवडल्याची कारणे त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक संदर्भात मला तपासाविशी वाटतात. एक सामाजिक, सांस्कृतिक सर्व्हे म्हणून आलेली सर्वच पत्रे मला महत्त्वाची वाटतात. उद्याच्या पिढीला ह्या वेळच्या सामाजिक, सांस्कृतिक अशा गुंतागुंतीचे धागेदोरे उलगडण्यास अशा पत्रांची मदतच होते, अशी माझी धारणा होते. संग्रहात ज्यांची पत्रे समाविष्ट केलीत, त्यांचे जसे मी मनःपूर्वक आभार मानतो, तसेच काही अपरिहार्य कारणांमुळे काहींची पत्रे समाविष्ट करता आली नाहीत याचा खेदही होत आहे.


अशा पत्र-संग्रहाचे पुस्तक खपेल की नाही याची चिंता न करता, एक सामाजिक दस्तऐवज वाचकांच्या हाती सुपूर्द करावा, हंसक्षीर न्यायाने वाचकांनी आजच्या सामाजिक वास्तवाचे मनन करावे, या उदात्त हेतूने प्रकाशक श्री. मनोहर चंपानेरकर यांनी बहुधा हे धाडस केलेले असावे. त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच! विखुरलेली पत्रे गोळा करणे, त्यांची प्रेस कॉपी करणे यासाठी मोलाची मदत, कन्या वैशाली आणि चिरंजीव प्रशांत यांनी केली आहे हे विसरून चालणार नाही. याशिवाय ज्येष्ठ कन्या प्रज्ञा ही सध्या एम. ए. (मराठी) करीत आहे. तिच्याबरोबर झालेल्या चर्चाही या संदर्भात महत्त्वाच्या वाटतात.

— दया पवार
२/D, स्वरूप, सुभाषनगर
गोरेगाव (पूर्व)
मुंबई ४०००६३

पुरोवाक्



पुरस्कार



'पुरस्कार' ह्या सदरात मला वेगवेगळ्या भागांतून, प्रतिष्ठित साहित्यिकांकडून आलेली पत्रे पुढे देत आहे. —दया पवार

तानाजी रंगनाथ गुरव / उस्मानाबाद

समाजातील सर्व थरातील लोकांनी 'बलुतं' वाचलं व त्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली. काही टीका करणारेही निघाले. सध्याच्या प्रतिक्रियात्मक जगात ते अपवादात्मक नाही. सत्य, वास्तववादी व प्रखर स्वरूपात एखादं वर्णन वाचलं की माणसाची स्थिती फारच चिंतनीय होते. आपल्या 'बलुतं'नं तसाच परिणाम केला. बालपण, शिक्षण, कामगिरी (अतिशयोक्तीचा आविष्कार), मृत्यू व मूल्यमापन असा सळा म्हणजे आत्मचरित्र किंवा व्यक्तिचरित्र. परंतु आपल्या वाट्यास आलेले आत्मचरित्र फारच विचित्र आहे व विचार करावयास भाग पाडणारं आहे. फक्त याची सामाजिक बाजू जमेस धरली तर आजचे पुरोगामित्व व सध्याची दलितांची परिस्थिती विसंगतीपूर्ण वाटतात. बलुतं सवर्ण व जातीयवादी मनोवृत्तीच्या उच्चभ्रू समाजास मार्मिक प्रश्न विचारते. उदा. "तुम्ही बौद्ध झाला तरी शेवटी महारच." महार म्हणून ओळखण्याकरिता सरकारदरबारी त्यांचं नाव 'नव बौद्ध' घोषित केलं गेलं. एखादा हिंदू जेव्हा खिश्चन किंवा मुसलमान होतो, तेव्हा त्याच्या वाट्याला हे असं नाव, विशेषण का बरं लागत नसावं? बाबांनी धर्म बदलल्याने समाजाकडून मिळणारी वागणूक बदलली नाही किंवा समाजाच' आमूलाग्र बदल झाला नाही. तसा संभवतही नाही परंतु 'नव बौद्ध' अशी बिरुदावली लागून एका नवीन जातीची भर पडली एवढेच

बलुतं वाचत असताना वाचक परिस्थितीवर विचार करताना दिग्मूढ होतो व सध्याची

समाजव्यवस्था तकलादू आहे असं जाणवतं. 'बलुतं'मध्ये ज्या स्वरूपाचं जीवन उपभोगलं, त्याच प्रकारे व त्याच शब्दात लिहिलं असल्यानं फारच मार्मिक वाटतं.

'बलुतं' दलित चळवळ व पुढारी यांच्यावरसुद्धा प्रकाश टाकते. सध्याची दलित चळवळ, दलितांचे प्रश्न सोडविण्यापासून दूर जात आहे असं जाणवतं.

बाबानंतर त्यांच्याप्रमाणे प्रखर व बुद्धिमान नेता न मिळाल्याने दलितांचे प्रश्न अजून सुटलेले नाहीत. कारण सवलतीने शिक्षण व राहणीमान यांच्यामध्ये फरक झाला; परंतु शिक्षण घेऊन उच्चभ्रू बनलेला दलित, दलिताविषयी आस्था न ठेवता स्वार्थी विचार करतो, हे दुःखदायक आहे. 'बलुतं' इथे प्रश्नचिन्हं आहे.

बलुतं वाचून झाल्यावर एक चूक समोर आली ती अशी : पान नं. १६२ वर "दुरुस्तात सारी वकील मंडळी, नादुरुस्तांचे पुढारी दादासाहेब गायकवाड ..... दादासाहेब हे माझ्या जिल्ह्याचे, त्यामुळे आपोआप मी दुरुस्तात काम करू लागलो." असो. 'बलुतं' खालील प्रश्न विचारते –

(१) उच्च तत्त्वे व वास्तववादी सामाजिक परिस्थिती याचा समन्वय साधताना तत्त्वांना बगल द्यावी लागते का? (२) परिस्थितीचा गुलाम मनुष्य बनतो का? (३) संकटसमयी मनुष्य विचलीत होतो व एकादा सावरू शकला नाही तर जीवन उद्ध्वस्त करून घेतो. संकटसमयी धीराने तोंड द्यावे हा बोलघेवडा तत्त्व-वाद तोकडा वाटतो नाही का?

एकंदरीत 'बलुतं' सामाजिक विचारांचे साधन बनून समाजात त्याचा विधायक विचार होणार हे निश्चित.

●

वपु काळे / मुंबई

मी झपाटल्याप्रमाणे 'बलुत्या'त गुरफटलो होतो. पानापानागणिक अस्वस्थ होत जात होतो. आपण होऊन व्यथेत सापडणं किती सौख्यदायक आहे ह्याचा अनुभव घेत होतो. चित्तवृत्ती बहरून टाकणारं हे पुस्तक नव्हे. खूप कुठंतरी एखाद्या अज्ञात डोहात नेऊन बुडवणारं हे लेखन.

पुस्तकाच्या गुणवत्तेबाबत विशेषणांची खैरात करता येईल. पण तसंही करण्यात स्वारस्य वाटत नाही. शब्दावरच तुमची सगळी कहाणी. सगळा भूतकाळ समोर एखाद्या उंच सुळक्यासारखा उभा ठाकलेला. माणसाच्या नकळत आणि त्याला नको असलेल्या किती गोष्टी, घटना, व्यथा त्याच्यावर लादल्या जातात — त्याचा एक न संपणारा तो आलेख. आणि तरी त्यातूनही, एक कलाकृती निर्माण करता येईल एवढे तुम्ही उरलात. हेच एक फार मोठं वरदान समजायला हवं.

तुमच्या मातोश्री जागजागी दिसतात. तुमच्या शब्दांतून तुमची आई तिच्या features-सहित समोर उभी राहते. पुस्तक वाचल्याक्षणी तुम्हाला भेटायची अतीव इच्छा निर्माण झाली आहे, तो तुमचा वर्तमानकाळ जाणून घेण्यासाठी.

●

वि. वा. कोटीभास्कर / वालचंदनगर

आपण फार भोगलेत, अनंत हाल तसेच अपमान सहन केलेत. आपले वैयक्तिक, कौटुंबिक, वैवाहिक जीवनही एकप्रकारे उद्ध्वस्त झालेले वाचून तर फारच दुःख झाले.

मला असे वाटण्याचे कारण मी देखील तुमच्यासारखाच अतिदाहक परिस्थितीतून जीवनमार्ग काढलेला आहे म्हणून ही सहानुभूती. तुमच्याइतके नसले तरी मला विद्या संपादन करताना कोणाचाही आधार नसल्याने बी. ए. होईपर्यंत अनेक संकटे, अपमान यांना तोंड द्यावे लागलेले आहे.

मी हायस्कूलात शिक्षक होतो. आता निवृत्त आहे. माझ्या सुदैवाने मला फार फार चांगले स्नेही, शिक्षक व प्राध्यापक लाभले. १९७६ साली निवृत्त झालो. आता वय ६८. जातपात याचा कधीही स्पर्श शिकत असल्यापासून मला होऊ दिलेला नाही. अगदी विद्यार्थीदशेपासूनही माझे स्नेही व खोलीतील सहमित्र वडार, कैकाडी इ. समाजातील सुद्धा होते.

समाजातील जात व तदनुषंगिक निर्माण होणारे प्रश्न समाज–मानसात इतके दृढमूल झाले आहेत की एखाद्या माणसाला जर टी. बी., बी. पी., डायबेटिक्स, गजकर्ण व महाभयंकर हाड्या व्रण झाला असेल तर त्याची अवस्था जशी होत असेल तशी आपल्या भारतीय समाजाची स्थिती आहे व त्यात निदान एक हजार वर्षांनीही बदल होईल असे वाटत नाही. गरीब, अत्यंत गरीब, मध्यम व अति श्रीमंत वर्गही समाजात राहतीलच. स्वातंत्र्योत्तर जी अपेक्षा होती, ती तोपर्यंत स्वप्नच राहील असे एकूण मला वाटते.

कवि केशवसुत म्हणतात, " नरेच केला हीन किती नर? " हे सर्व अनादिकालापासून चालू आहे. कवि वसंत बापट आपल्या ' स्वातंत्र्य ? कुठे स्वातंत्र्य ? कुणा स्वातंत्र्य ? ' या कवितेत हेच विचारतात. गिरणीतले कामगार, शेतकरी, अस्पृश्य–बौद्ध यांच्या वाट्याला सतत हेच आलेले आहे.

अनेक फुले, गांधी, आंबेडकर, सावरकर निर्माण झाले तरी या परिस्थितीत बदल होईल असे वाटत नाही. हे सर्व आत्यंतिक स्वार्थामुळे होत आहे असे नाही का ?

आपल्या पत्नी सई व आपली ताटातूट वाचताना मनाला अतीव दुःख होते.

●

रमण माळवदे / ठाणे

एक अस्सल, अकृत्रिम आणि समृद्ध जीवन वाचायला मिळालं. खूप आनंद झाला. तुमच्या गुंतागुंतीच्या, दारिद्र्याच्या जीवनात अनेक प्रश्न जरी गुंतागुंतीचे दिसत असले तरी अशा जीवनाचं आव्हान तुम्ही आत्मविश्वासाने जगलात, यातच तुमचा मोठा विजय मी समजतो.

कुठे तरी तुमचे माझे अनुभव, काहीशी आयुष्याची वाटचालसुद्धा जुळतेय. एवढ्या दिव्यातून मला नाही वाटत, आता तुम्ही वाकू शकाल !

●

सदानंद देशमुख / बुलडाणा

मी आपले बलुतं हे आत्मचरित्रात्मक पुस्तक वाचले. एकदा दोनदा नव्हे तर तब्बल सहा वेळा वाचले. त्याचे पारायणच करीत आहे म्हणा ना!! कारण हे पुस्तक मला फार आवडले. आतापर्यंत इतके म्हणजे खूप पुस्तके वाचली पण असे भारावून टाकणारे पुस्तक वाचनात आले नव्हते. पुस्तकातील कोणता भाग चांगला वाटला हे सांगता येणार नाही. कारण एकाविषयी लिहिले तर तो दुसऱ्याचा अपमान होईल असे वाटते. म्हणून थोडक्यात सांगायचे म्हणजे सारेच पुस्तक वाचनीय आहे.

खरोखरच बलुतं वाचून मनाचा खूपच कायापालट झाला.

●

एक वाचक / मुंबई

'बलुत्या'चा बोलबाला खूप झाला. 'चावडी'त मांडलेली अन्यायाची चीड आतमध्ये जाऊन भिडली तसेच फुकाचा दांभिकपणा किंवा निर्व्वळ दलितांची खोटी तरफदारी आपण केली नाहीत. 'चावडी'त प्रकट झालेला आपला प्रामाणिकपणा हा सध्याच्या लेखकांपेक्षा खूप वेगळा वाटला. आवडला. अन्यायाला वाचा फोडणारे एक तर विकले जातात किंवा टिपले जातात. बाकी उरलेले तळागाळातले 'तू मोठा की मी' हे करत करत संपतात. त्या समाजाचे अनेक (खरे खोटे) चेहरे मी पाहिले आहेत. प्रत्येक वेळी त्या वेळचा चेहरा ह्यावेळी खराखुरा वाटतो. प्रत्यक्ष जीवनाशी काहीही संबंध नसलेले कितीतरी भेदाभेद समाज पोसतो आहे. परवा फोरासरोडला गेलो होतो. तेथे एका रांडेने दुसरीला शिवी दिली, 'तू मांगीण हायेस. हित्थं धंदा करू नकोस! छिनाल!' सगळं सारखं.

'चावडी'तील लिखाण १९७१ पूर्वीचं आहे. नवीन काही वाचायला मिळेल का?

●

शिरीष पै / मुंबई

कालच तुमचं 'बलुतं' वाचलं .....

अतिशय अस्वस्थ आहे. नुसतं वाचणाऱ्याला ही वेदना तर ते बघणाऱ्याला—भोगणाऱ्याला किती वेदना होत असतील? एखादं पातं आरपार काळजात घुसावं आणि जखम ठिबकत राहावी तसं मनात 'बलुतं' घुसलंय.... मन जळतंय .... इतकी विलक्षण प्रभावी कलाकृती लिहिल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन. माझा मुलगा राजू ह्यालाही 'बलुतं' खूपच रुततंय.

एकच सांगते... साऱ्या जगाचे दरवाजे जेव्हा बंद होतात, तेव्हाच आतले दरवाजे उघडतात. तुमची जात ही आहे! ज्याचे सारे शत्रू होतात, त्याचा एकच मित्र उरतो — परमात्मा! पटणार नाही हा शब्द कदाचित् तुम्हाला ... असो. पुनश्च अभिनंदन!

●

गणेश पाठक / मुंबई

गेल्या रविवारी दूरदर्शवर 'बलुतं'वरील चर्चा मोठ्या कुतूहलानं ऐकली. प्रा. य. दि. फडके यांचा एकूणच थंड प्रतिसाद, प्रा. पुष्पा भावे यांची छापील बोलण्याची तऱ्हा (उदा. 'वाचकांचं स्वस्त कुतूहल', 'दोन ओळीतील मजकूर वाचणं' वगैरे.) आणि श्री. बाबूराव बागूल यांचा अलिप्त सहभाग. हे सगळं पाहिल्यावर आत्मचरित्रकार दगडू मारुती पवार यांची कींव करावीशी वाटली. वरील तिघांही पृच्छकांनी संपूर्ण कार्यक्रमात 'बलुतं' आवडल्याचा किंवा न आवडल्याचा धीटपणे चुकूनही उल्लेख केला नाही, हे आम्हाला तरी जाणवल्याशिवाय राहिले नाही. प्रत्येकाची आवड वेगवेगळी असते म्हणून त्यांनी कोणत्याही प्रकारची प्रतिक्रिया व्यक्त केली नसेल तर ते समजू शकते; पण एखाद्या कलाकृतीच्या सच्चेपणामुळे तिला मिळालेले अभावित यश तथाकथितांना कुठेतरी खुपते की काय अशी शंका येण्याइतपत ती चर्चा बेचव व्हावी याचे वाईट वाटले. शेकडो वाचकांनी ज्या पुस्तकाबद्दल आपली दाद उत्स्फूर्तपणे दिली—मग ती भली असो, बुरी असो—त्या पुस्तकाकडे समीक्षकांनी दगडी नजरेनेच पाहिले पाहिजे, असा काही दंडक असल्याचे आमच्या वाचनात नाही. शेकडो वाचकांचा हवाला देऊन बोलणे वेगळे आणि मनापासूनचे बोलणे वेगळे. पृच्छकांच्या निरनिराळ्या प्रश्नांना उत्तरे देण्याची तुमची पद्धती मात्र अगदी सरळ, साधी आणि समीक्षाविषयक परिभाषेच्या जंगलात शिरणारी नव्हती हे बरे झाले. उतास जाणारं यशही पचवणं किती कठीण असतं याचा प्रत्यय आला. कौतुक करण्यासाठी लागणारं मन फार मोठं असावं लागतं. हात राखून बोलण्याचा शाप मराठी समीक्षकांना केव्हा आणि कोणी दिला कुणास ठाऊक? अहंकारानं एकारलेल्या बहुतांश आत्मचरित्राच्या तुलनेनं (अपवाद – 'स्मृतिचित्रे') तुमचे पुस्तक मला खूप आवडलं म्हणून मी समीक्षकांविषयी कडवट प्रतिक्रिया व्यक्त केली आहे असे नसून, आत्मानुभूतीनं ओतःप्रोत ओथंबलेल्या आणि अकृत्रिम शैलीनं लिहिलेल्या आपल्या पुस्तकावरची चर्चा रसाळ होण्याऐवजी नीरस व्हावी याची खंत अधिक वाटली.

चर्चेवरची प्रतिक्रिया कळवण्यास विलंब झाला हे खरे. सदर पत्र वृत्तपत्राकडे पाठवावे की काय असा प्रश्न पडला. पण वृत्तपत्रे दखल घेतीलच असे वाटेना म्हणून तुम्हालाच लिहिले, असो.

आपली 'बलुतं' ही साहित्यकृती नुकतीच वाचून संपवली. तिला आत्मवृत्त म्हणावं की नको याबद्दल मी अजून संभ्रमात आहे. पण एक सुरेख पुस्तक वाचल्याचं समाधान मात्र मला निश्चितच मिळालंय. झपाटल्यासारखा मी ते पुस्तक अथपासून इतिपर्यंत वाचून काढलं. कोणत्याही प्रकारची रंगरंगोटी न करता, एखाद्या ग्रामीण युवतीनं आपल्या अकृत्रिम सौंदर्यानं नजर खिळवून ठेवावी, तसं या पुस्तकानं मनाला बांधून टाकलं. समीक्षेचे तथाकथित निकष 'बलुतं'ला लावण्याची गरज नाही.) जे जीवन मी माझ्या लहानपणी दुरून पाहात होतो, ते इतकं भीषण असेल अशी कल्पनाही

नव्हती. आपण अगदी साध्या, सोप्या भाषेत वेचक प्रसंगांची गुंफण करून एक सुंदर शिल्प तयार केलं. त्याबद्दलची चर्चा करायला मी व माझ्या सहकारी सौ. शीला सामंत आपल्या घरी येऊ इच्छितो.

•

स. ओं. इंगळे / बसमत

'बलुतं' वाचून Steinbeck John (Dead '72) ह्या अमेरिकन नोबल पुरस्कार–प्राप्त साहित्यिकाची आठवण माझ्यासारख्या James Henry, Austen Jean ते Bellow Saub...Joyce James यांच्या कादंबऱ्या आवडीने वाचणाऱ्या वाचकास आल्यावाचून राहिली नाही. 'Grapes of Wrath' व 'East of Eaden'-सारख्या अजरामर कलाकृती निर्मिणाऱ्या प्रतिभावंताच्या, Cannery Row, Sweet Thursday, Tortilla Flat, The Moon is Down, The Pearl इ. सारख्या छोटेखानी कादंबऱ्यांमधून, त्यात ज्या समाजजीवनाचे दर्शन घडवलं, त्याला त्यानं "slum of society" असं म्हटलं आहे व त्यातल्या लोकांना "Little beautiful peoples" म्हटलेलं आहे. ह्याच संदर्भात आपण 'तवंग' हा वापरलेला शब्द आठवतो. त्यानं तसं काही त्यांच्या कादंबरीतून गोऱ्या-काळ्यांचा संघर्ष दाखवल्याचं स्मरत नाही. त्यानं त्याच्या 'लोकां'विषयी आपुलकी निर्माण व्हावी असा दृष्टिकोण दाखवलेला दिसेल. भारतीय सांस्कृतिक, सामाजिक जीवनाचा एवढा पचका झालेला आहे की, असं कडवटपणे म्हणता येईल की एक वेळ विदेशी माणूस 'बलुतं'-मधील 'लोकांना' आपुलकीनं जवळ करील पण आपल्याकडे आपले देशबांधव मात्र त्यांना दोन हात दूरच ठेवतील.

अलीकडे भालचंद्र नेमाडेंच्या तीन कादंबऱ्या वाचल्या. त्यातल्या त्यात त्यांनी थोडं अंतर्मुख व्हायला लावलेलं; पण 'बलुतं' वाचून अंतर्मुख होण्याचा आलेला अनुभव अविस्मरणीय आहे.

खांद्यावर सुऱ्या टाकून महार गावच्या पाटलाकडे समेटासाठी जातात—ही घटना वास्तव सत्य आहे. मग ते प्रत्यक्ष सत्य असो वा नसो! पण सलमाचे प्रकरण, कल्पने-पेक्षा सत्य किती चमत्कारिक असते हाच जुना नियम सिद्ध करतो.

'बलुतं'मध्ये काहीही अश्लील नाही. विच्छेदन केलेला (नग्न) देह,शव असावं अशी त्यातली लैंगिकता आहे. काही वेगळे सांस्कृतिक संदर्भ लाभलेल्यांना नव्हे तर विकृत मनोवृत्तीच्या माणसांनाच 'बलुतं'मधे असं काही आढळेल असं वाटतं.

आपल्या धैर्याची स्तुती करावी तेवढी थोडीच. लेखन-स्वतंत्र्याचा पुरेपूर उपयोग करा. आपण विपुल लेखन करावं. आपल्या हातून थोडंसं परिवर्तन घडून येण्याची क्षमता दिसते.

•

विलास राशिनकर / भुसावळ

बलुतं पुस्तक वाचून मी खरोखरीच प्रभावित झालो. चार-दोन ओळीत अभिप्राय देऊन त्याची वासलात लावावी इतकं ते पुस्तक सामान्य नाही. बलुतं ही एक दलित साहित्याला व पर्यायाने मराठी साहित्याला मोलाची कॉन्ट्रिब्युशन आहे असे माझे मत आहे. म्हणून त्यावर सविस्तर समीक्षा लिहायचं ठरवलं. बलुत्यावरची समीक्षा सोबत पाठवीत आहे—

दगडू पवार आणि दया पवार यांचे नेमके नाते काय? आरशासमोरील पद्मिनी आणि आरशातील पद्मिनी यांचे जे नाते तेच दगडू पवार व दया पवार यांचे नाते. अल्लाउद्दीन खिलजीपुढे यायला पद्मिनीला लाज, संकोच व भय वाटले. म्हणून तिने आरशात दर्शन दिले. वाचकांपुढे यायला दया पवारांना असाच संकोच वाटला असावा, म्हणून त्यांनी दगडू पवारच्या रूपात दर्शन दिले.

'खरं तेच सांगेन खोटं सांगणार नाही' अशा प्रतिज्ञेने लिहिलेली ही आत्मकथा. या बाबत लेखक म्हणजे दुसरा 'सत्यकाम'च! सत्यकामाची भूमिका चढायला आणि पेलायला मुळातच कठिण. बापाचा पत्ता नसल्याचे गुरूला सांगणारा सत्यकाम आणि बापाची चोरी व रांडबाजी, मावशीचा वेश्या-व्यवसाय व बायकोचा तथाकथित संशयास्पद व्यभिचार वाचकांना सांगणारा दगडू पवार यात कमालीचे साम्य आहे. स्वतःचे अनुभव आणि जाणिवा यांच्याशी लेखक कधीही बेइमान होताना दिसत नाही.

स्वतःच्या लैंगिक जीवनाचे दर्शन घडविणे हे योग्य की अयोग्य? हा एक प्रश्न होताच. दगडू पवारने हे शक्य करून दाखवले, एवढेच नव्हे तर त्याही पुढची अनुल्लंघनीय झेप त्यांनी घेतली त्यांनी केवळ स्वतःच्या व आप्तेष्टांच्या लैंगिक जीवनाचे दर्शनच घडविले नाही तर, लैंगिक जीवनात पदरी आलेल्या 'विटंबनेचे व प्रतारणेचे प्रदर्शन' घडविले. ही बाब अभूतपूर्व अशी होय. सामान्यच काय तर असामान्य माणसेही ज्या बाबींच्या झाकपाकीसाठी आकाशपातळ एक करतात, त्या बाबी दगडू पवार प्रदर्शनात मांडून बसला. तथाकथित सुसंस्कृतपणा व सोवळे यांचे कवच फोडून पवारांचे लेखन अवतरले आहे. स्वतःचा रंडीबाज बाप, हिजडा चुलता, वेश्या-व्यवसायी मावशी आणि व्यभिचाराच्या संशयापायी सोडून दिलेली घाऱ्या डोळ्याची 'माल' बायको...या सर्वांची दगडू पवार आपल्याला तपशिलाने ओळख करून देतो. बापाच्या मृत्युनंतर आईला आलेल्या गरोदरपणावर आपण कशी शंका घेतली, हेही आडपडदा न ठेवता तो आपल्याला सांगतो. या महत्त्वाच्या बाबीशिवाय लैंगिक जीवनाच्या अनेक अंगांचे अनेक पटीने बलुत्यात दर्शन घडते. दाराच्या फटीला डोळे लावून लेखकाने पाहिलेले संभोग, भुऱ्या विठाबाईने कामतृप्तीचे एक साधन म्हणून केलेला लेखकाचा वापर; 'उन्माद', 'मस्ती' सारखी मासिके व वांड मित्रांच्या सहवासाने त्याला जडलेली एकसष्ट-बासष्टची सवय, पत्नीविरहाने व्याकुळलेल्या अवस्थेत देहाची भूक भागविण्या-

साठी त्याच्यापुढे उभी केली गेलेली विवस्त्र वेश्या—इ. स्वतःच्या लैंगिक जीवनाच्या प्रकृति-विकृतींचा गुंता दगडू पवार आपल्याला उघडून-उलगडून दाखवतो. याशिवाय लग्न होणे अशक्य झालेल्या कुष्ठरोग्याच्या आडदांड मुलाने 'घोडी'शी केलेल्या पशु-संभोगाच्या अफलातून घटनाही बलुत्यात आहेत. आपल्या बायकोशी, प्रत्यक्ष तिच्या भावाचाच शरीरसंबंध असल्याचे कळवळून सांगणारा दुर्दैवी नवराही बलुत्यात काळीज कापून जातो.

बायकोच्या संशयास्पद व्यभिचाराने व्यथित झालेला दगडू पवार स्वतः लिहीत असलेले 'बुद्धायन' त्याच्या एका मित्राला दाखवतो. तेव्हा त्या मित्राची प्रतिक्रिया काय? तर दगडू पवाराने 'बुद्धायनऐवजी झवायन लिहावे' असा मित्र सल्ला देतो. मित्राच्या या सल्ल्याचा दगडू पवाराच्या सुप्त मानसिकतेवर निश्चित परिणाम झाला असावा. 'बलुतं'मधील अन्य बहुमोल जीवन-दर्शनाची साभार व यथायोग्य दखल घेऊनही वाटते की, 'बलुत्या'मधील विस्तृत, विविध आणि विकृत लैंगिक जीवनाचे दर्शन घेतले म्हणजे 'बलुतं' हे एका अंगानं 'झवायन'च झाले आहे.

●

डॉ. वि. भा. देशपांडे / पुणे

'बलुतं' वाचलं. प्रतिक्रिया कळवण्यास काहीसा विलंब होतोय. 'बलुतं' मनापासून आवडलं ते अशासाठी की, तुमचा अनुभव सच्चा आहे, तसाच तो आमच्यापर्यंत तुम्ही पोहोचवलात. वाचत असताना असे वाटत होते की, काही प्रसंगांत आपण तिथे असतो तर आपले काय झाले असते? बहुधा आपण उन्मळून पडलो असतो. कारण शेवटी माणसाच्या जीवनातले दुःखच खरे असते. महाभारतापासून ते तुमच्या 'बलुतं'पर्यंत तेच सूत्र आहे. त्या दुःखाच्या सुरात जेवढी माणसे आणि आयुष्य आपल्याला आकळते तेवढ्या दुसऱ्या कशानेही नाही. वेदना जितकी चांगली बोलते तितके अन्य काहीही नाही!

जी कलाकृती आपल्याला अस्वस्थ करते, अंतर्मुख करते ती अस्सल असते. त्या कलाकृतीचा घाट – आकृतीबंध वगैरे सारे नंतर! 'बलुतं'ने हे अस्वस्थपण निर्माण केले.

'बलुतं'ला रंगमंचीय रूप देण्याचा चंदावरकरांचा विचार आहे असे ऐकले.

●

अविनाश सहस्रबुद्धे / मुंबई

'बलुतं' कालच वाचून संपवलं. मराठीत इतकं चांगलं गद्य क्वचितच वाचायला मिळतं. तेव्हा अशा पार्श्वभूमिवर 'बलुतं'च महत्त्व खूपच. 'बलुतं' हिंदीत न्यायला पाहिजे. हिंदीत ते खूपच गाजेल; कारण हे अनुभवविश्व हिंदीला अजून अनोळखीच आहे.

●

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
वा. मु. 3280
जपुट
जोधा गाडगे
ग्रंथ (दान)

अरुण रहाळकर / मुंबई

तुमचं 'बलुतं' वाचलं आणि थक्क झालो. तुमच्या आत्मचरित्रावरची भाष्यं / परीक्षणं आणि शिवाय रविवारी टी. व्ही.वर "प्रतिभा आणि प्रतिमा"मध्ये तुमच्याबरोबर झालेली बागूल / भावे / फडके यांच्याबरोबरची चर्चाही मी पाहिली / ऐकली. खरं म्हणजे एक वाङ्मयीन प्रकार म्हणून आत्मचरित्रात परीक्षण किंवा मूल्यमापन करणं हे मला काहीसं आगाऊपणाचं वाटतं. तुम्हाला काहीसा ओळखणारा मित्र, सुहृद म्हणून मी काही म्हणेन.

पहिलं म्हणजे आत्मचरित्र लिहिणारा कोणीही असला–थोर पुरुष वगैरे सुद्धा–तरी त्याला तसं लिहिण्यापूर्वी स्वतःसमोरच संपूर्णपणं नंगं होणं आवश्यक आहे असं मला वाटतं. यात तुम्ही पूर्णतः यशस्वी झाला आहात. धैर्य वगैरे गुण ठीक आहेत, पण तसं करायला माणसाला एक दिलदारपणा, जिगर आणि intransigence (uncompromising nature in politics) लागतो. एक माणूस म्हणून दगडू मारुती पवार यांचं हे यश आहे आणि ते अतिशय significant आहे. त्यामुळे व्यक्ती म्हणून या आत्मचरित्रातून कळणारा 'मी', त्याला घडवणारा समाज आणि त्या समाजाचं त्यामधील अपरिहार्यपणं घडणाऱ्या स्थित्यंतरांचं त्या व्यक्तित पडलेलं प्रतिबिंब याचा आवाका / झेप फार मोठा / मोठी आहे. आपल्या स्वतःच्या आयुष्याविषयी लिहिण्यासाठी तुम्ही जी मनाची तयारी केलीत, आणि ती करताना होणारी मनाची विचित्र ओढाताण, एकसारखी uphill struggle वगैरे गोष्टींची मला दुरून का होईना थोडीबहुत कल्पना आहे. आणि तुम्ही ते सगळं करून हे आत्मचरित्र लिहू शकलात हे मला अतिशय मोलाचं वाटतं. मला वाटतं जगात फार थोड्या माणसांना हे जमतं / जमेल. आणि त्यातली जी काही एक–दोन माणसं मला भेटली किंवा भेटतील यात तुम्ही आहात याचा खरा अभिमान–आनंद आहे.

दगडू मारुती पवार ही व्यक्ती अशी आहे किंवा तशी आहे, तिनं अशी चूक केली किंवा नाही, असं करणं योग्य होतं किंवा नाही, अशा प्रकारच्या मूर्ख आणि हास्यास्पद प्रतिक्रिया मला व्यक्त करायच्या नाहीत; तर माणूस म्हणून एखादी व्यक्ती जेव्हा आत्मचरित्राच्या माध्यमानं आपल्याला भेटते, त्यानं आपला स्वत:चा माणूस म्हणून जगण्याच्या प्रक्रियेत आणि सततच्या शोधात एक मोठा दिलासा मिळतो. तसा मला 'बलुत'नं दिला याबद्दल तुमचे आणि त्याबरोबरच 'ग्रंथाली'चे आभार. अर्थातच माझ्यासारख्या मध्यमवर्गीय आणि शहरी माणसाला, एक दुरून थोडंबहुत माहीत असलेलं एक 'नवं' अनुभवविश्व खुलं करून दिलं, हाही 'बलुतं'नं साधलेला मोठा कार्यभाग आहेच.

जाता जाता, लिखाणाच्या तुमच्या आकृतिबंधाविषयी मला एवढंच म्हणावंसं वाटतं की तो perfect आहे. स्वतःशीच केलेलं संभाषण अशा थाटातलं, आणि कुटलं आत्मचरित्र मी तरी अजून वाचलेलं नाही. त्या formमुळे या आत्मचरित्राला एक

वेगळीच dimension लाभते. कधी कधी मात्र, काल-स्थळाची सुसंगती लावताना मला थोडे प्रयास पडले. दोष म्हणून मला हे सांगायचं नाही — अशा संभाषणात नाही तरी असं सूत्र असतंच असं नाही.

जगातल्या इतर भाषांतही हे आत्मचरित्र छापलं जावं असं मला मनापासून वाटतं. त्यात मी काही तुमची मदत करू शकलो तर मला आनंद होईल. पुढेमागे भेटल्यावर बोलूच.

●

गोविंद घाणेकर / मुंबई

'बलुतं' हे आत्मचरित्रात्मक पुस्तक वाचताना आपल्या साहित्यगुणांची ओळख पटली म्हणूनच हे पत्र लिहीत आहे. या पुस्तकात आपण एका अनोख्या जीवनप्रवाशाचे हृदयंगम दर्शन घडविण्यात यश मिळविले आहे. त्यातील व्यक्तींची जीवनचित्रे न्याहाळताना, त्यांची अगतिकता, त्यामुळे होत असलेली कुतरओढ व तरीही आपापल्या पद्धतीने जीवन जगण्यासाठी चाललेला सोस, अट्टाहास या साऱ्याच गोष्टी काळजाचा ठाव घेतात. समाजाच्या तथाकथित तळातील व्यक्तिसमूहाचे इतके समर्थ आणि सत्य दर्शन क्वचितच आढळात येते.

या पुस्तकात प्रकट झालेल्या आपल्या लेखन-सामर्थ्याविषयी मला विशेष जिव्हाळा वाटला याचे कारण तसेच आहे. चित्रपट हे माझे विचार प्रकट करण्याचे माध्यम आहे. पुढील चित्रपटासाठी कथाविषयांचा विचार करताना माझ्या डोळ्यापुढे ज्या समस्या येतात, त्यात 'अस्पृश्यता' प्रामुख्याने असते. आजच्या संदर्भात या विषयावर मराठी बोलपट काढावा अशी माझी फारा दिवसांची इच्छा आहे. ती मी आपल्या सहकार्याने पुरी करू शकेन असे तुमचे 'बलुतं' वाचल्यानंतर मला वाटले. या विषयीच्या माझ्या कल्पना आपणास सांगितल्यास त्यानंतरच्या विचार-मंथनातून काहीतरी भक्कम उभे करता येईल असे मला वाटते.

●

महादेव मोरे / निपाणी

'कोंडवाडा' वाचण्याचं भाग्य आज लाभलं. काही कवितांनी माझ्याच आयुष्याचा आरसा माझ्यापुढे धरल्यागत वाटलं!

आपलं आत्मचरित्र (बलुतं) अजून वाचावयास मिळालं नाही, पण 'श्री'त आलेला त्याचा संक्षेप वाचून सुन्न झालो होतो. बरेच दिवस / वर्षे आपणास पत्र लिहावे म्हणत होतो; पण ह्या आडगावी आपला पत्ता मिळत नव्हता 'मेहता'तर्फे निघालेल्या 'कोंडवाड्या'च्या दुसऱ्या आवृत्तीत तो मिळाला. 'बलुतं'ला पूर्वी फोर्ड फाऊंडेशनतर्फे व आता महाराष्ट्र शासनातर्फे पुरस्कार मिळाला आहे. त्या दोहोंबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन!

●

सौ. सुनीता देशपांडे / पुणे

खरं तर तुम्ही आता प्रथितयश लेखक आहात. तुमच्या पुस्तकावर मोठमोठ्या व्यक्तींचे अभिप्राय तुम्हाला आले असणार. हे पत्र म्हणजे एका अतिसामान्य व्यक्तीची प्रतिक्रिया आहे हे लक्षात घेऊनच माझ्या हातून काही अधिकउणे लिहिले गेल्यास क्षमा करावी.

मुळात पुस्तकाचं कव्हरच खूप आवडलं. मी पाहिलेल्या मुखपृष्ठांमधे पुस्तकाच्या अंतरंगाचं इतकं बोलकं चित्र दुसरं क्वचितच आठवतं. काळा आणि पांढरा हे दोनच रंग. दारिद्र्याचं प्रतीक असणारी, पण मायेची ऊब देण्यात कुठेही उणे पडू न देणारी गोधडी. साधे उभे-आडवे धागे, पण त्यातून साधलेली किती सुंदर कलाकुसर ! संसारी बाईच्या जन्माला आलेल्या माझ्या सारखीला 'एका बैठकीत पुस्तक वाचून संपवलं' ही चैन परवडत नाही. तेव्हा कोणतंही पुस्तक वेळ मिळेल तसं हप्त्या-हप्त्याने मी वाचते. तसंच हे पुस्तक वाचलं. पण दर वेळी पुस्तक उघडण्यापूर्वी मिनिट दोन मिनिटं चित्रावर नजर खिळून राहिली. आणि मजकूर. सुरुवातीला कुठल्याही दलित साहित्यिकाच्या वाट्याला येणारीच परवड. तपशिलाचा थोडाफार फरक मला महत्त्वाचा वाटला नाही. कारण दुःखाची जात तीच. पण चरित्र, मग ते कुणाचंही असो, पुढे थोडं थोडं कंटाळवाणं होत जातं हा माझा अनुभव. एक तर, माणूस 'मोठा' होतो तेव्हाच तो चरित्राचा विषय होतो. आणि हे मोठेपण किंवा यश एकदा लाभलं की मग ते चरित्र बरंचसं एकसुरी बनतं. पण तुम्ही सुदैवाने योग्य वेळी चरित्र लिहायला घेतलं आणि योग्य ठिकाणी संपवलं. तेव्हा पुस्तक म्हणून शेवटपर्यंत ते वाचावंसं वाटलं आणि संपलं म्हणून चुटपूट लागली.

मला एखादं पुस्तक आवडलं तर ते मी इतरांना वाचायला सांगते, विकत घेऊन कुणाला भेट म्हणून देते, पण 'तुमचं पुस्तक मला आवडलं' असं त्या लेखकाला पत्राने कळवण्याचं धाडस सहसा करत नाही. कारण जिथे 'मी' त्या व्यक्तीला काही महत्त्व नसतं तिथे 'मला अमुक एक गोष्ट आवडली' या वाक्यालाही काही अर्थ नसतो, हे मी जाणते आणि असला आगाऊपणा टाळते. एखाद्या कलाकृतीचं मूल्यमापन करायची माझी लायकी नाही हे मला माहीत आहे. हे पत्र म्हणजे 'बलुतं' वाचल्यावर त्या लेखकाशी नव्हे तर 'दगडू पवार' या व्यक्तीशी बहिणीच्या नात्यानं थोडं बोलावंसं वाटलं, तो प्रयत्न आहे.

तुमची आई ही कुठल्याही दलित आईसारखीच वाटली. दुर्दैवी, कष्ट उपसत, हाल-अपेष्टा सोसणारी आणि समाज-राक्षसाच्या दणदणीत टाचेखाली एखाद्या मुंगीसारखी चिरडून मुकाट्याने संपणारी. पण या आईलादेखील लेकाची माया आणि अश्रू मिळाले आहेत. बकुळेसाठीदेखील कुठेतरी बापाचं आतडं तुटतंय. पण सई ? तिच्यावर तुम्ही फार मोठा अन्याय केला असं नाही वाटत ? आणि तोही तुमच्यासारख्याने, अन्याया-विरुद्ध संतापाने पेटणाऱ्याने. व्हावा तिथे स्फोट होऊन संपून जाण्याची ताकद तुमच्यात

नसेलही. पण सतत धुमसत आतून आग जिवंत ठेवणाऱ्याने असं चारचौघांसारखं का वागावं ? तुमचा विरोध किंवा राग हा अन्यायावर आहे की स्वतःवर अन्याय करणाऱ्यावरच फक्त आहे ? तुमच्या आईने विटाळात केलेल्या सैपाकावर बोर्डिंगातल्या मुलांनी बहिष्कार घातला तेव्हाचे तुमचे उद्‌गार सूचक आहेत. 'समाज ज्यांचा विटाळ मानीत होता, त्यांनीच स्त्री-देहाचा विटाळ करावा ?' मग हे तत्त्वज्ञान सईच्या बाबतीत कुठं जातं ? तिचा असा गुन्हा तरी कोणता ? एखाद्याशी थोडं बोलावं वाटलं, सहवास आवडला, मैत्री करावी वाटली, तर त्यात अ-सुंदर काय आहे ? कोणतं पाप आहे ? केवळ आपल्या नीतिनियमांच्या, तथाकथित संस्कृतीच्या चुकीच्या बंधनातून माणसा-माणसातल्या या साध्या देवीवेवीही कठिण होऊन बसल्या आणि ढोंग फोफावलं. सगळं काही चोरूनमारून चालू लागलं. लहान वयाची पोरं घरात कामाला असतात, तेव्हा भुकेच्या किंवा मोहाच्या पोटी एखादी वस्तू गुपचुप उचलून तोंडात टाकली, तर तो गुन्हा का ठरतो ? त्या पोराची नैसर्गिक गरज आपण बेकायदा ठरवली आहे म्हणूनच ना ? माझ्या मुलाने खाल्ले तर तो त्याचा अधिकार ठरतो. पण नोकराच्या मुलाला मात्र हा अधिकार नाही. तुम्ही पुरुष म्हटल्यावर तुमची सर्व प्रेमप्रकरणं क्षम्य ठरतात. सईच्या निष्ठेबद्दल शंका आल्यावर तुम्हालाही रामाचा अवतार घेऊन तिला वनवास भोगायला पाठवावंसं वाटलं. म्हणजे तुम्ही सवर्णांच्या संस्कृतीचाच सोयिस्कर आश्रय घेतलात ना ? लग्नापूर्वीची प्रकरणं सोडाच; पण सईकडून पत्नी म्हणून ज्या निष्ठेची अपेक्षा तुम्ही केलीत, ती पती म्हणून तुमच्यात होती का ? असती तर सलमाचं वेड तुम्हाला लागलं असतं का ? आणि ज्या सलमानं कोमेजलेलं तुमचं आयुष्य पुन्हा फुलवलं, तुम्हाला माणसात आणलं, तिच्या प्रेमाला तरी तुम्ही कोणता प्रतिसाद दिलात ? जिवावर उदार होऊन ती तुमच्या बरोबर यायला तयार झाली असताना, जिवाला धोका म्हणूनच तुम्ही माघार घेतली ना ? तुम्ही लिहिता, 'एका स्त्रीमुळे मी पुरा उद्‌ध्वस्त झालो होतो. दुसऱ्या स्त्रीनं मला जीवदान दिलं. स्त्रीचं आयुष्यातील सामर्थ्य नव्यानेच ध्यानात आलं.' कोणत्या सामर्थ्याबद्दल तुम्ही हे उद्‌गार काढले ? कारण खरोखरीचं सामर्थ्य तुमच्या ध्यानात आलं असतं तर त्यापुढं तुम्ही नतमस्तक झाला असता. त्यानंतर सलमाच्या घरी गेला असताना तिच्या गर्भार पोटाकडे पाहून जे उद्‌गार तुम्ही काढले ते तुमच्या तोंडून मग निघू शकले नसते.

●

प्रा. व. बा. बोधे / पुणे

'बलुतं' या आपल्या आत्मकहाणीतील एक प्रकरण 'पूर्वा'मध्ये वाचलं. अस्वस्थतेने पछाडलो. असे जीवघेणे अनुभव-रेखाटन दुर्मिळ! आपली संपूर्ण आत्मकहाणी वाचायला मी नेहमीच उत्सुक असेन.

●

पु. ल. देशपांडे / पुणे

प्रिय दया,

'बलुतं' वाचून संपवल्याक्षणी, पत्र लिहायला घेतले. आणि 'सुन्न' मनाच्या अवस्थेत 'दाद'सुद्धा देता येत नाही. हे ध्यानात आले. असामान्य मैफिल झाली की मैफिलीत 'सन्नाटा' पसरतो. माणसे अवाक् झालेली असतात. बेगम अख्तरच्या गाण्या नंतर असाच सन्नाटा पसरलेला असताना ती म्हणाली होती—"ह्या सन्नाट्यासाठीच जीव तोडून गायचे." तुमचे लेखन असेच जीव तोडून झालेले आहे.

निबर डोळ्यात जीव यावा असे लेखन तुमच्या हातून घडले आहे

●

सु. रा. चुनेकर / संगमनेर

चंद्रपूरहून इतर कडू-गोड आठवणींबरोबर 'बलुतं' घेऊन आलो! मला आवडलं. एक वेगळंच जीवन वाचायला मिळालं. त्यातला मोकळेपणा, प्रांजलपणा मोठा आहे. आणि कसलाही आव न आणता, देखावा न करता (कसलीही पोझ न घेता) ते निवेदन केले आहे. त्यामुळे त्याला प्रगल्भ तटस्थता आली आहे. अनुभवलेल्या, भोगलेल्या जीवनाचे दुःख, दैन्य, आपत्तींनी आलेली प्रौढता, एक चांगल्या अर्थाने (वर्तमान जीवनाविषयीची) तात्त्विक अर्थाने 'उदासीनता' इथे आलेली आहे. फार लहान वयात तुम्हाला ती मिळाली आहे. मोठ्यामोठ्यांना, वय कितीही वाढलं तरी ती मिळत नाही.

तुमची ही एक वेगळी (वाङ्मयीन) ओळख झाली. जी प्रत्यक्ष सहवासातून होतेच असं नाही.

माझ्या समजुतीप्रमाणे मराठीत हे एक वेगळे जीवन, अशा मोकळेपणाने प्रथमच आले असावे.

तुमचं पुस्तक 'दलित' वाङ्मय नाही; एक उत्तम साहित्यकृती आहे.

'दलित' वाङ्मय समृद्ध होणार आहे—ते आक्रस्ताळ्या घोषणांनी आणि विघातक वृत्तीने नाही—तर 'बलुतं'सारखी पुस्तकं निर्माण झाल्यानं.

●

रा. ज. देशमुख / पुणे

'बलुतं' वाचल्यापासून तुम्हाला पत्र लिहिण्याची इच्छा होती.

दुःख सांगताना फक्त दुःखच संयमाने आपण सांगितले आहे. ते सांगताना समाजातील कोठल्याही थरातील व्यक्तींना किंवा कोठल्याही जाती-धर्माला दोष न देता, आपण समाजातील एका घटकाचे दुःख व्यक्त केले आहे. परिणामकारकरित्या.

याबद्दल आनंद व्यक्त करतो.

●

प्रा. प्र. ना. परांजपे / पुणे

'रसिक'च्या दिवाळी अंकातील माधव मनोहरांच्या 'दलित लेखनाविषयी' या लेखाकडे तुमचे लक्ष वेधण्यासाठी हे पत्र लिहीत आहे. पृ. ४३ वर ते लिहितात की, "दलित लेखक आता खरीखोटी—पण बहुतकरून खोटीच—आत्मचरित्रे लिहायला लागले आहेत...एका दलित लेखकाने एक आत्मचरित्र लिहिले. ते दलिताचे म्हणून पुष्कळच गाजले आणि स्वाभाविकच त्याचे तसे कौतुकही पुष्कळ झाले. या आत्मचरित्राच्या बळावर कर्मधर्मसंयोगाने त्याला उत्तरलेखनार्थ एक भलीमोठी ग्रॅन्ट मिळाली. तेव्हा त्याला कोणी विचारले की, 'बाबा रे, आता तू काय लिहिणार आहेस?—' 'पुन्हा आत्मचरित्रच.' त्याचे उत्तर. 'म्हणजे काय? जे पहिले होते ते आत्मचरित्रच होते ना?'—त्यावर त्याचे उत्तर : 'होय. पण ते खोटे होते. आता मी खरे आत्मचरित्र लिहिणार आहे."

हा मजकूर उघडपणे तुमच्याबद्दल आहे. त्याचा प्रतिकार कसा करायचा हे तुम्ही ठरवा. पण अशा बेजबाबदार लेखनाला चपराक मिळाली पाहिजे. माझ्या मते तुम्ही अब्रूनुकसानीचा दावासुद्धा करू शकाल. वकीलांना विचारून पहा. पुण्याला आलात तर आपण M. R. परांजप्यांना भेटू. ते या संबंधातले तज्ज्ञ आहेत.

●

गं. चि. ग्रामोपाध्ये / पणजी-गोवा

तुमच्या कविता आधी वाचल्या होत्या व नुकतेच 'बलुतं'ही वाचले होते. त्यामुळे तुमची गाठभेट घेणे व गप्पागोष्टी करणे अगत्याचे वाटत होते.

'बलुतं'संबंधीचे लेख (विशेषतः शांता शेळके, रा. ग जाधव यांच्याकडे) वाचले होते. मलाही तुमच्याशी खूप बोलायचे होते. जमल्यास कुठंतरी लिहीनही. पण ते लेखनही तुमच्या भेटीनंतर झाले असते तर त्याला वेगळे परिमाण लाभले असते.

●

स. द. पुणेकर / मुंबई

मुंबईहून १९ मार्च रोजी निघताना वाटेत प्रवासात वाचावयास म्हणून आपले 'बलुतं' घेतले. वाचताना वेळ चांगला गेला. भागलपूरला (२१ मार्च) येईपर्यंत मी पुस्तक संपविले.

मला पुस्तकाबद्दल विशेष वाटले म्हणजे कोणताही आकस व द्वेष न दाखविता आपण सत्य वस्तुस्थितीचे निरपेक्ष वर्णन केलेत. जनावरेही राहाण्यास कचरतात, अशा दुर्गंध जागेत आपणाला बराच काळ घालवावा लागला. तरी देखील धडपडून आपण वर आलात. अजूनही वर जाण्याची आपली योग्यता आहे. आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा उपयोग आपल्या समाजाची उन्नती करण्यात व्हावा.

●

मुकुंद टाकसाळे / पुणे

हे पुस्तक आवडणारे खूप आहेत. मीही पाऊण पुस्तकाचा ह्याच मंडळींइतका चाहता असेन; पण जिथून पुढे 'सई प्रकरण' सुरू होते, तिथून पुढे मला तुमच्याबद्दल चीड, संतापच येत गेला. सईबाबत संशय आला म्हणून तुम्ही सोडून दिलं, इथपर्यंत सारं काही समजू शकतं. ह्यात सईचा दोष किती आणि परिस्थितीचा किती, ह्याचा तुम्हाला पडणारा संभ्रम समजू शकतो. परिस्थितीचा दोष आहे असं मानलं. (आणि सईचा दोष नसतानाही) तुम्ही तिला सोडून दिलंत–तरीही समजू शकतं. हा एवढा भागच आपण लिहिला असता तर 'सईवर तुम्ही अन्याय केलाय' असं मी म्हणालो नसतो.

पण मी तसं म्हणतोय आणि ह्याचं कारण 'सई प्रकरण' संपल्या संपल्या शिवडीतलं 'सलमा प्रकरण' ज्या पद्धतीनं सुरू होतं तो प्रकार वृणास्पद आहे. एकदोन पानांमागे तुम्ही 'सई मात्र मनातून तुटता तुटत नव्हती' असं लिहिता आणि लगेच सलमा 'अभी ना जाओ छोड के' म्हणून कोडभाषेत कशी बोलायची ह्याचे साग्रसंगीत वर्णन करता! पहिल्या बायकोची आठवण इतकी ताजी असताना हे असलं पोरकट प्रेमप्रकरण सुचू कसं शकतं एखाद्याला? त्यातून 'एखाद्याला' सुचेलही, 'तुम्हाला' कसं सुचू शकतं?

'सई प्रकरणा'नंतर ताबडतोब येणारं 'सलमा प्रकरण' खरोखरच चीड आणणारं आहे. वाचतानाही हा jerk चांगलाच जाणवतो.

आपल्या प्रामाणिकपणामुळं आपण सईचं जे व्यक्तिचित्रण केलेलं आहे ते खूप आवडून गेलं. सईनं ज्या पद्धतीची नंतर भूमिका घेतली तीही मला आवडली. बकुळाबद्दलच्या वात्सल्याचा दुवा सई मुद्दाम तुमच्यापासून हिसकावून घेते आहे. ती हेतुपुरस्सर करत आहे. त्यामागे तिचा विद्रोह आहे आणि तुमच्या विद्रोहापेक्षा हजारपटीने जास्त आहे. त्यामुळेच सईची बंडखोरी आवडते, भावते.

सईनं एका म्हाताऱ्याशी लग्न केलं— 'तिनं ही हाराकिरी का केली, हे मला समजायचं नाही,' असं मानभावीपणे लिहिता! ह्यावर काय बोलायचं?

सईचं एक वाक्य तुम्ही उद्धृत केलंय— "हा पुढारी झालाय ना? उद्या बकुळा मोठी झाली, म्हणजे मी तिला मुरळी करीन. त्याच्यासमोर नाचवीन!" हे वाक्य तमाम विद्रोही कवितांच्या तोंडात मारणारं आहे. त्यातला कडवटपणा कापत जाणारा आहे. सईलाही मुलीविषयी प्रेम असणारच. पण तुमच्या 'पुढारीपणा'चा नक्षा उतरवण्यासाठी प्रसंगी पोटच्या पोरीचाही बळी देण्याची तयारी आहे. कदाचित् सईच्या अडाणीपणामुळं 'मुरळी बनवणे' हा प्रकार तिला तुमच्याइतका भयंकर वाटतही नसावा पण तुम्हाला तो किती भयंकर वाटू शकतो ह्याची तिला पूर्ण कल्पना आहे. आणि म्हणूनच तिला ह्या प्रकारे तुम्हाला उघडं पाडायचं आहे, तुमचा सूड घ्यायचा आहे.

सईच्या आयुष्याची परवड तुम्हीच केलीत. तुम्हीच जबाबदार आहात ह्या गोष्टीला.

तरीही एक प्रश्न उरतोच : आयुष्यभर ज्या समाजअवस्थेत तुम्ही फक्त अन्याय आणि पिळवणूकच सोशीत राहिलात, ह्या समाजव्यवस्थेत स्त्रियांचीही तशीच पिळवणुक होते. शिकून सवरूनही आणि विशिष्ट जाणिवा निर्माण होऊनही पिळवणूक करणाऱ्यांच्यात तुम्ही कसे काय सामील होऊ शकता ? आणि संधी मिळताच जर तुम्ही पिळवणूक करणाऱ्यांच्या गटात सामील होणार असाल, तर तुम्हाला स्वतःच्या झालेल्या पिळवणुकी-विषयी तक्रार करण्याचा तरी अधिकार कसा काय पोचतो ?

'बलुतं' वाचून मला स्वतःला पडलेला हा प्रश्न.

तुम्ही म्हणाल, 'मला झालेला पश्चात्ताप मी प्रामाणिकपणे लिहिलेला आहे.' ठीक आहे. त्यामुळे पुस्तकाचा दर्जा निश्चितच वाढला आहे. त्यामुळं तुमच्या 'त्या' वागणुकीचं समर्थन होऊ शकत नाही.

सध्या 'बलुतं'चे Copy-rights ज्यांच्याकडे आहेत त्या सौ. हिरा पवारांविषयी आपण सोइस्कर मौन पाळलेले आहे. 'दलित पॅन्थर्स'बद्दलही असेच सोइस्कर मौन पाळले आहे. रिपब्लिकन प्रश्नांची चिरफाड करताना हे मौन विशेष खटकणारे आहे.

●

हनुमंत मनगटे / छिंदवाडा

एक लम्बे अरसे बाद पत्र. वैसे हमेशा यादों में रहे हो.

'बलुतं' (अछूत) अभी अभी पढा. इमानदार अभिव्यक्ति. पत्नी भी पढ रही है. याद कर रही है, कि कौन दया पवार ? समान्तराव के समय की फोटो दिखाता हूं. उसे याद आ जाता है.

समान्तराव धरणीधर बहुत ही अच्छा कवि है. मेरा मित्र. तीस साल से. घर का मेम्बर. तुम मिल चुके होंगे. वह भी महार है उसने भी पढा शंका—हमारे इधर, यानी मध्यप्रदेश में महार लोग बाजे नहीं बजाते. यह काम 'मांग' लोग करते हैं इधर कोस्वारी व अन्य काम वही करते हैं, जो आप के तरफ किया करते हैं.

उच्चवर्ण क चेहरे पर से नकाब हटकार यथार्थ को सामने लाने का कार्य लेखक अपने ढंग से कर सकता है. (अछूत) बलुतं इस में सफल है. घर में सब को यथायोग्य सानन्द हो.

●

विद्या बाळ / पुणे

स्वतःचं आयुष्य असं मध्यावर आलं असताना, आपल्या आजवरच्या आयुष्यातलं सगळं घटित असं विनाआडपडदा पुढे ठेवणारी माणसं खरोखरीच माझ्या पाहाण्यात नाहीत. तुम्ही ज्या अवघड वाटा चालून गेलात, क्वचित् पडलात, ठेचाळलात, चढलात ते सगळं इतकं सरळपणानं तुम्ही सांगितलंय. तुमचा प्रामाणिकपणा, तटस्थपणा आणि अभिनिवेशाशिवाय सांगण्याची पद्धती फार आवडली.

●

रा. भि. जोशी / मुंबई

'बलुतं' नुकतंच वाचले. आणि ते मला आवडले. एक म्हणजे आपल्या लिहिण्यात तटस्थपणा आहे. प्रौढ दृष्टिकोण आहे. आत्मपरीक्षण आहे. आणि त्यात दलितांच्या जीवनाचे अनेकांगी दर्शन झाले आहे. आपला जीवन-वृत्तान्त तर त्यातून कळतोच पण इतरही अनेक गोष्टी कळतात. महार समाजाचे शहरातले आणि खेड्यातले जीवन, तसेच आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीमुळे त्याला आलेले विशिष्ट स्वरूप त्यात व्यक्त झाले आहे. मुंबईतला कावाखाना ('कावा' म्हणजे 'कॉफी', 'कोको' नाही. मूळ अरबी 'कहूवा' आहे, त्याचा अर्थ 'कॉफी'. त्यावरूनच कॉफी शब्द आला आहे आणि अरब लोक ती उकळून ते काळे पाणी पितात.) आणि धामणगावचा महारवाडा त्यांच्या सर्व जीवनांगांसह जिवंत उभे राहतात. आपल्या गावची धोंडाली, ढग्या डोंगर, त्याच्या पलिकडले औरंगपूर ही समोर दिसतात.

डॉ. बाबासाहेबानंतर दलितांच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीच्या चळवळीच्या झालेल्या चिरफळ्या, सांपत्तिक-सामाजिक सुस्थितीबरोबर काही लोकांमध्ये आलेला नैतिक पिचलेपणा आपण मोकळेपणे वर्णन केला आहे ह्या सर्वांमुळे आपल्या आत्मवृत्ताला बराच व्यापक असा चौकसपणा आला आहे. पांढरपेशांसंबंधी आपण जे लिहायचे ते वर्णनाच्या ओघात लिहिले आहे आणि त्यात उगाच संताप किंवा कडवटपणा नाही.

मात्र ह्याबरोबरच इतर काही गोष्टींचा उल्लेख करणे योग्य होईल. आपण निवेदनाला एक कल्पित बैठक दिली आहे. दगडू पवार दया पवाराला आपली हकीकत सांगतो अशी भूमिका आहे. आरंभ आणि शेवट त्या भूमिकेवरच केला आहे. दया पवार हा दगडू पवाराला कळू लागल्यापासून सावलीसारखा ओळखतो. दगडूच्या चरित्राचा कोणताही भाग दया पवारापासून लपलेला नाही. खरे ते एकच आहेत; पण आपण ते दोन कल्पिले आहेत. त्याला काही सबळ कारण दर्शविलेले नाही. आपल्याच चरित्राकडे अलिप्ततेने पाहणे हा एक उद्देश असेल; पण ही अलिप्तता किंवा हे दुजेपण सर्वत्र टिकले नाही. त्यामुळे रचनेच्या एकसंधपणाला बाध आला आहे. ते दोघे एकच आहेत. नित्य परिचित आहेत. तर 'चाप्या', 'तोडक्या', 'गुडसा', 'भेगू', 'फाशी', 'शेव', 'बोहडा' ह्या शब्दांच्या अर्थाचा खुलासा कोणासाठी ? आणि कशासाठी ? उघड उघड तो आमच्यासारख्या पांढरपेशा वाचकांसाठी दिसतो. दगडू दयाला आपले चरित्र सांगतो त्यात हे खुलासे बसत नाहीत, आणि जर दगडू आणि दया वेगळे आहेत; तर दयाच्या कविता दगडू आपल्या स्वतःच्या म्हणून कशा उद्धृत करतो ? म्हणजे बैठक दगडू दयाशी बोलतो अशी घेतली आहे. पण प्रत्यक्ष लेखन पांढरपेशा समाज पुढे ठेवून केले आहे असे झाले आहे. त्यापेक्षा दया पवारांनी सरळ आत्मचरित्र सांगितले असते तर रचनेतला हा संकर झाला नसता. शिवाय काही ठिकाणी विषयांतर अनौपचारिक लेखनाच्या मर्यादाही ओलांडून गेले आहे. लैंगिक प्रसंगांचे आणि अनुभवांचे उल्लेख.

देखील थोडेसे अतिरिक्त आणि क्वचित् अनावश्यक वाटतात.

असे जरी असले तरी 'बलुतं' ही मराठी आत्मचरित्र वाङ्मयात महत्त्वाची भर आ . दलित लेखकांकडून, कार्यकर्त्यांकडून, विचारवंतांकडून अशी आत्मचरित्रे लिहिली गेली तर आजपर्यंत पांढरपेशांच्या दृष्टिआड राहिलेल्या किंवा त्यांनी दृष्टिआड केलेल्या मराठी समाजाच्या एका भागाचे मराठी वाचकांना दर्शन होईल. आणि मराठी आत्मचरित्र वाङ्मयाचा एकांगीपणा त्या प्रमाणात कमी होईल.

●

मनोहर तल्हार / अमरावती

दि. २५-३-८१ ला मुंबईहून परतताना, प्रवासात वाचनासाठी 'बलुतं' घेतलं. प्रवासात पूर्ण वाचून काढली. अतिशय सच्चे अनुभव व मनाची पकड घेणारी शैली, यामुळे 'बलुतं' मनस्वी झाली आहे. कादंबरीत (की आत्मचरित्र?) आपला एक शिंपी मित्र व त्याचे तुमच्या घरातील व तुमचे त्याच्या घरातील व्यवहार वाचून मला मनोहर तल्हार (शिंपी) व मधुकर तायडे (महार) या दोन मित्रांच्या मैत्रीची आठवण झाली. ('माणूस'मध्ये शंकर रफीक यांची मैत्री याच अनुभवातून आलेली) श्री मधुकरराव तायडे, विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई, हे Class I पोष्टवर आहेत. त्यांच्याकडेच मी उतरलो होतो. By the way, 'बलुतं' वाचताना एक सुखद धक्का आपण मला दिलात. 'माणूस'चा आपण केलेला गौरवपूर्ण उल्लेख वाचून क्षणभर थांबलो, भारावलो व थोडा अंतर्मुखही झालो. 'माणूस'ला समीक्षकांनी कधीच डोक्यावर घेतले नाही हे शंभर टक्के 'सत्य' आहे. ते सत्यही 'बलुतं'मध्ये आपण नोंदविले! त्या उल्लेखाने मनात थोडी गलबल झाली हे खरे.

●

वसंत चिंचाळकर / नागपूर

'पुलं'नी दाखविलेलं 'एक दुःखानं गद्गदलेलं झाड!' म.टा.मध्ये पाहायला मिळालं. दया पवारातील दगडूचे दर्शन पाहून पुण्याच्या संमेलनात भेटलेले दया पवार पुनः पुन्हा आठवायला लागलेत आणि त्यांच्या पुण्यातील भूमिकेचे अर्थ उलगडायला लागलेत.

मला असे दया पवार खरेच अनभिज्ञ होते. ते अस्सलात समजून घ्यायला 'बलुतं' नजरेखालून घालायची अनावर इच्छा आहेच. पुलंच्या झरोक्यातून कदाचित मी ते पाहणार नाही. त्याही पलिकडचे दगडू मारुती पवार मला शोधता येतील, असे का कुणास ठाऊक, ते पुस्तक न पाहता, वाचताही जाणवायला लागले आहेत.

हृदयाची भाषा ही समृद्ध समीक्षेहूनही अधिक डोळस असते; त्यामुळेही हा अकारण विश्वास जागत असावा. असो.

त्या दया पवारांना आणि त्यांचा दगडू जगविणाऱ्या तटस्थ, व्रतस्थ आत्मकथाकार लेखकाला माझा स्नेहनमस्कार सांगा.

●

कवि सोपानदेव चौधरी / मुंबई

दि. १५ एप्रिल. 'रविवार लोकसत्ता'मधे 'बलुतं' या ग्रंथासंबंधीचा लेख वाचला. गेल्या पुणे साहित्यसंमेलनांतर्गत, कविसंमेलनात मी आपल्या दोन-तीन कविता ऐकल्या. आणि त्या मला फारच आवडल्या. त्यापूर्वी एका मासिकात आपली कविता आली होती. ती कविता म्हणजे 'ला जबाब'—असा सवाल होता, आणि तोही आद्यकवि श्रीव्यासांना केलेला! छोटीशीच कविता! अंतःकरणाचा ठाव घेणारी!

तुम्हाला एक सांगू? सांगतोच. श्रीसंत चोखामेळा यांचे घरी काव्यमेळा, अभंग-मेळाच होता. त्यांची पत्नी, पुत्र हेही कवी होते. त्यांचा सुपुत्र 'कर्ममेळा' हा प्रखर विचारांचा होता. तो एकदा चीड येऊन आपल्या पित्याला—चोखोबांना—म्हणाला,

"बाबा!
— जोहार मायबाप जोहार
तुमच्या गांवचा मी महार!
तुमच्या उष्ट्यासाठी आलो."—

हे असे चालणार तरी किती युगे? संत कर्ममेळा यांच्या प्रश्नाला उत्तर मिळाले साडेसात शतकानंतर! आणि ते दिले कर्मशील परमपूज्य बाबासाहेब आंबेडकरांनी!! संत चोखोबांनीही उत्तर दिले होते. परंतु त्या काळात कोण लक्ष देणार! संत चोखोबांची ती चोख वाणी अशी —

वेदासी विटाळ, शास्त्रासी विटाळ। पुराणें अमंगळ विटाळांची॥
जिवाशीं विटाळ, शिवाशी विटाळ। विटाळ हा आहे आदिअंती!॥
शंकर विटाळ, विष्णूही विटाळ। विटाळापरते आहे कोण?॥
चोखा म्हणे मीही झालोसे विटाळ। विठ्ठल विटाळ विटेवरी॥

(परंपरेने चोखा सांप्रदायांत गायिला गेलेला हा विटाळासंबंधीचा अभ्यंग अभंग!) पू. बाबासाहेबांना मी वाचूनच नव्हे तर गाऊन दाखविलेला आहे. तो प्रसंग स्वतंत्र आठवणीचा! असो.

आम्ही वतनदार! चौधरी वाड्याशेजारीच वेसकरांचा वाडा! अवघे दहापंधरा फुटांचे अंतर! त्यांचे जीवन (जगणे) जवळून बघावयास मिळालेले आहे. माझी आई म्हणायची,

"देखा महारवाड्यांत। कशी माणसाची दैना॥
पोटामधीं उठे आग। चुल्हा पेटता पेटेना!॥"

आमच्या चौधरी वाड्याच्या दिंडी दरवाज्यापाशी रात्री जागले पहारा देत असत. त्यांच्याशी मी खूप बोललेलो आहे. त्यात तुळशीदादा हे बहुश्रुत होते. एकतारीवर भजन म्हणत. भिक्षेलाही जात असत. ते एकदा म्हणाले होते, 'उगवतीचा सूर्येनारायण आमच्या बाजूने उगवतो. आमची घरे, झोपड्या उगवतीच्या बाजूला!' याचा अर्थ बालपणी मला उमगला नाही; परंतु जाणतेपणी तुळशीदादाची खूप याद आली—येते! असो. लिहिण्या-वाचून राहावत नाही अशी काही पत्रे असतात, त्यापैकी हे एक!

डॉ. सूर्यनारायण रणसुभे / लातूर

(हिंदीचे प्राध्यापक. यांनी दलित कथेची अँथालॉजी हिंदीत संपादन केली.)

रेडिओ व 'महाराष्ट्र टाइम्स 'मधून 'बलुतं 'ला बक्षीस मिळाल्याचे ऐकले व वाचले म्हणून हे अभिनंदनाचे पत्र. तसे पाहता 'बलुतं 'चा आंतरराष्ट्रीय सन्मान झालेला आहे; पण घरचेच लोक विसरले होते. उशिरानं का होईना त्यांना जाग आली. यात 'बलुतं 'च्या सन्मानापेक्षा हे बक्षीस देऊन महाराष्ट्र शासनानं स्वतःचाच सन्मान करून घेतलेला आहे असे वाटते.

●

अशोक चिटणीस / मुंबई

दगडू पवारच्या आयुष्याची होरपळ फार जवळून पाहिली. इतकं प्रांजळ, प्रामाणिक, दाहक लिहायचं ठरवलं तरी मला लिहिता येणार नाही ! खरं बोलायला विलक्षण धैर्य आणि मानसिक ताकद लागते. 'बलुतं 'मध्ये ही ताकद आहे. मी दिपून गेलो. चक्रावून गेलो.

परमेश्वरानं तुम्हाला माणसाच्या जन्माला घातलं. महार आईबापाच्या पोटी जन्म झाला हेच तुमचं पाप असं समाजव्यवस्थेनं मानलं ! तुमच्या दुःखानं काठावर उभं राहून आम्ही फक्त हळहळायचं ! इतरांना हे पुस्तक वाचा म्हणून सांगायचं. बस्स इतकंच !

●

प्रा. वैजनाथ महाजन / कोल्हापूर

आता बलुतं वाचलं. चारुता सागर आलेले असतात तेही 'बलुतं 'बद्दल बोलतात बाबा मोहम्मद अत्तार येतो. तो पण आतून बोलतो. तोपर्यंत डोळ्यात पु. लं.नं लिहिलेला 'एक गदगदून गेलेले झाड ' हा लेख साकळून गेलेला असतो. तेव्हा अशी ही स्मृतींची साखळी सळसळलेली. एका प्रांजळ मांडणीला, त्यातल्या रक्ताळ अनुभवाला आणि शैलीदार कथनाला माझ्या उदंड प्रामाणिक सदिच्छा त्याच बरोबर आमंत्रण येऊनही दिल्लीला न गेलेल्या जळजळीत कविस सस्नेह नमस्कार. याहून अधिक ते काय लिहू ? सवडीने लिहावे.

●

प्रा. अविनाश केळकर / मुंबई

आपले 'बलुतं ' वाचून आत्ताच पुरे केले. आवडले. मनःपूर्वक अभिनंदन करतो. दगडू मारुती पवार ह्याच्या जीवनातील भीषण घटना वाचताना वाचक अंतर्मुख होऊन विचार करू लागतो. कारण हे सर्व जीवन त्याला नेहमीपेक्षा वेगळे वाटते. अपरिचित वाटते. त्यामागील वास्तवता ही सत्यावर आधारलेली आहे याची जाणीव त्याला होती. आपण या पुस्तकाचे लेखनही चांगले केले आहे. एक उत्कृष्ट पुस्तक वाचल्याचे श्रेय मिळते. इतर वाचकांकडून या पुस्तकाचे असेच स्वागत होईल असा विश्वास वाटतो.

●

प्रमोद कोपर्डे / सातारा

'बलुतं' कालच वाचून संपवलं. म्हणूनच लगेच लिहितोय. अर्थात त्या नादानं लिहायला एक सरळ निमित्त. गेल्या दोन रात्री 'बलुतं' वाचताना एक प्रचंड घुसमट अनुभवत होतो—जगत होतो.

'बलुतं' वाचायच्या आधी त्यावर वाचायला आणि ऐकायला बरंच मिळालं. पण तरीही नंतर वाचताना या सर्वांचा काही परिणाम झाला नाही हे बरं झालं. पण मला वाटतं अनुभवातला सच्चेपणा, जिवंतपणा आणि मांडणीतली स्पष्टता यामुळे हे सर्व मनाला सरळ भिडत गेलं. नुस्त्याच दलित साहित्यात नाही तर सर्व मराठी साहित्यात तुम्ही एक फार मोठी भर टाकलीय. सर्व साहित्याला एक जबरदस्त वळण देण्याची त्यात ताकद निश्चित आहे.

तुमच्या सर्व लिखाणात मला जाणवलेलं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य —तुम्ही कोणत्याही खोट्या शब्दांचा, उपमा-अलंकारांचा साज न चढवता त्या त्या शब्दात अनुभव मांडत गेलात, म्हणून तो तितक्याच गतीनं मनाच्या तळघरात उमटत राहिला. गेल्या दोन रात्री म्हणूनच तुमच्यावरोबर प्रवास करताना तुमची आई, सलमा, सई या व्यक्तींबरोबर भटकत राहिलो. खरंच प्रचंड घुसमट. तुम्हाला दोन तीनदा भेटल्यानंतर, गप्पा मारल्यानंतर आणि त्यानंतर 'कोंडवाडा' वाचल्यानंतरही या डोळ्यांच्याआड इतकं प्रचंड उद्ध्वस्त आयुष्य आहे हे जाणवत नव्हतं. पण 'बलुतं' वाचलं आणि हे सारं उद्ध्वस्त विश्व डोळ्यात उतरत गेलं — अक्षरशः तळापासून हाललं हे खरं.

तुमच्या आईबद्दल प्रचंड आदर वाटत गेला. खरेच तुम्ही भाग्यवान. मलाही तिच्याबद्दल इतकं का वाटत गेलं हे शोधताना माझी आजी मला तुमच्या आईला भेटली. असेच प्रचंड कष्ट विधवापणात खेड्यात करणारी. चार लहान पोरांना शिकवण्यासाठी धडपडणारी, तुमच्या आईसारखीच. कशी विसरणार ? 'सलमा', 'सई' याही अशाच मनात रुतत राहिल्या. मला राहून राहून आश्चर्य वाटतं ते या 'सलमा'चं. शरद्चंद्रांच्या कादंबऱ्यांतल्या स्त्रिया आणि तुमच्या आयुष्यातील ह्या साऱ्या स्त्रियांत, एक प्रचंड जवळीक आहे असं वाटतंय. सलमासारखी स्त्री हे सामान्यातलं असामान्यत्व स्पष्टपणे दाखविणारी वाटली. मी अक्षरशः भारावून गेलो. सर्व उद्ध्वस्तता माहीत असूनही, धर्माची भिंत आडवी येतेय हे माहीत असूनही पळून जाण्याचा विचार करणारी—खूप आदर वाटत गेला ...

मनात आलं ते लिहीत राहिलो. स्वतःला आवरणं अवघड गेलं. 'बलुतं' कायम मनाच्या कप्प्यात राहिलं असंच परवा 'किर्लोस्कर'साठी इथून जवळच्याच एका गावच्या जत्रेवर अभ्यास करताना ही सगळी 'बलुतं' पद्धती, तिची कामाची विभागणी जवळून पाहता आली. परवा 'त्रिपूरी परिषदे'साठी खेड्यापाड्यात हिंडताना वस्तीवस्तीवर 'घुसमटणारा' अंधार मनाच्या चिंधड्या उडवत गेला. बाबूराव बागूल परिषदेला आले होते. खूपच चांगला प्रतिसाद. तळयात शिरून पाणी घेतलं. प्रचंड समाधान. २ ते २॥

हजार माणसं पायी चालत आली होती. आता त्यांची इतर कामं पूर्ण करायचं चाललंय. '६–ब' खालच्या जमिनींचा तावा मिळवून देणं इ. प्रचंड भीती आहेच. मारण्याची धमकी वगैरे. पण 'बलुतं'सारखी पुस्तकं ही ताकद आहेत, यात 'काम करणाऱ्यां'साठी.

●

के. डी. दीक्षित / पुणे

तुमचं 'बलुतं' हे पुस्तक वाचलं. जवळजवळ एका बैठकीत. अत्यंत चांगलं लिहिलं आहे तुम्ही. आवडलं असं नुस्तं सांगणं काही पुरणार नाही. तसं तुम्हाला अनेकांनी लिहिलं असेल. मला पुस्तक वाचून खिन्नपणा आला. तुम्ही लिहिताना खूपच तटस्थपणा साधला आहे. एखाद्यानं स्वप्नात स्वतःला पाहावं आणि अरेरे म्हणावं इतक्या वेगळेपणानं तुम्ही लिहिलं हे मात्र विशेष महत्त्वाचं. ज्या यातना तुम्हाला झाल्या त्याकडे पहाणं हे कठिण. एका परीने तुम्हाला योगी म्हटलं पाहिजे. लिहिताना वळणा वळणाला तुम्हाला यातना आठवत असतानाही स्वतःला प्रक्षुब्ध असं होऊ दिलं नाही. माझे एक आकाशवाणीत मित्र होते—भास्करराव भोसले. तेही त्यांना लहानपणी झालेल्या छळांची हकीकत सांगत. ते वाल्ह्याचे. दिल्लीला असताना माझ्याकडेच उतरत. त्यांचं वावरणे थेट स्वैपाकघरापर्यंत. मी, बायको, मुलगा, ते असं आम्ही एकत्र पंगतीत जेवत होतो. पण त्यांनीही असेच किस्से सांगितले. तुमच्या पुस्तकात आणखी दोन गोष्टी आहेत, त्याने मी जास्तच भारावलो. तुम्ही संगमनेरची माहिती दिली आहे मी संगमनेरचा नाही. पण सासर संगमनेरचं. लहानपणी लग्न झाल्याने तिकडे जाणं-येणं खूप. त्यामुळं संगमनेर, तिथलं बोर्डिंग, अकोला, कोतूळ, अगस्ति हे सर्व वाचताना ओळख पटत होती. दुसरं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव आमचे भोसलेसाहेब त्यांचे निःसीम भक्त. परमशिष्य. त्यांच्याबरोबर रेडिओच्या शेजारी सिद्धार्थ कॉलेज होतं तिथं मला भोसले घेऊन जात. त्यावेळी बुद्ध प्रार्थनांना संगीत देत होते मास्टर कृष्णराव. मलाही संगीताचा नाद म्हणून मी जात असे. डॉक्टरसाहेबांच्याबरोबर बराच सहवास झाला. ते एकदा मला म्हणाले, "अरे, आपल्या देशात पुष्कळ गोष्टी वाईट आहेत. पण एक गोष्ट अशी की तिच्या चांगुलपणाला तुलना नाही, 'आपलं अभिजात संगीत' पूर्वसूरींनी विचार केलेलं, तालस्वरांचा पूर्ण आविष्कार असलेलं—असं संगीत—परिपूर्ण. जगात कुठेही त्याला तुलना नाही."

तुमचं एकंदर लिखाण अतिशय संयत आहे. तोल कुठेही गेलेला नाही. नाही तर एवढे ऊर फुटण्याचे प्रसंग सांगितलेत त्यात. पुष्कळ विखार आला असता. सेक्सही किती नाजुकपणानं लिहिलं आहे. तुमची भाषा प्रगल्भ आणि समर्थ आहे. तुमचं काव्यगायन TVवर ऐकलं. तुम्ही आहात लहान; पण तुमच्या एकंदर अनुभवांची खोली खूप आहे. तुमचं पुस्तक वाचून सर्व वाङ्मयात मला जास्त आवडलेलं असं म्हणायला काहीही अतिशयोक्ती वाटत नाही.

●

प्रभाकर द. मराठे / पुणे

आपलं 'बलुतं' वाचलं. अतिशय आवडलं.

इतकं जबरदस्त पुस्तक फारा दिवसांनी वाचनात आलं. ज्या काही थोड्या पुस्तकांनी मी कमालीचा अस्वस्थ होऊन गेलो अशा पुस्तकांपैकी एक आपलं 'बलुतं'.

इतका अप्रतिम आविष्कार मराठीत निर्माण केल्याबद्दल, दया पवार आपले मनःपूर्वक अभिनंदन.

आजवर मी अनेक चरित्रे, आत्मचरित्रे, आत्मभावानुवाद वाचले. तथाकथित 'बहुचर्चित' पुस्तकेही वाचली. पण 'बलुतं'ला तोड नाही.

समीक्षक काही म्हणोत पण 'बलुतं' 'अकॅडमी अवार्ड' मिळविण्याच्या लायकीचं आहे, हे निःसंशय. या पुस्तकात कुठेही आरडाओरडा नाही. कुठलाही अभिनिवेश नाही. कुणावर चिखलफेक नाही की दगडफेक नाही. कशाचं समर्थनही (आपण भोगलेल्या दुःखाचंसुद्धा) नाही. कुणावर आरोप नाहीत मग 'बलुतं'मध्ये आहे तरी काय ?

एका प्रगल्भ जाणीवेनं जीवनाचा रेखाटलेला स्थितिप्रज्ञ आलेख - असं मला वाटतं. फोटोच्या 'निगेटिव्ह'मध्ये फक्त काळा पांढरा रंग — 'बलुतं'चेही असेच फक्त दोन रंग—एक वस्तुस्थिती व त्या अनुषंगाने सामोरं आलेलं गडद दुःख.

या पुस्तकात आपण जी एक खंत व्यक्त केली आहे ती तर कमालीची अस्वस्थ करणारी आहे. या पुस्तकाची (पर्यायाने जाणिवांची) अशी ओळख झाली नसती तर चिरंजीव अस्वस्थतेचा असा शाप भोगावा लागला नसता. ही खंत सुन्न करून टाकणारी आहे.

●

प्र. श्री. नेरूरकर / मुंबई

हे पत्र अशासाठी, परवा तुमच्या 'बलुतं'चं प्रूफ (तिसरं) मी तपासलं.

शेवटचा परिच्छेद : तुमच्या आजीचं तुम्ही केलेलं वर्णन : अभिजात : अक्षर : अमर असं. माझे डोळे पाणावले : ऊर भरून आलं. तिने तुम्हाला दिलेला रेझर मला जरूर तुमच्या घरी येऊन पाहायचाय : तिला अभिवादन द्यायचं आहे.

तुमची आत्मकहाणी हे मराठीतील एक अलौकिक लेखन होणार आहे याबद्दल मला शंका मुळीच वाटत नाहीय. एक म्हणजे तिच्यातील जीवनानुभवाचं निखळ, नितांत व निरागस सच्चेपण. दुसरं त्या अनुभवांना साकार करणारी तुमची अस्सल, अवीट व अकृत्रिम अशी तळागाळाचा निर्मळ मळवट भरून आलेली बोलकी मराठी भाषा...हे सगळंच तुमचं भाषेचं व अनुभवाचं रसायन आधुनिक मराठी भाषेत व साहित्याला अपरिचित आहे. समृद्ध करणारं आहे...

म्हणूनच तर दलित साहित्याला स्वतःची अशी identity, ताकद, रूप व आशय प्राप्त झाला आहे...तुमच्या लेखनाने ते साहित्य सजीव व समर्थ होणार आहे—

तुमच्या आत्मकहाणीचं समग्र वाचन करायला मी फार उत्सुक आहे.

राहावलं नाही म्हणूनच घाईत लिहीत आहे.

प्रा. प्र. ना. परांजपे / मुंबई

'बलुतं' नुक्तंच वाचून संपवलं. अतिशय आवडलं म्हणून मुद्दाम हे पत्र लिहीत आहे.

स्वतःशीच संवाद करीत असल्याप्रमाणं केलेलं तुमचं निवेदन अतिशय प्रवाही व जवळीक निर्माण करणारं झालं आहे. शिवाय त्यामुळं तुमचा प्रांजळपणाही पारदर्शकपणानं वाचकापर्यंत पोचतो.

तुम्ही तुमच्या एकट्याच्या जगण्यावर लक्ष केंद्रित न करता सगळे नातेवाईक, मित्र यांच्या हकीकतीही निवेदनात सामावून घेतल्यानं तुमच्या साऱ्या समाजाचाच उभा छेद घेतल्याप्रमाणं झालं आहे. तुमच्या समाजाला व सवर्ण समाजालाही तुम्ही एक आरसा दाखवला आहे. त्यात स्वतःचा चेहरा पाहायचा की नाही हे ज्याचं त्यानं ठरवायचं आहे. निशिगंधाचा एक दांडा उपटला की सगळ्या आजुबाजूचीही मुळं वर यावीत तसं तुमच्या पुस्तकानं झालं आहे.

Sex विषयींच्या अनुभवांबाबतचं तुमचं perspectiveही आजकाल दुर्मिळ असं आहे तुम्ही ते अनुभव दडपलेलेही नाहीत, आणि त्यांना अवास्तव महत्त्वही दिलेलं नाही. त्यातही ज्यांना तुमच्या समाजाच्या दृष्टीनं प्रातिनिधिक महत्त्व आहे, त्यांना तुम्ही अधिक महत्त्व दिलं आहे. त्यातूनही हे पुस्तक लिहिण्यामागची तुमची भूमिका सूचित होते.

तुमच्या लेखनात अतिशयोक्ती नाही, भडकपणा नाही, नुस्ताच संताप नाही की तळतळाट नाही. क्रोध, खेद, वेदना, असहायता, तटस्थपणा आणि शोधकपणा यांचे एकजीव रसायन तुमच्या पुस्तकात आहे. म्हणून ते लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रां'प्रमाणे चिरकालीन महत्त्वाचे व मानदंडाच्या स्वरूपाचे झाले आहे.

काही थोडी स्थळे मात्र अशी आहेत की जिथे तुम्ही पराभूत होता. उदाहरणार्थ, सईविषयीच्या संशयाची खात्री पटण्याचा प्रसंग. तिथे तुम्ही एक तर सईवर अन्याय करता आहात, किंवा काहीतरी हातचे राखून ठेवताहात असे वाटते. तसेच तुम्ही आणीबाणीचा उल्लेख करता, पण तुमच्या द्वितीय विवाहाबद्दल वा नव्या संसाराबद्दल किंवा सध्याच्या नोकरीबद्दल लिहीत नाही. सई 'मुलीला मुरळी करीन' असे म्हणते हे लिहिता, पण त्या मुलीबद्दल फारसे लिहीत नाही. मुलीच्या लग्नासाठी जमीन गहाण टाकून एक हजार रुपये उभे केल्याचे लिहिता; पण ती मुलगी सईचीच का, ते मात्र लिहीत नाही. अर्थात आपण वर्तमानाच्या जितके जवळ यावे तितके आत्मनिवेदन अधिकच कठिण होत जाते हे खरेच. मला सर्वांत आवडले ते तुमचे प्रांजळपण. चुकूनही स्वतःच्या कौतुकाची भावना त्यात नाही. म्हणूनच तुमच्या लेखनाचे नाते लक्ष्मीबाई टिळक, इरावती कर्वे, दुर्गा भागवत यांच्या लेखनाशी जुळते, असे मला वाटते.

ता. क. : तुमच्या पुस्तकाला वाङ्मयीन जगातले सर्व मानसन्मान मिळतील असा मला भरवसा आहे. तुम्ही त्यांनी विचलित न होता तुमच्या लेखनातच गुंतून राहाल अशी आशा आहे.

●

कृष्णा पांचेगावकर / नांदेड

'बलुतं' पुस्तक वाचलं. फार आवडलं. खरंच आपण एवढं सुंदर लिहू शकता याची कल्पना नव्हती. दलित साहित्याबद्दल माझा दृष्टिकोण जरा jaundice eyed होता. पण आपलं पुस्तक वाचले आणि एकदम नवी दृष्टी लाभली. आजच आपले कोंडवाडा पुस्तक आणले आहे. अभिनंदन !

या सर्व खटाटोपीचा सारांश एकच. आपल्याबद्दलची वाटणारी आदराची आणि नितांत कौतुकाची भावना, मला व्यक्त करायची होती. आपला प्रामाणिकपणा, (जो म. गांधींच्या आत्मचरित्रावरही मात करतो.) तात्विक आणि सामाजिक विचारातील स्पष्टता, आपल्या या पिढीमधे मला तरी अतुलनीय वाटते.

●

यशवंत कानिटकर / अमेरिका

आपला आणि माझा प्रत्यक्ष परिचय नसतानाही दोन कारणास्तव हे पत्र तुम्हाला लिहीत आहे. डॉ. अरुण लिमये (पुणे), हे गेल्या वर्षी माझ्याकडे आले असताना त्यांनी 'बलुतं' नावाचं पुस्तक मी वाचावं अशी शिफारस केली होती. त्यानंतर म. टाइम्समध्ये पु. ल. देशपांडे यांचा अभिप्रायवजा लेख मी वाचला होता. सुदैवाने दोन महिन्यापूर्वी माझ्या मोठ्या भावाने (वि. ग. कानिटकर) 'बलुतं' हे पुस्तक मला पाठवून दिलं. पुस्तक मला खूपच आवडलं. एक विशेष जाणवला तो हा की स्वतःच्या आयुष्यात समोर येणारी घाण उपशीत दिवस काढणाऱ्या दगडू पवारच्या मनात कुणाहीबद्दल तसा द्वेष भिनलेला नाही. तो क्रांतीच्याही गर्जना करीत नाही. आपण आणि आपला समाज, जसे आहोत तसे पाहण्याची — त्यातील दोषांची दखल घेण्याइतका तो प्रामाणिकही आहे.

●

गिरीधर राठी (हिंदी कवी-लेखक) / दिल्ली

कल रात, बल्कि अभी-अभी मैं ने आपका उपन्यास 'अछूत' पढ़कर पूरा किया है। पढ़ते हुए, खास कर सई-प्रसंग तक आते आते, बल्कि वह प्रसंग आ जाने पर फूट फूट कर रोया हूँ। रुलाने वाले, दहलाने वाले, ग्लानि से नतमस्तक कर देने वाले कितने सारे प्रसंग, कितने सारे जाने-अनजाने आयाम आप ने उघाड़े हैं, और वे कितनी सरलता, दृढ़ता, निःस्पृह उदासी के साथ—गुस्सा और संयम दोनों हैं, पर आप ने लेखक-वक्ता-भोक्ता के रूप में जितना गुस्सा उस में यानी अपनी स्याही में उतरने दिया है उसमे कई गुना गुस्सा पाठक के मन में पैदा करने की कला का एक अप्राप्य-सा लक्ष्य आप पूरा करते हैं—सादगी में कला का यह बेजोड़ रूप मुझे कृतज्ञ, नतमस्तक करता है... दरअसल यह लिखते हुए भी मुझे आँसू आ रहे हैं—मनोवैज्ञानिक के नाते हालां कि आप का यह अंदाजा गलत नहीं होगा कि रोने के कारण शायद कुछ और भी हों, उपन्यास निमित्त बन गया है, पर केवल निमित्त नहीं।


पिछले दिनों सत्यजित राय की पथेर पांचाली, अपराजित और अपूर संसार एक साथ देखी थी। उस व्यथा ने जितना मरोड़ा और तोड़ा था—शायद उस से ज्यादा तोड़-मरोड़ हो तो आदमी खत्म ही हो जाय— 'अछूत' ने घाव और अधिक गहरे, और अधिक ज़हरीले कर दिये। विभूति बाबू ने जिस तरह इस देश की नब्ज़ पकड़ी थी, दूसरे ओर से आपने भी वैसा किया है...पर उस का कथानायक ब्राह्मण था जब कि आपकी कृति का अछूत—और यह कितना बड़ा अंतराल है इसे पढ़कर ही जाना जा सकता है।

हमारे यहाँ—शायद सारे संसार में प्रथा है कि लेखक की कोई कृति यदि किसी को भा जाए तो वह चाहता है, कामना करता है, लेखक वैसा ही और भी कृतियाँ दे देता रहे। यह या ऐसी कामना करते हुए मुझे कँपकँपी होती है—पर हम सच्चाइयों से कितना मुँह मोड़ेंगे ..सच्चाइयाँ कुछ अधिक प्रीतिकर, अधिक आनंदमय हों, यह कामना ही की जा सकती है।


उस सारे कुरूप यथार्थ में भी आपने मानवीय स्वत्व, इंसानी गरिमा पर अपनी नज़र रखी, उसे जहाँ मौका मिला सामने लाये—उसी की खोज, उसी की स्थापना शायद सब से बडा लक्ष्य, मनोरथ हम सब का हो—

●

शालशोभी



शालजोडी



'शालजोडी' ह्या सदरात वेगवेगळ्या भागांतून, अनेक सुशिक्षित पांढरपेशा वर्गातील व्यक्तींकडून मला आलेली पत्रे पुढे देत आहे.

— दया पवार

॥ ॐ ॥

सौ. मंगला भा. दंडगे / कोल्हापूर

बहुतांनी गौरविलेलं 'बलुतं' अत्यंत कुतूहलानं वाचण्यास घेतलं. उच्च वर्णियांविरुद्ध उभारलेलं बंड, यशस्वी कर्तृत्व .... पण पुस्तक वाचताना मनाला अत्यंत वेदना झाल्या. सर्वसामान्य वाचकाला ज्ञात नसलेले अश्लील शब्द ज्ञात झाले. आत्मनिवेदनाचा अट्टाहास कशाकरिता ? अनेक प्रश्नचिन्हं भेडसावू लागली. वास्तवता, वास्तवता म्हणून मनाची समजूत घालावी म्हटलं तरी वास्तवतेच्या बुरख्याखालील क्षुद्रता, तिचा हीन दर्जा, मानवंचना, कटू अनुभव कुणाला येत नाहीत ? गटारगंगा पावलोपावली आहेतच की. वास्तवतेच्या ढोंगाखाली त्याचे हीन दर्शन कशाला ? आत्मनिवेदनामागे सात्विकतेचा झरा झरू द्याना ! संस्कारक्षम नव्या युवकांनी आपल्या 'बलुतं'पासून काय बोध घ्यावा ? घाणेरडे शब्द, दारू, बाया, चोऱ्या, स्त्री-पुरुष संबंध ! छे छे ! स्पष्ट लिहायचे तर ते साहित्य नव्हेच ! अशा आत्मनिवेदनाने तुम्हाला काय आनंद झाला हे समजत नाही. ज्या व्यथांनी तुमचे जीवन झाकोळले ती परिस्थिती बदलण्याकरिता तुम्ही लेखणी उचला. निर्मळ जीवन प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा जगता येते. कटू अनुभव चागल्या शब्दांत मांडता येतात. गरिबी, अंधश्रद्धा, पतीचा तऱ्हेवाईकपणा, गरिबीचे उन्ह सतत होरपळते आहे. समाज, आप्त, सर्वांनी छळलेल्या रे. लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे' कोण विसरेल ? त्यांच्या आत्मचरित्रात किती ढंग आहेत. कटू अनुभवाला

त्यांनी विनोदाची, उपेक्षेची झालर लावली आहे. निर्मळ शुद्ध विचारांची पखरण पानापानांतून बरसली आहे.

कुठलीही व्यक्ती मोठी होते ती सुखासुखी, फुलाफुलांच्या पायघड्या चालत चालत, कीर्तिशिखर गाठत नाही. कुठल्या धर्माची, पंथाची, समाजाची असो; वेदना, अडथळे, प्रतिकूल परिस्थिती हे याच त्यांच्या पाऊलवाटा असतात. पादुका मिरवीत जाणारे, कीर्ति-ध्वज दिगंत फडकत राहाणाऱ्या ज्ञानोबामाऊलीला धर्म-मार्तंडांनी छळ छळ छळले; पण 'ज्ञानेश्वरी 'सारखा अमृतमधुर ग्रंथ ज्ञानोबानी लिहिला. आपण काय लिहितो, वाचणाऱ्या व्यक्तिवर त्याचा परिणाम काय होईल, याचा विचार लेखकाने करायला हवा. समाजाशी काही बांधिलकी असतेच असते. आपले प्रक्षोभक अनुभव कथन करून फार तर सहानुभूती त्याला मिळविता येईल.

'बलुतं 'बद्दलच्या वेदना कळवल्या आहेत. आपले अभिनंदनपर पत्र लिहिणारं साहित्य वाचण्यास मिळो ही सदिच्छा !

●

सौ. विद्युल्लता वैद्य / नासिक

खरं म्हणजे आपला तसा प्रत्यक्ष परिचय नाही; पण योगायोगानेच आपलं 'बलुतं' हातात पडलं. बसल्या बैठकीत वाचून काढलं. सुन्न झाले. अस्वस्थ झाले आणि लिहावसं वाटलं ! अस्वस्थ करण्याची ताकद आपल्या ह्या अनुभवात निश्चितच आहे. आपल्यातील असूनही जे जग आत्तापर्यंत अज्ञात राहिले होते ते असं जळजळीतपणे सामोरं आलेलं पाहून सुचेनासं झालं ! ह्या जिवंत अनुभवांना जो आकार, जे चिंतन लाभलं आहे ते स्तुत्य आहे. नावापासून, अर्पण-पत्रिकेपासून सारंच वेगळं वाटलं — पण थोडसं अपुरं वाटलं ! आपल्या जीवनात शिक्षणाने शिक्षित सहचारीने प्रवेश केल्याने आपण आपल्या जगापासून तुटून पडलात का ? ना ऐलतीर ना पैलतीर अशी अवस्था झाली का ? पुढचं काही लिहिणार असल्यास उत्सुकतेने वाट बघत आहे.

●

वर्षा वैद्य / मुंबई

मी तुमचं 'बलुतं' वाचलं. खूप आवडलं. कशा तऱ्हेचं जीवन दलितांना जगावं लागतं याची कल्पना आली.

नुकतंच मी 'कन्यादान' हे विजय तेंडुलकरांचे नाटक पाहिले. दलितांबद्दलची एक समस्या त्यात हाताळली आहे. पांढरपेशा समाजाबद्दल दलितांच्या मनात असलेली सूडाची भावना त्यात दाखवली आहे. खरोखरच हा आकस त्यांच्या मनात आहे काय ? याबाबत आपलं मत काय ? मग यावर उपाय काय ? असा जर एकमेकांबद्दल आकस असेल तर दलितांच्या उद्धारासाठी चाललेल्या प्रयत्नांचं काय ?

मनात आलेली शंका मोकळेपणाने विचारली. पत्राचं उत्तर जरूर पाठवा.

●

सत्त्वशीला वि. सामन्त / गोरेगाव प.

या आठवड्यात पुस्तक वाचून संपवलं. अव्वल दर्जाचं साहित्य म्हणून ज्याची गणना होऊ शकेल इतकं हे पुस्तक हृदस्पर्शी तर आहेच, परंतु त्याहीपेक्षा आम्हा पांढरपेशांना अंतर्मुख करायला लावणाऱ्या या पुस्तकाची विचारप्रवर्तकता हाही तितकाच मोलाचा गुण आहे.

एका मुद्द्यावर मात्र न राहावल्यामुळे विचार मांडावेसे वाटतात. (कदाचित डॉ. उषा मेहता यांनीही हाच मुद्दा उपस्थित केलेला असावा.) आपण सईला जी वागणूक दिली ती योग्य की अयोग्य याचा न्यायनिवाडा करण्याचा मला अधिकार नाही. किंबहुना काहीशा अपराधीपणाच्या भावनेने ग्रासलेल्या आपल्या मनाच्या जखमेवर आणखी मीठ चोळावं असाही हेतू नाही. पण एक सामाजिक बाजू म्हणून घटनेचा विचार जरूर करावासा वाटतो. दलित चळवळींच्या राजकारणाच्या संदर्भात आपण एका ठिकाणी एका पुढाऱ्याबद्दल उल्लेख केला आहे— " हा केनेडी... संसदीय लोकशाहीच्या गप्पा मारी, पण अंतर्गत लोकशाहीवर याचा कधीही विश्वास नसायचा. " म्हणजे मनुष्य स्वतःच्या बाबतीत ज्या हक्कांची मागणी करील तेच हक्क तो दुसऱ्याला बहाल करीलच असं नाही. या मानवी प्रवृत्तीची आपल्याला जाणीव दिसते. या पार्श्वभूमीवर सईच्या घटनेचा विचार केला तर काही वेगळं उत्तर सापडू शकेल. जावजीबाबांनी सांगितलेली रूपक-कथा फार सुरेख आहे. पत्नी व्यभिचारी असल्यास सच्छील पुरुषाचा दारुण मनोभंग होतो हे खरं. त्या मनोभंगावर उतारा म्हणून आपण सईचा त्याग केला. समजा, हे उलटं घडलं असतं तर ? पती व्यभिचारी असेल तेव्हा पोटी अपत्य असलेल्या स्त्रीनं काय करावं ? काय केलं असतं ? मिळवत्या स्त्रीलासुद्धा रागाच्या भरात संसाराचा पट उधळण्यापूर्वी पोटच्या मुलांचा चारदा विचार करावा लागला असता, तिथे दलित समाजातील अशिक्षित स्त्रीचं काय ? त्या प्रसंगी आपण मनातल्या मनात भूमिकांची उलटापालट करून पाहिली असती तर, मुलीकडे पाहून आपण हा प्रश्न वेगळ्या तऱ्हेने सोडवू शकला असता. दुसरं असं की, पत्नीशी सलगी करू पाहणाऱ्या आपल्या मित्राचं आपण पारिपत्य करू शकला नाही; पण संशय येताच पत्नीला मात्र शिक्षा करू शकलात. म्हणजे बलदंडापुढे आपलं काही चालत नाही, हा तुम्हाआम्हा सर्वांचा मनुष्यस्वभाव आहे. दुबळ्या माणसाकडून आगळीक घडली की, आपण तत्परतेने शासन करतो. अन्यायाचा प्रतिकार करण्याच्या आपल्या गप्पा लब्धप्रतिष्ठितांपुढे मात्र चालत नाहीत हे खरं. तथाकथित उच्चवर्णीयांशी झगडा करताना दलित समाजातल्या पुरुषांनी आपल्याकडून आपल्या स्त्रियांनाही न्याय्य वागणूक मिळेल याची हमी घ्यावयास हवी. हा जो मुद्दा मांडला, त्यात आपलं काहीतरी चुकलं असं दाखवण्याचा इरादा नाही. मनमोकळेपणानं मला जे वाटलं ते लिहिलं. दुसऱ्याला शहाणपण शिकवणं हा मनुष्य-स्वभाव आहे. मीही त्याला अपवाद नाही.

पुस्तकाचं मुखपृष्ठ, नाव, प्रारंभ आणि शेवटही— कशा कशाचं कौतुक करावं ते

समजत नाही. मात्र जॅक लंडनचे उद्‌गार तितकेसे पटले नाहीत. माझ्या मते हा दगड बांधकामाच्या पायात गाडलेला. मला वाटतं या खाते-यातून वर येऊ पाहणारी आपली ही पिढी. वरिष्ठ समाजाशी हक्कांसाठी लढा आणि स्वकीयांशी त्यांच्या अज्ञानाविरुद्ध लढा. या लढ्यातच निम्म आयुष्य संपलेलं. परंतु हे बलिदान तसं वाया जाणार नाही. आपण जे भोगलं ते आपल्या पुढच्या पिढीला भोगावं लागणार नाही याची आपण दक्षता घ्यालच. याची चुणूक परवा आपल्या घरी पाहायला मिळाली. सुविद्य पत्नी व चुणचुणीत मुलं पाहून आनंद वाटला. भावी साहित्यिक जीवनातही मी आपल्याला सुयश चिंतिते. या पुस्तकाला सरकारी पारितोषिक मिळेल असं वाटतं.

●

मीना चंदावरकर / पुणे

आल्यापासून रोज तुम्हाला पत्र लिहीन म्हणते आहे. परंतु जमले नाही. शिवाय एलोनॉर झीलियटबाईंनी तुमचा एक फार चांगला फोटो दिला होता. तो कुठेच सापडेना. शेवटी परवा तुमचे पत्र मिळाले. तेव्हा शोधून काढला आणि आज पाठवते आहे. हा फोटो जेव्हा आम्ही त्यांच्या घरी पाहिला, तेव्हा त्यांना आम्ही म्हटले होते की, 'हा तुमच्या अतिशय चांगल्या फोटोंपैकी एक आहे.' बाईंनी ते लक्षात ठेवून आम्ही निघण्याच्या सुमारास तो आम्हाला पोस्टाने पाठवून दिला होता. तुम्हालाही तो आवडेल असे वाटते.

फोर्ड फौंडेशनने दिलेल्या शिष्यवृत्तीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन! त्याबद्दल बातमी कानावर होतीच, परंतु ती निश्चित कळल्यामुळे फारच आनंद झाला. आणि इतके पैसे मिळूनही नोकरीतून सुटका नाही! हे अगदी आपल्याकडील राज्यकारभाराला साजेसेच झाले. लौकर सुटका करतील अशी आशा करण्यापलीकडे काय करणार? कलाकार माणसाची होईल तेवढी कुचंबणा करण्यातच त्यांना समाधान मिळणार!

अमेरिकेला पाठवलेलं पत्र मिळालं. FFC चे पैसे अजून आले नाहीत, पण लौकरच यावेत. सिनेमा करण्यात आम्हाला फारच interest आहे. परंतु FFCकडून कर्ज घेण्यात फारच भानगडी व पुढे कर्ज फिटू न शकल्यास फारच आर्थिक बंधने येतात. त्यामुळे FFC ने produce करणे हा उत्तम उपाय आहे. FFC चं रूपांतर NFDC मध्ये होणार आहे, व त्यांचं Constitution होतं तसंच राहिलं तरी एक-दोन बैठका होऊन policy वगैरे ठरेल, असं पत्र आम्हाला आलं होतं. ते झाल्यानंतरच NFDC सिनेमा produce करू शकेल का ते कळेल.

सिनेमा केल्यास 'बलुतं' या पुस्तकावर आधारित असं तर नक्की लिहूच, परंतु तुम्हाला वाटल्यास 'बलुतं' हेच नावही (FFC ची हरकत नसल्यास) सिनेमालाही ठेवता येईल. मुळात दुसरं ठेवण्याची कारणं काय होती, ते पुढे लिहीनच.

त्या scriptला बक्षिस मिळेल असा आत्मविश्वास असला, तरी स्पर्धा म्हटल्यावर कोणतीच खात्री देता येत नाही. अशा वेळी बक्षीस मिळालं नाही तर 'बलुतं'ला

नाही मिळालं असं होऊ नये व दुसऱ्या कोणाला त्यावर सिनेमा-नाटक काढावसं वाटलं, तर त्याने पुस्तकाचा स्वतंत्रपणे विचार करावा अशी एक कल्पना. बक्षीस मिळालं व आम्हाला सिनेमा काढता आला नाही, तर आमची script 'अत्याचार' नावाखाली असल्याने, निव्वळ पुस्तकावरून सिनेमा काढायला तांत्रिक अडचण येऊ नये असाही एक विचार होता. शिवाय बऱ्याच मराठी लोकांना (साहित्य वाचणाऱ्या) 'बलुतं' शब्दाचा नीट अर्थ किंवा उच्चार माहीत नव्हता. बरेच लोक तुमच्या पुस्तकाला 'बलुतं' असं न म्हणता 'बलुत' म्हणतात. (नवं शुद्धलेखनवाले तर फारच!) तेव्हा नाव वाचल्यावर मराठी लोकांनाही लक्षात येत नाही तर अ-मराठी लोकांना काय कळणार असं वाटलं. कारण सिनेमा मराठीच करणार, तरीही तो अशा प्रकारेच करणार की non-Marathi लोकांना त्यात interest वाटलाच पाहिजे. अ-मराठी लोकांना 'बलुतं' शब्द कळणार नाही; त्या मानाने 'अत्याचार' हे नावं भारतातील सगळ्या प्रांतांत कळू शकते, या सगळ्या विचारांनी हे नाव ठेवलं. परंतु सिनेमाला हवं असल्यास 'बलुतं' हे नाव ठेवण्यासही काहीच हरकत नाही.

●

स्वाती काळे / मुंबई

TV वर आपणास रविवारी 'प्रतिभा आणि प्रतिमा'मध्ये पाहिलं, ऐकलं. त्याच्या दोनच दिवस आधी म्हणजे शुक्रवारी आमच्या घरात आपलं पुस्तक आलं. वाचनाची मला आवड आहे. नविन काहीतरी वाचायला हवंच होतं. सुट्टी जाणार कशी त्याशिवाय? पण हे पुस्तक एकदमच निराळं आहे, हे पाच-सहा पानं वाचल्यावर समजलं. इतकं वैचारिक पुस्तक प्रथमच वाचत होते. 'राजा राणी' वगैरे सारख्या गोष्टी वाचण्याचं वय केव्हाच संपलं. मग त्यानंतर गावाच्या गोष्टी, काही हास्य-विनोदाच्या, तर काही शृंगारिक गोष्टी, अशाच आतापर्यंत वाचनात आल्या खरं सांगू तर आत्म-कथनावर लिहिलेली पुस्तकं वाचण्यात मला इंटरेस्ट नाही; पण आपल्या पुस्तकाने कमाल केली! हातातून पुस्तक सोडवायचं नाही. मग आईचा थोडासा आरडाओरडा, 'सुट्टी लागल्ये, पण काही कामात मदत आहे का बघा. सदान-कदा पुस्तक!' आणि असं म्हणताना तिनेसुद्धा पुस्तक वाचायला घेतलं. आता तिच्या हातून ते सुटत नाही.

आपली प्रत्येक गोष्ट, प्रत्येक प्रसंग अतिशय हृदय हेलावणारा आहे. मात्र इतरां-प्रमाणेच मी पण म्हणेन, सइंचं असं का केलंत? ह्या प्रश्नाला आपल्याजवळ उत्तर आहे की त्यावेळेस खरोखर काय झालं? आणि किती सहन केलं, हे आपणच जाणता. ह्याच प्रश्नावर आपण TVवरच्या कार्यक्रमात उत्तर दिलंत आणि म्हणूनच प्रश्न विचारण्यात काहीच अर्थ नाही; पण राहावलं नाही, म्हणून विचारलं.

एक स्पष्टपणे सांगावसं वाटतं, राग येणार नाही अशी इच्छा. सर्व पुस्तक अप्रतिम वाटलं पण 'राजकारण' हे जरा कंटाळवाणं वाटलं. आपल्या मनावर त्या त्या वयात राजकारणाचासुद्धा परिणाम होत गेला, हे अगदी बरोबर असूनसुद्धा तेवढं जरा

कंटाळवाणं वाटलं. पहिला पहिला पार्ट चांगला वाटला, पण नंतर मात्र रिपिटेशन होत आहे असं वाटलं.

अगदी खूप विचार करायला लावणारं पुस्तक आहे. कदाचित ह्याच पुस्तकामुळे माझे विचार व माझी वागणूक बदलेल. कारण माझं आताचं वय हे संस्कार घडवून घेण्याचं वय आहे. घराच्या चार भिंतींपलिकडे मिसळण्याचं वय आहे. अजून जगाचा खूपच खूप अनुभव यायचा आहे. आणि बरोबर त्याच काळात हे पुस्तक हाती आलं. स्वतःच्यात बदल करण्याचा नक्कीच प्रयत्न करीन.

●

संध्या गोखले / पुणे

आपले 'बलुतं' हे आत्मचरित्र वाचले. अतिशय आवडले. अतिशय विलक्षण अनुभवांमुळे भारावून गेल्यासारखे झाले. 'भीषण वास्तवाचा प्रामाणिक आविष्कार' यामुळेच तुमचे पुस्तक प्रभावी झाले आहे. त्यामधे आपण काहीही आडपडदा न ठेवता सर्व तुमचे जीवन दाखविले आहे. या गोष्टीचे मला अत्यंत कुतुहल वाटते. कारण प्रत्येक माणसाला जे अनुकूल नसते, ते लपविण्याची सवय असते. किंवा आपली असमर्थता तो तितक्या खरेपणाने स्पष्ट करू शकत नाही. पण तुमच्या या आत्मचरित्रात तुम्ही तुमचा भ्याडपणा, भित्रेपणा किंवा एखाद्या गोष्टीतील संताप येऊनसुद्धा तुमची असहाय्यता ही दुसऱ्या माणसाने लिहावी इतक्या अलिप्तपणे, स्पष्टपणे लिहिली आहे.

तुमचे दारू पिणारे व चोऱ्या करणारे वडील, अपार प्रेमाची पखरण करणारी आई, वस्तीतला वेडा, तुमची मावशी, बनू—अशा अनेक व्यक्तिरेखा आणि तुमचे त्यांच्या संदर्भातील 'वर्तन' हे विलक्षण आहे.

तुमचे अनुभव अतिशय तीव्र आहेत; पण त्याची तीव्रता ही काही ठिकाणी कमी करून लिहिली असती तर अधिक चांगलं झालं असतं तुमचे वेश्या, हिजडे किंवा adolsance यांबद्दलचे वर्णन आवश्यकतेपेक्षा जास्त झालं आहे. हे कबूल आहे की त्या गोष्टी एका बकाल वस्तीत राहणाऱ्या माणसाच्या बाबतीत अपरिहार्य आहेत. पण त्यांचे चित्रीकरण फारच गडद झाले आहे. त्यामुळे त्यांना नको इतका importance आला आहे.

तुमचा TVवरचा प्रोग्रॅम पाहिला. अजिबात आवडला नाही कारण तुम्हाला विचारले जाणारे प्रश्न अत्यंत primary होते. त्यामधे तुमच्यावर जो आरोप केला गेला की 'तुमच्या बायकोवर—सईवर—तुम्ही अन्याय केलात' त्याच्याशी मी अजिबात सहमत नाही. त्या परिस्थितीत तुम्ही योग्यच वागलात असे माझे मत

मला एक प्रश्न विचारावासा वाटतो तो म्हणजे, तुमची बहीण जेव्हा सवर्ण मुलांसमोर नाचत असते, तेव्हाच्या उद्वेगाचा परिणाम (तुमचे उद्‌गार) हे केवळ एक भाऊ म्हणून होते, का महार मुलगा आणि महारांच्याच आयाबहिणींना नाचवले जाते या संतापाचाच परिणाम होता? दुसरे म्हणजे हे पुस्तक जे इतकं प्रभावी झालं आहे, ते तुमच्या कठोर, कणखर भाषेमुळे का तुमच्या (संपूर्णपणे) अनुभवामुळेच?

सौ. मंगला रानडे / नासिक

आपण लिहिलेले बलुतं पुस्तक संपूर्ण व सावकाशपणे वाचले.

भारतीय समाज-घटकाची ओळख त्यामुळे झाली व त्यांची सुखदुःखे समजली. 'सुख थोडं दुःख भारी' अशीच स्थिती दिसून आली. या प्रकारची समाजरचना असल्यामुळे आपल्या वाट्याला अपमानास्पद जीवन आले किंवा अवहेलना सहन करावी लागली असे आपणास वाटत असेल, तर मात्र ते बरोबर नाही. प्रत्येक जाती-जमातीमध्ये, पुन्हा उच्चनीच भेदभाव रुळलेले असतात आणि त्या मानाने नीच स्थितीत जन्मभर अशीच स्थिती अनुभवावी लागते.

ज्या समाजात आपण लहानाचे मोठे झालो, त्या समाजाच्या सुधारणेसाठी मात्र आपण सुधारलेली माणसं काहीच करत नाही. एखादे आंबेडकर, एखादे गायकवाड सुधारण्याचा असा प्रयत्न करतात, हे भूषणावह नाही.

आता कागद उचलणाऱ्या स्त्रिया दिसल्या की आपल्या आईची काल्पनिक मूर्ती उभी राहाते. ज्यांना आयुष्यात दुःख व अपमान सहन करावे लागतात ते चिंतनशील बनतात.

•

कु. वी. गीता / बंगलोर

प्रिय भाऊ,

दुसरं कुठलंही संबोधन पटकन सुचलं नाही. 'दादा' म्हणायला हरकत नाही, पण त्यातून 'दादागिरी'चा सूर निघतो. म्हणून भाऊ...

अचानक एका अनोळखी व्यक्तिकडून पत्र आलेलं पाहून आश्चर्य वाटलं असेल तुम्हाला. खरं म्हणजे तुम्हाला पत्र लिहावं असं फार दिवसापासून, म्हणजे 'सारिका'-मध्ये तुमची आत्मरचना वाचल्यापासून वाटत होतं. पत्ता नसल्यानं गप्प बसणं भाग होतं. 'राजस'च्या दिवाळी अंकात तुमची कथा वाचली, पत्ताही मिळाला. पण अजिबात ओळख नसताना पत्र लिहावं तरी कसं असा संकोच वाटत होता. परंतु आता संकोच करून चालणार नाही. माझंच काम नडेल ...

मी बंगलोर विद्यापीठाची विद्यार्थिनी. सध्या इथल्या हिन्दी विभागात "वर्तमान परिवेश और सांप्रतिक हिन्दी, तामीळ, तथा मराठी कहानी" या विषयावर संशोधन करत आहे. मार्गदर्शन फारसं नाही. (कारण विषय हिन्दी... राजकीय कारस्थानांमुळे विरोधच ... स्वतःच्याच हिंमतीवर काम चालू आहे. सध्या मी "आंबेडकर आणि पेरियार रामस्वामी यांचा जनतेवर प्रभाव" या विषयाचा अभ्यास करत आहे. आंबेडकरांचा सुसंस्कृतपणा पेरियारमध्ये नसला तरी त्यांनी ब्राह्मणेतर जनतेत जी जागृती निर्माण केली आणि त्यांच्या स्वाभिमानाला जे आव्हान दिलं ते कमी महत्त्वाचं नाही. या दृष्टिनं कुणी आजच्या तामीळ साहित्याचं मूल्यांकन अजून तरी केलेलं नाही. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतरांमधली तेढ लहानपणापासून मी पाहात आलेली आहे, एका तटस्थ

प्रेक्षकासारखी. बालपण पुण्यात. वास्तव्य स्वतःला सुसंस्कृत म्हणवून घेणाऱ्या डेक्कन जिमखान्याच्या आपट्या–लेल्यांच्या वसाहतीत. आम्ही मद्रासी, म्हणजे बाहेरचे. आणि म्हणूनच सगळ्या महाराष्ट्रीयनांना सारखेच जवळचे आणि दूरचे. मोरे आणि मोघे यांच्यातला फरक कधी उमगला नाही. पटवर्धनांच्या शैलाबरोबर शेजारच्या शेवंतीला आईनं इडली खायला बसवलं म्हणून शैला फणकाऱ्यानं का निघून गेली हे मला तेव्हा समजलं नाही. शैलाच्या आईनं माझ्या आईशी कायमचा अबोला धरला. पण आईनं त्याकडे मुळीच लक्ष दिलं नाही. ते मला तेव्हा समजलं नाही. आता मी समजू शकते. आणि आईबद्दल अभिमान वाटतो.

पुणं सोडून मद्रासला आलो तेव्हा जातिभेदांचं वेगळंच विकृत आणि हिडीस रूप प्रकट झालं. 'पापाची' (बामणाची पोर) म्हणून पदोपदी अपमान. कॉलेजमध्ये प्रवेश नाही. कारणं दोन. एक म्हणजे ब्राह्मण, दुसरं म्हणजे शिक्षण मराठी माध्यमातून. अर्थात शाळेत 'तामीळ' विषय नव्हता म्हणून. एन्. बी.च्या बरोबर म्हणजे (Non–Brahmin) ब्राह्मणेतरांमध्ये मिसळतो, म्हणून नातेवाईकांकडून बहिष्कार.

जातियतेच्या सगळ्या अनुभवातून तावून सुलाखून बाहेर पडल्यानं मन कणखर झालं. विचारांचं, दृष्टिकोणांचं क्षितिज रुंदावत गेलं. साहित्याच्या मुळाशी समाज आहे हे वाचनात आलं होतं, आता समाजाच्या मुळाशी काय आहे याचा वेध घ्यायचा दृष्टी प्रयत्न करायला लागली ... अजून प्रयत्नच चालू आहेत. परमेश्वर कधी भेटणार आहे कुणास ठाऊक ? तुमच्यासारख्यांची मदत मिळू शकली तर नक्की भेटेल.

●

मेधा देशपांडे / अकोला

आपली भाषा फार परिणामकारक आहे. पण दगडू पवार, दया पवार हा आत्मकथन करतोय असं कल्पून जे आपण लिहिलंय, त्यामुळेच हे पुस्तक मला विशेष वाटले नाही. आपल्या आत्मकथनाची पद्धत खरोखरीच अतिशय कलात्मक आहे. पण या पद्धतीमुळे पाठीमागचे बरेच धागेदोरे पुढे लागत नाहीत. पुस्तकात बराच विस्कळीतपणा आलाय. शिवाय पुस्तकामध्ये बऱ्याच चुका आहेत. त्यातले काही मुद्रणदोषदेखील असू शकतात. उदा. डबल ब्रेसीयर्सचा कोट, शेरवानीचा कोट. तसेच आपण 'कावाखाना' असा जो उल्लेख करता त्या कावाखान्याचा खरा उच्चार 'कहवाखाना' असा आहे. अर्थात मराठीमध्ये अनेक शब्दांचे अपभ्रंश स्वरूप सर्रास प्रचलित आहे. त्याप्रमाणे कहवाखान्याचे 'कावाखाना' झाले असावे. पुढील आवृत्तीत मुद्रणदोष नसावेत अशी अपेक्षा आहे.

तसेच आपण पुस्तकाचा शेवटही अचानक केला आहे. पुस्तकाचा शेवट अजून परिणामकारकरित्या केल्यास 'बलुतं' जास्त 'इम्प्रेसिव्ह' होईल.

●

डॉ. व्ही. व्ही. साठये / अहमदनगर

मी 'बलुतं' विषयी लिहितोय. लिहिण्याचं कारण एवढंच की मी आताच पुस्तक वाचून बाजूला ठेवलंय. पहिली प्रतिक्रिया सांगू ? 'छान' लिहिलंय. व्यवसायानं डॉक्टर असलो तरी 'पोस्ट मार्टेम' करणारा नाही. सौंदर्याचं रसपान करणारा मी आहे. त्याशिवाय फत्तरात, काट्या-कुट्यात, अंधारात, अमावास्येला पाना-फुलांचं सौंदर्य कसं समजू शकेल ?

मॅट्रिकपर्यंत म्हणजे १६ व्या वर्षापर्यंत संघात (अर्थातच R. S. S.) नियमितपणे जात होतो, अजूनही त्यांचे विचार पटतात. बदलत्या काळाप्रमाणे बदलणारे आचारही आवडतात. पण कधी कधी वाटतं, संघ एक पाऊल वेळेच्या बाबतीत मागे आहे. पण काळाशी समरस झालेला आहे असो. ४२ च्या लढ्यात बुलेटीन वाटणे वगैरे कामं थ्रील म्हणून केलीत. मला वाटतं बालवयात अनुकरण, किशोर वयात आदर्शाच्या शोधासाठी धडपड (डॉ. आंबेडकरांना तुम्ही माझ्या मते किशोरवयातच मानू लागलात), आणि तरुणपणी आव्हान स्वीकारायची तयारी व त्यानुसार मतात आणि निश्चयात ठामपणा असेल तर तशी वर्तणूक घडते.

पूर्वजांच्या चुका आपण भोगतोय. जन्माचं स्वातंत्र्य म्हणजे केव्हा ? कोठे ? कोणाच्या पोटी ? आपल्या हाती नाही. मग स्वातंत्र्य कशात आहे ? कर्मात आहे. मग या जगात आपला समाज जन्मश्रेष्ठता का मानतो ? आपण प्रथम अद्वैतवादी होतो. आणि आपला ऱ्हास त्यानंतर सुरू झाला. द्वैतवाद, मूर्तीपूजा, व्यक्तीपूजा, व्यक्तीमहात्म्य असा आपला ऱ्हास आहे. अद्वैतवाद मानला की, 'तो परमेश्वर आणि मी एकच आहे.' 'तुम्ही' आणि 'मी' एकच आहोत. अचराचर एकच आहेत. एवढी आचारांची आणि विचारांची उंची आम्हा भारतीयांची निश्चितच होती. पण वर सांगितल्याप्रमाणे ऱ्हास सुरू झाल्यापासून हे सारं विचित्र चित्र दिसतंय. रोटी-बेटी व्यवहार यावर माझा विश्वास नाही. तसं पाहिलं तर माझ्या नात्यामध्ये एकाने चांभाराच्या मुलीशी आणि दोघांनी खिश्चन मुलींशी लग्न केली आहेत. पण त्या जोडप्यांच्या आणि संबंधितांच्यामधे एक विनाकारण संघर्ष उभा राहिला आहे. कोणीच सुखी नाहीत. तर आपण सामाजिक स्तरावर एका समपातळीवर यावयास पाहिजे. म्हणजे जीवनसाधना, साध्य, सवलती, सोयींची उपलब्धी, सर्वांना समान संधी असावी.

हरिजनांच्याबरोबर मी खूप कामं केली आहेत. पण माझे मत सांगतो, 'आळस, विनासायास जीवनोपयोगी वस्तू मिळविणे व लाचारी' या तीन गोष्टी त्यांनी प्रथम टाकल्या पाहिजेत. तथाकथित मठाधिपती, कीर्तनकार बुवा यांचेबरोबर मी अजूनही भांडतो. एकनाथांची गोष्ट मोठ्या चविष्टपणे रंगवून सांगणारा बाबा हरिजनवाड्यात का उतरत नाही ? तेथे त्यांच्यासाठी का कीर्तन करीत नाही ?

●

शांताराम साळुंके / मुंबई

विविध कप्प्यांची, असंख्य दोऱ्यांनी शिवलेली, खरी ऊब देणारी 'बलुतं' निर्मित गोधडी, तिची जाणीव असणारे 'दया' बरेच आहेत. परंतु हे भारतीय समाज व्यवस्थेनं पदरात बांधलेलं 'बलुतं' शब्दांकन केलं तेव्हा बुरखे फाटले गेले असतील व आजही बऱ्याच जणांची तीच अवस्था आहे. मध्यमवर्ग (आमचा) नाराज आहे. कारण त्यांना 'सत्य' वाचायला मिळालं, एकानं अनुभवलेलं. ग्रंथाली प्रकाशित २५ डिसेंबर रोजी मी वाचले. त्यानंतर मराठी ग्रंथ संग्रहालयात चर्चा आयोजिली....श्री साप्ताहिकात....नंतर 'इंप्रिट'मध्ये अनुवाद (तितकासा ठीक नाही)....हे सर्व होत असताना मी सर्व काही वाचत होतो. ऐकत होतो. दादू इंदूरीकरांच्या श्रद्धांजलीतही भेटण्याची इच्छा झाली होती. पण मोठ्यांच्या पंगतीत जमलेच नाही. तरी नुसतंच पाहून तुमच्याशी माझी फार जुनी ओळख आहे, असे वाटत होते आणि असावीसुद्धा. कारण तुमच्या वाड्याचं बलुतं वेगळं होतं. थोडा फार फरक केला तरी सध्याच्या पिढीच्या वाड्याला आहेच, असं वाटतं म्हणून ओळख जुनीच वाटते. आज आनंद होतो आहे.

•

बाळासाहेब थोरात / संगमनेर

'बलुतं' वाचले. मन अस्वस्थ झाले. प्रत्येक माणसाचे जीवन एक कादंबरी व्हावे इतके निरनिराळ्या घटनांनी भरलेले असते. किंबहुना मोठ्या-मोठ्यांच्या जीवनातील घटनांपेक्षा, सामान्यांच्या जीवनातील घटना जादा भावना ढवळून काढू शकतात, मनाच्या अंतरंगाला हात घालू शकतात. कारण वाचक रोजच्या जीवनात तेच पाहात असतो, अनुभवीत असतो. थोरा-मोठ्यांच्या आत्मचरित्रासारखे आपण काही लपवून ठेवले नाही किंवा समाजात किंमत वाढावी म्हणून खोटे दाखले जोडले नाहीत. त्यामुळे या आत्मचरित्राचा दर्जा म. गांधींचे आत्मचरित्र व श्रीमती टिळकांच्या 'स्मृतिचित्रां'च्या रांगेत बसणारा आहे. आपण केलेले समाजाचे चित्रण अत्यंत वस्तुस्थितीला धरून असून त्यात उणिवा आढळत नाहीत. त्यामुळे आपल्या लेखन-कलेचे कौतुकच वाटते.

दादासाहेबांचे आडनाव व अकोले तालुक्याचे नाव का टाळले हे समजले नाही. कदाचित उत्कृष्ट लेखनाच्या काही खुब्या असतील त्यामुळे तसे करावे लागले असेल. माझा त्या क्षेत्रातील अभ्यास कमीच असल्यामुळे ती उणीव आहे असे मी म्हणू शकत नाही.

आपल्या लेखनात 'पाथर्डीचा राजा' या वगाचा उल्लेख आला. हिजडा आणि पाथर्डी याचा काय संबंध आहे असे कोडे आपणास पडल्याचे आपण म्हटले आहे. त्याची मला असलेली माहिती अशी : पांडवांना द्यूतामध्ये हरल्यानंतर वनवास पत्करावा लागला. त्यात एक वर्ष अज्ञातवास. अज्ञातवासात अर्जुन–म्हणजे पार्थ, याने स्त्रीचे रूप घेतले. या काळात त्या रूपामुळे दुःखित होऊन पार्थ जेथे रडला, ती जागा म्हणजे आजची पाथर्डी गाव. पार्थ + रडी = पाथर्डी असे. तेथील ठराविक विहिरीचे पाणी पित्यास माणूस हिजडा होतो अशी समजूत. सहज म्हणून सांगतो. त्यावर जादा संशोधनाची गरज नाही.

शिंदे सुनिल / अकोले

मी तसा आपणास आजच अन् प्रथमतःच सदरहू पत्र पाठवत आहे. पण मागील वर्षी मी आपले विचार, आपल्या भाषणातून अकोल्यातच गांधी चौकात ऐकण्याचे भाग्य घेतले. कित्येक दिवस झाले, आपल्या 'बलुतं' या पुस्तकाबद्दल खूप काही ऐकलं, आपलं भाषणही ऐकलं; परंतु प्रत्यक्षात प्रयत्न करूनही 'बलुतं' काही वाचावयास मिळेचना. अखेर आज म्हणजे (दि. ९ जानेवारीस) बलुतं मिळालं ! समाधान वाटलं ....वाचलं अन् अस्वस्थ वाटलं. किंबहुना बलुतं वाचल्यापासून मन सैरभैर झालं ते 'बलुतं'मधल्या 'दगडू'चं दुःख, वेदना, आर्त वेदनांतून बाहेर पडण्याचा व पिचलेल्यांना बाहेर आणण्याचा आवेश पाहून. मनात खूप काही प्रश्न 'बलुतं'तून 'दगडू'नं उभं केले. आपण जगलेले कडू-गोड (गोड अनुभव क्वचितच किंवा नाहीतच म्हटले तरी चालेल) अनुभव, वेदना, दुःखाच्या ज्वालातले 'दिव्य' पाहून ह्या व्यवस्थेविरुद्ध मन भटकणार नाही तरच नवल.

पण बलुतंतून आपण सांगितलेले, मांडलेले विचार, अनुभूती हे सारं सारं वाचून मनात प्रश्न उभा राहतो तो मुख्यत्वे असा : असे असंख्य, जिद्दी, धडपडे 'दगडू' निर्माण व्हायला हवेत. असंख्य हातभार लावणारे (प्रस्थापितांविरुद्ध ठाम उभे राहण्यासाठी व त्यासाठी निकराने प्रयत्न करणारे) केवळ दलितांतूनच नव्हे तर इतरांतून प्रभावी हात निर्माण व्हायला हवेत, ही जातीव्यवस्थेची कठोर अन् क्रूर भिंत फोडण्यासाठी.

कौतुक अन् समाधान वाटतं ते यासाठी की, आजुबाजूस लहानपणापासून मानसिक दुर्बलता निर्माण करणारी चातुर्वर्ण्याची चौकट, परंपरा, रुढीप्रिय समाज अन् त्यातून आपल्यासारखे पुत्र वादळातून उभे राहतात. तुमच्या मातोश्रीसारख्या खंबीर, ध्येयवादी माता पुढे खूप काही सांगून जातात. वेदनेला वाचा फोडण्यास मदत होण्यात हातभार लागतो.

आणि हे वाचून किंवा पाहून स्वस्थ बसण्याची ही वेळ नाही, तर त्यासाठी पावलं उचलणं निकडीचं आहे.

[विशेष, आज म्हणजे ९।१।१९८२ स जवळच समशेरपूरला डॉ. अनिल अवचट यांचं 'समता युवा संघटने'तर्फे व्याख्यान होतं. अन् आजच 'बलुत' हातात होतं. अवचट यांच्या व्याख्यानास जायची खूप इच्छा...पण 'बलुतं' हातातून सुटत नव्हतं, सोडवत नव्हतं. व्याख्यान महत्त्वाचं, पण तितकच 'बलुतं'ही अति महत्त्वाचं. 'बलुतं'च वाचलं. तिकडं व्याख्यान सुरू कदाचित, पण नाइलाज ! आपल्या प्रमाणेच (एका प्रसंगाने) मीही चुकून पण नाइलाजाने व्याख्यानास मुकलो. पुनः असं होणार नाही याची दक्षता घेणार.]

●

शांता परांजपे / ठाणे

आपल्याला आलेले जीवनातले लहानपणापासूनचे अनुभव आपण अगदी सहजतेने कोठल्याही प्रकारचा आडपडदा न ठेवता सांगितले आहेत. आपल्याला प्रत्येक गोष्टीची जाणीव कशी लहानपणापासूनच होत होती हे स्पष्टपणे दिसते. आपण लहान असताना, मागासजातीय विद्यार्थी असल्यामुळे आपली व आपल्या आईची कशी परवड झाली हे वाचताना डोळ्यात अश्रू उभे राहिल्याशिवाय राहात नाहीत. आपण 'कावाखान्याचे' (झोपडपट्टीचे) जे वर्णन केले आहे, तशाच प्रकारच्या झोपडपट्ट्या अजूनही प्रत्येक शहरात अस्तित्वात आहेत. त्याच्या परिसरात झोपडपट्ट्यांचे प्रमाणही तेवढेच वाढलेले आहे. आमच्या ब्लॉकसमोरही अशाच प्रकारच्या झोपडपट्ट्या आहेत. आम्हाला सकाळपासूनच त्यांचे वाङ्मय ऐकू येते. तेथे सट्टा खेळणे, गांजा विकणे, दारू पिणे, दारू पिऊन बायकोला मारझोड करणे, ह्या सर्व गोष्टी अजूनही आपण वर्णन केल्याप्रमाणेच चालू आहेत. आम्हाला ही सर्व दृश्ये व त्यांचे वाङ्मय ऐकावयास येते. हे सर्व पाहून मन विषण्ण व बेचैन होते. काय यांचे हे जीवन (संसार) कुत्र्या-मांजरासारखे! यांना 'कुटुंबनियोजन' नाही. भरपूर मुले असतात. खायची भ्रांत असते. सरकारचे इकडे लक्ष आहे का असे वाटते. हे सर्व पाहून फार वाईट वाटते. या झोपडपट्ट्या जोपर्यंत नाहीशा होत नाहीत तोपर्यंत या सर्व गोष्टी चालूच राहणार. अज्ञान व गरिबी ही आधी पूर्णपणे नाहीशी व्हावयास पाहिजे. नुसते 'गरिबी हटाव' म्हणून या गोष्टी होणार नाहीत.

आपण आता चांगल्या वस्तीत राहता, आपण सुशिक्षित आहात, तेव्हा आपण आपल्या मुलामुलींवर चांगले संस्कार करणार, त्यांना चांगले शिक्षण द्याल. पण आपल्या एकंदर मागासवर्गीय समाजाकरिता आपली काहीतरी योजना असेलच.

आमच्याच शाळेत एक झोपडपट्टीतला मुलगा, आमचा विद्यार्थी. आमच्याच शाळेतून उत्तम तऱ्हेने S. S. C. होऊन आता M.Sc. (first class) झाला व आमच्याच शाळेत आता ११ वी व १२ वीला उत्तम तऱ्हेने सायन्स व गणित शिकवीत आहे. त्याला बायकोही चांगली शिकलेली मिळाली (B. A.). त्याने तावडतोब झोपडपट्टी सोडली, पण त्याची आई आणि भावंडे अजूनही झोपडपट्टीत राहतात.

आपण आपल्या 'बलुतं' मध्ये आपल्या जीवनाचे धागेदोरे फारच सहजतेने उकलून दाखविले आहेत, ते मला फार आवडले. पण पुढे काय? हा प्रश्न आपल्याभोवती कायम रुंजी घालतोच आहे.

मी एक सामान्य वाचक आहे. मला जे काय आपल्या 'बलुतं' विषयी वाटले ते मनमोकळेपणे लिहिले आहे. आपल्याला T. V.वर पाहिल्यावर—आपले स्पष्ट व स्वच्छ शब्दोच्चार, प्रश्न विचारण्यातील सहजता, आत्मियता व सोज्वळता पाहून आपण नुसते जातीने B. C. आहात, पण प्रत्यक्षात उच्चवर्णीय आहात असे वाटते.

कुठे जन्म घेणे हे आपल्या हाती नसते, पण कर्तृत्व करणे, वागणे, बोलणे हे आपल्या हाती असते. एखादा उच्च कुळात जन्माला येऊनही त्याचे वागणे अगदी हीनपणाचे असते.

शिरीष गंधे / नासिक

अगदी सात आठ दिवसापूर्वीच 'बलुतं' वाचलं.

खूप अस्वस्थ झालो. एक तर आपलं जीवन असं काही व्यतित झालं असेल याची कल्पना पूर्वी नव्हती. परंतु महारवाड्याचा अनुभव मला होता. अगदी लहानपणापासून माझे मित्र यातले, बहुतेक ! आपल्याला आश्चर्य वाटेल; परंतु संगमनेरला आम्ही ज्ञानेश्वर मंदिरामागे राहात होतो. तिथून देवी गल्ली ओलांडली की, सारी यांचीच वस्ती. दूर कशाला, 'संगमनेरला गाजलेलं लग्न' असा उल्लेख 'बलुतं'मध्ये आलेला आहे. यातील हंसाचा मुलगा 'मनोहर' हा माझा लहानपणचा जवळचा मित्र त्याचे आजोबा पुष्कळदा घरी आलेले आठवतात. एकदा 'मनोहर'ला घेऊन संक्रातीला जेवायला आले. मी लहानच होतो. परंतु वडिलांचा आणि त्यांचा संवाद ऐकला. म्हणाले, 'मनोहरला गुळाच्या पोळ्या कशा असतात हे दाखविण्यासाठी मुद्दामहून आणलंय.' त्या वेळेस मला खूप वाईट वाटले. आज सारं आठवतंय. मनोहरचा करुण चेहरा आजही आठवला की मी अस्वस्थ होतो. खरं सांगतो, त्यावेळेस हा मुलगा असा जन्मला असेल याची काही सुद्धा कल्पना नव्हती 'बलुतं'मध्ये वाचलं आणि पुन्हा अस्वस्थ झालो. आज संगमनेर सोडून दोन वर्षे झालीत, मनोहर कुठे आहे याची कल्पना नाही. बहुधा शाळा त्याने अर्धवट सोडली असावी.

दुसरा किस्सा, डॉ. अनुराधा पोतदार यांचा. साहित्य परिषदेने काव्य-वाचनाचा कार्यक्रम ठेवला होता (अर्थात संगमनेर साहित्य परिषद). रावसाहेब कसबे यांचा आमचा खूप चांगला संबंध. मला स्वतःला त्यांनी 'राज्यशास्त्र' हा विषय शिकवला. कार्यक्रम संपल्यावर अनुराधा पोतदार आमच्याकडे जेवायला थांबणार होत्या. त्यांच्या बरोबर डॉ. चुनेकर वगैरे लोक त्यावेळेस येणार होते. आईला कसबे सरांनी गंमतीनं म्हटलं, 'मी जेवायला येणार'. आईनं आनंदाने 'हो' सांगितलं. कदाचित कसबे सरांना आमच्या घरातील वातावरणाची कल्पना नसावी. आईनं त्यांनाही आग्रहाने जेवायला बसविलं. का कोण जाणे आमच्या घरात — जातीपाती वगैरेचा वास कधीही आला नाही. त्याचाच परिणाम म्हणून आमच्या घरात भंगी, मुसलमान वगैरे लोक अनेकदा येत, जेवत. आम्हाला त्यांचा कधीही विटाळ झाला नाही. संगमनेरचे गुरांचे दवाखान्यात कंपाउन्डर म्हणून काम करीत असलेले दारोळे किंवा तिथलेच एक शाहीर दारोळे किंवा सखाराम वस्ताद (दारोळे) ज्यांना 'दादा' या नावाने ओळखतात .... किती म्हणून सांगू...हे सर्व लोक आमच्या घरी येत. वडिलांचा आणि त्यांचा अकृतिम असा संबंध होता.

हे सारं लिहितोय याचं कारण 'बलुतं'मधील वातावरण आणि हे वातावरण यात एक नातं आहे. खूपदा महारवाड्यात गेलेलो. परंतु तिथलं वातावरण गढूळ, अपवित्र वगैरे कधीच वाटलं नाही.

संगमनेर सोडल्यानंतर मात्र हे मित्र दुरावले. काही जण नोकरीनिमित्त पांगलेले.

क्वचित गाठ झाली तर त्यांना आणि मला सारखाच आनंद होतो.

संगमनेर साहित्य परिषदेने आपला कार्यक्रम ठेवला. ह्या वेळेस अण्णा तुमच्या समोरच बसलेले. (वडिलांना मी अण्णा नावाने हाक मारतो) आणि तुम्ही जेव्हा सुरुवात केली त्या वेळेस मीही समोरच बसलेलो होतो. खरं सांगू, तुमच्या पहिल्याच वाक्यानं मी गार झालो. 'ज्यांनी मला मराठी कविता शिकवली....' आपण सुरुवात केली. मला वाटतं तुमच्या कवितापेक्षा एका शिक्षकाबद्दलच्या या अत्यंत विनम्र भावामुळे तुम्ही माझ्यासारख्या अनेकांची मनं जिंकलीत.

अर्थात् तुमच्या कवितांबद्दल बोलायचं तर सच्ची अनुभूती जिथं जिवंतपणे वावरते तिथं साहित्याला कृत्रिमतेचा वास येणार कुठून ? आपला 'कोंडवाडा' फार काळजीपूर्वक वाचला आहे पुन्हा पुन्हा अस्वस्थ झालो आहे. आपल्याला भेटण्याची तीव्र इच्छा आहे. लवकरच योग येवो ही योगेश्वरचरणी इच्छा ! आपल्या कुटुंबियांना प्रेमपूर्वक नमस्कार. तूर्तास एवढेच म्हणतो.

●

ज्ञानदेव सिद्राम लाटणे / सांगली

आजवर मी अनेक कादंबऱ्या, थोरामोठ्यांची चरित्रे, कथा वाचल्या. पण हृदय आक्रंदून आतल्या आत आजच हुंदके देतोय. त्याचं कारण म्हणजे आपलं बलुतं. वास्तविक हे माझ्यासारख्याने आपणास सांगणे म्हणजे आपल्याला काहीतरीच वाटेल.

पुस्तक वाचताना सर्वात भारावला गेलो ते दगडू मारुती पवाराच्या आईच्या दुःखाने. कर्णाच्याभोवती जशी अभेद्य कवचकुंडले होती, तशी या माऊलीच्या अंगावर दुःखाची कवचं होती. त्यातून त्यातील सुखाला सरळ आत जाता आले नाही. अंतःकरणाचा झरा केवळ दगडूसच दिसला. इतरांना तो कधीच दिसला नाही.

केवळ संशयपिशाच्यामुळे आयुष्याच्या हिरवळीचे, ऐन तारुण्यात वैराण वाळवंट झाले, ते म्हणजे सईच्या आयुष्याचे ! अक्षरशः तिने दुसरा घरोबा केल्याचे वाचले तेव्हा माझे डोळे डबडबले. मी फार नाराज झालो. अशी दुःखं हाडवैऱ्यालासुद्धा येऊ नयेत. या प्रसंगी एक कविता स्मरते.

चंदनाच्या खोडातुनि, गंध कधी जाऊ नये,
दोन जीवांची ताटातूट, उभ्या जन्मी होऊ नये ॥

या दोन पात्रांनी माझ्या डोक्यात घर केलं आहे, मी ते कधीही मोडणार नाही. केवळ या दोन पात्रांनीच आपली कसलीही ओळखदेख नसताना आपणासारख्या प्रतिष्ठित साहित्यिकाला पत्र लिहावयास भाग पाडले आहे. असो.

मला खात्री आहे की, दगडू मारुती पवार ही व्यक्ती आपणच आहात व हे जर शंभर टक्के खरे असेल तर स्वामी विवेकानंद, शिवाजी यांच्यासारखी आपली प्रतिमा काही दिवसांनी निश्चितच अभिमानाने वंदनास्पद होईल यात संदेह नाही.

●

सि पां. पाटील / जळगाव

'बलुतं'मधील वास्तववादावरील जीवन खरोखरच खूप शिकवून जाते आजचे ढोंगी पुरोगामी काही म्हणोत, आपले लिखाण भारतीय समाजव्यवस्थेचं दर्शन घडवतं यात शंका नाही. यापूर्वी 'उपरा' वाचली; पण आपल्या लेखनात समाजव्यवस्थेचं व्यक्तिदर्शन जे घडतं त्याला तोड नाही.

दुसरे वाईट याचे वाटते की आपण दलित लेखक आहात, पुरोगामी विचारांचे आहात, पण स्त्री-मुक्तिबाबत मात्र फारच मागास आहात. सईबाई आपली पत्नी. आपण संशयासारख्या—अधम, नीच—कारणांचा आश्रय घेवून, तिच्याशी काडीमोड केला. हे मनाला वेदनादायक आहे. जीव तोडून प्रेम करणारी सई आज हलाखीचे जीवन जगत आहे. म्हातारा नवरा तिला सांभाळत आहे. शेवटी प्रेमाबद्दल ज्या अनेक व्याख्या आहेत, त्या काय समजाव्यात? आपणच याला सर्वस्वी कारणीभूत आहात. याचे मागे संशय ही जरी कारणमीमांसा असली तरी आपण 'भटाळलेल्या दलिता'प्रमाणेच वागलात. वाण्या-ब्राह्मणासारखी बायको असावी असे आपले मन सांगत होतं आपण सुशिक्षित आहात, त्यामुळे आपल्याच समाजाच्या अशिक्षित बाईस आपण मात्र सांभाळू शकला नाहीत. यात आपली पांढरपेशी अस्मिता दडलेली दिसते. अत्यंत वेदना देणारी दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या प्रेमाची पहिली निशाणी व आपला जीव की प्राण अशा आपल्या मुलीचे-बकुळेचे-काय झाले ते आपण लिहिले नाही! बिचारी खरंच मुरळी झाली काय? आपल्या नवीन पत्नीबाबत आपल्या आत्मकथनात आपण का लिहिले नाही? यात सौ.चा सेन्सॉर तर नाही ना? सईचा वापर आपण लिखाणात मनसोक्त केलंय! त्याप्रमाणे आजच्या आपल्या सौ.चा उल्लेख का नाही? कृपया बकुळा व सईबाबत कळवावे म्हणजे त्याबद्दलच्या वेदना कमी होतील.

❸

जीवन कुलकर्णी / मुंबई

तुमच्या 'बलुतं' या कादंबरीची खूपच स्तुती मी ऐकत आहे. मी मात्र चिकित्सक, इतिहास संशोधनाच्या, म्हणजेच सत्यशोधक वृत्तीने विचार करतो. तुम्ही महार. त्या परिस्थितीचे भडक वर्णन सांगितले आहे. त्यात जाणूनबुजून वेधडकपणे खोटेच खरडले गेले आहे असे मला साधार वाटते. अर्थात हे मी माझे विधान क्षमेसह मागे घेईन, जर तुम्ही प्रामाणिकपणे दोन प्रश्नांची उत्तरे दिलीत तर—

(१) तुम्ही जे तथाकथित मागासवर्गीय दलितांचे भीषण चित्र रंगवले आहे ते कोठल्या आधारावर? पेशवाई सन १८१८ ला बुडाली. तोपर्यंतचे पेशवे नि इंग्रज दप्तर भरपूर उपलब्ध आहे. ज्यात समाजाचे चित्रणही आहे. त्यात हा भीषण प्रकार दिसत नाही. (२) दलितांच्या गळ्यात मडकी बांधली (पेशवाईत). त्याला पण सन १८१८ पर्यंतच्या कुठल्या कागदपत्रांचा आधार आहे? मी पण समाजजीवनाच्या इतिहासाचे संशोधन करतो, त्यात मला तर तसे काहीच आढळलेले नाही.

उल्हास गुप्ते / मुंबई

मी खलास झालो. खूप दिवसात नव्हे, खूप वर्षांनी एक सुंदर पुस्तक वाचलं. तुझ्या आयुष्यातल्या व्यथांचं, तुझ्या शब्दातलं सुंदर वर्णन वाचताना खूप हळवं होतं रे मन! खरं सांगू? आतापर्यंत 'दलित' या शब्दाचा उगाच बाऊ केल्यासारखा वाटायचा; पण तुझ्या वाट्याला आलेलं दुःख प्रचंड आहे रे! अरे, आमच्यासारखा माणूस 'दलित' म्हणून जगूसुद्धा शकला नसता. आयुष्यातल्या बऱ्याच खाजगी गोष्टी सच्चाईनं लिहिण्याचा प्रयत्न केलास, लिहिताना तुझ्या व्यथा तूच जाणो.

नम्रपणे सुरवातीलाच लिहिलेस मी फक्त भारवाहक. दुःख पचविणारा माणूस जेव्हा स्वतःकडे दूर दृष्टीने पाहू लागतो ना, तेव्हा तो खऱ्या अर्थानं माणसात येतो.

●

मा. ल. दादिलवार / नागपूर

दिनांक ७ सप्टेंबर १९८० च्या 'महाराष्ट्र टाइम्स' अंकात श्री. श्रीराम शिधये यांनी घेतलेली आपली मुलाखत, जी प्रसिद्ध करण्यात आली, ती वाचण्यात आली. आनंद वाटला. कुतूहल जागृत झाले 'बलुतं' केव्हा वाचतो असे वाटायला लागले. पुस्तक मिळविण्यात यशस्वी झालो. सारे वाचून काढले.

जीवनात जे घडले, अनुभवले, त्याचं शब्दांकन करून आपण ते आमच्यासारख्या जनसामान्यांपर्यंत पोहोचविल्याबद्दल आपले अभिनंदन!

त्या काळात गावकुसाबाहेर राहाणाऱ्यांची वैचारिक दृष्टीने जरी एक संघ म्हणून गणना नव्हती, तरी जमाव ही संज्ञा होती. परंतु गावकुसाआत राहणाऱ्या, सध्याच्या सरकारी व्याख्येप्रमाणे 'इतर मागासलेल्या जाती' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या समाज-घटकातील व्यक्तींचा, त्यांच्या एक-एकट्या घरामुळे इकडे आड तिकडे विहीर अशी अवस्था होती आणि आजही आहे. आमच्यासारख्या इतर मागासवर्गीय म्हणून समजल्या जाणाऱ्या समाजात आज सुद्धा 'जात' लपविण्याची चढाओढ सुरू आहे. ते विसरतात की त्यांचे आईवडील अंगठाबहाद्दर होते आणि शिकल्यामुळे, नोकरी मिळाल्यामुळे स्थिरता आली. शिक्षणामुळे बुद्धीचा आवाका विशाल होण्याऐवजी कोता झाला. समाज घटकांशी फटकून वागण्याची प्रवृत्ती वाढली. 'मी शिकलो. माझेही ह्या समाजाविषयी काही देणे लागते' ही भावनाच हवेत विरून गेली. ज्या जातीत तो जन्मला ही जात त्याला त्याच्या मरणापर्यंत आणि त्यांच्या मुलाबाळांनासुद्धा पुरून उरणार आहे. हा भारतीय समाजव्यवस्थेतला दुर्गुण अजूनही जात नाहीत. माहीत असूनही त्याबद्दलची त्याची तटस्थता आणि लपवाछपवी हे पाहिल्यानंतर खरोखर वाईट वाटते. मागे श्री. राम नगरकरांनी 'रामनगरी' पुस्तक लिहिले म्हणून आमच्या समाजातील शिक्षितांना काय वाईट वाटले! अशी ही त्यांची विचार करण्याची क्षमता. या सर्व गोष्टींचा विचार करता आपलं पुस्तक सर्वांना विचारप्रवण बनवो ही इच्छा! आणि याच अनुषंगाने आपले किती म्हणून अभिनंदन करावे! शब्द अपुरे पडतात.

दिलीप देशमुख / पुणे

पुस्तक मिळालं अन् आधाशासारखं एका दमात वाचून काढलं. वाचताना काळीज करपत होतं आणि शरीरावर कुणीतरी सारख्या डागण्या देत आहे असा भास होत होता. जीवनाचं एवढं यथार्थ दर्शन घडवणारं पुस्तक मी तरी पाहिलेलं नव्हतं अन वाचलेलंही नव्हतं.

टिळक स्मारक मंदिरात प्रवेश करीपर्यंत व आपल्याला पाहीपर्यंत श्री. दया पवार दिसायला कसे असतील, बोलणं कसं असेल, वागत कसं असतील — नाना विचारांनी मनात गर्दी केलेली होती. खोली सोडताना आपल्याबरोबर कमीत कमी अर्धा तास बोलावे असं ठरवून आलो होतो. परंतु प्रत्यक्षात तशी संधी मिळाली नाही, त्यामुळे थोडा हिरमुसलोही. परंतु आपल्याला पाहिल्यावर सगळं बलुतंच डोळ्यात जमा झालं. त्यामुळं जे ठरवून आलो होतो ते पार विसरून गेलो.

शिंदे आर. व्ही. / सोलापूर

आपलं 'बलुतं' हे आत्मकथन वाचलं. दलितांची कुचंबणा व ससेहोलपट बोलक्या रीतीनं स्पष्ट झाली आहे. काही अनुभव मराठीत प्रथमच व्यक्त झाले असावेत, असेही वाटते. धन्यवाद !

पुस्तक वाचून काही विचार मनात आले, ते सांगणे हा आणखी एक उद्देश.

(१) जमना भावशीला किंवा महारोगी मित्राला इच्छा असूनही साह्य करता येत नाही, हे दुःख केवळ दलितांचेच नाही; असले आत्मग्लानी आणणारे अनुभव सर्वच जातीतील लोकांना येतात. हा सामाजिक रोग आहे. त्याचे कारण उस्कटलेली (वाईट असली तरी काही प्रमाणात गाव बांधणारी) जुनी अर्थ-रचना.

(२) आपल्या शिक्षणाने आपल्याला दुर्बल केले नाही, फक्त अधिक बलवान केले नाही. आपले शिक्षण शिक्षकांकरवी, आपल्या सारख्याच शिक्षकांकरवी झाले त्यातील फार थोडे खऱ्या अर्थाने 'आचार्य' म्हणता येतील असे असतात. म्हणजे असे की, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, प्रामाणिक कष्ट आदि मूल्ये आचरणाद्वारे आपल्याला शिकता येत नसावीत. उदाहरण सांगतो. येथील सुभाष चौकात बॅरिस्टर बापूसाहेब कांबळे ह्यांची सभा ८–३० ते १२ वाजेपर्यंत रात्री चालली. ११ वाजता बिड्याची पाने घेऊन येणाऱ्या गृहिणींनाही, वाहनाप्रमाणेच तेथे असलेल्या भीमसेनेने वाटा बंद केल्या होत्या ! दलितांवरील अन्यायाच्या निषेधाची सभा ! — आता असे होते ते दुष्टपणा म्हणून नाही. 'न्याय' ह्या मूल्याला व्यवहारातील स्व-लाभापलीकडे काही अस्तित्व आहे, ही वैचारिक निष्ठाच आपली दृढ बनत नाही.

गांधी, विनोबा, दादा धर्माधिकारी, जयप्रकाश, लोहिया ह्यांच्या लिखाणांतून अशी थोडीफार शक्ती मिळत असावी, असे वाटते. पण हे सारे व्यक्तिगत पातळीवर ! बाबासाहेब आंबेडकरांचे लिखाण मुळातून कमी वाचायला मिळाले असल्याने तुमच्याशी त्याबद्दल बोलता येत नाही, ही एक उणीव आहे. ती दूर करीन.

(३) पृष्ठ १७१ : सोलापूरच्या कलेक्टर कचेरीचा तावा. कलेक्टरच्या बंगल्यावर झोपणे हे मी सोलापूरकर असून मला नवीन वाटते ! विश्वास बसत नाही

(४) सईवर अन्याय झाला असे वाटते.

(५) ' अलबेला ' सिनेमानंतर जाधवचं लग्न झालं असेल तर, ' पायाच्या दासी '-तील विस्मृतीत बुडालेल्याला गाण्याचे विडंबन कसे कळावे आणि रुचावे ?

शेवटी वाटते की हे अनुभव तुम्ही आणखी काही वर्षांनी लिहिले असते तर ते अधिक वजनदार, खोल वाटले असते ! असो.

●

तु. द. कुलकर्णी / कोल्हापूर

' केसरी 'चे विभागीय कार्याध्यक्ष श्री. वासुदेवराव कुलकर्णी यांनी २-३ दिवसापूर्वी ' हे वाचा – तुम्हाला आवडेल ' म्हणून ' बलुतं ' हातात दिलं.

तुमच्या लेखणीची ताकद मानतो. स्वतःबद्दल स्वच्छ, प्रांजल निवेदन आजवरच्या वाचनात आढळले नाही. पुस्तक वाचायला घेतल्यापासून वाचून संपेपर्यंत एका निराळ्या विश्वात माणूस जगत राहतो. वाचताना वाचकच जणू दया पवार (पोवार का नाही ?) होतो व त्या सर्व अवस्थेमधून जातो. ' महार ' म्हणून तुम्ही जे भोगलंत त्यात जातीयतेमुळे किती व दारिद्र्यामुळे किती ? मला वाटतं (!) की दारिद्र्य रेषेखाली राहाणाऱ्या सर्वच माणसांना या अथवा अशा प्रकारच्या खडतर जीवनाला सामोरे जावे लागते !

कोणत्या जातीत जन्माला यावं, कोणत्या देशात, धर्मात, आर्थिक परिस्थितीत जन्माला यावं हे आपल्या हाती थोडंच असतं.

मी कुलकर्णी ब्राह्मण. पण आता व्यवसायाने ' घिसाडी ' फौंड्रीमन. आमचे कणबरकर जन्माने मराठा पण व्यवसायानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू, म्हणजे ब्राह्मण झाले. केशव मेश्राम ज्ञानदान करतात, शिकवतात म्हणजे ब्राह्मणच नव्हे काय ? आमदार व्हटकरांचा मुलगा M. A. with Sanskrit व प्रोफेसर, म्हणजे माझ्या मते ब्राह्मणच. देव न मानणाऱ्या गौतम बुद्धालाच देव केला, त्यातला हा प्रकार नाही बरं का.

तर मी काय म्हणतो, नियतीनं जे दान आपल्याला टाकलं, त्यावर मात करून काही विशेष करून दाखवलं की माणसं त्याचं कौतुक करतात व करावंही.

मी आपण दिलेल्या ' आनंदा 'बद्दल तुम्हाला धन्यवाद देतो. कारण पुस्तकानं जीवन-संघर्ष—स्वतःचा—विसरायला झाला. ' महार ' म्हणून तुम्ही जे सोसलंत त्याबद्दल दुःख होतं, नव्हे माझं स्वतःचं मन थोडं अपराधी असल्याबद्दल खंतही वाटते प्रा. वाघमारे यांनी ज्या हळुवारपणे निग्रोंच्या दुःखाची कल्पना तिथल्या वाङ्मयाच्या आधारे मराठी माणसाला दिली, त्याप्रमाणे इथल्यांची दुःखं आपण दाखवून दिलीत, त्याबद्दल धन्यवाद !

●

शिरीष पटवर्धन / पुणे

आपले 'बलुतं' मोठ्या चवीने चाखले. मात्र वेळोवेळी कडूपणा, आंबटपणा, क्वचितच गोडी जाणवली. आपले आत्मचरित्र म्हणजे 'नागड्या सत्याचा' परिपाकच म्हणायचा ! आत्मचरित्रे म्हटली की साधारणपणे स्वतःची छाती बडवणे हा प्रकार बहुत जाणवतो. परंतू आपल्या आत्मचरित्रात मात्र एका दगडूच्या विचित्र जीवनाचे दर्शन घडले. हे जरी असले तरी काही गोष्टी मात्र खटकल्या. अर्थात माझ्यासारख्या अननुभवी तरुणास जाणवत असतील; परंतु जाणवल्या म्हणून नमूद करतो, राग नसावा.

पुस्तक वाचताना बरेच ठिकाणी असा विस्कळीतपणा आढळून आला. एका ठिकाणी आपण S. S. C. च्या जीवनाविषयी बोलता, तर पुढच्या प्रकरणात एकदम फायनलचे प्रकरण पुढे येते. अर्थात आठवून लिहिल्यामुळे असा आगे-मागे प्रकार झाला असेल.

काही अनावश्यक (मला वाटलेला) संदर्भ :

(१) मास्तरांच्या पडवीतील प्रतापासंबंधी लिहिताना, एकदम पुढच्या परिच्छेदात 'एक मराठ्याची मुलगी प्रथम विटाळशी बसली' त्याचा संदर्भ आला आहे. माझ्या मते तो वगळला असता तर ठीक झाले असते.

(२) बोर्डिंगमध्ये, आपल्या शेजारी झोपणारा मुलगा आपल्या इंद्रियांशी चाळे करतो आहे आणि त्या दिवशी माझी चड्डी भिजली...वगैरे वगैरे. अशा प्रकारचे संदर्भ वाचताना मात्र शंका येते की 'एक दुःखाने गद्‌गद्‌लेल्या झाडा'चे हे चरित्र आहे, की नाही ते चाळे अनुभविलेल्याचे चरित्र आहे ?

दया, Sorry ! श्री. दया पवार, एका वादग्रस्त मुद्द्यासंबंधी माझे (मूर्ख ?) विचार मांडतो : आपली प्रतिक्रिया जरूर जरूर कळवा.

सईला संशयास्पद अवस्थेत आपण माहेरी पोहोचते केलेत आणि शेवटी तिला ज्या अवस्थेत आपण पाहिलेत, तेव्हा आपणास जाणवले की तिच्या जीवनास (आजच्या) मीच जबाबदार आहे. मग मला असा प्रश्न पडतो की दगडू पवार हाही अनेक ठिकाणी नेभळट वागला. बोलून मोकळे होण्याची त्याची हिंमतही झाली नाही, तसेच सई आणि अहमदचे झाले असेल. कदाचित त्यांचे 'भाई-बहेन' नाते असेलही. आपल्या नवीन पतीराजास आपले हे नाते कदाचित पटणार नाही, ह्याच भीतीने सई बोलली नसेल. आणि म्हणून आपण तिला माहेरी पोहोचती केलीत पुन्हा वर T. B. (स्वतःला) झाल्याची थाप. नंतरही एकदा सई आपणाकडे आली. पण साडी-चोळी देण्याचे पुण्य पदरी पाडून आपण तिला पुन्हा माहेरी पोहोचविलीत; नव्हे ढकललीत. जर तिचे आणि त्या मुस्लीम तरुणाचे खरंच 'लफडे' असते तर ती पुन्हा आपणाकडे आली असती का ? याचाच अर्थ तिचा आपल्यावर खरोखरीच जीव होता. तिच्यावर आपला संशय आहे हे ठीक आहे; पण आपल्यापासून झालेल्या 'बकुळे'ला का नाही बरे आपण आपल्या office मधील सहकाऱ्यांचा किस्सा सांगितलात, की मुलांसाठी तो कोर्टात भांडला. असो. मला तरी असे वाटते की तिच्या आजच्या स्थितीला खरंच जर तुम्ही

स्वतःला जबाबदार धरत असाल; तर आपण तिचा पत्ता काढावा व तिचा सांभाळ करावा. किमानपक्षी आपल्या मुलीचा तरी !

●

जयंत पारुंडेकर / मुंबई

तसा मी पत्रलेखनाबाबत तितकासा जागरूक नाही. पण अक्षरशः न राहवल्यामुळे 'बलुतं' लिहिणाऱ्या मनाशी संवाद साधता आल्यास पाहावा म्हणून ही खटपट, खटाटोप. खरं सांगतो मराठीतील एक अफलातून, अनन्यसाधारण असं मी वाचलेलं दलित जीवनावरचं एक अप्रतिम असं आत्मचरित्र आहे.

गेले कित्येक दिवस असं झपाटून टाकणारं पुस्तक वाचलं नव्हतं. आपल्या पुस्तकानं मला अक्षरशः झपाटून टाकलं. पहिल्यापासून अखेरच्या पानापर्यंत आपल्या लेखनाची वाचनीयता जरादेखील ढळली नाही. यशस्वी आत्मचरित्राची ही एक फार मोठी जमेची बाजू आहे यात शंका नाही.

आपल्या पुस्तकाच्या वाचनाने जीवनाला एक नवी जाण आली. ज्याची कल्पनाही करता येणार नाही, खरंच बिलकूल कल्पना करता येणार नाही, असंदेखील एक आयुष्य असतं—आणि असं आयुष्यदेखील माणसं जगतात—असं जिणंदेखील काहीही तक्रार न करता जगतात ! यासंबंधी एक सुजाण विचार मनात येऊन गेला.

तुम्हाला एकदा प्रत्यक्ष भेटावं-बोलावं अशी इच्छा आहे. कधी भेटाल ?

कॉलेजमध्ये आत्मचरित्रं शिकविलेली आहेत. आत्मचरित्र कसं असावं, कसं नसावं, यासंबंधी साधकबाधक विचार आपण सार्वजनिक जीवनात नेहमीच करीत असतो.

तुमचं आत्मचरित्र हे खऱ्या अर्थानं मराठीतलं एक 'खुल्लमखुल्ला' आत्मचरित्र आहे यात शंका नाही. तुमच्या लिखाणात काही 'कोऱ्या जागा' नसतीलच किंवा नाहीत असं काही म्हणता येणार नाही. पण तरीही तुमची कहाणी ही एक खुल्लमखुल्ला कहाणी आहे. जे सांगावं ते, नि सांगू नये ते देखील विनधास्तपणे पण संयमितपणे तुम्ही सांगितलं आहे.

आणखी एक गोष्ट. काही दिवसापूर्वी श्री. म. माटे यांनी एक लेख लिहिला होता, भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी. त्या लेखात त्यांनी असा विचार मांडला होता की महार, चांभार, मांग, भंगी इ. जाती-जमातींतील लोकांनी त्यांच्या बोलीभाषेत लेखन केले तर भाषा अधिक जिवंत होईल. 'रामनगरी', 'बलुतं' ही पुस्तकं माट्यांनी वाचली असती तर माट्यांना आज खचित अत्यानंद झाला असता. बोलीभाषेचा जिवंतपणा म्हणजे याचा प्रत्यय तुमच्या ब्राह्मणळलेल्या मराठीतूनदेखील आल्यावाचून राहात नाही.

●

शिवाजी गोळे / ठाणे

आपल्या भारत भूमीत जातपात इत्यादीमुळे भारत देशाचा विकास खुंटला आहे. याला जबाबदार अंधश्रद्धा व राजकीय पक्षांचे पुढारी आहेत. पुढारी लोकच जातपाती वाढविण्यास मदत करतात. यासाठी सर्वांनीच एकत्रिपणे जनजागृतीचे काम केले पाहिजे. तरच आपणा सर्वांना सुखासमाधानाने जगता येईल. यासाठी जातीचा विचार न करता आपला भारत देश सुखी समृद्धी होईल, असे प्रयत्न केले पाहिजेत.

मी हिंदू मराठा तरुण आहे. पण दलित समाजावर होणाऱ्या अन्यायाबद्दल कळकळ आहे. यामुळेच माझे मन कासाविस होते. आपण सर्व एकाच देवाची लेकरे, मग असा दुजाभाव का ? यासाठी प्रत्येक समाजातील व्यक्तीनी पुढे येऊन झटले पाहिजे. माझा जातपातीवर अजिबात विश्वास नाही. मी तर पृथ्वीवरील सर्व लोक एकाच कुटुंबातली समजतो. मग तो कोणत्याही धर्माचा असो किंवा कोणत्याही जातीचा असो. माझा वर्गमित्र (ज्ञानदेव तुपे) दलित समाजातील आहे. मी त्याच्या घरी जाऊन जेवतो व त्याला माझ्या घरी आणून जेवावयास घालतो मी कधी दिवाळीस गावी गेलो तर पहिल्यांदा दिवाळीसाठी केलेल्या खाण्याच्या वस्तू त्याच्या घरी नेऊन देतो, नंतर मी खातो. या गोष्टीस माझी आई कधीही तक्रार करीत नसे. आम्ही दोघे जेव्हा दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेसाठी गेलो होतो, त्यावेळी दोघांचे जेवण एकत्र करून जेवत असू. माझ्या नातेवाईकातील काही लोक विचारतात की तू त्याच्याकडे का जेवतोस, का चहा पितोस ? त्यावेळी त्यांना सांगतो की, ' ते लोक माणसेच आहेत. त्यांना मन नाही का ? मला जे पटते ते करतो. तुम्हाला करायचे नसेल तर करू नका; पण मला का अडथळा निर्माण करता ? ' यामुळे नातेवाईक गप्प राहतात. आता पत्र पूर्ण करतो. आपण पत्राचे उत्तर जरूर देणे.

•

वि. चिं. फडके / ठाणे

आपलं ' बलुतं ' नुकतचं वाचलं. वाचकाला एका जागी खिळवून ठेवण्याचं आणि झपाटून टाकण्याचं विलक्षण सामर्थ्य त्यात आहे. आपली भाषा साधी, सरळ व निवेदनशैली थेट हृदयाला जाऊन भिडणारी आहे. बलुत्याला साहित्यिक मूल्य आहेच. परंतु त्यापेक्षाही त्यातील सामाजिक आशय अतिशय अस्वस्थ करणारा आहे. ज्यांच्या सामाजिक जाणिवा बोथट झालेल्या नाहीत, त्यांच्या हृदयाला घरे पाडण्याची शक्ती आपल्या पुस्तकात आहे.

पु. लं.सारख्या श्रेष्ठ सारस्वताने महाराष्ट्र टाइम्ससारख्या दर्जेदार वृत्तपत्रात त्याची मुक्तकंठाने प्रशंसा करावी, यावरून आपल्या जीवनानुभवातून संपन्न झालेल्या कलाकृतीची उंची, चोखंदळ व सहृदय वाचकांच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. असो.

लवकरच नव्या वर्षाला सुरुवात होत आहे. बलुत्याच्या गुढीला अनेक यशस्वी पताका लागोत हीच शुभेच्छा.

जयंत स. राईलकर / मुंबई

बलुतं मधील अनुभव अत्यंत वास्तव आहेत. त्यामुळे ते ताजेतवाने, कुरकुरीत व रसरशीत वाटतात. परंतु वास्तवामध्ये फुलांच्या गंधाबरोबर मानवी दुर्गंध बेमालूम मिसळलेला असतोच. खऱ्या वास्तवात असे मिश्रण आढळणे अर्थात स्वाभाविक आहे. हे सर्व अनुभवांचे लेणे आपण सहजसुलभपणे साकारीत असता एकदोन गोष्टी मात्र किंचित खटकल्या. अलिकडे तथाकथित वास्तववादी लेखक, श्लील-अश्लील अथवा प्रसन्न-अप्रसन्नतेचे धरबंध जाणीवपूर्वक टाळण्याचा प्रयत्न करतात. त्यातूनच केवळ वास्तवता उभारली जाते असा भास ते निर्माण करतात. उदा. विष्ठा अगर संभोगक्रिया इत्यादींचे उल्लेख व स्तोम. आपल्या कथानकात असल्या बाजारू वास्तवतेला अर्थातच स्थान नाही. तरीही एक-दोन प्रसंगी अशा प्रकारचा मोह आपल्यालाही अनावर झाला की काय अशी शंका येते. उदाहरणार्थ, जिल्ह्याच्या शाळेत दगडू शिकत असताना आलेला 'एकसष्ट-बासष्ट'चा उल्लेख; अथवा पिवळ्या वेष्टनातील पुस्तकांचा संदर्भ. हे कदाचित टाळता आलं असतं असं मला वाटतं. दुसरी गोष्ट म्हणजे, मी येथे जरी उदाहरणे नमूद करीत नसलो तरीही, काही इंग्रजी शब्दांचा वापर पुस्तकामध्ये केला आहे, तो अनावश्यक वाटतो. अखेर, संपूर्ण पुस्तक वाचून झाल्यावरही काहीतरी अजून शिल्लक आहे अशी रुखरुख लागते, काहीसा अपुरेपणा जाणवतो. याचा संपूर्ण वेध मला आलेला नाही; परंतु कदाचित आपण सुरुवातीपासूनच केलेल्या 'सुशिक्षित पत्नीचा' उल्लेख अर्धवट सोडल्यासारखा वाटतो. हे एक कारण असू शकेल.

असो एकूण आपल्या ग्रंथामुळे मराठी साहित्य भांडारात अत्यंत मोलाची भर पडली आहे. माझ्या माहितीप्रमाणे आपले पहिले-वहिलेच गद्य साहित्य इतके थोर ठरावे, ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे! खऱ्याखुऱ्या प्रसन्न व प्रगल्भ साहित्याद्वारे आपण केवळ मराठी साहित्याचीच नव्हे तर मानवतेची सेवा आपल्या पुस्तकाद्वारा केलेली आहे.

●

प्रभाकर / नागपूर

आपल्या पुस्तकावरचा परिचय-लेख वाचल्यावर 'बलुतं' पुस्तक वाचायची उत्सुकता होती. आज ते एका मित्राकडून मिळालं मी अधाश्यासारखं वाचून काढलं.

पुस्तकातला तुमचा प्रामाणिकपणा आवडला व तुमच्या वाट्याला आलेले दुःखानुभव वाचून फार दुःखी झालो.

बोर्डिंगमधल्या तुमच्या आईवर गुदरलेला प्रसंग हृदय पिळवटणारा वाटला.

मी हिंदू आहे. माझ्या धर्माचा मला अभिमानही आहे. जातीवर मुळीच विश्वास नाही. माणुसकीचा गहिवर असावा म्हणून तर शंकर ढोके नामक नवबौद्ध तरुण माझ्या घरात कुटुंबियापैकीच आहे.

●

मधुभाई पंडीत / मुंबई

'बलुतं'ने तुमची खास ओळख करून दिली एवढेच नव्हे, तर गेली तीन वर्षे माझ्या गावातील दलितांबरोबर मी वावरत आहे; पण तरी त्या वाङ्मयाचे मानस 'बलुतं'मुळे मी आता अधिक जवळीक मनाने समजू शकेन.

बुधवारनंतर मी घरीच असेन. वेळ काढून याल तर आनंद होईल. जिवाभावाचं थोडंफार बोलता येईल.

●

मधु चौधरी / पुणे

मी खुद्द अहमदनगरचा आहे. माझे वडलांनी ३०-३१ साली अकोले तालुक्यात जंगल सत्याग्रहात सक्रीय भाग घेतला होता व त्यांना त्यावेळी तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. असो. आपले 'बलुतं' या पुस्तकात कोणत्याही प्रकारे अकोले तालुक्यातील जंगल सत्याग्रह अगर सावकारांच्या विरुद्ध मोहिमेचा काहीच उल्लेख नाही. तो आणता आला असता का.?

मात्र आपण नगर जिल्ह्याचे राजकीय, सामाजिक चित्र अगदी बरोबर रेखाटलेले आहे. त्यावेळी जुने कम्युनिस्ट पुढारी कॉ. डीबीके, लालजी कुळकर्णी अगर तत्सम लोकांचा उल्लेख नाही. कदाचित जागेच्या अभावी विस्तार करणे शक्य झाले नसेल. शिवाय आपण जो भाग पुस्तकात घेतलेला आहे, तो अलिकडचा म्हणजे सुमारे १९४० नंतरचा असावा. कारण त्यात गोदीतील स्फोटाचा उल्लेख आहे.

मुंबईतील दलितांचे जीवन आपण खरोखरच स्पष्ट व संपूर्ण रेखाटलेले आहे. त्याबद्दल खरोखरच धन्यवाद! पुष्कळ पांढरपेशा मध्यमवर्गीयांना याची कल्पना येत नाही. ब्राह्मणवर्गीयांना तर याची काहीच माहिती नसते. असो.

मला फक्त एक दोन गोष्टी खटकतात. त्या आपण स्पष्ट कराल अशी आशा वाटते.

DM पवारचे शेवटी final शिक्षण काय झाले? व त्याने जर सईला सोडले आहे असे आपण कथानकात दाखवलेले आहे; तर मध्यंतरी एके ठिकाणी 'बबन तात्याचे मुलीचे लग्नास उपस्थित राहण्याकरता' त्याने आग्रहाने बजावले असता, DM ची पत्नी ही त्यात सुशिक्षित दाखवलेली आहे. 'मी व माझी मुले त्या झोपडपट्टीत येणार नाही. तुम्हास जायचे असेल तर खुशाल जा!' असा उल्लेख आहे. तर DM ने दुसरे लग्न एखादे सुशिक्षित मुलीशी केले आहे काय? त्याचा उल्लेख त्यात नाही. शिवाय ह्या सुशिक्षित बायकोपासून त्यास तीन मुले आपण दाखवलेली आहेत व सईला पण आपण मुले दाखवलेली आहेत; तर DM चे वय काय? व कथानकात आपण शेवटी शेवटी DM चे हलाखीचे जीवन दाखवलेले आहे. मग नंतर DM चा शेवट कसा समजायचा?

आपण एक चांगले पुस्तक लिहून समाजास चांगले, वस्तुनिष्ठ दर्शन घडवलेत याबद्दल खरोखरच अभिनंदन!

●

अजमल मुजावर / रहिमतपूर-सातारा

फार दिवसांनी आपले पुस्तक मला वाचावयास मिळाले आणि आपणास चार शब्द लिहावे असं वाटू लागलं. आपण चित्रित केलेल्या दलित समाजाची ट्रॅजेडी, आहे तशीच ट्रॅजेडी सर्वसामान्यपणे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या इतर अल्पसंख्यांक समाजाची पण आहे.

तसं पाहिलं तर सध्या मुस्लिम समाजाचीसुद्धा अशीच मागासलेली परिस्थिती आहे. महाराष्ट्रातल्या खेड्यांमध्ये राहाणाऱ्या मुस्लीम समाजास खरेखुरे धर्माचे ज्ञान नाही. केवळ ज्यांना थोडंफार धार्मिक ज्ञान आहे, अशांच्या मागे सर्व खेडूत मुस्लीम समाज उभा असतो. आणि धर्माच्या नावाखाली मग अनेक काळी कृत्ये घडत असतात. राजकीय लोक याचा चांगला फायदा उचलतात.

आपणास असं वाटत असेल की मुस्लीम समाज हा कितीतरी पटीने डेव्हलप झालेला आहे आणि हा काय सांगतोय ? परंतु ही परिस्थिती फक्त शहरी भागापुरती आहे. असो.

ता. क. : पत्र बंद केल्यानंतर एक गोष्ट आठवली की आपल्या बलुतं या पुस्तकातील पान नं. १८६ मधील खालून चौथा शब्द 'शिरखुर्मा' असा आहे; परंतु खरा शब्द हा क्षीरकुर्मा असा आहे. क्षीर = दूध व कुर्मा = खारीक. दूध व खारके-पासून बनवलेला पदार्थ. हे दोन्ही शब्द अरबी आहेत. असो.

●

व्ही. एस. मराळकर / संगमनेर

'बलुतं' वाचलं; अधाशासारखं.

नागडीउघडी वास्तवता मनात खूप खूप सलली. कल्पकतेचं कावड नाही; अवास्तवतेचे अलंकार नाहीत. काही लपवायचं नाही; काही टाळायचं नाही. असं हे 'अपूर्व' आत्मवृत्त.

संगमनेरच्या आठवणी त्या मानाने कमी. पृष्ठ १३० वर माझा उल्लेख 'भवाळकर' झाला आहे. कदाचित मुद्राराक्षस, कदाचित विस्मरण. रावसाहेब कसबे, कुलकर्णी, गंधे यांचे उल्लेख आहेत.

संगमनेर येथील वास्तव्यातील काही अधिक आठवणी, घटना व प्रसंग यांची नोंद करता आली असती.

भारतीय जीवनातील जातीयता, राजकारण, पुढाऱ्यांचे 'कार्य', परंपरा, उच्चनीच भेद, खेड्यातील व शहरातील भीषण दारिद्र्य, नीतिअनीतिच्या कल्पना, व्यसने या सर्वांचे एकत्रित चित्र वाचकांच्या मनावर ठसते. पण या सर्वांचा लेखकाच्या मनावर होणार आघात हा महत्त्वाचा. तो हृद्य आहे; भेदक आहे.

●

डॉ. एस. डी. साने / नासिक

आत्मकथेत स्वतःच्या आयुष्यातील उत्तमोत्तम गोष्टी, प्रसंग जास्त प्रमाणात येतात. त्यामानाने स्वतःचे दोष, त्रुटी, अपमान हे लपविले जातात. उल्लेखच केल्यास त्यावर मुलामा चढवून ते दोष कमी करण्याचा लेखक प्रयत्न करतो. या पुस्तकात मात्र तसा प्रकार आढळला नाही. अतिशय सरळपणे, कुटलीही लपवाछपवी न करता सारे प्रसंग वर्णिलेले आहेत.

व्यक्ती व समाज यांचे अभिनत्व आहे. तेव्हा आत्मकथेत समाजजीवन, सामाजिक चालीरीती, नाना प्रकारची – नाना विकारांची माणसे व त्यांचेवरोवर आलेले बरे-वाईट अनुभव, या सर्वांचा उल्लेख अपरिहार्यपणे येतो. इथे 'दया पवार' ही व्यक्ती राहात नाही; तर त्याचे मुखातून हिंदू समाजाकडून दुर्लक्षिलेल्या असंख्य व्यक्तींची दुःखं–वेदना बोलतात.

दलित, उपेक्षित यांचेविषयी खरा-खोटा कळवळा पोटी निर्माण होऊन त्याला कथेचे, कवितेचे, कादंबरीचे स्वरूप देणारे अनेक आहेत. पण ते वाङ्मय सुंदर असले तरी हृदयाला जखम करू शकत नाही. इथे लेखक स्वतः जे जीवन जगला, जे अनुभव घेतले, ते स्वतःच वर्णिल्यामुळे त्याला वेगळीच धार आलेली आहे. यातले पुष्कळ प्रसंग वाचून मन हेलावते!

हिंदू समाजातील रुढीमुळे आजही गावाच्या वेशीचे आतील जग व वेशी बाहेरील जग यात दुरावा दिसतो. वेशीचे आत पूजाअर्चा, उत्सव, मेळावे, भजने, कीर्तने, पुराणे, दिंड्या सगळं चालतं. पण यांचा मागमूगसही वेशीबाहेर नसतो. असे का? 'हरिजनोद्धार', 'दलित सेवा' अशा नावाखाली मुद्दाम काही मामुली कार्यक्रम योजिले जातात. त्यात कार्यक्रमापेक्षाही फोटो काढून तो वर्तमानपत्रात कसा येईल हीच चिंता अधिक असते! आणि ही सारी ढोंगबाजी पंचायतीच्या म्हणा, जिल्हा परिषद म्हणा किंवा विधानसभेच्या म्हणा निवडणुका जवळ आल्या की सुरुवात होते. अशा वेळी मग वंदनीय बाबासाहेबांची आठवण येते. त्यांचे पुतळे वसविले जातात. चार दोन पुढारी भाषणाचा कंडू शमवून घेतात. निवडणुका संपल्या की, सारे कसे शांत शांत! तो पुतळा तसाच उन्हातान्हात, पावसापाण्यात उदासवाणा राहतो. ना हार ना नमस्कार!

हल्ली काही शब्द फारच सवंग झाले आहेत. दलित, पददलित, तळागाळातील लोक इत्यादि. आणि मग त्यांचा 'उद्धार'. कुणी कुणाचा उद्धार करायचा? आणि का? मुळात जर सारी माणसे ही ईश्वराचीच अंशरूपे आहेत, तर त्यांत श्रेष्ठ-कनिष्ठ, उद्धार केला जाणारे व उद्धार करणारे, असा भेद होतोच कसा? कुणी तरी वरून शहाणपण-मार्गदर्शन करण्याऐवजी स्वतःच स्वतःची व भोवतालच्या जगाची उन्नत्ती करण्यात पुरुषार्थ आहे. 'आत्मगौरव' असल्याखेरीज उभारी न होता अधिक नीचपण येते. वंदनीय बाबासाहेबांच्या अविश्रांत प्रयत्नाने शिक्षणाचा प्रसार झाला. किती तरी लोक विद्या-विभूषित झाले.

पण आज विद्याविभूषितांचा मार्ग कोणता दिसतो? ते वागतात कसे? अगदी लहानपणापासून माझ्याकडे येणारा जवळच्याच खेड्यातील एक हुशार महार विद्यार्थी, आज सरकारी बँकेत खूप मोठ्या हुद्यावर आहे. दिल्ली-मद्रास-कलकत्ता येथील बँकांत तो बदलीमुळे फिरला. कधीकधी सुट्टीत येतो. क्वचित भेटही होते. पण या मुलाने स्वतःची उन्नती करून घेताना त्याच्या राहत्या खेड्याविषयी, त्याच्या मनात मुळीसुद्धा विचार नाही हे मला जाणवले. वस्तुतः त्याच्या खेड्यात आजही अज्ञान, भ्रामक समजुती आहेत. पण आपला समाज आपणच बदलणार आहोत, यासाठी माझ्या व्यक्तिगत फायद्यावर–सुखावर नियंत्रण घालून, माझ्या समाजबांधवांचे हीत बघेन ही वृत्ती नाही. उलट मला जाणवले की, तो तेथील समाजापासून जवळजवळ फटकूनच असतो.

आपल्या पुस्तकात रिपब्लिकन पक्षाची दैना वर्णिली आहे. ती पाहून खरंच वाईट वाटते. जो तो व्यक्तिगत स्वार्थासाठी धडपडत आहे. मग त्यात समाजाचे काहीही होवो ही वृत्ती. अर्थात ही वृत्ती साऱ्या भारतीय समाजाचीच आज दिसत नाही का?

रणवीरसिंह चौव्हाण / नागपूर

'बलुतं' वाचनाचा कालच योग आला आणि आपल्या ह्या पुस्तकाने अक्षरशः मला झपाटून टाकले. 'बलुतं'मधला दगडू मारुती पवार याचं व्यक्तिमत्व आणि ह्या बहुजन समाजाने त्याला दिलेली वागणूक म्हणजे माणुसकीच्या अभावाचा कळसच आहे. एक जिवंत आणि धगधगणारं पुस्तक आहे. त्यातील पृ. क्र. १३९ आणि १५६ म्हणजे माझ्या आयुष्यातीलसुद्धा तसाच अनुभव आहे.

परंतु साहेब, दुःख एकाच गोष्टीचं वाटतं की, आपल्या ह्या पुस्तकावरील लोकांची प्रतिक्रिया सीमित आहेत. माझे दलित मित्र म्हणतात, 'लेखकाने असं लिहावयास नको होते'. तर जे स्वतःला साहित्यिक समजतात ते म्हणतात, 'असं कधी झालंच नव्हतं', लेखकाने पुस्तकात रंजकता यावी म्हणून लिहिले आहे.

पण माझा स्वतःचा अनुभव असा आहे की, अजूनही बहुजन समाजास दलित वर्गातील माणूस पुढे गेलेला नको आहे. जे दलित वर्गातील लोक सरकारी नोकरीत, मानाच्या, हुद्याच्या जागांवर कामे करतात, तेसुद्धा खालच्या वर्गातील (आर्थिक बाबतीत) लोकांशी संबंध ठेवीत नाहीत. माझ्या एका मित्राला तर 'स्वतःच्या आई-बापाचीच किळस येते' कारण स्वतः तो ब्राह्मण समाजात वावरतो म्हणून! त्यावेळी मला स्वतःला खूपच वाईट वाटते.

आपले पुनः एकदा अभिनंदन की आपण 'बलुतं' लिहून समाजाची सत्यता दाखविली. आणि अपेक्षा की आपण असंच जबरदस्त लिखाण करून मराठी साहित्याला हादरे द्यावे आणि तथाकथित लेखकांची मराठी साहित्यातील मोनोपली संपुष्टात आणावी.

प्रा. वि. ज. गोडबोले / पुणे

आताच काही वेळापूर्वी पुस्तक हे आत्मचरित्र वाचलं. आपल्याशी परिचय नसूनही (बाकी आपलं पुस्तक वाचल्यावर परिचय नाही असं तरी कसं म्हणू ?) एका विलक्षण झपाटलेल्या अवस्थेत आपल्याला पत्र लिहायला प्रवृत्त झालो. गेले तीन चार दिवस—आपलं पुस्तक वाचायला सुरवात केल्यापासूनच—मी परकायाप्रवेश केल्याप्रमाणे आपले अनुभव स्वतः अनुभवले. आपल्या आयुष्यातल्या त्या दाहक अन् विदारक वस्तुस्थितीचे चटके सोसले. आतापर्यंत माझ्या आयुष्यात ज्यांची कल्पनाही करता येणं शक्य नाही असं ग्रामीण समाजजीवन—आपल्या परिसरातल्या, समाजातल्या सर्वांना आजवर भोगाव्या लागलेल्या मरणप्राय अशा मानसिक यातना, मानहानीचे प्रसंग—खरोखरच मला अस्वस्थ करून सोडलं. काल्पनिक प्रसंगही थिटे पडावेत अशी वस्तुस्थिती आपण वर्णन केलीत. कुणाच्याही वाट्याला हे असलं जिणं यायला नको. पण त्या गोष्टीला किती दशकं लागतील, शतकं लागतील ते कुणी सांगावं ? व्यक्तिशः जातपात न मानण्याचा निश्चय काही मर्यादेपर्यंतच तडीला जातो. त्यापुढं जाऊन काही प्रयत्न केला तर 'भारतीय समाजव्यवस्थे'च्या रेट्यापुढं आपण सारे दुबळे ठरतो. हा माझा अनुभव आहे पाच वर्षांपूर्वी माझ्या एका बंजारी स्नेह्याचं एका ब्राह्मण मुलीशी लग्न लावून देण्याच्या प्रयत्नात, दोन्ही समाजाच्या मंडळींच्या शिव्याशापांचा धनी बनावं लागलं. नियतीही अशी की हा विवाह अयशस्वी ठरून पुढं काही काळ त्या मुलीच्या कुटुंबियांची वाताहत झाली. तिच्या भावाला वेड लागलं. याची बोचणी सतत मनात राहाणारच.

असो. काहीसं विषयांतर झालं ! एक चांगलं पुस्तक वाचलं. काही काळानं जरी तपशील विसरला गेला तरी आशय कायमचा स्मरणात राहील. आपलं हे उत्तम आत्मचरित्र 'दलित साहित्या'च्या चौकटीत बसवणं मला मान्य नाही. आपण सर्वांचेच साहित्यिक आहात आणि आपलं हे पुस्तक सर्वांसाठीच आहे.

●

द. शं. पाटणकर / पुणे

माझे पत्र पाहून आश्चर्य वाटेल. तुमचे अभिनंदन करण्यासाठी मुद्दाम पत्र पाठवत आहे. मी ब्राह्मण असून तुमचे पुस्तक फार आवडले. ब्राह्मणी वाङ्मय वाचून वीट आला. खरे समाजचित्र त्यात दिसत नाही. पुष्कळ लिहा व समाजप्रबोधनाचे कार्य करा तुमच्यातील लेखक पुढे यावयास हवेत. अण्णा भाऊ साठे हे माझे आवडते लेखक. भाषा मराठीमोळाची व रसवंती. खरं गाव उभे करतात. आपणास नम्र विनंती की पुष्कळ लिहा. ते अनुभवाचे बोल अमृताचे आहेत. तुमचे पुस्तक फार आवडले व सतत वाचनाचा आनंद मिळत गेला.

●

स. वी. गोगे / औरंगाबाद

परवा योगायोगानेच आपलं बहुचर्चित पुस्तक हातात पडलं आणि काळवेळेचे बंधन न ठेवता वाचलं. असंच श्री. राम नगरकर यांचं 'रामनगरी' वाचलं. चांगलं वाटलं.

दलित साहित्य, साहित्यिक चळवळी या संबंधात तसा मी अज्ञानीच. पण परिस्थिती अजूनही, म्हणजे स्वातंत्र्य मिळून तेहतीस वर्षे झाली तरी, नेमके कोण कोठे आहे याचे ज्वलंत व मर्मग्राही दर्शन मराठवाडा विद्यापीठ नामांतराचे वेळी अतिशय जवळून घेता आले.

जितक्या प्रखरतेने जातीयवाद ह्या प्रकरणात पाहण्यात आला, तितक्याच परंतु त्याहीपेक्षा जास्त प्रखरतेने जाणीव झाली ती मा. श्री. गंगाधर पानतावणे यांची साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली नाही त्यावेळी. खरंच जातीयवादाचा हा अभिशाप कधीच दूर होणार नाही का?

आपण आपल्या कादंबरीमध्ये—आत्मचरित्रात—जे परखड लिखाण केलं, त्याबद्दल अतिशय आनंद झाला. विशेषतः आपल्या जीवनातील दुःख, त्याचा आवेग, आपली विद्रोही वृत्ती, अनेक लहानमोठ्या घटना, व्यक्ती, त्यांची वागणूक, त्यांचा आपल्या जीवनावर नकळत झालेला परिणाम, आणि त्यातून विकसित होत गेलेलं आपलं व्यक्तिमत्त्व, खरोखरी अतिशयच विलोभनीय आहे. आपली भाषा ह्या सर्व प्रसंगी थोडसं वर्णन देऊन, नकळत त्यावर एखादं प्रश्नात्मक वाक्य टाकून, प्रतिक्रिया तर व्यक्त करतेच पण प्रश्नाच्या दोन्ही बाजू समर्थपणे उभी करते. आपल्या पुस्तकाचं रसग्रहण हा स्वतंत्र विषय आहे, फार मोठा आहे आणि आवाकाही तसाच.

पण कॉमेंट्री करावयाचीच म्हटली, तशी इच्छा नाही, पण सुरवातीला आपण ऑडिट विभागात नोकरी करतो असा उल्लेख आहे. आपली सुशिक्षित पत्नी आहे असे उल्लेख आहेत; परंतु पुस्तकाचे शेवटपर्यंत थोडंसं का होईना याबाबत काहीच कळू शकत नाही.

आतापर्यंत पुष्कळ वाचले. वाचण्याच्या सवयीतूनच मराठी एम. ए. झालो. आज 'राजकीय चरित्रे' ह्या विषयावर Ph D. करीत आहे. (मराठवाडा विद्यापीठ). संवेदनक्षम माणूसच लेखक, साहित्यिक होऊ शकतो तो आजुबाजूच्या घटना पाहून बेचैन होतो व दुसऱ्याला बेचैन करतो. त्यांच्यातच खरी (creativity) निर्मितीक्षमता असते, ह्या सिद्धांतावर माझी नितांत श्रद्धा आहे. त्याचंच एक दृश्य स्वरूप आपलं पुस्तक आहे. तसंच आपल्या आईची विचारसरणी. म्हणजे 'आयुष्यात कुणाला तरी एकदा खरं सांगावं' ही फार मोठी शिकवण देणारी आहे. प्रसंगी Mile Stone, Guide Line किंवा Light House सारखीच आहे. आपण खरंच भाग्यवान, आपल्या व्यक्तिविकासाला अशी वैचारिक बैठक मिळाली आहे.

●

प्रा. श्या. गो. ताम्हणकर / मुंबई

मी सहसा असं कधीच कुणाला लिहायला घेत नाही व बसल्या बैठकीला झपाटून पुस्तक वाचण्याचा माझा स्वभावही नाही. मला वाटतं, हाताच्या बोटावर मोजता येतील इतकीच पुस्तकं मी वेड्यासारखी वाचली आहेत. माझ्या हातून काही प्रमाणात लेखन होत असतं; पण वाचन त्या मानानं व तेही चवीनं असं फारच कमी.

पुस्तक वाचून व वाचतानाही, मनात बरीच स्पंदनं जाणवली. मी लिहिलेल्या कथा, त्यातील काही घटना यांचा काहीसा स्पर्श पुस्तकामध्ये आढळला; म्हणून अधिक अंतर्मुख झालो असेन. आमच्या लेखी असणारी 'कथा' ही तुमची हकिगत होती कल्पनातीत अशी वाट तुम्ही तुडवली आहे. आयुष्याच्या वाटेवरील अनोखी वळणं तुम्ही अनुभवली आहेत. विटल्या आयुष्यात पुन्हा रंग भरण्याचा स्तुत्य प्रयत्न तुम्ही केलेला आहे. तरी पुढं चला.

मला वाटतं, त्यासाठीच ही नकळत कौतुकाची पावती. वयानं लहान असाल तर याच पत्री शुभाशीर्वाद समजा.

पुस्तकामध्ये वर्षाचे किंवा वयाचे उल्लेख आल्यामुळं, मला तुमच्या वाट्यास आलेल्या भयानक घटनांचं काटेकोरपणे मूल्यमापन करता आलं नाही व काही वेळा मी बुचकळ्यातही पडलो. तरीसुद्धा नियतीनं मांडलेला खेळ कुणाचीही परीक्षा घेणाराच ठरला असता, यात तीळभर शंका नाही.

एक टीकाकार म्हणून नव्हे तर तुमच्या जीवनपटाकडं जाणीवपूर्वक पाहणारा कलाकार म्हणून विचार करत आहे व तो इथं थोडा फार मांडतही आहे. म्हणूनच दलित-ललित वादाचा बाऊ माझ्याजवळ नाही. प्रत्यक्ष भेटलो तर तुमच्या व्यक्तिगत वाटचालीच्या संदर्भानं, समाजपुरुषाची स्थित्यंतरं—त्याच्या मार्गातील वळणं—यांचा विचार करता येईल. गप्पाही होतील माणूस-अस्पृश्यता-प्रगती-राजकीय प्रवाह-स्वराज्य-रामराज्य यासंबंधी मनमोकळेपणानं बोलता येईल. तुमच्या आत्मनिवेदनात जे राहून गेलं आहे त्याचा थोडाफार परामर्ष घेता येईल, हे वेगळं.

●

हरी दहातोंडे / मुंबई

बलुतं वाचलं. प्रकाशक, गांगल माझे चांगले मित्र आहेत. पुस्तकांचा गठ्ठा जेव्हा त्यांच्या घरी पडला होता तेव्हा त्याला मी हातसुद्धा लावला नाही. नंतर ते दोन-तीन संपादकांच्या टेबलावर पाहिले तरीही स्पर्श केला नाही.

मात्र श्री. पवार लखपती झाल्यावर एकदम पुस्तक डोळ्यापुढे आले. माणूस मोठा झाल्यावर त्याच्याकडे पाहण्यात कसा बदल होतो पाहा. असो.

मला सौ. पवार यांना भेटण्याची इच्छा आहे. त्यांची परवानगी असल्यास रविवारी वेळ द्या. मी येतो.

●

दिलीप कनवाळू / मुंबई

बऱ्याच उशिरा का होईना आपले 'बलुतं' हे आत्मचरित्र वाचावयास मिळाले. अगोदरच वर्तमानपत्रांतून आणि निरनिराळ्या मासिकांतून त्याविषयी भलताच गवगवा झालेला! ह्या अशा महागाईच्या काळात प्रपंचरूपी वारदानाची ठिगळे जोडता जोडता नाकी नऊ आलेत. आणि वीस-बावीस रुपये खर्च करून 'दया पवार'ने असं काय एवढं लिहिलं असणार म्हणून ते घ्यायचं? भूतकाळातील दलितांच्या जीवनाचेच चित्र रेखाटले आहे ना? मग त्यात काय एवढे विशेष आहे?...

...तर असा समज झालेला. काल-परवा अशाच एका मित्राकडून 'बलुतं' हाती लागलं. वाचले! अगदी तन्मयतेने वाचले!! शेवटची प्रस्तावनादेखील वाचावयास विसरलो नाही. अगदी खरोखरच बेंबीच्या देठापासून आणि निर्भिडपणे लिहून आपले स्वतःचे आणि भूतकालीन दलित समाजाला झालेल्या दुःखाच्या डागण्यांचे वर्णन आणि सुरेखतेने त्याची केलेली मांडणी वाचून अक्षरशः भारावून गेलो. असो. योगायोगाने आपले नाव दगडू मारुती पवार असे आहे, तर माझ्या वडिलांचेसुद्धा नाव दगडू मारुती कनवाळू असे आहे. आणि 'दगडू' हे नाव ठेवण्यामागील पार्श्वभूमीसुद्धा अगदी आपल्याप्रमाणेच! वाचून हास्याचे कारंजे फुटले.

मात्र पुस्तक वाचून झाल्यानंतर एक-दोन शंका निर्माण झाल्या. अर्थात शंका. आपल्या वैवाहिक जीवनात दुसऱ्याने ढवळाढवळ करू नये; परंतु राहवतसुद्धा नाही. तेव्हा माझ्या शंकेचे अगदी १०१% निरसन होईल अशी खात्री बाळगतो. शंका अशा आहेत की....

...आपण 'बलुतं'मध्ये असा उल्लेख केला आहे की मला सरकारी खात्यात ऑडिटसारख्या जागेची नोकरी आहे. सुशिक्षित पत्नी आहे. दोन मुली आहेत. दोन्ही मुली शाळा शिकताहेत ...

...परंतु आपली पत्नी सई ही आपल्या भांडणानंतर जी निघून जाते, ती परत केव्हा येते? येतच नाही. उलट एका जखखड म्हाताऱ्याबरोबर लग्न करते. अर्थात सोबत असणारी एकुलती एक मुलगी बकुळा हिलासुद्धा सईबाई सोबत न्यायला विसरल्या नाहीत.

...मग दोन मुली, सुशिक्षित बायको, हे सर्व काय ते कळायला मार्ग नाही. कृपया खुलासेवार कळवाल तर बरे होईल.

●

देशमुख एम. एस. / सोलापूर

मी आपली मला माहीत असलेली 'बलुतं' हीच कादंबरी वाचली; तर त्यातील प्रसंग मला माझ्या हृदयात जाऊन आसवांना खाली टपटप पाडले. काय तो प्रसंग! त्यावेळी असं होतं की, सतत व नेहमी डोळ्यासमोरून फिरणारी ती कादंबरी दलितांनी वाचण्यासारखी नसून, त्यातील प्रसंग ग्रहण करून, हातात ज्ञानाची ज्योत घेवून त्या प्रसंगांना या जगातून समूळ नष्ट केलं पाहिजे अशी आहे.

३२४८

अभय कुरपतवार / नांदेड

सप्रेम नमस्ते ! आपलं बलुतं हे पुस्तक अलिकडेच वाचले. हृदयातील 'त्या' काळच्या भावनांना या गतकाळात तुमच्या भावनांना आविष्कार मिळून ते हृदयाबाहेर पडले. जसे धनुष्यातून सुटलेल्या बाणाला स्वतःची केवढी तहान असते ? तसे 'दया पवार' यांच्या हृदयातून सुटलेले शब्दांकित बाण हे गतकालिन 'दगडू मारुती पवार' याच्या जीवनाचे वेध घेत आहे, धुंडाळत आहे असेच कोणालाही वाटेल.

आपलं प्रसिद्ध पुस्तक त्यास Ford Foundations तर्फे Prize मिळालेलं. किती अपूर्व हे पुस्तक ! मी तर अवघ्या ७–८ तासात हे पार केलं ! प्रत्येक क्षणी दुःखाचा आविष्कार व्हावयाचा ! आपल्या पुस्तकांबाबत बरीच टीका झाली. काहींनी 'अश्लिलपणाचा' आरोप ठेवला, पण मला या टीकाकारांना सांगावेसे वाटते की दया पवारांनी आपल्या जीवनातील 'त्या' काळातील सत्य भोगलेलं आहे. हे पुस्तक वाचून कुणालाही दिशा मिळू शकेल ! आपण शून्यातून विश्व निर्माण करणारे महान लेखक आहात ! देव आपले कार्य न भूतो न भविष्यति वृद्धिंगत करो !

मला येथे तत्परतेने सांगावेसे वाटते की आपल्या पुस्तकाच्या चाळीसाव्या पेजवर आपण एका बादशाहाची दंतकथा कथित केली आहे. त्यात आपण 'एका महाराने बादशहाच्या तरुण कन्येस त्याजवळ पोचते केले. परंतु बादशहाच्या शंकेचे समाधान तो महार त्या चिमुकल्या डब्यात आपले लिंग किंवा लिंक कापून ठेवलेलं दाखवतो. बादशहास खात्री पटते.' आमचे वाचक मला वाटते, एवढे 'अ-ज्ञानिक' कसे आहेत ? त्यांना येथे एवढे कळत नाही की एखाद्या पुरुषाचे लिंग तोडल्यास तो जिवंत राहील काय ? जर तो राहिला तर ते सायन्सला आव्हान आहे वाटल्यास आपण प्रात्यक्षिक करून पाहू शकता. मी S. Y. Science शिकत आहे. त्याची जाणीव होऊन मी बेचैन झालो !

●

जयरामजी धनगे / नांदेड

आपलं 'बलुतं' पुस्तक वाचून झालं. सामाजिक वास्तवतेचं चित्र आपण समाजासमोर ठेवलंत. 'समाजात आमुलाग्र बदल कुणालाच नको असतो.' (पान १९६) आपल्यासहित का ? आपल्या विरहित ?

भारतातील सर्वच राजकीय पक्षांचे पुढारी आपआपल्या अज्ञानी, अंधविश्वासू मेंढरांसारख्या जातभाईंचा सत्तेकडे जाण्यासाठी शिडीसारखा सर्रास वापर करतात. त्यास समाज फसतो.

खऱ्याखोट्या पुढाऱ्यांचं मूल्यमापन करण्याची लायकी भारतीय समाजात आलेली नाही. हे आपल्या देशाचं, समाजाचं दुर्दैव.

आपणास लिहिण्याचं धाडस केलं. चुकल्यास माफी मागतो.

●

संभू वांदेकर / गोवा

'बलुतं' हाती आलं तसं शांत चित्तानं (!) वाचून काढलं. त्यातील प्रत्येक पान हे मला एक नवीन आव्हान वाटतं. आपण भाषासौष्ठवाकडे विशेष लक्ष दिलं नसलं तरी दलितांच्या जिवंत अनुभूतीला समर्थपणे शब्दबद्ध केलंत याचा मला मनापासून अभिमान वाटतो आणि म्हणून मी आपणास मनःपूर्वक धन्यवाद देतो.

महंमद रफी आपल्या दर्दभऱ्या आवाजात 'मेरे लाश की मिट्टी खराब न हो' असं आळवून जसं श्रोत्यांचं मन हेलावून सोडतो, तद्वतच 'माझ्या या बऱ्या-वाईट विचारांचा ऱ्हास न हो' असं आपण जीव तोडून सांगत आहात. आणि मी जे अनुभवलं ते दुःख, त्या वेदना, तो छळ माझ्या समाजाला न मिळो असं आपण आवर्जून व आर्जवून सांगता आहात याची खात्री पटते.

पुन्हा एकदा मनःपूर्वक अभिनंदन.

●

नितीन देशपांडे / ठाणे

नुकतेच 'बलुतं' हातावेगळे केले. दुसऱ्यांदा वाचले. दोन वर्षांपूर्वी त्या पुस्तकाची हवा होती, तेव्हाही वाचले होते. तेव्हा त्यात sex आहे म्हणून मित्रांनी वाचण्यास दिले होते व मी ते त्याच दृष्टीने, चवीने वाचले—कबूल करायला संकोच कसला?

आज मी १८ वर्षांचा आहे.

अत्यंत योग्य वेळी पुस्तक परत वाचायची बुद्धी झाली. 'दगडू पवार'च्या life story ने सुन्न झालो.

अशी गाळात, उकिरड्यात रुतून बसलेली माणसे, sub-human level वर जगणारी, त्यांना आम्ही 'हरिजन' हे सुंदर नाव दिले व पूर्वपरंपरेनुसार विसरून गेलो. त्यांचे पुसटसे अस्तित्व मान्य करायलाच हजारो वर्षे लागली. आज त्यांना Colleges, नोकऱ्यांमध्ये Reserved seats आहेत, म्हणून आमच्यात प्रचंड असंतोष आहे. मी ज्या Engineering College मधे आहे, तेथील विद्यार्थी त्यांचा भयानक द्वेष करतात. Lab. Assistantसुद्धा कचऱ्याप्रमाणे वागणूक देतो.

"साले एक फालतु आत्मचरित्र लिहिलं अन् अमेरिकेची ट्रीप करून आला ×××" ही तुमच्या व मान्यांबद्दल साधारण प्रतिक्रिया आहे. टीकाकारांनी पुस्तक उचलून धरणं तर ते सोडा. याचा अर्थ, नवीन सुशिक्षितांमध्येसुद्धा ही भेदाभेद पाळण्याची क्षुद्र मनोवृत्ती दिसते. किंबहुना जरा जास्तच दिसते. आजचे नालायक राज्यकर्तेसुद्धा जाती-भेदाला—अर्थातच मते मिळविण्यासाठी—खतपाणी घालीत आहेत; सवर्ण व हरिजन यांचा प्रक्षोभ भडकावीत आहेत, याला काय म्हणावे?

बलुत्याने प्रथम या दुःखाला वाचा फोडली. निदान या पुस्तकामुळे तरी त्यांनी किती सोसलं व सोसताहेत ह्याची थोडीशी कल्पना समाजाला आली तरी खूप झाले.

●

एस. वी. डांगे / बेळगाव

खूपच दिवसापासून मी आपलं नाव ऐकत आहे. पण तसा जिव्हाळा उत्पन्न झाला नव्हता. पण जेव्हा मी तुमची कादंबरी 'बलुतं' वाचली, त्यामुळे माझ्यात एक प्रकारचा अविस्मरणीय जिव्हाळा उत्पन्न झाला आहे व परवा मी डॉ. वराळे, निपाणी, यांना मी तुमच्या घरच्या पत्त्याबद्दल विचारले व त्यांनी सुद्धा तुमची फार स्तुती केली. एक छान दलित लेखक व दलितांच्यावर होणाऱ्या अन्यायाची चिड बाळगणारा एक सुंदर वक्ता. तेव्हा अशा माणसाची व आपली ओळख असावी, निदान प्रत्यक्ष नाही तर पत्राने का होईना आपली ओळख अखंड राहू दे. त्याचप्रमाणे या भागातील काही समस्या असल्या तर तुमच्या कानावर घालता येतील.

●

एल. के. निकम / मालेगाव

बलुतं वाचलं. सत्याचे उघडेनागडे प्रदर्शन समाजाला दाखविलेत. धन्यवाद!

परंतु आपण सईवर अन्याय केला आहे. सई जिवंत आहे का नाही हे आपण आपल्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत लिहिले असते तर बरे झाले असते. ज्या दल-दलीतून आपण वर आलात, त्याच दलदलीत आपण सईला फेकून दिले!

सईनंतर आपण दुसरे लग्न केले असावे. परंतु सईच्या पोटी तुमच्या रक्ताचा गोळा वाढला त्याचे काय झाले? आपण सुधारणावादी (?) आहात (असे वाटते), तर बकुळाचा शोध घेऊन तिला चांगले जीवन जगण्यास संधी दिली काय? कृपया सई व बकुळाबाबत खुलासा करावा ही विनंती.

●

शि. के. आंबळे / पुणे

कादंबरी वाचताना मी झपाटून गेलो होतो. कादंबरी-लेखनापेक्षा त्यातील भयानक वास्तवता मनाला चटका लावून गेली. वाचनाला सुरुवात केल्यापासून संपेपर्यंत मला ती खाली ठेवावीशी वाटली नाही. कोणाही आत्मचरित्रकाराने आत्मचरित्र इतके सत्य लिहिले नसेल. आपल्यावर जातीयतेमुळे व वैयक्तिक कारणांमुळेही अनेक आपत्ती कोसळल्या त्याबद्दल फारच रुखरुख वाटली.

पुस्तकावरील आपल्या पत्त्यावरून आपले दुसरे लग्न झाले असे वाटते. तसा एक दोन ठिकाणी कादंबरीत उल्लेखही आढळला. त्यामुळे आपल्या सध्याच्या जीवनाबद्दल उत्सुकता लागली. अपणाला फोर्ड फाउंडेशनचे बक्षीसही मिळाले आहे. तेव्हा आता आपले जीवन सुस्थितीत असावे ही सदिच्छा!

पुढाऱ्यांची आपण बिंगं बाहेर काढलीत. त्यांच्यामुळेच समाजाची प्रगती होत नाही. कारण ते फक्त स्वतःचा स्वार्थ पाहतात. तळातला माणूस तळातच राहतो शेवटी. आपणास शुभेच्छा!

●

प्रा. ल. मा. सुभेदार / ठाणे

तुझे 'बलुतं' वाचलं. तुझे म्हणायचे कारण मी एक तर वय ६६ चा. दुसरे तू जसा 'दलित ब्राह्मण' तसा मी 'ब्राह्मण दलित'. स्वतःची जात : देशस्थ ऋग्वेदी महार, अशी पुष्कळदा सांगतो. सध्याचे राजकारण व समाजजीवन पाहून वैताग येतो. अशी पुस्तके वाचणे हेच काम. १५-२० वर्षांत इतके चांगले मराठी पुस्तक वाचले नव्हते म्हणून मनापासून अभिनंदन. नुकतेच श्री. ज. जोश्यांचे 'आनंदी गोपाळ' वाचून समजले की तेही माझ्यासारखेच एक एके काळचे 'दलित'च.

सोबत माझ्या माजी विद्यार्थ्यांनी छापलेला एक इंग्रजी अल्प परिचय आहे. (कारण त्यात मराठी न जाणणारे काही आहेत.) खेडेगावात ३० वर्षे अलिकडची घालविली. मी भाऊराव पाटलांच्या संस्थेत होतो. शहरी २५ वर्षे मुंबई. म्हणून कोठेच जड गेले नाही. लोणंदला सुहासिनी नावाच्या मुलीने फलटणचे प्रसिद्ध वकील गुं. बा. माने (B. A. LL. B) यांचेशी लग्न लावले. माने, कोंडोली (बेळगावचे), महार. तिला तीन मुली आहेत. तिच्या चां. कां. प्र. आईवडिलांना, मीच थोडेफार तयार केले. अर्थात मिश्र विवाहाने (एखाद्या दुसऱ्या) प्रश्न सुटत नाहीत. धर्मांतराने सुटलेले नाहीत. खरे ब्राह्मण ढोर होऊ शकतात. जनावरांचे कातडे मातीत कुजविणे गुन्हा. सुधारणे म्हणजे 'बामणी' मर्कटानुकरण करणे नव्हे. मी अमेरिकेत गोमांसही खाऊन पाहिले आहे. तसे सर्प पण. आता २० वर्षे शाकाहारीच आहे. क्वचित अंडी खातो. रक्तदाब इ. असल्याने डॉ. ने प्रथिने खाण्यास बंदीच केलीय.

या पुस्तकात काही दलित/मागास शब्द आहेत. काही कळतच नाहीत. इंग्रजी व संस्कृत शब्द पण अशिक्षित समाजाला कळणार नाहीत. मी १४६ पानापर्यंत पुनः वाचून काढले दुसऱ्या आवृत्तीत संस्कृत व इंग्रजी शब्द कमी करणे. 'रिपब्लिक' शब्दही दास्य दाखवतो. 'अस्पृश्य' ऐवजी 'अस्पृष्ट' (भूतकाळी) करावा. जास्त लिहीत नाही. सौ. व मुलास गोड आशीर्वाद कळावे. एकदा येथे येणे (अवश्य.)

कै. बाबासाहेबांची बहुतेक पुस्तके वाचली. (पूर्वीची.) ते लोकल III मधून नेहमी (पुष्कळदा) प्रि-लॉला असताना मजबरोबर प्रवास करीत. त्यांच्या पहिल्या पत्नीच्या मातीस हजर. 'हिंदूंचे समाजरचना शास्त्र', 'हिंदूंचे अर्थशास्त्र' — ले.(कै.)गो. गं. जोशी यांची पुस्तके तुम्ही ग्रंथालयातून मिळवून वाचणे.

●

बाळ बापट / इंदूर

तुमचं 'बलुतं' आजच वाचून झालं व गलबलून गेलो. तुम्ही बऱ्याच इमानदारीनं लिहिलेली दिसते आहे आत्मकथा. म्हणूनच भ्याडपणा वगैरेची कबुली दिलीत; तरी तुमच्याबद्दलचं प्रेम कमी होत नाही, उलट वाढतंच. कारण तुमच्यासारखे दलित—खास म्हणजे enlightened दलित—म्हणजे अगदी तळहातावर मृत्यू घेऊन लढा द्यायला निघालेले सैनिक असणार अशी भाबडी समजूत. पण दलित काय, ब्राह्मण काय आणि

वाणी काय...थोडं वाचन वगैरे झालं की तो जास्तच भेकड होतो का ? मी कोकणस्थ ब्राह्मण जन्माने असलो तरी देवाधर्मावर माझा मुळीच विश्वास नाही. आज चाळीशी ओलांडलेला मी पंचविशीपासून मार्क्सवादाने प्रभावित आहे. गम्मत म्हणजे मी देखील Lab. Asstt. राहून M. Sc. पूर्ण केलं व आता कॉलेजात मास्तरकी करतो आहे. बायकोने पण लग्नानंतर M. Sc. केलं व आता Chemist आहे. दोघेही आम्ही नोकरी करतो. दोनच मुलं. त्यामुळे तसा हेवा वाटण्यासारखा संसार. पण खरंच सांगतो मन धड संसारात रमत नाही. आणि धड समाजकार्य किंवा राजकारणातही भेकडपणामुळे उडी घ्यायची हिम्मत होत नाही.

●

सुरेश वैराळकर / अकोला

'बलुतं' काल रात्रीच वाचून संपवलं. तसं बरंच उशिरा वाचायला मिळालं. अक्षरशः कातडी सोलून नग्न करून फटके मारल्यासारखं वाटत होतं. गेल्या पाच सहा वर्षांत सेवा दलानं दिलेल्या जाणिवांपेक्षा सत्य कितीतरी पटीनं दाहक आहे याची कल्पना आली.

स्वतःचीच लाज वाटायला लागलीय. अक्षरशः किळस येण्याच्या मर्यादेपर्यंत. रात्रीपासून सारखा अस्वस्थ.

आमच्या भाषणभाऊ 'साथीं'ना एकेक वर्ष 'महारवाड्यात' राहायची सक्ती करावी काय ?

मी जात, धर्म, पंथ मानत नसलो तरी ज्या सवर्णांनी ही परिस्थिती निर्माण केली, जन्मतःच त्यांचा मी घटक आहे. ह्या गुन्ह्याबद्दल शिक्षा कोणती ?


●


सदानंद देशमुख / बुलडाणा

आज तुमचं 'बलुतं' वाचण्यात आलं. खूप दिवसापासून वाचण्याची इच्छा होती. तुमच्या 'बलुतं'बद्दलची एक आठवण आहे. ताजी. तेव्हा चिखलदऱ्याला पुण्याच्या लोकशिक्षण मासिकातर्फे लेखकांचं शिबिर आयोजित करण्यात आलं होतं. त्यात शरच्चंद्र टोंगो या लेखकाजवळ 'बलुतं' होतं. बलुत्याविषयी खूप ऐकून आणि वाचून होतो, म्हणून वाचावसं वाटत होतं. टोंगोला पुस्तक मागितलं. मिळालं तर नाहीच, वर उत्तर : पुस्तकं वाचायचा षौक आहे तर विकत घ्यावी. ही गोष्ट विशेष वर्मी लागली. तेव्हापासून वाचण्यासाठी धडपडत होतो. ते आज मिळालं. अर्धं वाचून झालं. राहवलं नाही. पूर्ण वाचण्याच्या अगोदर तुम्हाला पत्र लिहावसं वाटू लागलं म्हणून हे पत्र लिहीत आहे. खरंच आपलं पुस्तक खूपच इमोशनल आहे. मला खूप खूप आवडलं. शिवाजी सावंतच्या 'मृत्युंजय'नंतर हेच चांगले, मन खिळवून ठेवणारे पुस्तक हाती पडले आहे. अर्थात पुस्तक पूर्ण वाचल्यानंतर तुम्हाला कळवीनच; पण तुम्ही मात्र ह्या पत्राला उत्तर द्यायचं हं. तुमचं हस्ताक्षर संग्रही असावं ही माझी खूप इच्छा आहे.

●

धनधान्यदेव





घरचा अहेर

'**घरचा अहेर**' ह्या सदरात वेगवेगळ्या भागांतून, अनेक दलित वाचकांकडून आलेली पत्रे पुढे देत आहे. —**दया पवार**

अस्मितादर्शचे संपादक डॉ. गंगाधर पानतावणे / औरंगाबाद

'बलुतं'च्या निमित्तानं बलुतं वाचलं. एक मोठा कालपट डोळ्यांसमोर उभा राहिला. दलितांच्या जीवनाची इतकी भेदक कहाणी आणि ती सांगणारा समर्थ लेखक, असा संयोग घडलेला आहे. 'बलुतं' वाचताना आणखी एक जाणवत राहिलं की अजून तुम्हाला खूप सांगायचं आहे; पण ते राहून गेलं आहे. ते पुन्हा कुठल्यातरी लेखनातून यावं. आपल्या सगळ्यांचं जीवन—आत्मचरित्र—खूप अनुभवसमृद्ध आहे. 'बलुतं'मुळे अनेकांना लिहिण्याची इच्छा अनावर होईल यात शंका नाही.

'बलुतं' हा एक समर्थ आविष्कार आहे. मी तुमचं मनःपूर्वक अभिनंदन करतो.

●

योगीराज वाघमारे / उस्मानाबाद

आपल्या 'बलुत्या'स पारितोषिक मिळाल्याची आनंदाची वातमी वाचली आणि अक्षरशः आकाश ठेंगणं झालं. दलित साहित्यिकाचा एवढा मोठा सन्मान होतोय हे पाहून बाकीच्यांना मूठ मूठ मांस चढल्यासारखे झाले आहे. आज आपण ज्ञानपीठ आणि नोबेल पारितोषिक मिळविल्यासारखंच आम्हाला वाटतंय. तो क्षण काही दूर नसेल असे मला वाटते. पुनःश्च हार्दिक अभिनंदन.

भीमसेन देठे / मुंबई

वाचताना मन शहारत होतं. काही प्रकरणं तर माझ्या स्वतःच्याच जीवनातली वाटू लागली. हे बलुतं आपल्या सगळ्यांच्याच थोड्याफार फरकाने वाट्याला आलेलं. परंतु तुमच्या जीवनातले अनेक गुंतागुंतींचे प्रसंग वाचून तुम्ही किती हालअपेष्टा सहन केल्या असतील याची कल्पना येते. मी आतापर्यंत बरीच पुस्तके वाचली. काही पुस्तकांनी मी भारावूनही जातो, परंतु बलुत्याने भयंकर बेचैन झालो. वाचताना मनाला धक्क्या-पाठोपाठ धक्के होते. जीवननातले प्रसंग रंगविताना कुठेही तुम्ही नाटकी झालर लावली नाही किंवा कल्पनांचे अवडंबर केले नाही. सत्य हे कल्पनेपेक्षा किती भयंकर असते याचे प्रत्यंतर तुम्ही आणून दिले आहे. मराठी साहित्यात रंगवलेलं थातूरमातूर, काल्पनिक कादंबऱ्यांपेक्षा, वास्तवतेचे चटके किती कडक आणि भयंकर असतात हे सांगताना तुम्ही स्वतःच्या नागडेपणावर कुठेही पांघरूण घालण्याचा ढोंगीपणा केला नाही. तुम्ही चितारलेले कावाखान्याचे— महारवाड्याचे चित्र, वडिलांची शोकांतिका, होस्टेलमधले जीवन, वैवाहिक जीवनातील विफलता, आईला होणारा मानसिक त्रास आणि शारीरिक श्रम हे सर्व सोसत असताना तुमच्या मनाची होणारी घालमेल—हे सर्व वाचताना काळीज हेलावून गेलं.

●

योगेन्द्र मेश्राम / नागपूर

जरा उशिराच आपलं 'बलुतं' वाचलं. रडतच कालपरवाच नुकतं संपवलं. संपलं नाही. मनात कल्लोळ सारखा. माझ्याच जीवनातल्यासारख्या घटना. आमच्याच जीवनाचं हे 'बलुतं' तर आमचं अश्रूंचं साहित्य. संतापाच्या अश्रूतून फुललेलं मोल मोठंच असतं. पण मराठी समीक्षकांना ते मोजता येत नाही. नकळत किंवा कोणी जाणून गल्लत करीत असतात. करू देत. त्यानं हे साहित्य लहान होत नाही. 'बलुतं'बद्दल अभिनंदन!

मला आश्चर्यच वाटलं, वाटत आहे. तुमच्याबद्दल इतकी अशी काही कल्पनाच नव्हती. तुमच्याकडे पाहून कधी वाटलंही नाही. दिसतं तसं नसतं हे खरं. तुमची 'हिमखडा'ची 'झाडा'ची कविता खरी. त्यात तुम्ही आहात. आणखी एका गोष्टीचं मला नवल वाटतं ते हे की स्थल-काल-परिस्थिती व प्रसंगपरत्वे अंतर जरूर असणार; पण सामाजिक मानसिकतेत, म्हणजे तुमचं माझं मन एवढं सारखं—तुम्ही आत्मनिवेदनात सांगितलं अगदी तसंतसंच कसं? एवढं जुळतं कसं, याचं आश्चर्य! तुम्ही चळवळीच्या संदर्भात मोठे व वाहते झालात, मी जाग्यावरच आहे. अगदी खचून. खिळून गेल्यासारखा. परिस्थितीनं, आपल्यांनीही, मला माझ्या चेहऱ्याने आजवर जगू दिलं नाहीये. दुःख मोठंच आहे. कथांतून मी येतोच पण व्यक्तिमत्व सर्व काही त्यातून उकलता येत नाही. हे असो.

●

पांडुरंग कदम / मुंबई

दलितांच्या लढ्याच्या दृष्टीनं आपली कॉम्प्रेडशीप आहे. आपण बरंचसं अंतर चालून गेला आहात. मार्गातले खाचखळगे, चढउतार आपणास ठाऊक आहेत ... त्या दृष्टीनं मी पोरसवदा. रंगरूट भरती कालपरवाची. आपण आज म्होरके आहात ... एकमेकांविषयी आंतरिक ओढ नष्ट झाल्यामुळेच आपल्या लढ्याचे तीन तेरा झाले. वैयक्तिक अहंता नि महत्त्वाकांक्षा ह्यामुळे कलह पेटले नि त्यात चळवळीची होरपळ झाली. दलित साहित्यिक ह्यापासून दूर राहायला हवे होते. कारण त्यांचं क्षेत्र सर्जनशीलतेचं, पण खोकल्याच्या उबळीसारखी माणसं वागताना दिसतात ... काहीच नक्की नसतं. असो.

आपलं अभिनंदन करण्याइतका मी मोठा नाही. आपल्या ह्या यशाबद्दल अभिवादन!

●

प्रा. रावसाहेब कसबे / संगमनेर

[प्रा. कसबे यांचीं व्यक्तिरेखा बलुत्यात आली आहे. ते नायकाचे मामा.]

तुझे 'बलुत्या'नंतर आणि माझे 'झोत'नंतर कळत नकळत अथवा जाणीवपूर्वक लिखाण थांबले ही वस्तुस्थिती आहे. खरोखर असे का व्हावे? याचा एकदा अंतर्मुख होऊन कठोर आत्मपरिक्षणाद्वारे विचार करावा असे तुला नाही वाटत? पूर्वीची बेचैनी आणि लिखाणाची धडपड एकदम अशी लुप्त का व्हावी? तू अलिकडे वृत्तपत्रिय लिखाणात रस घेताना दिसतोस; परंतु त्यातून फारसे काही भरीव बाहेर पडत नाही. वृत्तपत्रिय लेखनाला मुळातच काही मर्यादा असतात. आपण एकदा बसून खरोखरच यावर विचार करावा असे वाटते. नाहीतर आपण 'संपल्याची' इतरांच्यावर जी टीका करीत असतो, तीच टीका आपल्यावरही होऊ लागेल.

●

रमाकांत जाधव / डोंबिवली

आपले 'बलुतं' वाचून होताच पत्र लिहावयास घेतलं. खरं पाहता 'बलुतं' महारांचे एक 'दस्तऐवज' आहे यात तीळमात्र शंका नाही. आपल्या आत्मवृत्तपर पुस्तकाला सच्चेपणामुळे एक वेगळीच धारदार प्रतिमा लाभली आहे. डोंबिवलीमधील काही लेखक मंडळी जेव्हा माझ्याकडे गप्पा मारण्यासाठी येतात, तेव्हा त्यांना 'बलुतं' वाचावयाचा सल्ला देतो व वरून टोमणाही मारतो, 'बघा, महार माणूसही चांगलं दर्जाचं साहित्य लिहू शकतो, हे दया पवारांनी दाखवून दिले आहे.'

काही मित्रांकडे गप्पा मारताना मला असेही विचारण्यात आले, ते म्हणजे श्री. दया पवारांनी जर 'सईचा' उल्लेख केला आहे, तर मग त्यांनी दुसऱ्या पत्नीविषयी का उल्लेख करू नये? अशा वेळी त्यांना मी सांगितले की, प्रत्यक्षात दया पवार भेटल्यावर मी खाजगीत हा प्रश्न उपस्थित जरूर करीन व त्यांना या उल्लेखाविषयी चर्चा करून आपल्या प्रश्नाचे निरसन करीन. बरे असो.

●

उत्तम तुपे / पुणे

वास्तविक 'काट्यावरची पोटं', आपले बलुतंच्या आधी प्रकाशित झाले असते; परंतु मनोराच्या प्रकाशकाच्या अडेलपणामुळे ते उशिरा प्रकाशित झाले....आणि आपण म्हणता तसलं दलित चळवळीचं काही पण नाहीय. या चळवळीच्या आधी अण्णा भाऊ साठे, शंकर खरातांसारखे अनेक नामवंत लेखकांची परांपरा या दलित साहित्य चळवळी-अगोदर नावारूपाला आली आहेच आणि दलित साहित्यिकाला परंपरा आहे. रामायण लिहिणारा वाल्मीकी कोळीच होता आणि महाभारत लिहिणारा व्यास पण दलितच की. असो. कधीतरी भेटीअंती बोलूच. बाकी दलित साहित्य हे ग्रामीण साहित्याचीच एक बाजू आहे. कारण नव्वद टक्के लोक हे गावात-खेड्यात राहात आहेत आणि या यंत्र-युगात त्यांच्याजवळ जाऊन, त्यांच्याच व्यथांची गाथा तयार करणे हे आपल्या सर्वांचे काम आहे.

●

दे. य. ठोकळ / कर्जत

'बलुतं' वाचलं. माझेच प्रतिबिंब पानापानातून दिसत होते. तुम्ही म्हणाल हे शक्य नाही. पण शपथेवर सांगतो, मुंबईचं आपलं जीवन वगळता हे असंच, अगदी असंच मी जगलो. असाच वाढलो. अनेक कथा लिहिल्या, लिहितो आहे. पण असं आपल्या-सारखं मनात साठलेल्या उमाळ्याला मोकळी वाट करून देणं जमलं नाही. ते मनातच होतं. 'बलुतं' वाचताना डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. हुंदके अनावर होत होते. उशी ओली झाली. मुलगी म्हणाली, 'बाबा, असे का रडता?' आपण चान्याचा उल्लेख केलात. ते वाचत असताना चान्या (तोटक्या) शिळ्या भाकरीच्या तुकड्यात मिसळून तवलीत शिजवून खाल्ल्याची आठवण झाली. डोळे पाणावले. आणि म्हणूनच मुलगी विचारीत होती.

तुम्ही म्हणाल हा माणूस वेडा तर नाही. आजच्याइतका भावनावश मी कधीच झालो नव्हतो पुस्तक वाचून समदुःखी भेटल्यावर जो उमाळा फुटतो तसंच काहीसं झालं आहे. माझा चुलतासुद्धा म्हणत असे, 'फिरल गल्लोगल्ली आन् खाइल डल्लीडुल्ली.' तुम्हाला वडिलांचं छत्र लाभलं नाही. मला दोघांचं लाभलं आहे. फरक इतकाच. एस. एस. सी परीक्षेच्या वेळी बीस रुपये फॉर्म-फी भरण्यासाठी नव्हते. आईनं घरातील हंडा मराठ्याकडं गहाण ठेवला. आपलं बलुतं वाचताना भावनांचा कल्लोळ झाला. मी सुद्धा बोर्डिंगमध्ये होतो. आठवी ते अकरावी माजी समाजकल्याण मंत्री बाबूराव भारस्कर यांच्या माळीवाडा (नगर) येथील बोर्डिंगमध्ये होतो. बोर्डिंगचा आपला अनुभव वाचताना मला गलबलून आलं. गरिबीनं अनेक वर्षे पाठ धरली होती. माझ्या आईनंसुद्धा सखा वेचला आहे.

●

एस. टी. शिरसाट / संगमनेर

[शिरसाट गुरुजी ही 'बलुत्या'तील व्यक्तिरेखा.]

माझे स्मरण ठेवून वाङ्मयात मला अजरामर करून ठेवले, याबद्दल आभार मानण्यासाठी मजजवळ शब्दच नाही. निःस्वळ देव पिशवीत घालून नेणे एवढे काम दाखविल्याने या देशातील आस्तिकांवर तितकासा परिणाम होईल असं वाटत नाही. 'ब्रह्मा, विष्णू, महेश यांना देव मानणार नाही', या बाबासाहेबांचे प्रतिज्ञेनुसार काम स्वीकारले होते. देव उचलण्यापूर्वीची पार्श्वभूमिका प्रेक्षकांसमोर ठेवल्यास अधिक परिणामकारक होईल असे मला वाटते. उदा० :

(१) एका मुलीला (राधा, दोडी बु।।ची) बाळंतरोग होतो. नवरा, बायकोला भूत लागले म्हणून ३।४ भगत आणतो. राधाला मधोमध बसवितात. भगत घुमतात. राधाला फुलं देतात (वेताने मारतात). अशा प्रसंगी मी त्या घरात प्रवेश करतो. मुलगी नाल्याने चुलत – निलत पुतणी असते. भगतांचा मार असह्य होऊन 'तात्या मला वाचवा!' असे उद्गार काढते. मी म्हसोबाचे नाव घेऊन नकली घुमतो. तोंडाने भगत उच्चारतात त्या भाषेत मंत्र उच्चारतो आणि भगतांचा समाचार घेतो. भगत पळून जातात.

(२) एका गावी एका म्हातारीचे अंगात देवी येत असते. तिच्याकडे अनेक रोगी येतात. एकदा म्हातारी घुमत असते. तिचा ५।६ वर्षांचा गणपत नावाचा नातू बाजूला बसलेला असतो. कुणाचे पोट दुखते, कुणाला मूल होत नाही. अशा ४ बाया (रोगी) बसलेल्या. चुलीवर दुधाने (दुधाचे) असते. मांजर दूध पिण्यासाठी दुधान्यात डोके आत घालण्याचा प्रयत्न करत असते. घुमता-घुमता म्हातारी कशी म्हणते, 'अहं-अहं, शिर म्हण गणप्या! अहं-अहं, शिर म्हण गणप्या!' म्हातारीची भाषा गणपतच्या उशिरा लक्षात येते. मग तो शिर-शिर म्हणतो. मांजर पळून जाते. त्याच वेळी माझा प्रवेश. मला पाहाताच म्हातारी घुमणे बंद करते. (कारण मास्तर घुमणाऱ्या लोकांना मारतो हे ती ऐकून असते.)

(३) मन्हळ बु।, ता. सिन्नर. येथे बौद्ध दिक्षा समारंभ-असतो. कर्मवीर दादासाहेब गायकवाड, शांताबाई दाणी, आर. जी. भालेराव व अनुरुद्धा नावाचा जर्मन भिक्खू असे आम्ही स्टेजवर. चावडीतील मेसूआई कोणीच आणीत नाही. शेवटी मी चावडीत जातो. सर्व प्रेक्षक लोक पहात असतात. मी मेसूआईशी बोलतो, "माणसासारखा मी माणूस, माझी या गावाहून त्या गावाला बदली आणि पिढ्यान् पिढ्या तू इथेच! वारे आई!" इत्यादि. आईला (माझ्या नव्हे चावडीतल्या) स्टेजवर आणतो. अनुरुद्धा माझे पाठीवरून हात फिरवतात. आईच्या ठिकाणी गौतमबुद्धाच्या मूर्तीची स्थापना करतात. तसेच काळूबाबाची उचलबांगडी. तुमच्या पुस्तकात डे. इन्स्पेक्टरचा उल्लेख आहे ती घटना अशी :

हा इन्स्पेक्टर जेथे जाई तेथे शिक्षकाला दंड करी. शिक्षकांत घबराट निर्माण

झालेली. वर्गात कागदाचा तुकडा दिसला की कर दंड, पान खाणाराला कर दंड, इ. हे महाशय माझे शाळेत आले. दुपारची २-१५ ची वेळ. मार्च महिना. हेडमास्तर व तो ऑफिसचे बाहेर खुर्ची-टेबल मांडून बसलेले २ ते २-३० मधली सुटी असते. २-२० चे दरम्यान शिक्षक सही करून आपापले वर्गात जात असतात. मधल्या सुटीत मी सही करून पान खात खात येत असतो. पण शाळेचे कंपाउन्डचे बाहेरच थुंकून देतो. हजेरीवर सही करून भाग शाळेवर जाणेसाठी जात असतो. हेडमास्तरने साहेबाना माझेबद्दल वेडेवाकडे सांगितल्यामुळे मला हेडमास्तर हाक मारतो. मी घाबरतो. जाऊन साहेबांना नम्रतेने अभिवादन करतो. 'तुमचे नाव काय? ट्रेन्ड की अन्ट्रेन्ड? तुम्हाला कोणते व्यसन आहे?' माझे तोंड लाल असल्याने खोटे न बोलता पान खात असतो असे उत्तर दिले. साहेब म्हणाले, 'शिक्षकाने पान खायचे नाही.' मी म्हणालो, 'साहेब, मी पान शाळेत नाही, घरी खातो. हेडमास्तरांना विचारा.' हेडमास्तर जातीयवादी असल्याने मूग गिळून बसतो. 'अहो, शिक्षकाने पान सुद्धा खायचे नाही.' मी म्हणालो, 'साहेब, घरी काय करायचे हा माझा खाजगी प्रश्न आहे.' साहेब गरम होतो. 'माझे तोंडाला तोंड देतो, मी कोण आहे, आहे का माहीत?' वाद वाढतो. बोलता बोलता साहेब बोलून जातो, 'मी तुम्हाला सस्पेंड करीन. तुमचे लोकच शिष्ट असतात.' हे वाक्य ऐकताच मी म्हणालो, 'साहेब, नीट बोला. नोकरीला मी आहे, जात नाही!' देहभान विसरून पायातला बूट काढून साहेबाला मारतो. साहेब चिंगाट पळून ऑफिस-मध्ये. आतून कडी लावतो. जिल्ह्यात ज्या साहेबाचा दरारा त्याला मी मारतो. मला विशेष वाटते. पण शिक्षकांत समज होतो की, शिरसाटचे डोके फिरले (वेडा झाला). गावातील सर्व लोकांत शिक्षकांनी प्रचार केला... शिरसाट मास्तर वेडा झाला. मी विशेषकेले म्हणून सदर घटना सांगू लागतो. लोक संशयित दृष्टीने निमूटपणे ऐकून घेतात व मला हळुवारपणे कटविण्याचा प्रयत्न करतात. मला कोणीच शहाणा म्हणेना. एव्हाना बायको-सुद्धा (भगताची पोर). घरी जातो, तो बायको मला पाहून (वेडा आला) शेजारचे घरी लपून बसते. आपण शहाणे असून कोणीच शहाणा म्हणत नाही. डोके अधिक तापते. आणि मग खरोखरच अंधश्रद्धा, ढोंगबाजी याविरुद्ध बंड उभारतो. भगत दिसला की मार. देव दिसला की थूक त्याच्यावर व उचला त्याला. देव देवळात नाही हे माझ्या कृतीने आपल्या समाजास थोडे फार पटविण्याचा प्रयत्न केला. आज जरी ४९ वे लागले तरी या विषयावर शिरसाट पूर्वीसारखाच पेटलेला आहे. मी जिवंत असता श्री. जाधव यांनी माझे काम करावे याचेच मनाला दुःख होते.

●

प्रा. बी. रंगराव / अमरावती

आपलं 'बलुतं' अलिकडेच माझ्या हाती आले. ते वाचून मी अगदी भारावून गेलो होतो, कारण त्यातील प्रसंग अनेक प्रकारे माझ्या अनुभवांशी मिळते जुळते आहेत.

●

दीनबंधू शेगांवकर / अकोला

'बलुतं' मधील एका वेगळ्या मुद्याबद्दल हे पत्र आहे. 'शूद्र' हा चौथा वर्ण आहे. त्यामुळे शूद्र जातींना सवर्ण म्हणतात. उपनयन, विद्या आदीपासून तोडलेल्या कुणबी, माळी आदी जातींना शूद्र म्हणण्यात आले. सध्या त्यांना O. B. C. म्हणतात. हिंदू धर्मशास्त्रातील शूद्राबाबतचे निर्बंध ह्या जातींना समोर ठेवून तयार झाले आहेत. डॉ. बाबासाहेबांचा Who Were The Shudra's ? (शूद्र पूर्वी कोण ?) हा ग्रंथ वरील जातींचा कैवार घेणारा आहे, अस्पृश्यांचा नाही. शूद्रांची संख्या ७०-८० टक्के सांगितली आहे.

अस्पृश्य हा शूद्राहून खाली, वर्णबाह्य आहे. त्याला अतिशूद्र म्हणतात. बाबासाहेबांनी अस्पृश्यांसाठी वेगळा ग्रंथ लिहिला. त्याचे नाव Untouchables who were they and why they become untouchables ? (अस्पृश्य मूळचे कोण ?) ग्रंथ लिहिला. महार-मांगादी जाती ह्या वर्गात मोडतात.

वरील प्रकाशात पाहिल्यास 'बलुतं' मध्ये महारांच्या चालीबद्दलच्या परिच्छेदात (पान ४९) आपण 'शूद्र पूर्वी कोण ?' हा ग्रंथ वापरला आणि त्यावरून अस्पृश्यांच्या इतिहासाचे दुवे जुळून आले असे जे म्हटले ते असंबद्ध होय, ती गफलत होय. यावरून दोन गोष्टी स्पष्ट होतात अस्पृश्यांच्या इतिहासासाठी बाबासाहेबांचा कोणता ग्रंथ वापरावा हे आपणास माहीत नाही. विशेष खरी गोष्ट अशी की 'शूद्रां'बद्दलचा ग्रंथ 'अस्पृश्यां'साठी लिहिला आहे अशी आपली चुकीची कल्पना झाली. ही घटना लहान वा क्षुल्लक नाही.

शूद्र व अस्पृश्यांबद्दल संज्ञा एकाच समान वर्गासाठी आहेत, ही आपली चुकीची धारणा. मनुस्मृतीतील नावाबद्दलचा आपण जो उल्लेख केला (पान ४१) त्यावरूनही दिसून येते. मनुने शूद्रापर्यंतच्याच नावांचा उल्लेख केलेला आहे. अस्पृश्यांच्या, आदिवासींच्या नव्हे. म्हणून नावांचे जे नमुने दिले त्यात शूद्रांच्या नावात 'मातंग' शब्द असंबद्ध म्हणावा लागेल.

शूद्र व अस्पृश्य ह्या संज्ञा अभिन्न समजून बाबासाहेबांच्या 'शूद्र पूर्वी कोण ?' हा ग्रंथ अस्पृश्यांबद्दलचा इतिहास सांगणारा, अशी चूक आपल्या बऱ्याच लेखकांनी केली. हे कसे घडले, ही एक उद्वेगजनक गोष्ट होय.

●

देवराम तपासे / निमोण

आपण लिहिलेली 'बलुतं' ही वाचून काहींना स्वतःच्या घराण्याची नालस्ती जगाच्या चव्हाट्यावर मांडल्यामुळे अति संताप आल्याचे दिसते. मी प्रथम वाचन केले. परतही वाचत आहे जो इतिहास लिहिला तो मी सर्व प्रत्यक्ष पाहिला आहे, नव्हे भाग घेऊन सर्व कामे केली. ज्या ज्या व्यक्तींचा आपण उल्लेख केला, ती प्रत्यक्ष पाहिली आहेत.

●

के. आर. देठे / गोरगाव (प.)

[बलुत्यात आलेले के. आर. देठे यांचे चित्रण. नायकाचे मावस भाऊ.]

ज्या मातेने काबाडकष्ट करून आपल्याला घडविले, त्या आत्याला त्रिवार वंदन ! "पुत्र व्हावा ऐसा गुंडा, त्याचा तिन्ही लोकी झेंडा !" मातेची कूस धन्य झाली. हिराताईच्या पदस्पर्शाने आपले जीवन आज खरे बहरले आहे. त्यात सुगंध प्रज्ञाने भरला आहे, वैशाली कारंज्या सोडते, प्रकाश प्रशांतने दिला आहेच.

आपल्या लेखणीने आपली कीर्ती सातासमुद्रापलिकडे पोहचली. समाजाला आपण गोड कोपरखिळ्या दिल्यात. कोणी दुखावले, कोणी सुखावले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची कास आपण सोडली नाही.

●

प्रा. वाय. आर. गायकवाड / औरंगाबाद

भारतीय समाज व्यवस्थेनं श्री. दगडू मारुती पवार यांच्या वाट्याला दिलेलं विषमता, अपमान आणि अठरा विश्व पोशिंदा असं दारिद्र्यरूपी 'बलुतं' आपण शब्दांकित करून, एक अनमोल असा ऐतिहासिक वारसा माझ्यापर्यंत येऊन, माझ्यासमोर एक अभ्यसनीय संशोधनाचा विषय म्हणून, आमच्या विभागातील डॉ. सुधीर रसाळ यांनी ठेवला. त्यामुळे माझा आनंद हाच आपल्याकडे हे अनौपचारिक पत्र लिहिण्यास कारणीभूत झाला आहे. आशा आहे की, आपण त्याबद्दल मला क्षमा कराल.

'बलुतं' वाचत असताना त्यातील स्त्री-पात्रांनी मला अगदी गलबलून सोडलं आहे. 'सई' आणि 'बकुळा' एका कादंबरीचा विषय होतील इतकी सर्जनता असलेली पात्रं, केवळ दयेची याचना करणारे नसून पुरुषप्रधान संस्कृतीला आव्हान देणारे आहेत. त्यांचा तो आवाज शोधण्याचा एक अल्पसा प्रयत्न माझ्या ह्या लघुनिबंधात घ्यावा असा माझा मानस आहे.

आपला दगडू मारुती पवार हा दया पवार कसा बनला याचा हा इतिवृत्त असं काहींचं म्हणणं. परंतु ह्या म्हणण्यात जे दिसतं त्यापेक्षा वेगळं असं त्यात असावं ही माझी समजूत. शैक्षणिक सवलतीमुळे दलित मंडळी हळूहळू कशी प्रस्थापित मध्यमवर्गीय होऊ लागली त्यावर हा आलेखच.

ह्या आलेखाचं संरचनात्मक विश्लेषण करताना, कात टाकलेला साप गारुड्याच्या टोपलीत कसा वेटोळा घालून बसला असावा ह्याविषयी मी काही लिहू इच्छितोय.

एस. पी. दारोळे · संगमनेर

[दारोळे वस्ताद. ' बलुतं 'मधील व्यक्तिरेखा.]

रा. रा. महाशय दया पवार साहेब, आपणास आवडते स्नेही सखाराम पुनाजी दारोळे वस्ताद, संगमनेर, ह्यांचेकडून अनेक अनेक जयभिम. विनंती वि. कळविण्यात येते की, आपण जे पुस्तक बलुतं हे लिहिलेत व कीर्ती संपादन केलीत, त्याबद्दल अत्यानंद होत आहे. आपण उत्तम बक्षीसही मिळवलंत ह्याबद्दलही आनंदीआनंद होत आहे. पुस्तक लिहिताना माझी खरी हकीकत थोडक्यात लिहिलीत. हेही ठीक झाले. तीच माहिती मला भेटून जर लिहिली असती तर मी थोडक्यात उत्तम माहिती आपणास दिली असती. बरे मी हल्ली संगमनेरला माझ्या घरा आहे. मी १९७५ साली इकडे आलो. नंतर दोन वर्षे उत्तम ठीक प्रकृतीत राहिलो. नंतर मला प्रथम उजव्या पायाला बाजूस लखवा मारला. नंतर दोन महिन्यांनी डाव्या बाजूस लखवा मारला. पूर्ण बाजू गेली. ह्या दोन्ही बाजू सुधारता सुधारता आज बरोबर तीन वर्षे होत आहे. आता माझी तब्येत ठीक आहे. म्हणजे मी आता हळूहळू एक मैलभर चालू शकतो. बारा आणे उत्तम उत्तम बोलू शकतो. दोन तीन महिन्यात मुंबईस येऊन आपली सर्वांची गाटभेट घेऊ व घेईन. बरे आपण जे बलुतं) हे पुस्तक लिहिले ह्यात माझी ही माहिती आपण लिहिली म्हणून ते पुस्तक मला संग्रही हवे आहे. म्हणून आपण मला एक प्रत पाठवावी. जी किंमत आहे ती मनीऑर्डने जरूर जरूर पाठवून देईन. काळजी नसावी. उत्तर जरूर जरूर द्यावे लोभ असावा. वाट पाहतो. कळावे. जयभिम.

●

वि. द. घोटणे / सागरमाळ, कोल्हापूर

मी Scheduled Caste No. 31 (अनुसूचित जात क्र. ३१—खाटिक) जन्मलो असून माझे कुलदैवत खंडोबा आहे. मी साठी ओलांडली असून हायस्कूलचा मुख्याध्यापक म्हणून दोन वर्षापूर्वी निवृत्त झालो आहे. फुरसतीच्या वेळाचा उपयोग म्हणून मी ' एका माणसाची कहाणी ' या नावाने मला आलेले अनुभव लिहून काढले आहेत. असो.

तर आपल्या पुस्तकामध्ये पृष्ठ १३४ वर खंडोबाचा उल्लेख आला आहे. त्यामध्ये थोडा चुकीचा संदर्भ आहे तो आपल्या निदर्शनास आणून देण्याची अनुमती घेतो.

खंडोबा हे दैवत मागासवर्गीयांचेच असले तरी ते कुलदैवत कोकणस्थ ब्राह्मणांमध्ये-देखील आहे.

माधव कोंडविलकर / देवरूख

दुःख, व्यथा समाजव्यवस्थेमुळे दलितांच्या वाट्याला आलेले भोग, काय एकट्या दया पवारचेच नाहीत की ते एकट्या माधव कोंडविलकरचे नाहीत, ते समस्त दलितांचे आहेत. आणि ते जोपर्यंत नाहीसे होत नाहीत, नाहीसे होण्याची निकट्या काळात आशा दिसत नाही, तोपर्यंत असल्या पुस्तकास माझ्या दृष्टीने काही महत्त्व नाही.

कुणाला खरे वाटणार नाही. आपल्याला ते वाटेल-कारण आपल्या आजच्या वयात आपण नेमकी माझीच (आणि आपली) व्यथा बरोबर व्यक्त केली आहे—' यशाबरोबर कमालीची बेचैनी असल्या आत्मकथनातून वाट्याला येते हेही विसरून चालणार नाही. ' हे वाक्य माझ्या काळजाला जाऊन भिडले. गेले चार-सहा दिवसांचे टेन्शन जरा कमी झाले. आपल्यासारख्या नव्या लेखकाला मोठी प्रकाशन संस्था लाभणे हा खरोखर दुर्मिळ योग—कोणीही फुगून जावे असा.

●

स. प. घस्ते / औरंगाबाद

अनेक थोरामोठ्यांचो चरित्रं वाचली आहेत. त्यामध्ये त्यांनी आयुष्यात घेतलेले श्रम, उत्कर्षासाठी केलेले प्रयत्न, देशभक्ती वगैरेबाबत वाचून काही अंशी प्रभावित झालो होतो. यथावकाश सर्व काही विसरूनही गेलो. आपले पुस्तक ' बलुतं ' अलिकडेच वाचले. ते वाचत असता माझ्या स्वतःच्या तसेच बालपणापासून माझ्या संबंधामध्ये आलेल्या व्यक्तिंची, त्यांच्या जीवनाची आठवण होऊन पुनःप्रत्ययाचा आनंद उपभोगता आला. पुस्तक अत्यंत चटकदार झाले असून सर्व प्रसंग जिवंत व आपल्यापैकी अनेकांनी अनुभवलेले आहेत. तसेच ' महार ' समाजाला कोणत्या परिस्थितीमध्ये जीवन जगावे लागत आहे, त्याचे विचार-आचार याचे स्पष्ट चित्र उभे राहाते. ' दलित साहित्या 'च्या व्याख्यांचा वाद सध्या चालू आहे. माझ्यासारख्या सर्वसामान्य वाचकाला त्याचे सयुक्तिक उत्तर आपल्या ' बलुतं 'मध्ये सापडले. " ज्या साहित्यामधून दलिताला त्याच्या जीवनाचे वास्तववादी चित्र, आपल्या जीवनाचा पुनःप्रत्यय आढळून येतो, त्यालाच ' दलित साहित्य ' असे म्हणावे, मग ते कोणीही लिहिलेले असो. " सर्व दृष्टीने आपले पुस्तक हे खरेखुरे ' दलित साहित्य ' म्हणावे लागेल.

' बलुतं ' पुस्तकामध्ये अनेक प्रसंगी तुमचा स्वभाव मित्रा असल्याचे सांगितले आहे. परंतु माझ्या मते काही प्रसंगांतून पुरेसा ' धीटपणा ' स्पष्ट होत आहे. म्हणून मूळ घीटाईचा स्वभाव असून प्रसंगी आर्थिक, सामाजिक अगतिकेमधून आपल्या सर्वांना ' भित्रेपणा ' ग्रासून जातो हे सत्य आहे.

राजकीय व्यक्तिंचा उल्लेख अजून स्पष्ट झाला असता तर समाजाला त्यांची उचित व निःसंदिग्ध माहिती मिळू शकली असती.

●

मधुकर तुपलोंढे / गोरेगाव (प.)

खरं म्हणजे, तुला पत्र का लिहावं तेच समजत नाही. दुःखाचं लेणं जसं कुरवाळत निस्तब्ध बसावं, तसं तुझं 'बलुतं' वाचलं. निखळ असा नदीचा संथ प्रवाह चांदण्या रात्रीत दिसावा असं हे तुझं आत्मचरित्र निखळ आहे; प्रवाहीत आहे, खोल आहे आणि चांदण्या रात्रीसारखं गूढही आहे. असंच जीवन किंबहुना आपल्या सर्वांचं आहे तुझं, माझं, अर्जून, पद्माकर आपण समाज जीवनाच्या वृक्षावरील असेच पक्षी आहोत. पण ही झाली एक बाजू. दुसरी सामाजिक बाजू मात्र खूपच प्रखर आहे. तिचा कनव्हास फार मोठा आहे. खूप पदर आहेत. तुझ्या 'बलुत्या'मधील प्रत्येक व्यक्ती ही एक स्वतंत्र कथा वाटते. सामाजिक जीवनाचे जे अनेक पदर तू दाखवले आहेस, त्यातून व्यक्तिमत्त्व घडत नसतं तर त्या जीवनास ते सडत असतं असं भासतं. जीव जीवाणूंपेक्षा मेंदू माणसाचा आहे म्हणून जीवन म्हणायचं एवढं हे सामाजिक विश्व भयाण आहे. ज्यांनी आमच्यासाठी हे विश्व निर्माण केलंय, त्याचं उत्तर तू देऊ शकला नाहीस, याची मात्र खंत वाटतेय. कदाचित असंही होईल, याचा हिशोब पुढील पिढीच करील. हातात शस्त्र घेऊन किंवा शासन घेऊन.

सामाजिक जीवनाबरोबरच आर्थिक जीवन मात्र तू खूपच रोडावल्यासारखं दाखवलंस. ज्या आर्थिक दैन्यानं आपल्याला हे दिवस आले, आणि आपण वंचित राहिलो तोही प्रश्न मनात गुंता करून राहिला आहे. एक मात्र बरं केलंस, ज्या पुढाऱ्यांच्या खांद्यावर आपण विश्वासानं मान ठेवली होती, त्यांना तू नागडं केलेस. पण दया! एवढा प्रचंड विध्वंस पाहूनही, बाबासाहेब आंबेडकरांसारखा प्रचंड झोत तुझ्यापुढं असताही, ज्ञानाचे दरवाजे खुले होत असताही, परिस्थितीला लाथ मारून, तिचा कोथळा फोडून तू तुझं व्यक्तिमत्त्व पुरुषी बनवू शकला नाहीस ह्याची खंत वाटतेय. जसा जसा पुरुषांवर प्रहार पडावा, पण त्या रसायनांतून पोलाद तयार व्हावयाच्याऐवजी तू ठिसूळ लोखंडासारखा–Cast Iron सारखाच–राहिलास ह्याबद्दल मला तुझी कणव येतेय. तुझ्यातील दुर्मुखलेपणा किंवा अंतर्मुख स्वभाव याला कारणीभूत आहे. याचा सर्वस्वी दोष हा तुझाच आहे. म्हणून जी खंत, आलेल्या अनेक संधी तू घालवून बसला असशील आणि म्हणूनच तू कधी ताठ उभाच राहू शकला नाहीस. क्षमा कर! पण हेही जाणवलं.

दलित समाजातील प्रसववेदना तूच सांगू शकलास याबद्दल तुझे अभिनंदन. तुला आता अनुभवानं कळलंच असेल की, समाज, वर्णव्यवस्था, शासन आणि दारिद्र्य ह्या भयानक गोष्टीबरोबर आपले युद्ध अटळ आहे. हे सर्व बदलायचं आहे. स्वतःपासून सुरुवात नव्या उमेदीनं करावयाची आहे. तुझ्या पुस्तकातील नैसर्गिक (कायदे) जीवन मला खूपच आवडलं. माणसं जिवंत वाटली. बदलत्या परिस्थितीतील जीवनाच्या घड्या फारच उत्तम उलगडल्यास. हसू आणि अश्रूचं हे गुंफण भावपूर्ण आहे. तू खूप लिहावस. तुझ्या-माझ्यासाठी नाही; तर ह्या आपल्या गरीब, दुबळ्या समाजासाठी की ज्याच्या गर्भातून नवक्रांतीचे हुंकार बाहेर पडू देत. जास्त काय लिहू? हृदय दाटून येतेय, अश्रू

तरळतात, मन गलबलून येतंय आणि क्रोधानं चित्कार करावासा वाटतो की, आताशी एक बलुतेदार जागा झालाय अजून अकरा शिल्लक आहेत. बचेंगे तो और भी लढेंगे ! वेइमान्यांशी लढलंच पाहिजे.

●

बेले बी. के. / नागमोडे (गोवा)

मी 'बलुतं' वाचले. विशेषतः माझ्याच आई-वडिलांच्या भाषेत लिहिलेले असल्याने मला फारच आवडले. माझी आई अंगठाबहाद्दर. पण तीदेखील हीच पुस्तकं मला वाचून दाखव अशी म्हणायची. तिलाही पुस्तक पाचदा वाचून दाखवली. अक्षरशः रडायची ! पुस्तकातील काही प्रसंग जेव्हा तिला चटका देत, तेव्हा तर ती सुन्न व्हायची. बिचारी आई, ती पण पूर्वीचे दिवस आठवायची. म्हणायची, " बेटा ! आम्ही फारच त्रास घेतला पण तुम्ही घेऊ नका ! " आणि अडाणी माझी आई म्हणायची, " बेटा, आम्ही फार त्रास घेतलाय, तुम्ही संघटित व्हा, खूप संघटित व्हा, त्याग करा, खूप त्याग करा. लढा द्या, खूप लढा द्या. अन्यायाला वाचा फोडा व समाज-व्यवस्थेच्या दास्यातून मुक्त व्हा ! तेव्हाच बाबासाहेब आंबेडकरांच्या आत्म्याला शांती मिळेल. " आई बोलत होती मी शब्दांकन करीत होतो. माझी आई अडाणी असूनही बोधीसत्व बाबासाहेबांची वेडी. आजही ती जिवंत आहे. बाबासाहेबांच्या जन्मदिनात व मृत्युदिनात आजही मोठ्या हिरीरिने भाग घ्यायला सांगते व आम्ही देखील बाबासाहेबांकरिता आईच्या म्हणण्याप्रमाणे प्राणाची आहुती द्यायला सदासर्वकाळ तयार आहोत.

आपण बलुतं लिहून बाबासाहेबांचा जो पेहराव पुस्तकात मांडला व प्रत्यक्षात स्वतःवर समाज व्यवस्थेतून घडलेला अन्याय मांडला, त्याबद्दल खरोखरच धन्यवादास पात्र आहात.

मी बलुतं वाचल्यानंतर शपथच घेतली आहे की, 'उर्वरित आयुष्य बाबासाहेबांकरिता अर्पण करीन व सामाजिक संघटनेत हिरीरिने भाग घेऊन त्यांचे ऋण फेडण्याचा अहर्निश प्रयत्न करीन ! ' हीच प्रेरणा 'बलुतं 'ने मला दिलेली ! बलुतं वाचल्यानंतर मी पवित्र दीक्षा-भूमीला भेट दिली व बौद्ध साहित्य विकत घेऊन आज मी अभ्यासाला बसलो आहे. आशा आहे, आईची इच्छा असल्यास व प्रयत्नाने साथ दिल्यास, जरूर छोटासा लेखक होण्याची माझी इच्छा फळास येईल अशी खात्री बलुत्यानेच दिली आहे.

●

सुभाष धोत्रे / ठाणे

आपलं पुस्तक वाचलं आणि एका वेगळ्या आविष्काराने मी भारावला गेलो. 'बलुतं' माझं-तुमचं-आणि साऱ्या बौद्ध बांधवांच्या जीवनात आलेल्या अनुभवांचं सत्यरूप आहे.

●

रा. स. जाधव / गोवा

आपल्या 'बलुतं'नं आपली तोंडओळख, आणि या पत्राने तुमची अन् माझी मैत्री होईल या इराद्यानं हे पत्र मी आपणास लिहीत आहे. महत्प्रयासानं आणि ग्रंथपालाला चहा-वटाण्यांचं आमिष दाखवून आपलं 'बलुतं' मिळविलं. पुस्तकासाठीच तर कित्येक जादा फेऱ्या मला वाचनालयात माराव्या लागल्या. पण आपणास माहीतच आहे की प्रत्येक गोष्टीला pusher हवा. नाहीतर सगळं ब्लॉक. पुस्तक मिळविलं अन् कित्येक दिवसांची अपुरी इच्छा पूर्ण झाल्याचं समाधान लाभलं. पुस्तक वाचून काढलं. पुस्तक हातातून खाली ठेवावसं वाटेना. कारण त्यात माझ्या महार समाजाचं दारूण, किळसवाणं प्रतिबिंब पाहायला मिळत होतं. काही वाक्यं तर पुस्तक बंद करून अंतर्मुख व्हायला लावत होती. सत्याचं दर्शन घडविणारे, आपण सोसलेल्या यातनांचा पुरावा; नव्हे माझ्या जातीला सहन करावया लागणाऱ्या यातनांचा आरसाच. गोव्याला आपण साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आला होता; पण मी आजारी असल्याने आपली भेट मनात असूनसुद्धा होऊ शकली नाही. सुरेश राणे नावाचा माझा मित्र आपणास भेटला, गप्पा-गोष्टी केल्या. त्यानं मला आपल्या कवितांविषयी, आपल्या साहित्याविषयी अन् स्वभावाविषयी सांगितलं. यापूर्वी 'श्री' साप्ताहिकातील 'बलुतं'विषयीचं समीक्षण वाचनात आलेलं. मला वाटतं ७ एप्रिल १९७९ चं साप्ताहिक असावं. त्या दिवसापासून आपल्या बलुत्यासाठी टपलोय. म्हणजे पुस्तकासाठी हं! नाहीतर म्हणाल, त्या बलुत्यासाठी. आम्ही बलुत्यासाठी नाही जात. कारण मी मूळचा कोकणातला. खांडेकरांच्या शिरोड्याचा (मिठाचा सत्याग्रह फेम). आता गोव्यात शिक्षक. दुसरा भाऊ एस. टी.त ड्रायव्हर अन् तिसरा भाऊ आय. टी आय.चा कोर्स करतोय. त्यामुळे बलुतं जमा करायला आहेच कोण घरी? वडील नाहीत त्यामुळे त्या किळसवाण्या गुरे फाडण्याच्या व्यवहारात घरातला कुणी नाही. जुन्या पिढीपैकी जमा कॉलममध्ये कुणी नाही. त्यामुळे बिनधास्त. वाचनाची आवड (फार). कविता करण्याची चट लागलीय.

●

के. डी. गवांदे / कळस, ता. अकोले

पत्रास कारण की, ता. ३।४।७९ रोजी 'श्री' साप्ताहिकाचा स्पेशल रिपोर्ट सहज पाहाण्यात आला. तो पण तुझा फोटो पाहिनंतरच लक्ष गेले म्हणून. 'श्री' साप्ताहिक विकत घेतले. तो पाहिल्यानंतर माझा आनंद गगनात मावेनासा झाला व तोच 'बलुत्या'तील दुःखाची छाया डोळ्यापुढे उभी राहिली. पहिल्या घरोबापासून उद्ध्वस्त झालेले जीवन योग्यवेळीच सुधारले नसते तर आज मला अगर महाराष्ट्राला 'बलुतं' पाहता अगर वाचतासुद्धा आले नसते.

●

उत्तम कांबळे / नांदेड

तुमच्या बलुतंविषयी गेल्या एक दीड वर्षापासून उलटसुलट प्रतिक्रिया वाचत होतो. पण वाचावयास मिळाले नाही तेव्हापासून बलुतंविषयी मनात जिज्ञासा उत्पन्न झाली. मन पुस्तक वाचण्यासाठी धडपडत होते. कोठेही त्याविषयी समीक्षा छापून आली की अधाशासारखा वाचत होतो. काही दिवसापूर्वी बौद्ध साहित्य परिषदेतर्फे प्रकाशित झालेलं एक पुस्तक वाचलं. सदरील पुस्तकात बलुतंवर अवास्तव चिखलफेक केलेली पाहून वाईट वाटलं. आपली माणसं आपल्याच माणसांचे पाय ओढतात! या पुस्तकात आपणावरील वैयक्तिक टीका वाचून आपल्या समाजातील तथाकथित पांढरपेशा साहित्यिकांबद्दल अत्यंत घृणा वाटू लागली आहे.

पत्र लिहिण्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे पुस्तक मला कालपरवाच वाचावयास मिळालं. पुस्तक वाचून डोकं सुन्न झालं. पुस्तकाच्या प्रत्येक पानावर दगडू पराभावाच्या गर्तेत लोळताना वाचून त्याच्याबद्दल तिटकारा वाटला नाही; तर येथील समाज-व्यवस्थेबद्दल अधिकच चीड वाटत होती.

पुस्तक वाचताना दगडूची आई माझीच आई वाटली. तिने हयातभर सोसलेल्या वेदना, तिचा दुःखपीडित चेहरा माझ्या डोळ्यासमोर आतादेखील उभा आहे. तिच्यासाठी दगडू हयातभर काही करू शकला नाही. पण आता दगडू साहित्य क्षेत्रात चमकत आहे. पैसा, मानमरातब त्याच्यापुढे झुकत आहे, आता जर दगडूची आई असती तर तिला काय वाटले असते?

बलुतंमधील माझ्या मनावर परिणाम करणारी घटना म्हणजे जेव्हा दगडू आपल्या आईविषयी, तिच्या चारित्र्याविषयी मनात शंका बाळगतो व जेव्हा ही गोष्ट त्याच्या आईला कळते, तेव्हा त्या माऊलीला काय वाटले असेल? तिच्या त्या वेळच्या परिस्थितीचे वर्णन एक दोन ओळींने करून भागणार नाही. आपल्या मुलानेच आपल्यावर अविश्वास दाखवल्यावर, कोणती आई समाजात उजळमाथ्याने जगेल? पण दगडूची आई जगली—दगडूला वाढवण्यासाठी.

यानंतर असंच दुसरं पुस्तक तुमच्याकडून लिहून पूर्ण होईल असं मला वाटत नाही. दगडूची आई गेली, त्याबरोबर भूतकाळ पण संपून गेलाय. आता दगडू, दगडू नसून दया पवार झालेला आहे. तो मोठा झालेला आहे. थोरामोठ्यांच्या संगतीत वावरत आहे. याचा अर्थ असा नव्हे की तो आपल्या लोकांना विसरलाय, तरी पण पूर्वीचा दगडू साकार होणं शक्य नाही.

लिहिण्यासारखं बरंच काही आहे; पण लिहू शकत नाही. कारण आता आपणास माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसांची पत्रं वाचण्यास वेळ नसणार. तेव्हा तुमचा वेळ वाया घालवणे बरोबर ठरणार नाही.

●

रा. श्री. तावरे / शेवगाव (अ. नगर)

मी आपलं 'बलुतं' वाचलं. फार उशिरा वाचलं. पण मनावर कायमचा ठसा उमटवून गेलं. आपण जे भोगलं ते खरोखर भयानक आणि हृदयविदारक आहे. असं जीवन कोणाच्याही वाट्याला येऊ नये. परंतु आजच्या या विषम समाजव्यवस्थेत अशी वेडी आशा ठेवणं म्हणजे मृगजळापाठोपाठ धावणं आहे. आपल्या पुस्तकाने माझ्या ऊर्मी जागवल्या. मी पण विचार केलाय की आपणही असंच आपलं जीवन चितारले तर! मी कुंभार समाजातील. खेड्यात जन्माला आलो. माझ्याही, माझ्या कुटुंबाच्याही वाट्याला समाजातील जात-पात व तत्सम दुःख आलेले आहे. बलुतेदारी पद्धतीमुळे वरंचसं भोगावं लागलं आहे. ते जीवन आपल्यासारखं भयानक खासच नाही, याची मला जाणीव आहे. पण इतर सुखवस्तू जीवन जसं असतं, तसं खासच नाही. मी जे काही भोगलं, कुंभार समाजाची अवस्था कशी होती व आहे हा केन्द्रबिन्दू घेऊन, जाता जाता माझ्याही जीवनात डोकावणारं लिखाण मी करणार आहे. या कामी आपले आशीर्वाद मला हवे आहेत.

•

प्रा. यादव गायकवाड / सेलू

दया पवाराचं 'बलुतं – एक अभ्यास' ही शोध-प्रबंधिका मराठवाडा विद्यापीठाने स्वीकृत करून मला एम. फिल. मराठी ही पदवी प्रथमश्रेणीत दिली आहे.

सदर प्रबंध-लेखनात विद्यापीठीय पदवीसाठी हवी ती तांत्रिक बाजू सांभाळताना दलित आत्मकथा आकलन आणि आस्वादाची दिशा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या दृष्टीने सदर लेखन पुस्तक रूपात येणं आवश्यक वाटले. म्हणून ग्रंथालीशी संपर्क साधला.

•

डी. एन. दुपारगुडे / होटगी

होटगी येथे आल्यावर आपलं 'बलुतं' वाचून काढलं, तो हैराण होऊन गेलो. थोडेस माझे बालपण आठवले. खरे पाहता, दादा आपण एवढे उघडउघड लिहिण्याचे कसे धाडस केले हो? आपण म्हटल्याप्रमाणे हे सर्व खरे बोलण्याचे धाडस आपणास आपल्या मातोश्रीपासून मिळाले, याचा प्रत्यय आला.

•

नारायणराव भोईर / भिवंडी

मी एक पुस्तकवेडा माणूस आहे. मिळेल ते वाचतो. सामाजिक रूढीबद्दल केव्हा मन खवळते, केव्हा चक्रावून जाते. अशाच अवस्थेत आपलं पुस्तक माझ्या हाती पडलं. वाचता वाचता डोळे ताठ झाले. वाचनात काही चूक होते का म्हणून पुस्तकाची फेरउजळणी केली आणि माझी मती गुंग झाली.

कारण मी अनेकांची आत्मचरित्रे वाचली. म. गांधींचेसुद्धा. पण सर्व आत्मचरित्रांमध्ये आपल्या आईवडिलांचा, कुटुंबाचा कुठेतरी चोरकप्पा दडलेला दिसतो. कारण जीवनातील सत्य कहाण्या लिहिण्यासाठी हिम्मत आणि ताकद असावी लागते.

आपण कोणाचाही मुलाहिजा न ठेवता स्वतःपासून ते आईवडलांपर्यंत मनमोकळे करून 'बलुतं' सादर करण्याचा अग्निहोम निर्माण केला. माझी डॉ. बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानावर डोळस श्रद्धा आहे. त्यांचे वाङ्मय म्हणजे दलितांना जिवंत माणूस होण्याचे एक औषध आहे. आणि त्यामुळेच आपल्या हातून 'बलुतं' सादर करण्याचे चोख कर्तव्य पार पडले असे वाटते.

आपलं पुस्तक सर्व दलितांनी वाचलं तर त्यांना पुढील वाटचाल करणे खूप सुखाचे होईल. त्या दृष्टीने मी आपल्या पुस्तकाचा एक प्रचारक म्हणून आजपासून संधी मिळेल तसे काम करणार.

•

आर. एस. गायकवाड / मुंबई

आपल्या लिखाणात वगळावगळी नाही याचा मला अभिमान वाटतो. बऱ्याच जणांच्या लिखाणात बुद्धधर्म, धर्मान्तर, धार्मिक-सामाजिक पुनरुत्थान याचा उल्लेखच नसतो. ते साहित्याच्या तंत्रात बसत नाही की काय मला माहीत नाही; पण ओघाओघाने जर ते येत असेल तर, कालपरत्वे घडामोडींच्या अनुक्रमाने ते जर येत असेल तर, ते लेखकाने, कविने का गाळावे याचाच मला अचंबा वाटतो. तुम्ही मात्र तसे वगळणे (एकारणे) करत नाही हे चांगले आहे, नव्हे ते समाजाच्या प्रतिष्ठेला शोभूनच दिसणारे आहे, समाजाची प्रतिष्ठा वाढविणारे आहे. अरे आम्ही 'तसे...' होतो आणि आता 'असे असे' आहोत. आम्ही एवढा मोठा प्रगतीचा टप्पा गाठला हे सांगण्यात जो अभिमान आहे, प्रतिष्ठा, सन्मान आहे, तो पूर्वीचेच, फक्त पूर्वीचेच रडगाणे गाण्यात नाही पूर्वीच्याच डबक्यात उड्या मारून, नाचून घाण पाणी आणखी खंदळण्यात काय अर्थ आहे? त्यांचे तेच जाणे! अहो तुलनेला भरपूर मसाला असताना दुसरी बाजू— धर्मान्तराची, बौद्ध धर्माची बाजू, उत्कर्षाची बाजू—वगळणे चांगले नव्हे! आपण ते जाणता म्हणून आपले त्रिवार अभिनंदन.

•

हुणशीमोरे मल्लिनाथ / अथणी, कर्नाटक

(१)

'बलुतं' सर्वांनाच आवडतंय, आवडलंय ती कथा म्हणूनच. आणि या कथेचा उपयोग मनोरंजन म्हणून करतात. (मुख्यतः समाजातल्या 'अ' गटातले लोक) त्यांना या पुस्तकापासून होणारे बोध होत नाहीत. ते पुन्हा दलितांना डाफरतीलच. कदाचित मुंबईची परिस्थिती वेगळी असेल.

बस! यापुढे माझे विचार पानांवर मांडू शकत नाही, पत्र इथेच थांबवितो आहे. कारण मी बडबडतो, परंतु साधं चार ओळींचं पत्र खरडू शकत नाही. कल्पना नाही कसं आणि का पुस्तक तीन चार वेळा संपूर्ण वाचले. आणि मला कुठंतरी दूरवर काहीतरी चमकताना दिसते आहे पण नेमकी ती वस्तू कोणती याची कल्पना येत नाही.

कानडी मुलुखातला असल्याने माझ्या भाषेला व्याकरण नाही, तरी क्षमस्व! पुन्हा कधीतरी एखादं सुंदर पत्र तुम्हाला मजकडून पाठविणार आहे, त्यात 'बलुतं'नं मला काय present केलंय याचा उल्लेख मी करणार आहे. आज खूपसे विचार आहेत पण माझ्या दुबळेपणामुळे कागदावर उमटत नाहीत. अच्छा.

(२)

'बलुतं'वरील चर्चा खरंच खूप, खूप वैचारिक आणि वैज्ञानिक दृष्टीकोनातून व्यवस्थित व उद्‌बोधकरित्या झाली. भाषेची अडचण सोडल्यास ही चर्चा खूपच सुंदर होती. ६० ते ६५ व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला होता. ३० ते ४० जणांनी आपले मत मांडले. मी तेव्हाच पत्र पाठविले असते तर नक्कीच आमचे विचार लिहिले असते. परंतु मी त्यावेळी दुबळा होतो. तरी इथं 'बलुतं' आणि डावी विचारसरणी, सरंजामशाहीच्याविरुद्ध जातीयतेसंबंधी ("कोमवादी" असे कानडीत म्हणतात) खूपसे विचार circulate होत आहेत. फक्त मीच तेवढा त्यांना मिळत नव्हतो. 'बलुतं' तसंच डॉ. शिवराम कारंथ यांची 'चोमन दुडी' (चोराचा डमरू) सारखी पुस्तिका हुन्नरी तरुण जनमानसात पसरवित आहोत. एकूण माझ्या गावात निदान तोंड उघडणारी माणसं तयार होत आहेत याचा मला खूपच आनंद होत आहे.

इथं एक छोटासा पेपराचा तुकडा आहे. बेळगावच्या ज्येष्ठ कवियित्री 'इंदिरा संत' यांच्या 'गर्भरेशीम' या काव्यसंग्रहास कै. अनंत काणेकर पारितोषिक मिळाले आहे. या निमित्ताने दैनिक सकाळशी बातचीत करताना त्यांनी दलित साहित्य म्हणजे समाजाचा एक विशिष्ट (?) कप्पा आहे आणि आम्ही त्याकडे विशिष्ट कप्पा या अर्थाने बघितलं पाहिजे की काय असा अर्थ निघतो असं मला वाटत आहे. आजच्या समाजातला सामान्य मनुष्य म्हणजे मला तो दलितच वाटतो, तर मग दया पवारांच्या साहित्याला, नामदेव ढसाळांच्या कवितेला दलित हे शब्द विनाकारणच आणि परंपरागत वाटतात. प्रत्येक देशाच्या इतिहासात असे काही प्रसंग घडून येतात की मग तिथे त्या देशाच्या

इतिहासाला कलाटणी मिळते. ही कलाटणी साध्य होण्यासाठी, नावीन्यता आणण्यासाठी, त्या देशातील साहित्य हे मूळ कारण असते. आजच्या समाज परिवर्तनासाठी आमच्या देशाच्या वाङ्मयात जी पुस्तक लिहिली जात आहेत, त्यांची 'दलित साहित्य' या आवरणाखाली मुस्कटदाबी तर होत नाही ना, अशी भीती वाटते आहे. खरंच माझ्या दृष्टिकोणात सगळाच समाज आणि समाजातील प्रत्येक व्यक्ती दलित आहे. थोडे हातावर मोजण्याइतके ज्येष्ठ आणि श्रेष्ठ आहेत. सामाजिक क्रांतीसाठी लिहिलं गेलेल्या लेखाला किंवा साहित्याला जिथपर्यंत दलित साहित्य म्हणून म्हटलं जाईल तिथपर्यंत काहीच शक्य नाही असं मला वाटतं.

म्हणून म्हणतो 'बलुतं'मध्ये प्रत्येक सामान्य वाचकाला दगडूच्या ठिकाणी स्वतःची प्रकृती आणि आईच्या ठिकाणी स्वतःची आई वाटली पाहिजे आणि दिसली पाहिजे, तिथपर्यंत 'बलुतं'ची पानं सार्थकी लागणार नाहीत असं मला वाटतं. म्हणूनच मला म्हणावसं वाटतं की सामाजिक परिवर्तनासाठी, समाजाच्या अनिष्ट चालीरितींना केंद्रबिंदू समजून केलेल्या लेखनाला 'सामाजिक साहित्य' म्हणायला हरकत नाही. जिथपर्यंत आमच्या जिभेवर 'दलित' हे शब्द आहे, तोपर्यंत आम्ही समाजात दलितपणा शोधण्याचा प्रयत्न करणार आणि नसेल तर निर्माण करणार असं मला वाटतं. तरी आपण आपले विचार कळवावेत. माझ्या लिहिण्याचा तात्पर्य एकच आम्ही सगळेच कुठल्या ना कुठल्या तरी रितीने दलितच आहोत. दलित हे पुसून काढण्यासाठी पहिल्यांदा 'दलित' हा शब्द जो आम्ही दुसऱ्यांसाठी वापरतो तो पुसून काढला पाहिजे.

•

ध. ना. सरवदे / रत्नापूर

मी आपलं 'बलुतं' मनःपूर्वक वाचलं. खूप आवडलं. परंतु आपण प्रथमच सांगितलेलं आहे की, 'कुणाला सांगू नये' हा नियम मोडला तो म्हणजे, रत्नापूरमध्ये रात्री 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' याचं अध्यायन चालू आहे. ऐकण्यासाठी महार मंडळी येतात. त्यांना हे वाचून दाखविलं. उदा. ५२ हक्कांचा महार, चांदण्या इत्यादी. सर्व लोकांनी तुमची स्तुती केली. त्यांना सांगितल्याचा जो मी आपला गुन्हा केला, नियमभंग केला, त्याबद्दल क्षमा असावी.

पुस्तक जरा उशिराच हाती पडलं. प्रकाशकांना मी हात जोडून एक विनंती करतो, ह्या पुस्तकाची किंमत फार आहे. ती आपल्या समाजाला पेलावणारी नाही. पुस्तक आपणाला तळा-गाळातील माणसांपर्यंत पोहोचवायचं आहे. एवढी किंमत देऊन विकत घेणे अशक्य आहे.

•

निळकंठ मेश्राम / यवतमाळ

आपण अनुभवलेलं जीवनवर्णन जीव ओतून, चिकाटीनं, उत्कटपणे जनतेच्या दरबारात मांडलं, ते सगळ्यांनाच आवडलं ! वैभव आणि प्रतिष्ठेच्या शिखरांवर 'बलुतं' विराजमान झालं. त्यामुळे ते दीन-दलितांच्या अंधाऱ्या जीवनाला उजाळा देण्यास समर्थ होईल यात शंका नाही !

•

बी. व्ही. कांबळे / उस्मानाबाद

मी माझ्या आयुष्यातील अनुभव 'घुसटमलेल्या दयाची कथा' आणि 'बलुतं' वाचून पडताळलं तेव्हा ते अनुभव माझेच वाटले. इतकंच नव्हे तर माझं नावसुद्धा 'दगडू'च आहे. माझ्या भोवतालचे सवर्ण अजूनही मला 'दगड्या' म्हणून संबोधतात. माझे हितचिंतकसुद्धा 'दगडू गुरुजी' म्हणतात. माझ्या आसपास मला विघ्नसंतोषी मित्र पावलोपावली भेटतात. त्यामुळे मी आज 'एक शिक्षक' म्हणून अत्यंत दुःखी जीवन जगतोय. खरोखर विश्वासावर कुरघोडी जेव्हा होते तेव्हा ...! असो.

•

दिलीप मुन / पुणे

'बलुतं'ने मला खरोखरीच अत्यवस्थ केलं. 'आजच्या शिक्षणाने आमची सांकृतिक नाळच तोडली जात आहे' या तुमच्या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे.

बलुतंच्या मागील तुमच्या भूमिकेशी मी पूर्ण सहमत आहे. त्याचप्रमाणे आपण अस्मितादर्शच्या सोलापूर येथील मेळाव्यात उद्घाटनपर केलेल्या भाषणाशीही मी सहमत आहे. दलित साहित्याला एक निश्चित अस्मिता व उज्ज्वल भवितव्य आहे याबद्दल माझ्या मनात तीळमात्र शंका नाही. परंतु दलित साहित्य व दलित रंगभूमी यात काही मतभेद असल्यास ते त्वरेने मिटले पाहिजेत असे मला आवर्जून वाटते.

परमपूज्य बाबासाहेबांचे स्वप्न साकार करण्यासाठी आपल्यासारखा एक प्रामाणिक साहित्यिक, अत्यंत प्रामाणिकपणाच्या भावनेतून लेखन करीत आहे हे वाचून मनाला अत्यानंद झाला. 'बलुतं'चे सर्वांत मोठे यश त्याच्या लेखनामागील प्रामाणिक भूमिकेत आहे.

•

भगवान तांबेवाघ / मुंबई

'बारा-बलुते'दारांना निश्चितच आनंद झालेला असणार. त्याउपर उभ्या महाराष्ट्रातील पिढीजात साहित्यिकांना तुम्हामुळे आपल्या व्यासपीठास आणि वेचारिक बैठकीस दुजाभाव करणे दुरापास्त होईल हे वेगळेच. अलबत् ! याला अपवाद काय तो पु. ल. दे.चांच !! पु. लं.च्या साहित्य प्रवासात दुजाभाव तो काय मी तरी अद्याप अनुभवला नाही 'बलुतं'वरील त्यांच्या परीक्षणातून हेच तर दिसून येतं. किंबहुना ते प्रकर्षाने जाणवते.

•

भीमराव धीवर / मुंबई

आपलं पहिलंच प्रसिद्ध झालेलं 'बलुतं' हे पुस्तक वाचलं व ते आवडलं देखील. सदर पुस्तक वाचत असताना दुःख, मत्सर, हेवा, राग, आनंद, प्रेम आणि माया ह्या जीवनातील काही प्रमुख अवस्था आहेत, त्यांचा अनुभव पुस्तकातील प्रत्येक पानात, नाही प्रत्येक ओळीत, नाही नाही, प्रत्येक शब्दात आला. परंतु बऱ्याचशा वेळी हृदयाला पीळच जास्त पडले. अशा ह्या प्रभावी लिखाणाबद्दल आपले अभिनंदन आधी करावे की आपल्यावर अशी परिस्थिती लादणाऱ्या समाजव्यवस्थेला आधी दोष द्यावा हा प्रश्न पडतो. दलित समाजात जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात कमी-जास्त प्रमाणात असेच अनुभव येतात. आपण ते कुठलाही आडपडदा न ठेवता व कुणाचाही मुलाहिजा न ठेवता अतिशय समर्थपणे मांडलेत त्याबद्दल आपले करावे तितके अभिनंदन थोडेच.

दुसरे असे की आपलं हे पुस्तक आता थोड्या लोकांनी वाचलंय, बरेच लोक वाचताहेत व आणखी कितीतरी लोक ते वाचतील की ज्यामुळे आपणास बरीच प्रसिद्धीही मिळेल व अनेक मोहाचे प्रसंगही येतील. अर्थात, आपण ह्या गोष्टी अनुभवाच. तुमच्यातील लेखकाला कृपया कुठल्याही गोष्टीच्या आहारी जाऊ देऊ नका ही नम्र विनंती. नाहीतर आपणास माहीतच आहे की दलित समाजातील एखाद्याच्या पुस्तकाचा बराच बोलबाला झाला की पुढे तो लेखक म्हणून 'पूर्णविराम'च्या जवळपास भटकत असतो. आपण तसे होऊ देऊ नये ही पुन्हा एकदा विनंती. तसेच आणखी थोड्याच दिवसात आपल्या दुसऱ्या पुस्तकाची, निदान त्याबद्दलच्या घोषणेची अपेक्षा करतो, हेच एक आपणाकडे मागणं.

•

पी. बी. सावंत / पुणे

आपलं पुस्तक वाचलं. वाचलं कसलं, वाचावंच लागलं. अतिशय ओघवती भाषा. एकदा हातात पुस्तक घेतलं की सोडावसं वाटत नाही.

पवारसाहेब, आपण अत्यंत उंच उडी मारलीत. ज्या समाजात आपण जन्मला, त्या समाजाचे आपण पांग फेडलेत. आम्ही आणि आमच्या पुढील पिढी आपले सदैव ऋणी राहू. आपण दाखवून दिलं की माणसाला जर संधी मिळाली तर तो काय करू शकतो.

ज्या गावी आपण जन्मलात, धन्य त्या गावाची ! आपल्या आईनं आम्हाला एक अत्यंत तेजस्वी रत्न दिलं. या रत्नाकडून आम्हाला पुष्कळ अपेक्षा आहेत. खात्री वाटते की आपण सदैव असेच चमकत राहाणार.

जवळ जवळ सबंध आयुष्य पुण्या-मुंबईत गेल्याने महारांचं दुःख पदरात पडावं तेवढं पडलं नाही पण महारांची काय दुःखं असतात हे काम आपल्या पुस्तकाने चांगलं दाखवलं आहे.

पुस्तक लिहिण्यात आपण प्रचंड धाडस केलं आहे. अगदी महात्मा गांधींपेक्षा अधिक. इतकं मोठं धाडस करण्यासाठी खरोखरच फार मोठं व्यक्तिमत्त्व असावं लागतं.

डॉ. मा. प. मंगुडकर म्हणतात की, "आपल्या पुस्तकास प्रचंड खोली आहे. पुस्तक साहित्यगुणांनी श्रेष्ठ आहे, 'उपरा'पेक्षाही दया पवारांचं पुस्तक उजवं वाटतं."

'आपल्या जातीतल्या मुलांना सवर्णांच्या, त्यातल्यात्यात ब्राह्मणांच्या मुलींविषयी आकर्षण जास्त.' हा आपला एक न्यूनगंड असावा. श्री. भोसले यांचा याच संदर्भात आपण उल्लेख केला असावा. वास्तविक भोसले यांना राग यावयास नको होता, पण मला वाटतं आपण त्यांची परवानगी घेऊन त्यांचं नाव छापलं असतं; तर बरं झालं असतं. मी स्वतः ब्राह्मण मुलीशी लग्न केलेल्यापैकी एक आहे.

पुस्तकात 'दादासाहेबां'चा उल्लेख आहे. हे कोणते दादासाहेब हे कळवू शकाल काय ? एक दादासाहेब गायकवाड, दुसरे दादासाहेब रुपवते व तिसरे दादासाहेब रोहम. त्याचप्रमाणे एका बॅरिस्टराचा उल्लेख आहे. तो मला वाटते श्री. आर. आर. भोळे यांचेविषयी असावा ?

●

रमेश सोनवणे / धुळे

तुमचे 'बलुतं' हे आत्मचरित्र वाचले. दगडू पवारचा जीवनाच्या व्यथा वाचल्या व नंतर महार समाजावर पिढ्यान् पिढ्या झालेल्या दुःखांची अनुभूती आली. हा महार समाज धड आज खेड्यात जगू शकत नाहीच, शहरातही त्याला कोणताच उद्योग किंवा धंदा नाही. तो जगू पण शकत नाही मरू पण शकत नाही. दगडू हा त्या समाजाचा प्रतिनिधी वाटला. तो अस्तित्वात असलेल्या समाजव्यवस्थेचा शिकार आहे.

●

शांताराम जाधव / ठाणे

फार दिवसाने चांगलं पुस्तक हातात पडलं. माझं डोकंच चक्रावून गेलं आणि विचारांच्या आवर्तात मी सुन्न झालो. 'बलुतं' फक्त तुमच्या एकट्याचंच का ? नाही. मनाचो सांगडच घालता येत नाही. मला तर 'बलुतं' तुमच्या एकट्याचं वाटतच नाही, ते तर सर्व दलित समाजाचं आहे.

तुमचा 'दादा'! हो दादाच! तुमच्या दादात आणि माझ्या दादात काडीचाही फरक नव्हता. 'त्यातच' दादा गेले म्हणूनच जीवनाला वेगळे वळण मिळाले. मुंबई जास्तच जवळ करावी लागली...भार सोसावाच लागला. त्याशिवाय तरणोपाय नव्हता.

त्यात तुमची 'आई'...! आई नाही ती साक्षात देवीच...हो आई म्हणजे देवीच! बापाचा काही भरोसा नाही, पण आई लेकरांना कधीही अंतर देणार नाही. सुखात, दुःखात...

एकेक पान पुढे सरकत जातं तसतशी उत्सुकता शिगेला पोहोचते. आज रविवार. आज मटण! पण जेवणावरचे लक्षच उडालेले. आज भूक कुठे पळाली...पण पुस्तक सोडवत नव्हतं.

इतका हुबेहूब वास्तविकपणा, हृदयाचा भेद घेणारा, कशाचीही चाड न ठेवता— तुमच्या जीवनाची झालेली ससेहोलपट, किती हृदयद्रावक आहे.

तुम्ही जीवनाला किती सामोरे गेलात...केवढे हे धैर्य...केवढा हा सोशिकपणा... कळतच नाही!

'बलुत्याचं मुखपृष्ठ' मुळी बोलकं आहे. त्यावरील गोधडीत सगळ्या दलित वर्गाचं, त्यांच्या यातनांचं आणि त्यांच्या जीवनात त्यांना करावी लागणारी जुळवाजुळव...सर्व काही त्या गोधडीच्या अस्तराच्या ठिगळांवरून उमजणाऱ्याला उमजून चुकते.

सगळेच दलितवर्गीय बलुतं लिहिणारी झाली तरच त्यांच्यावरील 'दलित' या शब्दाचं कातडं दूर होईल असं नाही का तुम्हाला वाटत ? पण तो काळ अजून आलेला नाही एवढं नक्की. कारण मी हे पत्र लिहिणारा केवळ पत्रच लिहू शकतो, बलुतं नव्हे.

●

रा. शि. मेश्राम / पेण

ही कादंबरी आपण आपल्या आत्मचरित्रपर लिहून या देशात हजारो वर्षांपासून होत असलेल्या दलितांवरील अन्याय-अत्याचारांचे वाचकांना प्रत्यक्ष दर्शन दिले. या देशात जातिव्यवस्थेचे बंधन समाजाभोवती व मनुष्याभोवती किती घट्ट आवळून बांधले आहेत याची साक्ष होते.

ही कादंबरी लिहून आपण दलित साहित्यात एक मोलाची भर घातली आहे. मी सुरवातीपासून बौद्ध साहित्याचा व दलित साहित्याचा एक वाचक आहे. आपली

कादंबरी मला फार आवडली.

एक मात्र अल्पशी उणीव आपल्या निदर्शनास आणून देण्याची माझी इच्छा आहे. ती म्हणजे आपल्यावर प्रेम करणारी सलमा हिने, आपल्या प्रेमाची भेट म्हणून जी बनियन विणून दिली व त्या बनियनने आपल्या घरची लादी पुसणारी आपली दुसरी प्रियपत्नी सौ. हिरा यांच्याबाबत म्हणजे, सई सोडल्यानंतर आपण हिराशी केव्हा लग्न केलंत? दुसऱ्या लग्नाबाबतची माहिती कादंबरीत वाचण्यात आली नाही. तरी ही माहिती आपण कादंबरीत का दिली नाही, हे कृपया अल्पशा चिठ्ठीत खुलासा लिहून पाठविण्याची कृपा करावी ही विनंती.

•

केशव हंडोरे / ठाणे

'बलुत्या'चा बराच गाजावाजा झाला. अनुकूल-प्रतिकूल वाचण्याच्या ऊर्मिपायी वाचावसं वाटलं. आपल्या माणसानं लिहिलंय म्हणून अधिकच. अनेक ठिकाणी चौकशी करूनही पुस्तक मिळेना आणि तुमचा पत्ताही माहीत नव्हता. दादरला (६ एफ) असलेल्या एका टी. सी.नं बोलण्याच्या ओघात तुमची ओळख सांगितली. 'दया' माझा फार fast friend. माझ्या घराजवळच राहातोय. पैसे देऊनही चार महिन्याच्यावर काळ गेला. पब्लीक आम्हाला 'मामा' म्हणतंय, आणि ह्या माणसानंही मला (एका धंद्यातला आणि जातीचा असूनही) पुरता 'मामा' केलं. आपलेच दात अनू आपलेच ओठ असल्यामुळे मी जास्त आक्रमक होऊ शकलो नाही. आणि ते माझ्या स्वभावातही बसेना. असो. आता उशिरा का होईना, एकदाचं पुस्तक मिळालं आणि वाचून संपविलं.

आपल्या माणसाचं कौतुक आपणच करायला हवं. इतर समाज गेली २।३ हजार वर्षे आपल्याला छळतोय. आताही केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच, तुम्ही जे अनुभवलं ते दाखविण्याचा प्रयत्न केलाय. वास्तवता ही नेहमीच दाहक असते. ती दिसते तशी स्वीकारावयास काहींचं मन धजावत नाही. पण बाबासाहेबांनी स्वतः महार जातीत जन्मल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पण अलिकडे 'महारांनी' जे भोगलंय ते पुढील पिढीला दाखविण्याचा जो एक स्तुत्य प्रयत्न तुमच्यासारखे साहित्यिक करीत आहेत, ते सबलती घेतांना 'महार' आणि इतर वेळी 'तो मी नव्हेच' म्हणणारी मंडळीच त्याला नाक मुरडीत आहेत.

चर्चा करताना एक जण म्हणाला की हे 'दलित साहित्य' लिहून पूर्वीचे मढे उकरून काढायचे कशाला? आता पुढची दिशा दाखविणारं साहित्य हवं. पण आपला 'भूतकाळ' समजल्याशिवाय 'वर्तमाना'तून 'भविष्या'चा वेध कसा घेणार? आपण

जे बघतो, अनुभवतो, ते शब्दबद्ध करणं एवढं एकच कार्य आपल्याला करायचंय. साहित्य हे त्याला आलेलं रूप नंतरचं. मग त्याची वर्गवारी कोणी 'दलित, ललित किंवा पलित' किंवा आणखी कोणत्याही साहित्यात करो. अशिक्षित किंवा सुशिक्षित घटक आधी कर्ता, कर्म आणि क्रियापद योजून बोलत नसतो; तर तो आधी बोलतो आणि मग भाषाशास्त्र, अभ्यासाच्या सोयीसाठी व्याकरणाची निर्मिती करतो. हा प्रकार म्हणजे निरनिराळ्या नद्यांना सागराला भेटायचंय, एकजीव व्हायचंय. मग नदी कोणती होती हे समजणार नाही फक्त जिकडेतिकडे सागरच सागर.

आत्मचरित्र म्हटलं म्हणजे आपल्या जीवनावर ज्या ज्या घटनांचा बराबाईट ठसा उमटला तो दाखविणं. त्यातून समाजानं 'हंसक्षीर' न्यायानं फक्त योग्य त्या घटनेची दखल घेऊन वागण्याचा प्रयत्न करणं. आणि वाईट घटना आपल्या वाट्याला येऊ नये म्हणून प्रयत्नशील राहणं, असं माझं प्रामाणिक मत आहे. लेखकाच्या प्रत्येक मताशी वाचकानं सहमत झालंच पाहिजे असं नाही. मीही आपल्या काही मतांशी सहमत नाही. असं व्हायला नको होतं असं वाटतं पण ते नकळत झालेलं असतं आणि म्हणूनच लेखक ते जगाला सांगत असतो. मी असा गोत्यात आलोय, तुम्ही सावध व्हा. हा क्षणच वाचकानं मनात घट्ट धरायचा असतो. असो.

आता मला एक सूचना करावीशी वाटते, ती म्हणजे तुम्ही दादासाहेब रुपवतेंचा उल्लेख फक्त 'दादासाहेब' असा केलाय. पण त्यामुळे घोटाळा होतोय. (माझं एक सोडा किंवा आपल्या समाजाचंही सोडा; कारण आपण ताबडतोब ओळखतो.) तीन दादासाहेब आहेत. एक दादासाहेब गायकवाड, दुसरे दादासाहेब रोहम आणि तिसरे दादासाहेब रुपवते—तेव्हा पुढील आवृत्तीत जर दादासाहेब रुपवते असं स्पष्ट लिहिलं तरी वाचकांची सोय होईल व समजुतीचा घोटाळाही होणार नाही. माझ्या सूचनेचा विचार होईल असे वाटते.

सध्या 'बलुतं' माझी सौ वाचत आहे. ती कोणत्याही शाळेत शिकलेली नाहीय. लिहिता येत नाही पण वाचू शकते. जोडाक्षरांच्या दगडावर ठेचाळते. मी जवळ असलो तर मलमपट्टी करतो. नाहीतर तसंच रक्ताळलेली ठेच घेऊन वाटचाल करते. मी कामाला लागण्यापूर्वी खेड्यात, डोईवर रानातून जाळण्यासाठी आणलेल्या सरपणांचा भारा आणि खाली बोचरे दगड. पण ती ठेच आता राहिली नाही. पण ती सबब आता कामाला येतेय. पंधरा दिवसात कदाचित वाचून पूर्ण होईल. नंतर तिची प्रतिक्रिया काय आहे ते कळवीन. कारण अनेक 'महारीय' शब्द आल्यामुळे तिला आपण घरातच बोलतोय असं वाटतंय. म्हणून ती वाचतेय. ती फक्त गोष्टी, कादंबऱ्याच वाचते. पण 'बलुतं'चं मात्र वाचन चालू आहे. बघू या काय होतंय ते.

•

पां. शा. शेळके / मुंबई

तसा मी काही नवीन नाही, जुनाच आहे. होय जुनाच. अनंत काळापासून पिढ्यान्-पिढ्या पिचलेला, रंजला-गांजलेला आणि याही पुढे असं म्हणावसं वाटतं की या देशात, या नंतरही कायम अन्यायाच्या, अत्याचाराच्या व बलात्काराच्या जात्याखाली भरडला जाणारा असा. ' बलुतं 'कारास ओळख विचित्र वाटेल. मला एक प्रकारचं आपल्या-बद्दल आकर्षण वाटू लागलंय. आधीच सळसळणारं रक्त ' बलुतं 'च्या वाचनामुळे त्याचा ओघ-वेग आणखीनच वाढू लागलाय.

ओळख लिहायलासुद्धा ' बलुतं 'मुळेच माझ्यामध्ये एक प्रकारची प्रेरणा-शक्ती निर्माण झाली आहे. यामुळे मलाही काही लिहिता यईल, लिहू शकेन असं वाटू लागलंय.

खूप खूप सोसले की एक प्रकारची अलिप्तता येते हे खरं आहे.

दलित चळवळीतील माणसे कितीही मोठी असली तरी ती वाळूच्या ढिगाऱ्यासारखी कोसळतात. कारण त्यांच्यामध्ये मुख्यत्वेकरून भूक आणि लाचारी सामावलेली असावी असे वाटते.

मी एक सुशिक्षित दलित कामगार. दहा महिन्यांच्या संपकाळामध्ये व त्या अगोदर पाच वर्षांच्या काळात, वर्तमानकाळामध्ये घडलेल्या घटनांमुळे मला काही दिव्य लाभल्या-सारखे वाटू लागले आहे.

' बलुतं 'कारास क्षणभर का होईना पण समक्ष पाहावं अशी खूप दिवसांपासूनची इच्छा होती. ह्या आजच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने खास मी माझी इच्छा पुरी करू शकलो. इथून माझी सुरवात आहे. बऱ्याचशा चुका असणारच. ' बलुतं 'कार सागरा-प्रमाणे आहेत.

•

श. दे. सावंत / मुंबई

बलुतं वाचल्यानंतर ' आपल्या समाजाची अब्रू गेली ' अशी प्रतिक्रिया व्यक्त करणारांपैकी मी नाही. बलुतं हे चांगले पुस्तक असून त्यामुळे भारतीय संस्कृतीचे वाभाडे काढले गेले असे अनेकांना सांगणारांपैकी मी एक आहे. परंतु बलुतं ही जुनी गोष्ट झाली असून आता त्यासंबंधी लिहिण्याचे प्रयोजन काय ? त्यास महत्व काय ? फेलोशिप मिळून गौरव झाल्यानंतर अशा पत्राचे महत्त्व किती हे लक्षात घेऊन मी हे पत्र लिहीत आहे. पुस्तक मी अनेक दिवसापूर्वी वाचले. ते माझ्या संग्रही आहे. तेव्हा-पासून आपणास पत्र लिहिण्याची इच्छा होती.

इतक्या दिवसांनी का होईना आपण पत्र वाचाल ही आशा, आणि वाचावे ही विनंती पुन्हा करतो.

•

मला वाटते आपल्या मित्रांमध्ये स्वजातीयांपेक्षा परजातीयच अधिक असावेत. किंबहुना बलुतं लिहिल्यानंतर अनेक स्वजातीय मित्र अकारण दुरावले असणे शक्य आहे. परजातीय मित्र दुरावण्याचे कारण नाही. आपल्या मित्रांविषयी लिहिण्याचे कारण या मंडळींचा आपल्या व्यक्तिमत्त्वावर आणि विचारांवर मोठा परिणाम झाला आहे, असे मला वाटते. मी जे काही आपले लिखाण वाचतो, त्यावरून आपण आंबेडकरांचे अनुयायित्व मानता अथवा नाही याचीच शंका वाटते. आंबेडकरांना एक आदर्श मानणे आणि त्यांचे अनुयायित्व मानणे या दोन गोष्टी भिन्न आहेत. नामदेव ढसाळ आंबेडकरांना आदर्श मानीत असेल; परंतु तो त्यांचा अनुयायी नाही. परंतु आपण स्पष्टपणे मार्क्सवाद स्विकारलेला नाही किंवा आंबेडकरवाद नाकारलेला नाही. अर्थात आपले अत्यंत त्रोटक लिखाण मी वाचतो व त्यामुळे मी या संबंधी अज्ञानी असणे शक्य आहे.

परंतु आंबेडकर अनुयायी म्हटला की त्याच्या लिखाणात डॉ. आंबेडकरांविषयी आदर असीमपणे व्यक्त होत असतो. असा आदर आपल्या लिखाणात दिसून येत नाही. हे सत्य असल्यास हा केवळ आपल्या मित्रमंडळींचा परिणाम होय असे मला वाटते.

आपण बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाचा विचार केला असेलच. बौद्ध धर्म त्यांनी स्विकारला. बौद्ध धर्माशिवाय आंबेडकरवाद नाही. कोणाही व्यक्तीला बौद्धधर्म नाकारून आंबेडकरवादी राहता येणे शक्य नाही. आणि मानवजातीला तहहयात धर्म आवश्यक आहे. 'धर्म आणि मानवी स्वातंत्र्य या दोन गोष्टीमुळेच मानवाच्या मानवपणाला अर्थ आहे' असे डॉ. आंबेडकरांचे विचार होते, हे मी आपणास सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु काही शब्दजड तत्वज्ञान वाचून झाल्यानंतर अनेकांना बाबासाहेबांचे आणि भ. बुद्धांचे, साध्या सरळ भाषेतील तत्त्वविचार त्या केवळ आणि शब्दज्जड विचारांपुढे फिके वाटतात. आणि बाबासाहेबांचे विचार ते जीवनाचा अचूक वेध घेणारे असले तरी आमच्या विद्वानांना स्विकारावेसे वाटत नाहीत. ही बाबासाहेबांची शोकांतिका आहे असे म्हणावेसे वाटते. नाही तरी त्यांच्या अनुयायांची आज जी अवस्था झाली आहे, त्या अवस्थेचा विचार करता ही एक दारुण शोकांतिका ठरली असे वाटते.

परंतु जगासमोर ज्या समस्या आहेत, त्या समस्यातून जग जेव्हा एक एक मार्ग शोधू पाहील, तेव्हा तो मार्ग म्हणजे बुद्धांचाच मार्ग असेल. मात्र त्याला बौद्धमार्ग असे नाव दिले जाईल अथवा दिले जाणार नाही; परंतु कधीतरी ते दिले जाईल अशी अशा वाटते.

परंतु प्रामुख्याने लिहायचे आहे ते आपण बलुतंमध्ये श्री. बी. सी. कांबळे यांच्या-संबंधी जे लिहिले आहे, त्या संबंधी. आपण जे लिहिले आहे ते बी. सी. कांबळे यांच्यासंबंधी लिहिले आहे असे प्रथमदर्शनी वाटत नाही. कारण ते बी. सी. कांबळे

आज राहिलेले नाहीत. त्यांच्यात बदल झाला आहे. मी त्यांच्या सहवासातील माणूस नसलो तरी त्यांच्या स्वभावाविषयी मला संपूर्ण माहिती आहे असे मी म्हणू शकतो. आणि व्यक्तीच्या स्वभावावरून तिची पूर्ण ओळख होतेच असेही नाही.

श्री. बी. सी. कांबळे कधी काळी महत्त्वाकांक्षी होते, असणे शक्य आहे. परंतु त्यांच्या माथी पक्ष फोडल्याचा संपूर्ण दोष जो मारला जातो तो योग्य नव्हे. सर्वांबरोबर ते एक दोषी असतीलही. रिपब्लिकन पक्ष दुभंगला तो संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सभासदत्वाच्या प्रश्नावरून. काही पक्षांनी ही समिती स्थापन केली होती. त्या पक्षाच्या सभासदांनी, समितीचे सभासद होण्याची आवश्यकता नव्हती. परंतु तसा ठराव करण्यात आला आणि बी. सी. कांबळे वगैरेनी त्याला विरोध केला. मला वाटते कांबळे यांचे म्हणणे रास्त होते. सामान्य सभासद हा त्या पक्षाचा सभासद राहील. समितीचा सभासद पक्ष राहील हे रास्त म्हणणे असतानासुद्धा दोष बी सी. कांबळे यांच्या माथी मारला जातो हा एका व्यक्तिवरील अन्याय झाला. त्या वेळी ही समिती कम्युनिस्ट वर्चस्वाखाली होती. पक्ष दुभंगण्यास मला माहीत असलेले हे कारण होय. आपण अज्ञानी असल्यास हा सभासदत्वाचा प्रश्न काय होता याची चौकशी आपणच करावी व काँग्रेस-रिपब्लिकन युतिमुळे रिपब्लिकन पक्ष निम्मा खतम झाला. या आपल्या विधानाच्या संदर्भात आपण विचार करावा. इथे बी. सी. कांबळे यांची दूरदृष्टी दिसून येते. हा प्रश्न बगळून आपण बी. सी. कांबळे यांच्यावर दोन पाने खर्च करावीत हे खेदकारक आहे.

पक्षाच्या आजच्या अवस्थेचा विचार करता श्री. बी. सी. कांबळे यांच्याइतके पक्ष-ऐक्यासाठी अन्य कुणीही उत्सुक नाही. ते व्यासंगी व घटनातज्ञ आहेत. आणि-बाणीच्या वेळी हे सिद्ध झाले आहे. तेथे त्यांची विद्वत्ता अनेकांनी कबूल केली आहे. त्या काळात त्यांनी दाखविलेले धैर्य बाबासाहेबांच्या ब्रिदाला साजेसेच होते. त्यांच्या विचारांपुढे अन्य रिपब्लिकन नेते फिके पडतात. त्यामुळे ते त्यांच्याजवळ येऊ बघत नाहीत. त्यांचा वैयक्तिक स्वार्थ ही गोष्ट आहेच व त्यामुळे रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य होणे अशक्य झाले आहे. आपण याचा अवश्य विचार करा. आपल्या दृष्टीने एक हास्यास्पद विधान करतो की, विचारांची तुलना केली तर बी. सी. कांबळे केनेडींपेक्षा श्रेष्ठ ठरतील. सत्यनिष्ठा व विचारांची उत्तुंगता यात ते केनेडींपेक्षा सरस ठरण्याचा संभव आहे. परंतु त्यांना संधी मिळाली नाही व आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा नाही.

●

महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद / वरळी, मुंबई

मा. श्री. भास्कर चंदावरकर,
'पद्मजा', लॉ कॉलेज रोड,
डेक्कनजवळ, पुणे

यास—

विषय : श्री. दया पवार यांच्या 'बलुतं'वरून चित्रित केलेल्या 'अत्याचार' चित्रपटासंबंधी

महोदय,

श्रीमान दया पवार यांच्या बहुचर्चित 'बलुतं'वरून आपण अत्याचार नावाचा चित्रपट काढलात. सदर चित्रपटाची प्राथमिक चांचणी म्हणून बौद्ध आणि मागास समाजातील काही प्रतिष्ठितांना निमंत्रित करून दि. २० जानेवारी १९८२ रोजी बॉम्बे फिल्म लॅब, प्रभादेवी, मुंबई येथे सदर चित्रपट दाखविलात. निमंत्रितांमध्ये मा. प्रकाश आंबेडकर यांच्यासह मीही होतो.

श्री. दया पवार यांचे १९५८ नंतरचे जीवन माझ्यासमोर आणि माझ्यासहच घडत गेले असल्याने त्यांच्या जीवनातील मी एक जवळचा साक्षीदार आहे. त्यामुळे त्यांच्या 'बलुतं'मधील एकूण कथाभाग समाजाला कसा बदनामीकारक आहे, हानीकारक आहे, अतिशयोक्तीवर आधारलेला आहे, याबद्दलची प्रतिक्रिया मी आणि समाजातील काही मान्यवरांनी वेळोवेळी व्यक्त केलेल्या आहेत.

'बलुतं' बरेच चर्चित झाले असले तरी बौद्ध समाजाने त्यास मुळीच स्विकारलेले नाही, अथवा अन्य समाजातील लोकांनी त्याच्या यशाबद्दल स्वागतही केलेले नाही, याची आपणास कल्पना नाही, अथवा जाणून घेण्याचा कधी प्रयत्नही केलेला नाही. केवळ त्याच्या बाह्य यशावर लक्ष ठेवून, आर्थिक फायद्यांसाठीच त्यावर 'अत्याचार' नावाचा बोलपट तयार केलात असा आमचा आक्षेप आहे.

बरे आपला 'अत्याचार' पाहिल्यानंतर त्यासंबंधी ज्या विकृत भावना तयार होतात – त्यापैकी काही प्रतिक्रिया खालीलप्रमाणे आहेत. या प्रतिक्रिया केवळ आमच्या एकट्याच्याच नसून त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकूण सर्वच समाजाच्या आहेत.

(१) बौद्ध समाजातील नेत्यांची बदनामी.

(२) कालसंगत माहितीचा विपर्यास करून केलेले संकलन.

(३) धर्मांतरापूर्वीचा महार समाज ज्या पद्धतीने जीवन जगत होता, त्याचे विकृत, बदनामीकारक आणि हिडीस चित्रण.

(४) आत्मचरित्रात 'बलुतं'त नसलेल्या गोष्टींचं आणि स्थळांचं अकारण चित्रिकरण.

(५) संपूर्ण चित्रपटच आजचा बौद्ध आणि कालचा अस्पृश्य समाज यांची पद्धतशीरपणे बदनामी करणारा असा आहे.

ही माझी स्वतःची थोडक्यात चित्रपटासंबंधीची प्रतिक्रिया आहे.

यावरून आपणास नम्र विनंती आहे की या चित्रपटावर बौद्ध समाजाचा तीव्र प्रतिकार आणि रोष ओढवू नये यासाठी सदर चित्रपट प्रकाशित करण्यापूर्वी बौद्ध समाजातील खालील मान्यवर नेत्यांना निमंत्रित करून तो दाखविण्यात यावा आणि नंतरच तो प्रकाशित करण्यात यावा.

(१) डॉ. आर. जी. भंडारे, माजी गव्हर्नर बिहार व आंध्र प्रदेश.

(२) माजी खासदार बी. सी. कांबळे, भारतीय रिपब्लिकन पक्ष नेता.

(३) मा. घनःशाम तळवलकर, सेक्रेटरी, पिपल्स एज्युकेशन सोसायटी.

(४) नामदार रा. सु. गवई, सभापती, महाराष्ट्र राज्य विधान परिषद.

(५) खासदार, न्यायमूर्ती आर. आर. भोळे.

(६) मा. राजा ढाले, बौद्ध तरुणांचा नेता.

(७) मा. प्रकाश यशवंत आंबेडकर.

आपला,

टी. पी. आडसूळ,
अध्यक्ष,
महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद

वि. सी. भोसले,
कार्यवाह,
महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद

प्रती — (१) नामदार बाबासाहेब भोसले, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.

(२) नामदार वसंत साठे, माहिती व नभोवाणी मंत्री, भारत सरकार.

(३) चेअरमन, फिल्म सेंसॉर बोर्ड, भारत सरकार, नवी दिल्ली.

(४) श्री. दया पवार, 'बलुतं'चे लेखक.

(५) श्री. गांगल, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

●

निनावी पत्र

कीर्तिच्या शिखरावर आरूढ झालेल्या दया पवार. तुला नदीच्या काळ्या काठावर प्रीतिच्या जगात साधं कुठंच बसता आलं नाही, हे तुझं बलुतं मी ऐकल्यानंतर असं म्हणावसं वाटतं.

कारण की तू बाराच बलुतं न लिहिता, तुझं एकट्याचंच बलुतं लिहिलं आहेस. आणि त्यामध्ये तुझी खलनायकाची भूमिका तू यशस्वीपणे पार पाडली आहेस. ती अशी की, हिंदू धर्मामध्ये, सोळा सहस्र नारी भोगूनी ब्रह्मचारी, असा कृष्ण. ज्याप्रमाणे ऊसातून जावयाचे पण अंगाला उसाचे पाचट लावून घ्यावयाचे नाही. अशी तुझी आत्मचरित्रात भूमिका मला दिसून आली आहे.

दया पवार यास सांगणे की, बऱ्याच दिवसापासून मला तुला काहीतरी सांगावयाचे राहिले होते. आणि ते मी माझ्या संसारात विसरूनसुद्धा गेले होते. परंतु तुझी स्मृती जागृत असल्यामुळे, त्याची आठवण तुला झाली आणि ती आठवण तू लेखणीद्वारे सर्व मराठी वाचकांसमोर मांडलीस.

परंतु तुझंच बलुतं या पुस्तकात पान १७५ वर एक वाक्य असं लिहिलं आहे की : " स्वतःच्या स्त्रीचा साधा संशय जरी आला, तरी केवढं मोठं रामायण घडतं " हे वाक्य तुझ्याच पुस्तकात लिहिलं आहेस. तेव्हा आता ऐक माझं रामायण. माझ्या सुखी संसाराला तू एकाच शब्दामुळे, निष्कारण सुरुंग लावण्याचा प्रयत्न केला आहेस आणि त्या दगडधोंड्यामुळे, माझं अंग ठेचून निघत आहे. त्यामुळे तुला हे लिहिण्याची वेळ आली आहे. नाहीतर आयुष्यात मला तुला पत्र पाठविण्याची काय आवश्यकता होती ?

परंतु तुझ्या पान नं. ८५ वरील जावई प्रकरणामुळे, मला तुला पत्र पाठविण्याची वेळ आली आहे. आणि त्याला कारणही तसंच घडलं. ते कारण असं की माझा नवरा तुझ्याविषयी अधून-मधून गप्पा सांगावयाचा की : एक गरीब घराण्यातील विधवेचा मुलगा. त्याची नेहमी या विज्ञानयुगातसुद्धा किती भरभराट होत आहे. दया पवारचा रेडिओ, टि. व्ही वर कार्यक्रम असतो. ' मरावे परि कीर्तीरूपे उरावे ' असे गुणगान तुझ्याविषयी माझ्याकडे काढावयाचा. व मी सुद्धा तुला आतापर्यंत चांगलाच मानीत आले होते. परंतु तू जे माझ्याविषयी लिहिलं, त्या मुळे किती अनर्थ ओढवला म्हणून सांगू ?

एक वेळ तुझी कविता—माझा कोंबडा कुणी मारीला ? ही मी रेडिओवर लक्षपूर्वक ऐकली होती व माझ्या नवऱ्याजवळ तुझी स्तुती मी गायिली होती. त्यानंतर नवऱ्याची जात, सुतावरून स्वर्ग कसा गाठते, तेच मी आता सांगणार आहे.

बलुतं या पुस्तकात माझ्याविषयी मजकूर आहे, असं माझ्या नवऱ्याला कुणीतरी सांगितलं होतं. तेव्हापासून माझा नवरा माझ्याबरोबर भांडण करावयास लागला. ' तुझ्या लहानपणी तू दया पवार याची काय काय चेष्टा करायचीस ? हे मला आज-आमच्या

लग्नाला २१ वर्षं होत आली आहेत, तेव्हा २१ वर्षांनी मला लोकांचेकडून समजले आहे. तेव्हा तू जे काही खरं असेल ते मला सांग ! ' यावरून दोन तीन महिन्यापासून आमचे एकसारखे झगडे होत आहेत. माझे लग्न झाल्यापासून माझ्या नवऱ्याने मला कधी पाच बोटाने मारले नाही किंवा साधी शिवी दिली नाही.

आज मी चार मुलांची आई झाले तरी बाहेरील कोणतेच काम माहीत नाही. मी माझ्या संसारात सुखाने नांदते आहे. परंतु तुझ्या काहीबाही शब्दामुळे माझ्या संसारात किती विष कालवले म्हणून सांगू !

तू तुझ्या एका संसाराचे संशयामुळे कसे वाटोळे केलेस, हे तुझ्या पुस्तकातच लिहिलं आहेस, हे मला माहीत आहे. तसे माझ्यासुद्धा संसाराचे वाटोळे व्हावे असे तुला वाटत होते काय ? एवढ्यासाठीच तुझ्या पुस्तकात माझी बदनामी केली आहेस काय ? ज्या वेळी मी अज्ञान होते, तेव्हाचे मला काहीसुद्धा आठवत नाही. आणि तू तर मी वयात आले होते असे लिहिलं आहेस. यावरून तुझं आत्मचरित्र किती खरं आहे, याची कल्पना येते !

तुला जर तुझ्या मुलांची जन्मतारीख किंवा लग्न किती साली झालं हे आठवत नाही, असं लिहिलं आहेस—तेव्हा माझ्याच लहानपणची कशी काय आठवण राहिली ? तेव्हा तू तुझी स्मरणशक्ती चांगली जागृत कर. आणि आठवण कर की, तुझे लग्न होईपर्यंत मी एका शब्दाने तुझ्याशी कधी बोलले नाही. मी माझ्या आईबरोबर तुझ्या लग्नाला आले होते. तेव्हा मला आठवण आहे की, त्याच वेळी तू माझ्याशी चेष्टेने दोन शब्द बोलला होतास, एवढीच मला आठवण आहे.

तू कवी आहेस, लेखक आहेस, आणि दुसऱ्या मुलींच्या सांगण्यावरून माझ्याविषयी **तू काहीबाही** हा शब्द वापरला आहेस. तेव्हा माझ्या बरोबरीच्या मुली अजून जिवंत आहेत. त्या काही मेल्या नाहीत. तुझं माझं बोलणं कधी झालं असतं तर मी तू लिहिलेलं कबूल केलं असतं. परंतु तुझे माझे बोलणे, माझं लग्न झाल्यानंतर मी तुझ्याशी जास्त बोलले आहे.

तुला काळी बायको नको होती तर शेवटी तू गोरीगोमटी बायको केलीस. आणि गोऱ्या बायकोने तुझ्याभोवती काय प्रताप केला हे मला चांगलेच माहीत आहे. आणि शेवटी तू कसबे यांचीच, ' रंग गेल्यास पैसे परत ' अशा कोकिळेसारख्या, काळ्या बायकोशीच संसार करीत आहेस.

मला काळी असं लिहिलं आहेस, तेव्हा मला काळीला, तुझ्यापेक्षा चढ असाच नवरा मेटला आहे. तू माझे अगोदर काळीसावळी, नंतर काळी असं वर्णन केलेस, हे मला माही नव्हते. परंतु मुळातच मला तुला नवरा करायचे नव्हते. आणि माझे आईबाप-सुद्धा तुला द्यावयास तयार नव्हते. तेव्हा मी तुला कसा काय नवरा करणार ?

मला पाहण्यासाठी दिवसाला चार-पाच स्थळं येत जात होती. तुला वाटलं की माझ्या-वर लई पाऊस पडलाय !

तुझ्या घराण्याची माझ्या आईबापाला चांगली माहिती होती.

तू लेखक, कवी, कलाकार म्हणून चांगला आहेस. तुझ्या पुस्तकात माझ्याविषयी, काहीबाही, खुदकन हसणें, माझ्या अवतीभोवती फिरणे हे शब्द वापरून तुला असे सुचवावयाचे आहे की, मीच तुझ्यावर प्रेम करीत होते. "आणि मी मात्र तिच्याकडे डोळे वर करून पाहात नसे" या वाक्यावरून काय अर्थबोध होणार? की--मुलगीच दोषी आहे. तेव्हा यावरून कोणत्या पुरुषाला आपल्या बायकोच्या चारित्र्याचा संशय येणार नाही ? याचा तू तुझ्या सद्‌विवेकबुद्धीला स्मरून विचार करावयास पाहिजे होता. हे सर्व अगदी खोटं लिहून, तू आमच्या नवरा-बायकोत भांडण लावून दिले आणि तू मोकळा राहिलास.

मी माझ्या आयुष्यात कोणाची साधी सावलीसुद्धा अंगावर पाडून घेतली नाही. परंतु आता मात्र नवऱ्याचे वाकडेतिकडे बोलणे मला ऐकावे लागत आहे. तेव्हा ते मला म्हणतात की, ' मी तुला आता नेऊन दया पवारकडे घालणार आहे.' तेव्हा मला आता तुझ्या घरी येण्याची पाळी निर्माण झाली आहे. तेव्हा या गोष्टीचा कसा काय निर्णय लावायचा ते तू आता विचारपूर्वक ठरव.

●

र. श. भोळे / मुंबई

दोन-अडीच वर्षांपूर्वी रेडिओसाठी आपली आणि सौ. पवार यांची मुलाखत ध्वनि-मुद्रित केली होती. त्यावेळी मी मुंबईचा (आकाशवाणी) संचालक होतो. आज मी दिल्लीत आणखी वरच्या हुद्यावर आहे. त्यामुळे मध्ये आपली भेट झालीच नाही; तरी पण तुमच्या आणि आणखी काही साहित्यिकांच्या लिखाणासंबंधी मी नेहमीच उत्सुकतेने वाचत असतो, ऐकत असतो. ' बलुतं 'चा उत्तरार्ध आपण लवकरच प्रसिद्ध करणार आहात असं मी ऐकलं. आनंद झाला. ' बलुतं 'ची पहिली आवृत्ती मी दोनदा वाचली. म्हणूनच रेडिओच्या मुलाखतीसाठी मला आपली आठवण झाली. दिल्लीमध्ये त्या मुलाखतीसंबंधी आणि त्या कार्यक्रमासंबंधी बरेच बोलले गेले. बक्षीस मिळाले नसले तरी त्याची चर्चा झाली याबद्दल मला आनंद झाला. श्री. दैठणकर, श्री. जाधव या I. A. S. अधिकाऱ्यांनीसुद्धा त्या कार्यक्रमाबद्दल प्रशंसा व्यक्त केली. त्यातही तुमचा आणि सौ. पवार यांच्या मुलाखतीसंबंधी खूपच आनंद व्यक्त केला.

●

REFBK-0025538